समुत्तस्थौ महाबलः । क्रुद्धश्चाभक्षयत्तेषां शस्त्राणि विविधानि च २५
आस्याद्वमन्पावकं स संवर्तकसमं तदा । तान्सर्वान्नृपतेः पुत्रानदहत्स्वेन
तेजसा २६ मुखजेनाग्निना क्रुद्धो लोकानुद्वर्तयन्निव । क्षणेन राजशार्दूल
पुरेव कपिलः प्रभुः २७ सगरस्यात्मजान्क्रुद्धस्तदद्भुतमिवाभवत् । तेषु
क्रोधाग्निदग्धेषु तदा भरतसत्तम २८ तं प्रबुद्धं महात्मानं कुम्भकर्णमि-
वापरम् । आससाद महातेजाः कुवलाश्वो महीपतिः २९ तस्य वारि
महाराज सुस्राव बहु देहतः । तदापीय ततस्तेजो राजा वारिमयं नृप ३०
योगी योगेन वह्निं च शमयामास वारिणा । ब्रह्मास्त्रेण च राजेन्द्र दैत्यं
क्रूरपराक्रमम् ३१ ददाह भरतश्रेष्ठ सर्वलोकभवाय वै । सोऽस्त्रेण दग्ध्वा
राजर्षिः कुवलाश्वो महासुरम् ३२ सुरशत्रुममित्रघ्नं त्रैलोक्यश इवा-
परः । धुन्धोर्वधात्तदा राजा कुवलाश्वो महामनाः ३३ धुन्धुमार इति
ख्यातो नाम्नाप्रतिरथोऽभवत् । प्रीतैश्च त्रिदशैः सर्वैर्महर्षिसहितैस्तदा ३४

तीक्ष्ण खड्ग ह्याच्या योगानें २४ ते वध करूं लागले असतां तो महाबलाढ्य धुंधु अत्यंत क्रुद्ध होऊन तेथून उठला व क्रुद्ध झाल्यावर त्यांची नानाप्रकारची शस्त्रं त्यानें भक्षण करून टाकिली २५ इतकेंच नव्हे; परंतु, प्रलयकालच्या संवर्तकाग्निप्रमाणें मुखांतून अग्नि बाहेर टाकित असलेल्या त्या धुंधूनें आपल्या तेजाच्या योगानें कुवलाश्वराजाचे ते सर्व पुत्र दग्ध करून टाकिले २६. हे नृपश्रेष्ठा युधिष्ठिरा, पूर्वी प्रभु कपिलानें क्रुद्ध होऊन ज्याप्रमाणें सागराचे पुत्र एका क्षणांत दग्ध करून टाकिले त्याप्रमाणें क्रुद्ध झालेला तो धुंधु मुखांतून निघालेल्या अग्नीच्या योगानें लोकांचा उच्छेद करूं लागला व हें एक अद्भुतच वाटूं लागलें. असो. हे भरतवंशजश्रेष्ठा युधिष्ठिरा, धुंधूच्या क्रोधाग्नीनें ते पुत्र दग्ध झाले असतां २७,२८ जागा झालेला दुसरा कुंभकर्णच की काय अशा त्या महात्म्या धुंधूला महातेजस्वी कुवलाश्वराजानें गांठिलें २९. त्या वेळीं, हे महाराजा युधिष्ठिरा, त्या धुंधूच्या देहांतून पुष्कळच उदक वाहूं लागलें. तथापि, हे राजा, तें उदकमय तेज पिऊन टाकून त्या योगी कुवलाश्वराजानें योगजन्य उदकाच्या योगानें अग्निही शांत केला आणि, हे राजाधिराज भरतवंशजश्रेष्ठा युधिष्ठिरा, भयंकर पराक्रम करणाऱ्या त्या दैत्याचा सर्व लोकांच्या हिताकरितां ब्रह्मास्त्राच्या योगानें त्यानें वध केला. ह्याप्रमाणें त्या कुवलाश्वराजर्षीनें प्रतिपक्ष्याचा नाश करणाऱ्या त्या देवशत्रु महादैत्याला अस्त्रानें दग्ध करून टाकिल्यावर तो दुसरा त्रैलोक्याधिपति इंद्रच कीं काय असा शोभूं लागला. धुंधूचा वध हातून झाल्यामुळें उदार मनानें युक्त असलेला तो कुवलाश्वराजा ३०,३१,३२,३३ धुंधुमार म्हणून प्रसिद्ध झाला आणि अप्रतिरथ

वरं वृणीष्वेत्युक्तः स प्राञ्जलिः प्रणतस्तदा । अतीव मुदितो राजन्निदं वचनमब्रवीत् ३५ दद्यां वित्तं द्विजाग्र्येभ्यः शत्रूणां चापि दुर्जयः । सख्यं च विष्णुना मे स्याद्भूतेष्वद्रोह एव च ॥ धर्मे रतिश्च सततं स्वर्गे वासस्तथाक्षयः ३६ तथास्त्विति ततो देवैः प्रीतैरुक्तः स पार्थिवः । ऋषिभिश्च सगन्धर्वैरुत्तङ्केन च धीमता ३७ संभाष्य चैनं विविधैराशीर्वादैस्ततो नृप । देवा महर्षयश्चापि स्वानि स्थानानि भेजिरे ३८ तस्य पुत्रास्त्रयः शिष्टा युधिष्ठिर तदाभवन् । दृढाश्वः कपिलाश्वश्च चन्द्राश्वश्चैव भारत ३९ तेभ्यः परंपरा राजन्निक्ष्वाकूणां महात्मनाम् । वंशस्य सुमहाभाग राज्ञाममिततेजसाम् ४० एवं स निहतस्तेन कुवलाश्वेन सत्तम । धुन्धुर्नाम महादैत्यो मधुकैटभयोः सुतः ४१ कुवलाश्वश्च नृपतिर्धुन्धुमार इति स्मृतः । नाम्ना च गुणसंयुक्तस्तदाप्रभृति सोऽभवत् ४२ एतत्ते सर्वमाख्यातं यन्मां त्वं परिपृच्छसि । धौन्धुमारमुपाख्यानं प्रथितं यस्य कर्मणा ४३ इदं तु पुण्यमाख्यानं विष्णोः समनुकीर्तनम् । शृणुयाद्यः स धर्मात्मा पुत्रवांश्च भवेन्नरः ४४ आयुष्मान्भूतिमांश्चैव श्रुत्वा भवति

असें त्याचें नांव पडलें. नंतर महर्षींसहवर्तमान सर्व देव प्रसन्न होऊन ३४ "वर माग." ह्मणून त्याला ह्मणाले असतां, हे राजा, अत्यंत आनंदित झालेला तो कुवलाश्व हात जोडून व नम्र होऊन त्यांना ह्मणाला ३५ "मीं शत्रूंना अजिंक्य असावें, माझ्या हातून द्विजश्रेष्ठांना द्रव्य दिलें जावें, विष्णूशीं माझें सख्य व्हावें, प्राणिमात्रांशीं माझा द्रोह नसावा, धर्माविषयीं माझी नेहमीं तत्परता असावी आणि स्वर्गामध्यें माझें अक्षय्य वास्तव्य व्हावें ३६." ह्यावर 'ठीक आहे.' ह्मणून विचारी उत्तंक व गंधर्व ह्यांसहवर्तमान ऋषींनीं आणि देवांनीं प्रसन्न होऊन त्या राजाला सांगितलें ३७ आणि, हे राजा युधिष्ठिरा, नानाप्रकारचे आशीर्वाद त्याला देऊन ते देव व महर्षि आपआपल्या स्थानांकडे निघून गेले ३८. हे भरतकुलोत्पन्ना युधिष्ठिरा, दृढाश्व, कपिलाश्व आणि चंद्राश्व असे तीन पुत्र त्या वेळीं त्याचे शिलक राहिले होते ३९ आणि त्यांच्यापासूनच, हे महाभाग्यवान् राजा, अपरिमित तेजानें युक्त असलेल्या महात्म्या इक्ष्वाकुराजाच्या वंशाची परंपरा सुरू राहिली ४०. ह्याप्रमाणें, हे सज्जनश्रेष्ठा युधिष्ठिरा, त्या कुवलाश्वानें मधुकैटभांचा पुत्र जो महादैत्य धुंधु त्याचा वध केला ४१ आणि तेव्हांपासून कुवलाश्वराजा धुंधुमार ह्या नांवानें प्रसिद्ध होऊन अप्रतिरथ ही पदवी त्याला प्राप्त झाली ४२. असो. तुझ्या विचारणेंत आलेलें व कुवलाश्वराजाच्या पराक्रमामुळें प्रसिद्ध असलेलें हें धुंधुमारसंबंधीं उपाख्यान मीं सर्व तुला कथन केलें आहे ४३.

पर्वसु । न च व्याधिभयं किंचित्प्राप्नोति विगतज्वरः ४५ [८१५७] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां ० मारण्यके पर्वणि मार्कण्डेयसमास्यापर्वणि धुन्धुमारोपाख्याने चतुरधिकद्विशततमोऽध्यायः ॥२०४॥

वैशम्पायन उवाच ॥ ततो युधिष्ठिरो राजा मार्कण्डेयं महाद्युतिम् । पप्रच्छ भरतश्रेष्ठ धर्मप्रश्नं सुदुर्विदम् १ श्रोतुमिच्छामि भगवन्स्त्रीणां माहात्म्यमुत्तमम् । कथ्यमानं त्वया विप्र सूक्ष्मं धर्म्यं च तत्त्वतः २ प्रत्यक्षमिह विप्रर्षे देवा दृश्यन्ति सत्तम । सूर्याचन्द्रमसौ वायुः पृथिवी वह्निरेव च ३ पिता माता च भगवान्गुरुरेव च सत्तम । यच्चान्यदेव विहितं तच्चापि भृगुनन्दन ४ मान्या हि गुरवः सर्वे एकपत्न्यास्तथा स्त्रियः । पतिव्रतानां शुश्रूषा दुष्करा प्रतिभाति मे ५ पतिव्रतानां माहात्म्यं वक्तुमर्हसि नः प्रभो । निरुध्य चेन्द्रियग्रामं मनः संरुध्य चानघ ६ पतिं दैवतवच्चापि चिन्तयन्त्यः स्थिता हि याः । भगवन्दुष्करं त्वेतत्प्रतिभाति मम प्रभो ७ मातापित्रोश्च शुश्रूषा स्त्रीणां भर्तरि च द्विज । स्त्रीणां धर्मा-

---

विष्णुस्तवनरूप हें पवित्र आख्यान जो पुरुष श्रवण करील तो धर्मात्मा व पुत्रवान् होईल ४४ आणि पर्वदिवशीं हें आख्यान श्रवण केलें असतां पुरुष चिरंजीवी, ऐश्वर्यवान् व व्याधिरहित होईल आणि त्याला कसलीही चिंता रहाणार नाहीं ४५. ह्याप्रमाणें महामुनिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील मार्कंडेयसमास्यापर्वापैकीं धुंधुमारोपाख्यानाविषयीं दोनशें चवथा अध्याय समाप्त झाला ॥ २०४ ॥

वैशंपायन सांगतातः— हे भरतवंशजश्रेष्ठा जनमेजया, तदनंतर युधिष्ठिरराजा समजण्यास फारच कठिण असा एक धर्मविषयक प्रश्न विचारण्याच्या उद्देशानें महातेजस्वी मार्कंडेयमुनींना ह्मणाला १ " हे भगवन्, हे विप्र, आपल्या मुखांतून सूक्ष्म, तत्त्वतः धर्माला धरून असलेलें व उत्कृष्ट असें स्त्रियांचें माहात्म्य श्रवण करण्याची माझी इच्छा आहे २. हे ब्रह्मर्षे, हे सज्जनश्रेष्ठ,— सूर्य व चंद्र, वायु, पृथ्वी, अग्नि, पिता, माता, आणि भगवान् गुरु—हे देव ह्या भूतलावर प्रत्यक्ष दृष्टीं पडणारे आहेत आणि, हे सज्जनश्रेष्ठा भृगुनंदना, देव ह्मणून आणखी जे कांहीं अतिथि वगैरे श्रुतींमध्यें सांगितले आहेत तेही ह्या भूतलावर प्रत्यक्ष दृष्टीं पडत आहेत ३,४. हे सर्वही गुरु आणि त्याचप्रमाणें (काया, वाचा, मनेंकरून) एकाच पतीचें अवलंबन करणाऱ्या स्त्रिया मान्य आहेत; परंतु, पतिव्रता स्त्रियांची पतिशुश्रूषा मला फारच दुर्घट वाटत आहे ५. ह्याकरितां, हे प्रभो, पतिव्रता स्त्रियांचे माहात्म्य आपण आह्माला कथन करा. हे निष्पाप प्रभो, सर्व इंद्रियें व मन ह्यांचा निरोध करून मुख्य दैवताप्रमाणें पतीचेंच चिंतन

स्सुघोराद्धि नान्यं पश्यामि दुष्करम् ८ साध्व्याचाराः स्त्रियो ब्रह्मन्यत्कु-
र्वन्ति सदादृताः । दुष्करं खलु कुर्वन्ति पितरं मातरं च वै ९ एकपत्न्यश्च
या नार्यो याश्च सत्यं वदन्त्युत । कुक्षिणा दशमासांश्च गर्भं संधारयन्ति
याः १० नार्यः कालेन संभूय किमद्भुततरं ततः । संशयं परमं प्राप्य
वेदनामतुलामपि ११ प्रजायन्ते सुतान्नार्यो दुःखेन महता विभो । पुष्णन्ति
चापि महता स्नेहेन द्विजपुङ्गव १२ ये च क्रूरेषु सर्वेषु वर्तमाना जुगु-
प्सिताः । स्वकर्म कुर्वन्ति सदा दुष्करं तच्च मे मतम् १३ क्षत्रधर्मसमाचा-
रतत्त्वं व्याख्याहि मे द्विज । धर्मः सुदुर्लभो विप्र नृशंसेन महात्मनाम् १४
एतदिच्छामि भगवन्प्रश्नं प्रश्नविदां वर । श्रोतुं भृगुकुलश्रेष्ठ शुश्रूषे तव
सुव्रत १५ मार्कण्डेय उवाच । हन्त तेऽहं समाख्यास्ये प्रश्नमेतं सुदुर्वचम् ।
तत्त्वेन भरतश्रेष्ठ गदतस्तन्निबोध मे १६ मातॄस्तु गौरवादन्ये पितॄनन्ये

करून पतिव्रता राहिलेल्या असतात; हें, हे भगवन्, मला मोठें कठिण दिसतें ६,७. पुत्रांच्या हातून होणारी मातापितरांची शुश्रूषा आणि स्त्रियांच्या हातून होणारी भर्त्याची शुश्रूषा ह्या दोन्ही गोष्टी जरी कठिण आहेत तरी, हे द्विज, अत्यंत दुर्घट अशा स्त्रीधर्मापेक्षां दुसरा कोणताही धर्म मला कठीण दिसत नाहीं ८. हे ब्रह्मनिष्ठ, सदाचरणसंपन्न स्त्रिया आदरपूर्वक जें वर्तन पतीशीं करीत असतात आणि तसेंच सदाचरणसंपन्न पुरुषही जें वर्तन मनापासून आपल्या मातापितरांशीं करीत असतात तें खरोखर दुर्घट आहे ९. एका पतीलाच दैवत मानणाऱ्या, कसाही प्रसंग आला तरी सत्य भाषण करणाऱ्या आणि उदरामध्यें दहा महिनेपर्यंत गर्भ धारण करणाऱ्या स्त्रिया यांचें वर्तन खरोखर दुर्घट आहे १०. हे प्रभो, हे द्विजश्रेष्ठ, योग्य कालीं पतीशीं समागम करून आणि प्रसूतिकालीं अनुपम वेदना व पराकाष्ठेचें दुःख प्राप्त करून घेऊन मोठ्या कष्टानें स्त्रिया पुत्रांना जन्म देतात आणि मोठ्या प्रेमानें त्यांचें पोषण करितात ह्यापेक्षां जास्त अद्भुत गोष्ट ती कोणती ? ११, १२. त्याचप्रमाणें नेहमीं सर्व प्रकारच्या क्रूर कर्मांमध्यें असलेले आणि ह्मणूनच निंद्य झालेले ते लोक नेहमीं स्वकर्म करीत असतात तेंही दुर्घट आहे असें मला वाटतें १३. ह्यास्तव, हे द्विज, क्षत्रधर्माच्या आचरणाचें तत्त्वही आपण मला कथन करा. कारण, हे विप्र, निंद्य पुरुषाला महात्म्यांचा धर्म प्राप्त होणें अत्यंत कठीण आहे १४. तस्मात्, हे भगवन्, हे प्रश्नवेत्त्यांमध्यें श्रेष्ठ, हे भृगुकुलश्रेष्ठ, हे सदाचरणसंपन्न, आपल्या मुखांतून ह्या प्रश्नाचें उत्तर श्रवण करण्याची माझी इच्छा आहे " १५. मार्कंडेय ह्मणतातः—हे भरतवंशजश्रेष्ठा युधिष्ठिरा, ह्या अत्यंत कठीण प्रश्नाचें उत्तर मी तुला खरें

तु मेनिरे । दुष्करं कुरुते माता विवर्धयति या प्रजाः १७ तपसा देवते-
ज्याभिर्वन्दनेन तितिक्षया । अभिचारैरुपायैश्चापीहन्ते पितरः सुतान् १८
एवं कृच्छ्रेण महता पुत्रं प्राप्य सुदुर्लभम् । चिन्तयन्ति सदा वीर कीदृशोयं
भविष्यति १९ आशंसते हि पुत्रेषु पिता माता च भारत । यशः कीर्ति-
मथैश्वर्यं प्रजा धर्मं तथैव च २० तयोराशां तु सफलां यः करोति स
धर्मवित् २१ पिता माता च राजेन्द्र तुष्यतो यस्य नित्यशः । इह प्रेत्य
च तस्याथ कीर्तिर्धर्मश्च शाश्वतः २२ नैव यज्ञक्रियाः काश्चिन्न श्राद्धं
नोपवासकम् । या तु भर्तरि शुश्रूषा तया स्वर्गं जयत्युत २३ एतत्प्रक-
रणं राजन्नधिकृत्य युधिष्ठिर । पतिव्रतानां नियतं धर्मं चावहितः शृणु २४
[८१८१] इति श्रीमहाभारते० मारण्यके पर्वणि मार्कण्डेयसमास्यापर्वणि पतिव्रतोपाख्याने पञ्चाधिकद्विशततमोऽध्यायः ॥ २०५ ॥

मार्कण्डेय उवाच ॥ कश्चिद्द्विजातिप्रवरो वेदाध्यायी तपोधनः ।
तपस्वी धर्मशीलश्च कौशिको नाम भारत १ साङ्गोपनिषदो वेदानधीत

खरें कथन करितों; तूं श्रवण कर १६. कोणी मातांना श्रेष्ठ समजतात आणि कोणी पित्यांना श्रेष्ठ समजतात; कारण, संतति लहानाची मोठी करणें हें दुर्घट कृत्य माता करीत असते १७ आणि पितेही देवांना उद्देशून केलेले यज्ञयाग, वंदन, सहिष्णुता आणि क्रूर उपाय यांच्या योगानें पुत्राची इच्छा करीत असतात १८. इतकेंच नव्हे; परंतु, ह्याप्रमाणें अत्यंत दुर्लभ असा पुत्र मोठ्या कष्टानें प्राप्त झाल्यावरही, हे वीरा युधिष्ठिरा, हा कसा निघेल ह्मणून सर्वदां ते चिंतन करीत असतात १९. हे भरतकुलोत्पन्ना युधिष्ठिरा, पुत्रापासून आपणाला यश, कीर्ति, ऐश्वर्य, कुलसंतति आणि धर्म प्राप्त होईल अशी मातापितर आशा करीत असतात २०. ही त्यांची आशा जो सफल करितो तो धर्मवत्ता होय २१. हे राजाधिराज, ज्याच्यावर मातापितर नेहमीं संतुष्ट असतात त्याची इहलोकीं व परलोकीं कीर्ति होऊन त्याला अक्षय्य पुण्य प्राप्त होत असतें २२. कोणत्याही यज्ञयागादि क्रिया, श्राद्ध आणि उपवास स्त्रियांना स्वर्गप्राप्तीला उपयोगीं पडत नाहींत. पतीच्या ठिकाणीं त्यांची जी शुश्रूषा तिच्याच योगानें त्यांनां स्वर्गप्राप्ति होते २३. हे राजा युधिष्ठिरा, ह्या प्रकरणालाच धरून असलेला पतिव्रतांचा नियत धर्म तूं आतां लक्ष्यपूर्वक श्रवण कर २४. ह्याप्रमाणें महामुनिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील मार्कंडेयसमास्यापर्वांपैकीं पतिव्रतोपाख्यानसंबंधीं दोनशें पांचवा अध्याय समाप्त झाला ॥ २०५ ॥

मार्कंडेय सांगतातः—हे भरतकुलोत्पन्ना युधिष्ठिरा, कौशिक ह्मणून कोणी एक धर्म-

द्विजसत्तमः । स वृक्षमूले कस्मिंश्चिद्वेदानुच्चारयन्स्थितः २ उपरिष्टाच्च वृक्षस्य बलाका संन्यलीयत । तया पुरीषमुत्सृष्टं ब्राह्मणस्य तदोपरि ३ तामवेक्ष्य ततः क्रुद्धः समपध्यायत द्विजः । भृशं क्रोधाभिभूतेन बलाका सा निरीक्षिता ४ अपध्याता च विप्रेण न्यपतद्धरणीतले । बलाकां पतितां दृष्ट्वा गतसत्त्वामचेतनाम् ५ कारुण्यादभिसंतप्तः पर्यशोचत तां द्विजः । अकार्यं कृतवानस्मि रोषरागबलात्कृतः ६ मार्कण्डेय उवाच ॥ इत्युक्त्वा बहुशो विद्वान्ग्रामं भैक्ष्याय संश्रितः । ग्रामे शुचीनि प्रचरन्कुलानि भरतर्षभ । प्रविष्टस्तत्कुलं यत्र पूर्वं चरितवांस्तु सः ७ देहीति याचमानोऽसौ तिष्ठेत्युक्तः स्त्रिया ततः । शौचं तु यावत्कुरुते भाजनस्य कुटुम्बिनी ८ एतस्मिन्नन्तरे राजन्क्षुधासंपीडितो भृशम् । भर्ता प्रविष्टः सहसा तस्या भरतसत्तम ९ सा तु दृष्ट्वा पतिं साध्वी ब्राह्मणं व्यवहाय तम् । पाद्यमाचमनीयं वै ददौ भर्तुस्तथासनम् १० प्रह्वा पर्यचरच्चापि भर्तारमसित-

---

शील ब्राह्मण तपस्वी व वेदाध्ययन करणारा असे आणि तप हेंच आपलें धन मानीत असे १. तो द्विजश्रेष्ठ उपनिषदं आणि शिक्षाप्रभृति अंगें ह्यांसहवर्तमान वेदाध्ययन करीत असे. एकदां एका वृक्षाच्या मुळाशीं तो वेदाध्ययन करीत बसला असतांना २ त्या वृक्षावर एक बगळी बसली होती. तिनें ह्या ब्राह्मणावर विष्ठा टाकिली ३. तेव्हां तिच्याकडे पाहून ब्राह्मण क्रुद्ध झाला आणि मनामध्यें त्यानें तिच्याबद्दल वाईट बुद्धि आणिली. क्रोधानें अत्यंत व्याप्त होऊन ब्राह्मणानें त्या बगळीकडे पाहिलें असल्यामुळें आणि मनामध्यें तिच्यासंबंधानें वाईट बुद्धि आणिली असल्यामुळें ती बगळी एकाएकीं भूतलावर पडली. तेव्हां गतप्राण आणि ह्मणूनच निश्चेष्ट पडलेली ती बगळी अवलोकन करून ४, ५ करुणेनें ब्राह्मण अगदीं द्रवून गेला आणि "रोष व राग यांच्या तावडींत सांपडून मीं हें अकार्य केलें." अशा प्रकारें त्या बगळीबद्दल शोक करूं लागला ६. मार्कंडेय ह्मणतातः—ह्याप्रमाणें वारंवार शोक केल्यानंतर तो ब्राह्मण भिक्षा मागण्याकरितां गावांत गेला आणि, हे भरतवंशजश्रेष्ठा युधिष्ठिरा, गांवांतील शुद्ध शुद्ध घरांमध्यें भिक्षेला हिंडतां हिंडतां पूर्वी जेथें नेहमीं जात असे अशा एका घरांत तो शिरला ७. "भिक्षा घाला" असें हा ह्मणत असतांना "उभे रहा." असें घरांतील स्त्रीनें सांगितलें आणि ती स्त्री भिक्षा घालण्याकरितां शुचिर्भूत होत आहे ८ तों इतक्यांत, हे भरतवंशजश्रेष्ठा राजा युधिष्ठिरा, तिचा भर्ता क्षुधेनें अतिशय व्याकुल होऊन एकाएकीं गृहामध्यें प्रविष्ट झाला ९. तेव्हां पति अवलोकन करितांक्षणीं त्या ब्राह्मणाकडे दुर्लक्ष्य करून त्या साध्वीनें पतीला पाद्य, आचमनीय व आसन दिलें १० आणि

क्षणा। आहारेणाथ भक्ष्यैश्च भोज्यैः सुमधुरैस्तथा ११ उच्छिष्टं भाविता
भर्तुर्भुङ्क्ते नित्यं युधिष्ठिर। दैवतं च पतिं मेने भर्तुश्चित्तानुसारिणी १२
कर्मणा मनसा वाचा नान्यचित्ताभ्यगात्पतिम्। तं सर्वभावोपगता पति-
शुश्रूषणे रता १३ साध्वाचारा शुचिर्दक्षा कुटुम्बस्य हितैषिणी। भर्तु-
श्चापि हितं यत्तत्सततं सानुवर्तते १४ देवतातिथिभृत्यानां श्वश्रूश्वशुर-
योस्तथा। शुश्रूषणपरा नित्यं सततं संयतेन्द्रिया १५ सा ब्राह्मणं तदा
दृष्ट्वा संस्थितं भैक्ष्यकाङ्क्षिणम्। कुर्वती पतिशुश्रूषां सस्माराथ शुभे-
क्षणा १६ व्रीडिता साभवत्साध्वी तदा भरतसत्तम। भिक्षामादाय विप्राय
निर्जगाम यशस्विनी १७ ब्राह्मण उवाच॥ किमिदं भवति त्वं मां तिष्ठेत्युक्त्वा
वराङ्गने। उपरोधं कृतवती न विसर्जितवत्यसि १८ मार्कण्डेय उवाच॥
ब्राह्मणं क्रोधसंतप्तं ज्वलन्तमिव तेजसा। दृष्ट्वा साध्वी मनुष्येन्द्र सान्त्व-
पूर्वं वचोऽब्रवीत् १९ इत्युवाच॥ क्षन्तुमर्हसि मे विद्वन्भर्ता मे दैवतं महत्।

कृष्णवर्ण नेत्रांनीं युक्त असलेली ती साध्वी नम्र होऊन भर्त्याची शुश्रूषा करूं लागली आणि अत्यंत मधुर अशा भक्ष्य व भोज्य पदार्थांनीं युक्त असलेलें भोजन तिनें पतीला घातलं ११. हे युधिष्ठिरा, भर्त्याच्या मनाप्रमाणें वागणारी ती स्त्री पति हेंच मुख्य दैवत मानीत असे आणि आपल्या पतीचें उच्छिष्ट नेहमीं भक्षण करीत असे १२. काया, वाचा, मनेंकरून ती पतीचीच शुश्रूषा करीत असे आणि दुसरीकडे तिचें लक्ष्यच नसे. सारांश, पतिशुश्रूषेविषयीं तत्पर असलेली ती स्त्री अगदीं मनापासून फक्त त्या पतीचेंच सेवन करीत असे १३. गृहकार्याविषयीं दक्ष, कुटुंबाचें हित पहाणारी, सदाचरणसंपन्न व शुद्ध असलेली ती साध्वी भर्त्याला हितावह जी गोष्ट ती करण्याविषयीं एकसारखीं तत्पर असे १४. नेहमीं जितेंद्रिय राहून देवता, अतिथि व सेवकजन आणि त्याचप्रमाणें सासू व सासरा ह्यांच्या शुश्रूषेविषयीं ती सर्वदां दक्ष असे १५. असो. ह्याप्रमाणें शुभ दर्शनें युक्त असलेली साध्वी पतीची शुश्रूषा करीत असतांना भिक्षेकरितां उभ्या राहिलेल्या ब्राह्मणाकडे सहज दृष्टि गेल्यामुळें तिला (भिक्षा घालण्याचें) स्मरण झालें १६. तेव्हां, हे भरतवंशजश्रेष्ठा युधिष्ठिरा, ती यशस्विनी साध्वी लज्जित झाली आणि भिक्षा घेऊन ती ब्राह्मणाला घालण्याकरितां गेली १७. ब्राह्मण, ह्मणाला 'हे भाग्यवती बाई, हें काय ?' थांबा.' असें मला सांगून तूं माझा खोळंबा मात्र केलास; माझी सुटका केली नाहींस १८.' मार्कंडेय सांगतात:—हे राजा, तेजानें जसा कांहीं जळत असलेला तो ब्राह्मण क्रोधानें संतप्त झाला आहे असें आढळून येतांक्षणीं सांत्वनपूर्वक ती साध्वी त्याला ह्मणाली १९ " हे ज्ञानसंपन्न, आपण मला क्षमा करा. पति हेंच

स चापि क्षुधितः श्रान्तः प्राप्तः शुश्रूषितो मया २० ब्राह्मण उवाच ॥ ब्राह्मणा न गरीयांसो गरीयांस्ते पतिः कृतः । गृहस्थधर्मे वर्तन्ती ब्राह्मणानवमन्यसे २१ इन्द्रोप्येषां प्रणमते किं पुनर्मानवो भुवि । अवलिप्ते न जानीषे वृद्धानां न श्रुतं त्वया २२ ब्राह्मणा ह्यग्निसदृशा दहेयुः पृथिवीमपि । स्त्र्युवाच ॥ नाहं बलाका विप्रर्षे त्यज क्रोधं तपोधन २३ अनया क्रुद्धया दृष्ट्या क्रुद्धः किं मां करिष्यसि । नावजानाम्यहं विप्रान्देवैस्तुल्यान्मनस्विनः २४ अपराधमिमं विप्र क्षन्तुमर्हसि मेनघ । जानामि तेजो विप्राणां महाभाग्यं च धीमताम् २५ अपेयः सागरः क्रोधात्कृतो हि लवणोदकः । तथैव दीप्ततपसां मुनीनां भावितात्मनाम् २६ येषां क्रोधाग्निरद्यापि दण्डके नोपशाम्यति । ब्राह्मणानां परिभवाद्वातापिः सुदुरात्मवान् २७ अगस्त्यमृषिमासाद्य जीर्णः क्रूरो महासुरः । बहुप्रभावाः श्रूयन्ते ब्राह्मणानां महात्मनाम् २८ क्रोधः सुविपुलो ब्रह्मन्प्रसा-

---

माझें मोठें दैवत आहे. तेव्हां तो थकून भागून भुकेलेला घरीं आल्यामुळें प्रथमतः मला त्याची शुश्रूषा करणें भाग पडलें " २०. ब्राह्मण ह्मणतो:—हॅं: ! हॅं: ! ब्राह्मण तुला मोठें नाहींत ? ब्राह्मणापेक्षां तूं पतीलाच मोठा समजत आहेस ? आणि गृहस्थाश्रमामध्यें रहात असतांना ब्राह्मणांचा अपमान करीत आहेस ?२१. इंद्रसुद्धां ब्राह्मणांना प्रणाम करीत आहे, मग ह्या भूतलावरील मनुष्याची ती कथा काय? परतु, हे गर्विष्ठे स्त्रिये, हें तुला समजत नाहीं काय ? अथवा वृद्धांपासूनही तूं कधीं ऐकिलें नाहींस काय ? २२. ब्राह्मण हे अग्नितुल्य आहेत; ते पृथ्वीलाही दग्ध करून टाकतील (हें तूं पक्कें लक्ष्यांत ठेव.) स्त्री ह्मणते:—हे ब्रह्मर्षे, हे तपोधना, आपण हा क्रोध सोडून द्या; मी बगळी नव्हे २३. आपण क्रुद्ध झाला आहां हें खरें; परंतु, ह्या आपल्या सक्रोध दृष्टीनें आपण माझें काय करणार आहांत ? देवतुल्य विचारी ब्राह्मणांचा मी कधींही अवमान करीत नाहीं २४. तस्मात्, हे निष्पाप विप्र, आपण ह्या अपराधाची मला क्षमा करा. मी बुद्धिमान् ब्राह्मणांचें तेज व माहात्म्य जाणीत आहें २५. क्रोधानें सागराचें उदक खारट करून टाकून तो ब्राह्मणांनीं पिण्यास निरुपयोगीं करून टाकिला; त्याचप्रमाणें उज्ज्वल तपश्चर्येनें व शुद्ध अंतःकरणानें युक्त असलेल्या मुनींचा २६ क्रोध अद्यापि दंडकारण्यांमध्यें शांत होत नाहीं; ब्राह्मणांचा अवमान केल्यामुळें अत्यंत दुरात्मा वातापिसंज्ञक २७ क्रूर महादैत्य अगस्त्यमुनींकडे गेला असतां तो त्यांच्या उदरामध्यें जिरून गेला वगैरे प्रकारचें अनेक प्रभाव माहात्म्यां ब्राह्मणांचें मांझें ऐकण्यांत आहेत २८. परंतु, हे ब्रह्मन्, माहात्म्या ब्राह्मणांचें

दश्च महात्मनाम् । अस्मिंस्त्वतिक्रमे ब्रह्मन्क्षन्तुमर्हसि मेनघ २९ पति-
शुश्रूषया धर्मो यः स मे रोचते द्विज । दैवतेष्वपि सर्वेषु भर्ता मे दैवतं
परम् ३० अविशेषेण तस्याहं कुर्यां धर्मं द्विजोत्तम । शुश्रूषायाः फलं
पश्य पत्युर्ब्राह्मण यादृशम् ३१ बलाका हि त्वया दग्धा रोषात्तद्विदितं
मया । क्रोधः शत्रुः शरीरस्थो मनुष्याणां द्विजोत्तम ३२ यः क्रोधमोहौ
त्यजति तं देवा ब्राह्मणं विदुः । यो वदेदिह सत्यानि गुरुं संतोषयेत
च ३३ हिंसितश्च न हिंसेत तं देवा ब्राह्मणं विदुः । जितेन्द्रियो धर्मपरः
स्वाध्यायनिरतः शुचिः ३४ कामक्रोधौ वशौ यस्य तं देवा ब्राह्मणं विदुः।
यस्य चात्मसमो लोको धर्मज्ञस्य मनस्विनः ३५ सर्वधर्मेषु च रतस्तं
देवा ब्राह्मणंविदुः । योध्यापयेदधीयीत यजेद्वा याजयीत वा ३६ दद्या-
द्वापि यथाशक्ति तं देवा ब्राह्मणं विदुः । ब्रह्मचारी वदान्यो योऽप्यधीया-
द्विजपुङ्गवः ३७ स्वाध्यायवानमत्तो वै तं देवा ब्राह्मणं विदुः । यद्ब्राह्म-

---

ठिकाणीं जसा क्रोध अतिशय असतो तशी दयाही अतिशयच असते. ह्यास्तव, हे निष्पाप विप्र, हा जो माझ्या हातून अपराध घडला आहे त्याची आपण मला क्षमा करा २९. हे द्विज, पतिशुश्रूषेनें संपादन होणारा जो धर्म तोच (मुख्यतः) मला रुचत आहे आणि सर्व देवतामध्ये भर्ता हेंच माझें मुख्य दैवत आहे ३०. हे द्विजश्रेष्ठ, मी एकसारखी त्या पतीची शुश्रूषा हाच धर्म करीत असतें व, हे ब्राह्मणा, पतीच्या शुश्रूषेचें काय फल आहे हें तूं पहा ३१.तूं क्रोधानें बगळी मारून टाकिलीस हें मला समजलें. हे द्विजश्रेष्ठा, क्रोध हा मनुष्यांच्या शरीरात राहणारा शत्रु आहे ३२. ह्यास्तव, जो क्रोध व त्याच्यापासून उत्पन्न झालेला मोह ह्याचा त्याग करितो त्याला देव ब्राह्मण असें ह्मणत असतात. जो येथें सत्य भाषण करून गुरूला संतुष्ट ठेवितो ३३ आणि दुसऱ्यांनीं अपकार केला असतांही आपण उलट अपकार करीत नाहीं त्याला देव ब्राह्मण असें ह्मणतात. जितेंद्रिय, धर्माविषयी तत्पर, नेहमीं वेदाध्ययनाविषयीं दक्ष, शुद्ध ३४ आणि काम व क्रोध स्वाधीन ठेवणारा जो असेल त्याला देव ब्राह्मण असें ह्मणतात. जो विचारी धर्मवेत्ता आपल्याप्रमाणेंच जगताला समजत असून ३५ सर्व धर्मकार्याविषयीं रत असतो त्याला देव ब्राह्मण ह्मणतात. अध्यापन, अध्ययन, यजन आणि याजन करून ३६ जो यथाशक्ति दान देतो त्याला देव ब्राह्मण असें ह्मणतात. ब्रह्मचारी व दानशूर असून जो द्विजश्रेष्ठ वेदाध्ययन करीत असतो ३७, इतकेंच नव्हे; परंतु, प्रमाद न करितां जो वेदाध्ययन करीत असतो त्याला देव ब्राह्मण असें ह्मणतात. ब्राह्मणांना जें हितावह असेल तें

णानां कुशलं तदेषां परिकीर्तयेत् ३८ सत्यं तथा व्याहरतां नानृते रमते मनः। धर्मं तु ब्राह्मणस्याहुः स्वाध्यायं दममार्जवम् ३९ इन्द्रियाणां निग्रहं च शाश्वतं द्विजसत्तम। सत्यार्जवे धर्ममाहुः परं धर्मविदो जनाः ४० दुर्ज्ञेयः शाश्वतो धर्मः स च सत्ये प्रतिष्ठितः। श्रुतिप्रमाणो धर्मः स्यादिति वृद्धानुशासनम् ४१ बहुधा दृश्यते धर्मः सूक्ष्म एव द्विजोत्तम। भगवानपि धर्मज्ञः स्वाध्यायनिरतः शुचिः ४२ न तु तत्त्वेन भगवन्धर्मं वेत्सीति मे मतिः। यदि विप्र न जानीषे धर्मं परमकं द्विज ४३ धर्मव्याधं ततः पृच्छ गत्वा तु मिथिलां पुरीम्। मातापितृभ्यां शुश्रूषुः सत्यवादी जितेन्द्रियः ४४ मिथिलायां वसेद्व्याधः स ते धर्मान्प्रवक्ष्यति। तत्र गच्छस्व भद्रं ते यथाकामं द्विजोत्तम ४५ अत्युक्तमपि मे सर्वं क्षन्तुमर्हस्यनिन्दित। स्त्रियो ह्यवध्याः सर्वेषां ये धर्ममभिविन्दते ४६ ब्राह्मण उवाच॥ प्रीतोस्मि तव भद्रं ते गतः क्रोधश्च शोभने। उपालम्भस्त्वयात्युक्तो मम निश्रेयसं परम् ४७ स्वस्ति तेऽस्तु गमिष्यामि साधयिष्यामि

त्यांना कथन करावें ३८. सत्य भाषण करणाऱ्या ब्राह्मणांचें मन अनृताचे ठिकाणीं रमत नाहीं. स्वाध्याय, दम, सरळपणा आणि इंद्रियनिग्रह हा, हे द्विजश्रेष्ठ, ब्राह्मणाचा अक्षय धर्म होय. धर्मवेत्ते लोक सत्य व सरळपणा हा मुख्य धर्म असें ह्मणत असतात. ३९,४०. समजण्यास कठिण जो शाश्वत धर्म तो सत्यावर अवलंबून राहिलेला आहे आणि धर्म हा श्रुतिमूलकच आहे असें वृद्धांचें सांगणें आहे ४१. हे द्विजश्रेष्ठ, धर्म सूक्ष्मच असून त्याचे पुष्कळ प्रकार आहेत आणि वेदाध्ययनाविषयीं तत्पर व शुचि असे आपणही धर्मज्ञ आहांतच ४२. तथापि, हे भगवन्, तत्त्वतः आपणाला धर्म समजत नाहीं असें मला वाटतें. हे विप्र, हे द्विज, मुख्य धर्म कोणता हें जर आपणाला माहीत नाहीं ४३ तर मिथिलानगरीमध्यें जाऊन आपण धर्मव्याधाला विचारा. मातापितरांच्या शुश्रूषविषयीं तत्पर, सत्यवादी आणि जितेंद्रिय असा ४४ एक व्याध मिथिलानगरीमध्यें वास्तव्य करीत आहे; तो आपणांला धर्म सांगेल. ह्यास्तव, हे द्विजश्रेष्ठ, आपली मर्जी असेल त्याप्रमाणें आपण तिकडे जाण्याचें करावें ह्मणजे आपलें कल्याण होईल ४५. हे दोषशून्य, भाषणांत जो कांहीं माझ्या हातून अतिक्रम झाला असेल त्या सर्वांची आपण मला क्षमा करा. धर्माचें अवलंबन करणाऱ्या सर्वांना स्त्रिया अवध्य आहेत ४६. ब्राह्मण ह्मणतोः—हे साध्वि, मी तुझ्यावर संतुष्ट झालों आहें, तुझें कल्याण असो. माझा क्रोध गेला. तूं जी माझी अतिशय खरडपट्टी काढिलीस ह्यांतच माझें उत्कृष्ट प्रकारचें कल्याण आहे ४७. तुझें कल्याण

शोभने ४८ मार्कण्डेय उवाच ॥ तया विसृष्टो निर्गम्य स्वमेवभवनं ययौ । विनिन्दन्स स्वमात्मानं कौशिको द्विजसत्तम ४९ [८२३०] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां ० मारण्यके पर्वणि मार्कण्डेयसमास्यापर्वणि पतिव्रतोपाख्याने षडधिकद्विशततमोऽध्यायः ॥ २०६ ॥

मार्कण्डेय उवाच ॥ चिन्तयित्वा तदाश्चर्यं स्त्रिया प्रोक्तमशेषतः । विनिन्दन्स स्वमात्मानमागस्कृत इवाबभौ १ चिन्तयानः स्वधर्मस्य सूक्ष्मां गतिमथाब्रवीत् । श्रद्दधानेन वै भाव्यं गच्छामि मिथिलामहम् २ कृतात्मा धर्मवित्तस्यां व्याधो निवसते किल । तं गच्छाम्यहमद्यैव धर्मं प्रष्टुं तपोधनम् ३ इति संचिन्त्य मनसा श्रद्दधानः स्त्रिया वचः । बलाकाप्रत्ययेनासौ धर्म्यैश्च वचनैः शुभैः ४ संप्रतस्थे स मिथिलां कौतूहलसमन्वितः। अतिक्रामन्नरण्यानि ग्रामांश्च नगराणि च ५ ततो जगाम मिथिलां जनकेन सुरक्षिताम् । धर्मसेतुसमाकीर्णां यज्ञोत्सववतीं शुभाम् ६ गोपुरा-

---

असो. मी आतां जातों आणि, हे साध्वि, तूं सांगितल्याप्रमाणें करण्याच्या तिजविजीस लागतों ४८. मार्कंडेय सांगतातः—ह्याप्रमाणें उपदेश करून त्या साध्वीनें जा ह्मणून सांगितल्यावर तो द्विजश्रेष्ठ कौशिक ब्राह्मण स्वतःची निंदा करीत करीत आपल्याच घरीं गेला ४९. ह्याप्रमाणें महामुनिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील मार्कंडेयसमास्यापर्वांपैकीं पतिव्रतोपाख्यानाविषयीं दोनशें सहावा अध्याय समाप्त झाला ॥ २०६ ॥

मार्कंडेय सांगतातः—स्त्रीनें सर्व कांहीं सांगितलेलें तें आश्चर्य आहे असें चिंतन करीत करीत स्वतःची निंदा करूं लागलेल्या त्या ब्राह्मणाची मुद्रा हातून अपराध घडलेल्या पुरुषाप्रमाणें झाली १ आणि स्वधर्माची सूक्ष्म गति काय आहे ती जाणण्याच्या इच्छेनें तो आपल्याशींच ह्मणाला "त्या साध्वीच्या वचनावर मला श्रद्धा ठेविली पाहिजे; मी मिथलानगरीला जातों २. कारण, कृतकृत्य झालेला धर्मज्ञ व्याध त्या नगरींत रहात आहे असें ह्मणतात. ह्यास्तव, धर्म विचारण्याकरितां मी आजच्या आजच त्या तपोधनाकडे जातों" ३. असा मनामध्यें विचार करून आणि बगळीच्या गोष्टीचा प्रत्यय आल्यामुळें व त्या साध्वीनें शुभ व धर्मानुरूप अशा वचनांनीं उपदेश केल्यामुळें तिच्या वचनावर विश्वास ठेऊन ४ मोठ्या उत्सुकतेनें तो ब्राह्मण मिथिलानगरीला निघाला आणि अरण्यें, ग्राम वगैरे ओलांडून जातां जातां ५ शेंवटीं जनकानें संरक्षण केलेल्या मिथिलानगरीला तो जाऊन पोंचला. ती शुभ नगरी यज्ञयागसंबंधीं उत्सवांनीं युक्त असून जगताला तारणारीं जीं धर्मकृत्यें त्यांनीं गजबजून गेलेली

ट्टालकवतीं हर्म्यप्राकारशोभनाम् । प्रविश्य नगरीं रम्यां विमानैर्बहुभिर्युताम् ७ पण्यैश्च बहुभिर्युक्तां सुविभक्तमहापथाम् । अश्वै रथैस्तथा नागैर्योधैश्च बहुभिर्युताम् ८ हृष्टपुष्टजनाकीर्णां नित्योत्सवसमाकुलाम् । सोऽपश्यद्बहुवृत्तान्तां ब्राह्मणः समतिक्रमन् ९ धर्मव्याधमपृच्छच्च स चास्य कथितो द्विजैः । अपश्यत्तत्र गत्वा तं सूनामध्ये व्यवस्थितम् १० मार्गमाहिषमांसानि विक्रीणन्तं तपस्विनम् । आकुलत्वाच्च क्रेतॄणामेकान्ते संस्थितो द्विजः ११ स तु ज्ञात्वा द्विजं प्राप्तं सहसा संभ्रमोत्थितः । आजगाम यतो विप्रः स्थित एकान्तदर्शने १२ व्याध उवाच ॥ अभिवादये त्वां भगवन्स्वागतं ते द्विजोत्तम । अहं व्याधो हि भद्रं ते किं करोमि प्रशाधि माम् १३ एकपत्न्या यदुक्तोऽसि गच्छ त्वं मिथिलामिति । जानाम्येतदहं सर्वं यदर्थं त्वमिहागतः १४ श्रुत्वा च तस्य तद्वाक्यं स विप्रो भृशवि-

---

होती ६. वेशी व जिने ह्यांनीं युक्त असून वाडे व कोट ह्यांनी सुशोभित झालेल्या आणि सात सात मजली अनेक इमारतींनीं युक्त असलेल्या नगरीमध्यें ब्राह्मणानें प्रवेश केला ७ ती ती नगरी नानाप्रकारच्या विक्रीच्या पदार्थांनीं युक्त आहे; तिच्यांतील रस्ते मोठे असून उत्तमप्रकारें विभागिलेले आहेत; अश्व, रथ, गज आणि तसेच अनेक योद्धे ह्यांनीं ती गजबजून गेलेली आहे ८; आनंदित आणि पुष्ट अशा प्रजाजनांनीं ती व्याप्त झालेली आहे; नित्य सुरू असलेल्या उत्सवांची तिच्यामध्यें जिकडे तिकडे गर्दी उडालेली आहे आणि अनेक प्रकारच्या वार्ता तिच्यामध्ये जिकडे तिकडे कानीं पडत आहेत असें जातां जातां त्या ब्राह्मणानें अवलोकन केलें ९. नंतर धर्मव्याधाचा शोध केल्यावर ब्राह्मणांनी त्याचा पत्ता त्याला सांगितला असतां तो त्याच्या घरीं गेला आणि वधस्थानामध्यें तो व्याध बसलेला त्यानें पाहिला १०. तो तपस्वी व्याध मृग व महिष यांचें मांस विकीत बसला होता आणि गिराइकांची तेथें त्या वेळीं अतिशयच गर्दी उडून गेली असल्यामुळें त्या ब्राह्मणाला कांहीं वेळ एकीकडेच उभें राहणें भाग पडलें ११; परंतु, द्विज आपल्या घरीं आला आहे असें समजून येतांक्षणीं तो व्याध एकाएकीं लगबगीनें उठला आणि जेथें एकांतस्थलीं तो ब्राह्मण उभा राहिला होता तेथें गेला १२. व्याध ह्मणतोः—हे भगवन्, मी आपणांला अभिवंदन करीत आहें. हे द्विजश्रेष्ठ, आपलें स्वागत असो. मी व्याध आहें; आपलें देव बरें करो, मीं काय करावें ह्याची आपण मला आज्ञा करा १३. पतीलाच दैवत मानणाऱ्या पतिव्रतेनें " तू मिथिला-

स्मितः । द्वितीयमिदमाश्चर्यमित्यचिन्तयत द्विजः १५ अदेशस्थं हि ते स्थानमिति व्याधोऽब्रवीदिदम् । गृहं गच्छाव भगवन्यदि ते रोचतेऽनघ १६ मार्कण्डेय उवाच ॥ बाढमित्येव तं विप्रो हृष्टो वचनमब्रवीत् । अग्रतस्तु द्विजं कृत्वा स जगाम गृहं प्रति १७ प्रविश्य च गृहं रम्यमासनेनाभिपूजितः। पाद्यमाचमनीयं च प्रतिगृह्य द्विजोत्तमः । ततः सुखोपविष्टस्तं व्याधं वचनमब्रवीत् १८ कर्मैतद्वै न सदृशं भवतः प्रतिभाति मे । अनुतप्ये भृशं तात तव घोरेण कर्मणा १९ व्याध उवाच ॥ कुलोचितमिदं कर्म पितृपैतामहं परम् । वर्तमानस्य मे धर्मे स्वे मन्युं मा कृथा द्विज । २० विधात्रा विहितं पूर्वं कर्म स्वमनुपालयन् । प्रयत्नाच्च गुरू वृद्धौ शुश्रूषेऽहं द्विजोत्तम २१ सत्यं वदे नाभ्यसूये यथाशक्ति ददामि च । देवतातिथिभृत्यानामवशिष्टेन वर्तये २२ न कुत्सयाम्यहं

नगरीला जा. " असें जें तुला सांगितलें आहे आणि तूं ज्या कामाकरितां येथें आला आहेस तें मी सर्व जाणीत आहें १४. हें त्या व्याधाचें सांगणें ऐकितांक्षणीं तो ब्राह्मण फारच विस्मित झाला आणि हें दुसरें आश्चर्य आहे ह्मणून आपल्या मनामध्यें विचार करूं लागला १५. तों इतक्यात " आपण अयोग्य ठिकाणीं उभे राहिलों आहों; तेव्हां, हे भगवन्, हे निष्पाप, आपली मर्जी असेल तर आपण घरीं जाऊं." असें तो व्याध त्याला ह्मणाला १६. मार्कंडेय सांगतात:—ह्यावर " ठीक आहे. " असें त्या ब्राह्मणानें आनंदित होऊन सांगितलें असतां ब्राह्मणाला पुढें घालून तो व्याध घरीं गेला १७. त्या रम्य गृहामध्यें प्रविष्ट होतांक्षणीं आसनानें त्या ब्राह्मणाची आधीं मानमान्यता झाली आणि पाद्य व आचमनीय ग्रहण करून स्वस्थ बसल्यानंतर तो द्विजश्रेष्ठ त्या व्याधाला ह्मणाला १८ " हें तुझें कर्म मला योग्य दिसत नाहीं. बा व्याधा, तुझ्या ह्या घोर कर्माबद्दल मला फारच वाईट वाटत आहे. " १९. व्याध ह्मणतो:— वाडवडिलांपासून चालत असलेलें हें माझें स्वकुलाला योग्य असें मुख्य कर्म आहे. तस्मात्, स्वधर्मानें वागणाऱ्या माझ्यावर, हे द्विज, आपण क्रोध करूं नका २०. हे द्विजश्रेष्ठ, विधात्यानें नेमून दिलेलें व परंपरागत चालत आलेलें जें आपलें कर्म त्याचें मी परिपालन करीत असून प्रयत्नपूर्वक वृद्ध मातापितरांची शुश्रूषा मी करीत असतों २१ मी सत्यभाषण करीत असतों, कोणाचाही मत्सर करीत नाहीं, यथाशक्ति दान देत असतों आणि देवता, अतिथि व आपल्या पदरीं असलेले सेवक ह्यांची तृप्ति होऊन उरलेल्या अन्नावर उपजीविका करीत असतों २२. मी कोणाच्या दोषाचें उद्घाटणही करीत नाहीं आणि विनाकारण कोणावर दोषारोपही करीत नाहीं.

किंचिच्च गर्हे बलवत्तरम् । कृतमन्वेति कर्तारं पुरा कर्म द्विजोत्तम २३
कृषिगोरक्ष्यवाणिज्यमिह लोकस्य जीवनम् दण्डनीतिस्त्रयी विद्या तेन
लोको भवत्युत २४ कर्म शूद्रे कृषिर्वैश्ये सङ्ग्रामः क्षत्रिये स्मृतः । ब्रह्म-
चर्यं तपो मन्त्राः सत्यं च ब्राह्मणे सदा २५ राजा प्रशास्ति धर्मेण
स्वकर्मनिरताः प्रजाः । विकर्माणश्च ये केचित्तान्युनक्ति स्वकर्मसु २६
भेतव्यं हि सदा राज्ञां प्रजानामधिपा हि ते । वारयन्ति विकर्मस्थं नृपा
मृगमिवेषुभिः २७ जनकस्येह विप्रर्षे विकर्मस्थो न विद्यते । स्वकर्म-
निरता वर्णाश्चत्वारोऽपि द्विजोत्तम २८ स एष जनको राजा दुर्वृत्तमपि
चेत्सुतम् । दण्ड्यं दण्डे निक्षिपति तथा न ग्लाति धार्मिकम् २९ सुयुक्त-
चारो नृपतिः सर्वं धर्मेण पश्यति । श्रीश्च राज्यं च दण्डश्च क्षत्रियाणां
द्विजोत्तम ३० राजानो हि स्वधर्मेण श्रियमिच्छन्ति भूयसीम् । सर्वेषा-
मेव वर्णानां त्राता राजा भवत्युत ३१ परेण हि हतान्ब्रह्मन्वराहमहिषा-
नहम् । न स्वयं हन्मि विप्रर्षे विक्रीणामि सदा त्वहम् ३२ न भक्षयामि

हे द्विजश्रेष्ठ, पूर्वी केलेलें कर्म कर्त्याला फलरूपानें प्राप्त होत असतें २३. शेतकी, गोरक्षण आणि व्यापार हें इहलोकींचें जीवनसाधन असून दंडनीति आणि वैदिक धर्म ह्यांच्या योगानें जगत् रहात असतें २४. शूद्राला सेवाकर्म, वैश्याला कृषिकर्म, क्षत्रियाला संग्राम आणि ब्राह्मणाला ब्रह्मचर्य, तप, वेद व सत्य हीं विहित आहेत २५. (ह्या राष्ट्रामध्यें) राजा स्वकर्मनिष्ठ प्रजाजनांचें धर्मानें परिपालन करीत असून जे काणी स्वकर्मापासून च्युत झाले असतील त्यांची प्रवृत्ति स्वकर्माकडेच करून देत असतो २६. राजाना नेहमीं भिऊन वागलें पाहिजे; कारण, ते प्रजाजनांचे अधिपति आहेत आणि बाणांच्या योगानें ज्याप्रमाणें ते मृगांचें निवारण करीत असतात त्याचप्रमाणें स्वकर्म सोडून चालणाऱ्या पुरुषाचें ते निवारण करीत असतात २७. हे ब्रह्मर्षे, जनकाच्या ह्या राष्ट्रात स्वकर्म सोडून वागणारा कोणीही नाही; हे द्विजश्रेष्ठ, चारीही वर्ण आपआपल्या कर्माविषयीं तत्पर आहेत २८. हा जनकराजा--दुराचारी असल्यामुळें स्वतःचा पुत्र जरी दंडास पात्र झाला तरी—त्याला दंड करीत असतो आणि जो कोणी धर्मानें वागणारा असेल त्याला कधींही त्रास देत नाहीं २९. ह्या राजाचें आचरण अगदीं योग्य असून तो धर्मदृष्टीनेंच सर्व पहात असतो. हे द्विजश्रेष्ठ, वैभव, राज्य आणि दंड हीं राजांचे ठिकाणीं असतात ३० व राजे स्वधर्मानेंच मोठी संपत्ति मिळविण्याची इच्छा करीत असतात. राजा सर्वही वर्णांचें रक्षण करीत असतो ३१. असो. हे ब्रह्मन् , दुसऱ्यांनीं मारून आणिलेलीं डुकरें व महिष मी नेहमीं विकीत असतों. हे

मांसानि ऋतगामी तथा ह्यहम् । सदोपवासी च तथा नक्तभोजी सदा द्विज ३३ अशीलश्चापि पुरुषो भूत्वा भवति शीलवान् । प्राणिहिंसारतिश्चापि भवते धार्मिकः पुनः ३४ अभिचारान्नरेन्द्राणां धर्मः संकीर्यते महान् । अधर्मो वर्तते चापि संकीर्यन्ते ततः प्रजाः ३५ भेरुण्डा वामनाः कुब्जाः स्थूलशीर्षास्तथैव च । क्लीबाश्चान्धाश्च बधिरा जायन्तेत्युच्चलोचनाः ३६ पार्थिवानामधर्मत्वात्प्रजानामभवः सदा । स एष राजा जनकः प्रजा धर्मेण पश्यति ३७ अनुगृह्णन्प्रजाः सर्वाः स्वधर्मनिरताः सदा । ये चैव मां प्रशंसन्ति ये च निन्दन्ति मानवाः ३८ सर्वान्सुपरिणीतेन कर्मणा तोषयाम्यहम् । ये जीवन्ति स्वधर्मेण संयुञ्जन्ति च पार्थिवाः ३९ न किंचिदुपजीवन्ति दान्ता उत्थानशीलिनः । शक्त्यान्नदानं सततं तितिक्षा धर्मनित्यता ४० यथार्हं प्रतिपूजा च सर्वभूतेषु वै सदा । त्यागान्नान्यत्र मर्त्यानां गुणास्तिष्ठन्ति पूरुषे ४१ मृषावादं परि-

---

नव्हे, मा स्वतः कधीं कांहीं मारीत नाहीं ३२. हे द्विज, मी मांसभक्षण करीत नाहीं. दिवसां नेहमीं उपवास करून नक्तभोजन करीत असतों आणि ऋतुकालीं पत्नीशीं समागम करीत असतों ३३. सारांश, जो पुरुष दुसऱ्याला शीलरहित दिसत असतो तो (स्वधर्माचा विचार केला असतां) सुशीलही असण्याचा संभव आहे आणि प्राण्यांच्या हिंसेविषयीं तत्पर असणाराही पुरुष स्वतः धार्मिक असण्याचा संभव आहे ३४. राजाच्या स्वैर वर्तनामुळें श्रेष्ठ धर्माचा संकर होत असून अधर्माची प्रवृत्ति होऊं लागते आणि प्रजाजनांतही संकर होऊन जातो ३५. खुजे, कुबडे, फताड्या डाक्यांचे, नपुंसक, अंध, बहिरे, अतिशय बटबटीत डोळ्यांचे आणि भयंकर असे लोक राजाच्या स्वैर वर्तनामुळें उत्पन्न होत असतात ३६. राजांच्या धर्मभ्रंशामुळें प्रजाजनांचा नेहमीं नाश होत असतो; परंतु, हा जनकराजा धर्मदृष्टीनें प्रजेकडे पहात असून ३७ स्वधर्मनिष्ठ अशा सर्व प्रजाजनांवर नेहमीं अनुग्रह करीत असतो. असो. जे मानव माझी प्रशंसा करीत असतात आणि जे माझी निंदा करीत असतात ३८ त्या सर्वांना मी आपल्या सत्कर्मानें संतुष्ट करीत असतो. जे नेहमीं स्वधर्मानेंच उपजीविका करीत असतात, जे स्वधर्मानेंच स्वतःला बद्ध करून टाकीत असतात आणि त्याचप्रमाणें जितेंद्रिय व उद्योगशील राहून जे आपल्या उपभोगाकरितां अन्यायानें परकीय वस्तु हरण करीत नाहीत तेच राजे होत. यथाशक्ति अन्नदान, नेहमीं क्षमा, सतत धर्मतत्परता आणि सर्वांची योग्यतेनुरूप मानमान्यता हे जे मानवांना आत्मप्राप्तीला अवश्यक असलेले गुण त्यांचें पर्यवसान वैराग्यामध्यें आहे ३९, ४०, ४१. असो. असत्य भाषणापासून अलग रहावें, दुसऱ्यानें प्रार्थना

हरेत्कुर्यात्प्रियमयाचितः। न च कामान्न संरम्भान्न द्वेषाद्धर्ममुत्सृजेत् ४२
प्रिये नातिभृशं हृष्येदप्रिये न च संज्वरेत्। न मुह्येदर्थकृच्छ्रेषु न च धर्मं
परित्यजेत् ४३ कर्म चेत्किंचिदन्यत्स्यादितरन्न तदा चरेत्। यत्कल्याणम-
भिध्यायेत्तत्रात्मानं नियोजयेत् ४४ न पापं प्रतिपापः स्यात्साधुरेव सदा
भवेत्। आत्मनैव हतः पापो यः पापं कर्तुमिच्छति ४५ कर्म चैतदसा-
धूनां वृजिनानामसाधुवत्। न धर्मोस्तीति मन्वानाः शुचीनवहसन्ति
ये ४६ अश्रद्दधाना धर्मस्य ते नश्यन्ति न संशयः। महादृतिरिवाध्मातः
पापो भवति नित्यदा ४७ मूढानामवलिप्तानामसारं भावितं भवेत्। दर्श-
यत्यन्तरात्मा तं दिवा रूपमिवांशुमान् ४८ न लोके राजते मूर्खः केव-
लात्मप्रशंसया। अपि चेह मृजाहीनः कृतविद्यः प्रकाशते ४९ अब्रुव-
न्कस्यचिन्निन्दामात्मपूजामवर्णयन्। न कश्चिद्गुणसंपन्नः प्रकाशो भुवि

करण्याची वाट न पाहतां आपण त्याला इष्ट असेल तें करावें आणि कामामुळें, भयामुळें अथवा द्वेषामुळें धर्म कधींही सोडूं नये ४२. इष्ट वस्तु प्राप्त झाली असतां अत्यंत आनंद मानूं नये, अनिष्ट गोष्ट प्राप्त झाली असतां दुःखी होऊं नये, संकटाचे प्रसंग उद्भवले असतां गांधळून जाऊं नये आणि धर्माचा कधींही त्याग करूं नये ४३. जें कांहीं विपरीत कर्म असेल तसें आपण कधींही कर्म करूं नये. आपलें व दुसऱ्याचें ज्याच्या योगानें कल्याण होईल त्याचेंच चिंतन करीत असावें व तिकडेच आपलें मन लावावें ४४. कोणीं आपला अपराध केला असतां आपण उलट तसें न करितां नेहमीं सौम्यच रहावें; कारण, जो दुष्ट दुसऱ्याचा घात करण्याची इच्छा करितो त्याचा स्वतःच्या कृतीनेंच घात होत असतो ४५. आपला कोणीं अपराध केला असतां आपण उलट त्याचा घात करण्यास प्रवृत्त होणें हें निंद्य कर्म व्यसनी दुर्जनांनाच योग्य आहे. धर्म नाहीं असें समजून जे पुरुष (धर्मानें वागणाऱ्या) पवित्र लोकांना हसत असतात ४६ ते धर्माचे ठिकाणीं श्रद्धा नसल्यामुळें नाश पावतात ह्यांत संशय नाहीं. मोठा भाता आंत वारा भरला असतांनाही ज्याप्रमाणें विनाकारण पुष्ट होतो त्याचप्रमाणें दुष्ट पुरुष विनाकारण गर्वानें फुगत असतो ४७. गर्विष्ठ मूढ लोकांच्या विचारांत काहीं एक अर्थ नसून दिवसां ज्याप्रमाणें सूर्य एकाद्या वस्तूचें स्वरूप दर्शवितो त्याचप्रमाणें त्या मूढाचा अंतरात्माच त्यांचें स्वरूप इतरांना दर्शवितो ४८. जगतामध्यें नुसत्या आत्मप्रशंसेच्या जोरावर मूर्ख कधीं झळकत नाहीं; परंतु, विद्या संपादन केलेल्या पुरुषाच्या अंगीं जरी स्वच्छपणा नसला तरी सुद्धां तो प्रकाशत असतो ४९. कोणाची निंदा केल्यावांचून कोणीही गुणी पुरुष ह्या भूतला-

दृश्यते ५० विकर्मणा तप्यमानः पापाद्विपरिमुच्यते । न तत्कुर्यां पुनरिति द्वितीयात्परिमुच्यते ५१ कर्मणा येन तेनेह पापाद्द्विजवरोत्तम । एवं श्रुतिरियं ब्रह्मन्धर्मेषु प्रतिदृश्यते ५२ पापान्यबुध्वेह पुराकृतानि प्राग्धर्मशीलोपि विहन्ति पश्चात् । धर्मो राजन्नुदते पूरुषाणां यत्कुर्वते पापमिह प्रमादात् ५३ पापं कृत्वा हि मन्येत नाहमस्मीति पूरुषः । तं तु देवाः प्रपश्यन्ति स्वस्यैवान्तरपूरुषः ५४ चिकीर्षेदेव कल्याणं श्रद्दधानोनसूयकः । वसनस्येव च्छिद्राणि साधूनां विवृणोति यः ५५ पापं चेत्पुरुषः कृत्वा कल्याणमभिपद्यते । मुच्यते सर्वपापेभ्यो महाभ्रेणेव चन्द्रमाः ५६ यथादित्यः समुद्यन्वै तमः पूर्वं व्यपोहति । एवं कल्याणमातिष्ठन्सर्वपापैः प्रमु-

---

मध्यें प्रसिद्धीला येत असल्याचें दृष्टीं पडत नाहीं (हें मत मूढ लोकांचें आहे) ५०. केलेल्या पापकर्माच्या योगानें पुरुषाला पश्चात्ताप होऊं लागला ह्मणजे तो त्या पातकापासून मुक्त होतो आणि मी तें फिरून करणार नाहीं असा त्यानें निश्चय केला ह्मणजे पुढेंही त्याच्या हातून पाप होत नाहीं ५१ सारांश, हे श्रेष्ठ ब्राह्मणा, केलेल्या कर्माचा पश्चात्ताप होऊन पुनरपि तें कर्म न करण्याचा निश्चय झाल्यावर पुरुष जप, तप, तीर्थाटण वगैरे कोणत्याही एका पापनाशक कर्मानुष्ठानाच्या योगानें पापापासून मुक्त होतो. हे ब्राह्मणा, धर्माविषयींही ह्याचप्रमाणें पुढील अर्थाची श्रुति आहे ५२. इहलोकीं आपल्या हातून पूर्वीं घडलेलीं पातकें कोणतीं हें जरी ठाऊक नसलें तरी धर्मशील पुरुष आपल्या धर्माच्या योगानें त्या पातकांचा नाश करितो; कारण, हे राजा, इहलोकीं न समजून जीं कांहीं पुरुषांच्या हातून पातकें घडतात तीं पातकें नंतर त्यांच्या धर्माचरणामुळें नाहींशीं होतात ५३. पाप करूनही जो पुरुष पाप करितांना) मी कोणाच्या दृष्टीं पडलों नाहीं (तेव्हां ह्या पापाचें फल मला भोगावें लागणार नाहीं) असें समजतो त्याला देव (पाप करीत असतांना) पहात असतात आणि त्याच्या हृदयामध्यें रहाणारा सर्वसाक्षी पुरुषही पहात असतो ५४. आपल्या वस्त्राला पडलेलीं छिद्रें ठिगळांनीं वगैरे बुजविण्याचा ज्याप्रमाणें पुरुष प्रयत्न करीत असतो त्याप्रमाणें द्रव्य नसल्याकारणानें कमी पडणारीं साधुजनांचीं श्राद्धादि कर्में जो द्रव्य वगैरे देऊन चांगल्या रीतीनें शेंवटास नेतो तो श्रद्धालु व मत्सररहित पुरुष मोक्षाच्या उपायाचेंच अवलंबन करीत असतो (असें समजावें) ५५. पूर्वीं हातून पातक घडलें असतांना जो पुरुष ह्याप्रमाणें मोक्षोपायाचें अवलंबन करितो तो प्रचंड मेघापासून मुक्त होणाऱ्या चंद्राप्रमाणें सर्व पातकांपासून मुक्त होतो ५६. ज्याप्रमाणें सूर्य उदयास येऊं लागला असतां पूर्वीं असलेल्या अंधकाराचा नाश करून टाकितो त्याचप्रमाणें पापमोचक उपायाचें

ल्यते ५७ पापानां विद्ध्यधिष्ठानं लोभमेव द्विजोत्तम ५८ लुब्धाः पापं व्यवस्यन्ति नरा नातिबहुश्रुताः । अधर्मा धर्मरूपेण तृणैः कूपा इवावृताः ५९ तेषां दमः पवित्राणि प्रलापा धर्मसंश्रिताः । सर्वं हि विद्यते तेषु शिष्टाचारः सुदुर्लभः ६० मार्कण्डेय उवाच ॥ स तु विप्रो महाप्राज्ञो धर्मव्याधमपृच्छत । शिष्टाचारं कथमहं विद्यामिति नरोत्तम ६१ एतदिच्छामि भद्रं ते श्रोतुं धर्मभृतां वर । त्वत्तो महामते व्याध तद्ब्रवीहि यथातथम् ६२ व्याध उवाच ॥ यज्ञो दानं तपो वेदाः सत्यं च द्विजसत्तम । पञ्चैतानि पवित्राणि शिष्टाचारेषु नित्यदा ६३ कामक्रोधौ वशे कृत्वा दम्भं लोभमनार्जवम् । धर्ममित्येव संतुष्टास्ते शिष्टाः शिष्टसंमताः ६४ न तेषां विद्यते वृत्तं यज्ञस्वाध्यायशीलिनाम् । आचारपालनं चैव द्वितीयं शिष्टलक्षणम् ६५ गुरुशुश्रूषणं सत्यमक्रोधो दानमेव च । एतच्चतुष्टयं ब्रह्मञ्छिष्टाचारेषु नित्यदा ६६ शिष्टाचारे मनः कृत्वा प्रतिष्ठाप्य च

अवलंबन करणारा पुरुष सर्व पातकापासूनच मुक्त होतो. ५७ हे द्विजोत्तमा, लोभ हेंच पापाचे अधिष्ठान आहे असें तू समज ५८. विशेष बहुश्रुत नसलेले असे लोभी पुरुष जरी धर्महीन असतात तरी तृणानें आच्छादित झालेल्या कूपांप्रमाणें धर्मरूप दंभाच्या योगाने ते आपले स्वरूप आच्छादित करून पापकर्म करण्याचा निश्चय करीत असतात ५९. इंद्रियदमन, पवित्रपणाची कृत्यें, धर्मविषयक गोष्टी वगैरे सर्व कांही त्या दांभिकाच ठिकाणी (वरवर पाहणाऱ्या पुरुषाच्या दृष्टीनें) विद्यमान असते. ह्यामुळे शिष्टाचार कोणता ह्याचा बोध त्या दांभिकांच्या वर्तनावरून होत नाही ६०. मार्कंडेय सांगतात:—ह्यावर तो महाबुद्धिमान् विप्र धर्मव्याधाला ह्मणाला " हे पुरुषश्रेष्ठा, शिष्टाचार मी कसा समजावा ? ६१ हे, हे धर्मनिष्ठांमध्ये श्रेष्ठ व्याधा, तुझ्यापासून श्रवण करण्याची माझी इच्छा आहे. ह्यास्तव, तुझें देव बरें करो; हे महाज्ञानवान् व्याधा, तू मला हें इत्थंभूत कथन कर ६२. " व्याध ह्मणतो " हे द्विजश्रेष्ठा, यज्ञ, दान, तप, वेद आणि सत्य ह्या पाच पवित्र गोष्टी शिष्टाचारामध्यें नेहमीं असाव्या लागतात ६३. काम, क्रोध, दंभ, लोभ, कुटिलपणा हीं सर्व आवरून धरून केवळ धर्माचें अनुष्ठान करण्यातच जे संतुष्ट असतात ते सज्जनसंमत शिष्ट होत ६४. यज्ञयाग व वेदाध्ययन ह्यांविषयीं तत्पर असलेल्या लोकांचे ठिकाणीं स्वैर वर्तनाचा अभाव आणि सदाचाराचें परिपालन हें दुसरें शिष्टलक्षण होय ६५. हे ब्राह्मणा, गुरुशुश्रूषा, सत्यावलंबन, क्रोधराहित्य आणि दान हीं चार सदाचारामध्यें नेहमीं असावी लागतात ६६. शिष्टाचाराकडे मन लावून आणि सर्व प्रकारें

सर्वशः । यामयं लभते वृत्तिं सा न शक्या ह्यतोऽन्यथा ६७ वेदस्योपनिषत्सत्यं सत्यस्योपनिषद्दमः । दमस्योपनिषत्त्यागः शिष्टाचारेषु नित्यदा ६८ ये तु धर्मानसूयन्ते बुद्धिमोहान्विता नराः । अपथा गच्छतां तेषामनुयाता च पीड्यते ६९ ये तु शिष्टाः सुनियताः श्रुतित्यागपरायणाः । धर्मपन्थानमारूढाः सत्यधर्मपरायणाः ७० नियच्छन्ति परां बुद्धिं शिष्टाचारान्विता जनाः । उपाध्यायमते युक्ताः स्थित्या धर्मार्थदर्शिनः ७१ नास्तिकान्भिन्नमर्यादान्क्रूरान्पापमतौ स्थितान् । त्यज ताञ्ज्ञानमाश्रित्य धार्मिकानुपसेव्य च ७२ कामलोभग्रहाकीर्णां पञ्चेन्द्रियजलां नदीम् । नावं धृतिमयीं कृत्वा जन्मदुर्गाणि संतर ७३ क्रमेण संचितो धर्मो बुद्धियोगमयो महान् । शिष्टाचारे भवेत्साधू रागः शुक्लेव वाससि ७४ अहिंसा सत्यवचनं सर्वभूतहितं परम् । अहिंसा परमो धर्मः स च सत्ये प्रतिष्ठितः । सत्ये कृत्वा प्रतिष्ठां तु प्रवर्तन्ते प्रवृत्तयः ७५ सत्यमेव गरीयस्तु शिष्टा-

---

तो स्थापित करून जी वृत्ति ह्या धर्मशील पुरुषाला प्राप्त होत असते ती वर निर्दिष्ट केलेल्या चार गोष्टींचें अवलंबन केल्यावाचून प्राप्त होणें शक्य नाहीं ६७. सत्य हें वेदाचें रहस्य असून इंद्रियदमन हें सत्याचें रहस्य होय आणि वैराग्य हें इंद्रियदमनाचें रहस्य होय. हीं शिष्टाचारामध्यें नेहमीं अवश्य आहेत ६८. बुद्धीला भ्रम पडलेले जे पुरुष धर्माचाराचा मत्सर करीत असतात त्यांचें ह्मणजे मार्ग सोडून चालणाऱ्याचें अनुकरण करणारा पुरुष दुःखी होतो ६९. श्रुतिप्रतिपादित धर्म आणि वैराग्य हीं दोनच ज्यांना मुख्य आश्रयभूत आहेत, ज्यांनीं इंद्रियदमन उत्कृष्ट प्रकारें केलेलें आहे, जे सदाचरणसंपन्न आहेत, ज्यांनीं अहंकाराचा निग्रह केलेला आहे, उपाध्यायाच्या मतानें जे वागणारे आहेत आणि धर्म व अर्थ ह्यांना अनुसरून जे वागणारे आहेत तेच धर्ममार्गावर आरूढ झालेले आहेत असें समजावें ७०,७१. ह्यास्तव, धार्मिकांचा समागम करून आणि ज्ञानाचा आश्रय करून तूं पापबुद्धि व मर्यादा सोडून वागणाऱ्या त्या भयंकर नास्तिकांचा त्याग कर ७२. काम व लोभ ह्या मकरांनीं व्याप्त आणि पंचविषयरूप उदकांनीं युक्त अशी जी संसाररूप नदी ती आणि तिच्यांतील जन्मरूप दुर्गम स्थलें तूं धैर्यरूप नावेचें अवलंबन करून तरून जा ७३. स्वच्छ वस्त्रावर घातलेला रंग ज्याप्रमाणें चांगला खुलतो त्याप्रमाणें सदाचरणसंपन्न पुरुषाचे ठिकाणीं हळू हळू साचत चाललेला हा कर्मज्ञानरूप धर्म मोठा फलदायक होतो ७४. अहिंसा आणि सत्यवचन हें प्राणिमात्राच्या हिताचें उत्कृष्ट साधन होय. अहिंसा हाच मुख्य धर्म आहे; परंतु, तो सत्याच्या आश्रयावर राहिलेला आहे आणि त्याचप्रमाणें इतर

चारनिषेवितम् । आचारश्च मतो धर्मः सन्तश्चाचारलक्षणाः ७६ यो यथाप्रकृतिर्जन्तुः स स्वां प्रकृतिमश्नुते । पापात्मा क्रोधकामादीन्दोषाना-प्नोत्यनात्मवान् ७७ आरम्भो न्याययुक्तो यः स हि धर्म इति स्मृतः । अनाचारस्त्वधर्मेति एतच्छिष्टानुशासनम् ७८ अक्रुद्ध्यन्तोनसूयन्तो निरहंकारमत्सराः । ऋजवः शमसंपन्नाः शिष्टाचारा भवन्ति ते ७९ त्रैविद्यवृद्धाः शुचयो वृत्तवन्तो मनस्विनः । गुरुशुश्रूषवो दान्ताः शिष्टाचारा भवन्त्युत ८० तेषामहीनसत्त्वानां दुष्कराचारकर्मणाम् । स्वैः कर्मभिः सत्कृतानां घोरत्वं संप्रणश्यति ८१ तं सदाचारमाश्चर्यं पुराणं शाश्वतं ध्रुवम् । धर्मं धर्मेण पश्यन्तः स्वर्गं यान्ति मनीषिणः ८२ आस्तिका मानहीनाश्च द्विजातिजनपूजकाः । श्रुतवृत्तोपसंपन्नाः सन्तः स्वर्गनिवासिनः ८३ वेदोक्तः परमो धर्मो धर्मशास्त्रेषु चापरः । शिष्टाचारश्च शिष्टानां त्रिविधं धर्मलक्षणम् ८४ पारणं चापि विद्यानां तीर्थानामव-

धर्मप्रवृत्तिही सत्याचाच आश्रय करून सुरू होत असतात ७५. सदाचरणसंपन्न लोकांनीं स्वीकारिलेलं सत्यच श्रेष्ठ आहे. साधूंचे आचरण हाच धर्म असून सदाचरण हेंच साधूचें लक्षण आहे ७६. जशा प्रकारच्या घटकावयवांनीं प्राणी उत्पन्न झालेला असतो तशाच प्रकारचा त्याचा स्वभाव बनतो आणि ह्मणूनच ज्याची उत्पत्तिच दूषित आहे तो इंद्रियाधीन पुरुष कामक्रोधादि दोषांचें अवलंबन करीत असतो ७७. (श्रुतिस्मृतिप्रतिपादित) न्यायाला अनसरून जें आचरण त्याला धर्म असें ह्मणतात आणि ह्या श्रुतिस्मृति वगैरेंना सोडून असलेलें जें आचरण ह्मणजे अर्थात् अनाचार तो अधर्म, असें शिष्टांचें ह्मणणें आहे ७८. क्रोध, परोत्कर्षासहिष्णुता, अहंकार आणि मत्सर यांनीं रहित असून वर्तनानें सरळ व मनोनिग्रह केलेले असे जे लोक ते शिष्टाचाराचें अवलंबन करणारे होत ७९. ज्ञानवृद्ध, शुचि, सुशील, विचारी, जितेंद्रिय आणि गुरुशुश्रूषेविषयीं तत्पर असे जे असतात ते सदाचरणसंपन्न होत ८०. असे पुरुष उदार अंतःकरणानें युक्त असतात, ह्यांचें शील व कर्म इतरांना दुर्घट असतें, हे आपल्याच कर्मांच्या योगानें योग्यतेला चढलेले असतात आणि स्वकर्मांच्याच योगानें ह्यांच्या आचरणांतील दोष नाहींसा होतो ८१. तर्‍हां आश्चर्यकारक, अनादि, अनश्वर आणि कधींही त्याग करण्यास अयोग्य अशा त्या सदाचाररूप धर्माचें आचरण जे धर्मबुद्धीनें करीत असतात ते विचारी पुरुष स्वर्गाला जातात ८२. अभिमानरहित, द्विजांचा सत्कार करणारे, बहुश्रुत आणि शीलसंपन्न असे जे सज्जन असतात तेच स्वर्गामध्यें वास्तव्य करितात ८३. वेदविहित हा मुख्यधर्म आहे. धर्मशास्त्रामध्यें सांगितलेला

गाहनम् । क्षमा सत्यार्जवं शौचं सतामाचारदर्शनम् ८५ सर्वभूतदयावन्तो अहिंसानिरताः सदा । परुषं च न भाषन्ते सदा सन्तो द्विजप्रियाः ८६ शुभानामशुभानां च कर्मणां फलसंचये । विपाकमभिजानन्ति ते शिष्टाः शिष्टसंमताः ८७ न्यायोपेता गुणोपेताः सर्वलोकहितैषिणः । सन्तः स्वर्गजितः शुक्लाः संनिविष्टाश्च सत्पथे ८८ दातारः संविभक्तारो दीनानुग्रहकारिणः । सर्वपूज्याः श्रुतधनास्तथैव च तपस्विनः ८९ सर्वभूतदयावन्तस्ते शिष्टाः शिष्टसंमताः । दीनशिष्टाः सुखाँल्लोकानाप्नुवन्तीह च श्रियम् ९० पीडया च कलत्रस्य भृत्यानां च समाहिताः । अतिशक्त्या प्रयच्छन्ति संतः सद्भिः समागताः ९१ लोकयात्रां च पश्यन्तो धर्ममात्महितानि च । एवं सन्तो वर्तमानास्त्वेधन्ते शाश्वतीः समाः ९२ अहिंसा

दुसरा धर्म आहे आणि सदाचार हा तिसरा धर्म आहे. ह्याप्रमाणें शिष्टाच्या धर्माचें लक्षण तीन प्रकारचें आहे ८४. विद्यापारगतता, तीर्थस्नान, क्षमा, सत्य, सरळपणा आणि शौच हे आचार सज्जनाचे ठिकाणीं दृष्टोत्पत्तीस येतात ८५ सज्जन द्विजप्रिय असतात, प्राणिमात्राविषयीं त्यांचे ठिकाणीं दया असते, अहिंसेविषयीं ते नेहमी तत्पर असतात आणि दुसऱ्याच्या अंतःकरणाला लागणारें भाषण ते कधींही करीत नाहीत८६. शुभ व अशुभ कर्मांच्या फलाचा संचय झाला असता त्याचा क्रमानें नाश कसा होत असतो हें जे जाणीत असतात ते सज्जनसंमत शिष्ट होत (सारांश, शुभ व अशुभ अशीं दोन्हीं कर्मे हातून घडल्यामुळें त्यांच्या फलाचा संचय झाला असतां सुख हें पुण्याच्या ऱ्हासाला कारणीभूत होतें असें समजून जे त्याची इच्छा करीत नाहींत आणि दुःख हें पापाच्या नाशाला कारणीभूत होतें असें समजून जे तें सहन करतात ते सज्जनसंमत शिष्ट होत)८७. युक्ति, शमदमादि गुण आणि सर्व लोकांच्या हिताची इच्छा हीं ज्यांचे ठिकाणीं आहेत आणि सन्मार्गाचें अवलंबन केलें असून जे हिंसेपासून पराङ्मुख असतात ते सज्जन स्वर्गलोक जिंकितात ८८. दानशूर, आपणाला जें मिळेल तें कुटुंबांतील माणसांना विभागून देणारे, दीनांवर अनुग्रह करणारे, प्रत्येकाचा आदर करणारे, विद्यारूप धनानें युक्त असलेले, तपस्वी ८९ आणि प्राणिमात्रावर दया करणारे असे जे पुरुष तेच शिष्टसंमत सज्जन होत. दीन असूनही शिष्ट असे जे पुरुष असतात त्यांना सुखावह लोक प्राप्त होत असून इहलोकींही ऐश्वर्य प्राप्त होतें ९०. ह्यांच्या पोषणाचें दुःख असतांनाही सज्जनांचें मन स्वस्थ असतें आणि अशी स्थिति असूनही आपल्याला हितकारक गोष्टी कोणत्या आणि धर्म कशामध्यें आहे इकडे लक्ष्य देऊन लोकव्यवहार पहात असतांनाही प्रसंगोपात्त शिष्टांचा

सत्यवचनमानृशंस्यमथार्जवम् । अद्रोहो नाभिमानश्च ह्रीस्तितिक्षा दमः शमः ९३ धीमन्तो धृतिमन्तश्च भूतानामनुकम्पकाः । अकामद्वेषसंयुक्तास्ते सन्तो लोकसाक्षिणः ९४ त्रीण्येव तु सतामाहुः सन्तः पदमनुत्तमम् । न चैव द्रुह्येद्दद्याच्च सत्यं चैव सदा वदेत् ९५ सर्वत्र च दयावन्तः सन्तः करुणवेदिनः । गच्छन्तीह सुसंतुष्टा धर्मपन्थानमुत्तमम् ९६ शिष्टाचारा महात्मानो येषां धर्मः सुनिश्चितः । अनसूया क्षमा शांतिः संतोषः प्रियवादिता ९७ कामक्रोधपरित्यागः शिष्टाचारनिषेवणम् । कर्म च श्रुतसंपन्नं सतां मार्गमनुत्तमम् ९८ शिष्टाचारं निषेवन्ते नित्यं धर्ममनुव्रताः । प्रज्ञाप्रासादमारुह्य मुच्यन्ते महतो भयात् ९९ प्रेक्षन्तो लोकवृत्तानि विविधानि द्विजोत्तम । अतिपुण्यानि पापानि तानि द्विजवरोत्तम १०० एतत्ते सर्वमाख्यातं यथाप्रज्ञं यथाश्रुतम् । शिष्टाचारगुणं ब्रह्मन्पुरस्कृत्य द्विजर्षभ १०१ [८२३१] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां

समागम झाला असता ते आपल्या शक्तीच्या बाहेर त्याना देतात. ह्याप्रमाणें वागणारे जे शिष्ट लोक त्यांचा अनंत संवत्सरपर्यंत एकसारखा उत्कर्षच होत असतो ९१, ९२. अहिंसा, सत्यवचन, सुजनता, सरलता, द्रोहबुद्धि आणि अभिमान ह्यांचा अभाव, पापाचरणाची लाज, सहिष्णुता, इंद्रियदमन व मनोनिग्रह हे गुण ज्यांचे ठिकाणीं आहेत ९३ आणि विचारी, धैर्यवान् , प्राणिमात्रावर दया करणारे व रागद्वेषरहित जे आहेत तेच लोकमान्य शिष्ट होत ९४. द्रोह करूं नये, यथाशक्ति दान द्यावें आणि नेहमीं सत्यभाषण करावें हे विशेषतः तीनच गुण संपादन करण्याची सज्जन इच्छा करीत असतात असें शिष्टानें ह्मणणें आहे ९५. सर्वत्र दया करणारे, दीनांचें दुःख जाणणारे आणि कशीही स्थिति आली असतां अत्यंत संतुष्ट असणारे असे जे शिष्ट असतात त्यांनाच धर्मानें संपादन केलेल्या उत्कृष्ट लोकाची प्राप्ति होते ९६. धर्मापासून जे कधींही ढळत नाहींत ते महात्मे सदाचरणसंपन्न होत. अनसूया, क्षमा, शांति, संतोष, प्रियवादित्व ९७, काम व क्रोध यांचा त्याग, सदाचाराचें अवलंबन आणि ज्ञानयुक्त कर्म ह्या शिष्टांनीं आचरिलेल्या उत्कृष्ट सन्मार्गाचा जे नेहमीं धर्मानें वागणारे लोक आश्रय करितात ते, आणि हे द्विजोत्तमा, हे विप्रश्रेष्ठा, पुण्यरहित व पापमूलक असे नानाप्रकारचे लोकांचे आचार जे समजत असतात ते आत्मज्ञानरूप प्रासादावर आरूढ होऊन संसाररूप महाभयापासून मुक्त होतात ९८, ९९, १००. हे द्विजोत्तमा, हे विप्रा, मीं आपल्या समजुतीप्रमाणें व ज्ञानाप्रमाणें शिष्टाचाराच्या लक्षणासंबंधानें तुला हें सर्व कथन केलें आहे १०१. ह्याप्रमाणें महामुनिव्यासप्रणीत

संहितायां वैयासिक्यामारण्यके पर्वणि मार्कण्डेयसमास्यापर्वणि ब्राह्मणव्याधसंवादे सप्ताधिकद्विशततमोऽध्यायः ॥ २०७ ॥

मार्कण्डेय उवाच ॥ स तु विप्रमथोवाच धर्मव्याधो युधिष्ठिर । यदहमाचरे कर्म घोरमेतदसंशयम् १ विधिस्तु बलवान्ब्रह्मन्दुस्तरं हि पुराकृतम् । पुराकृतस्य पापस्य कर्मदोषो भवत्ययम् २ दोषस्यैतस्य वै ब्रह्मन्विघाते यत्नवानहम् । विधिना हि हते पूर्वं निमित्तं घातको भवेत् ३ निमित्तभूता हि वयं कर्मणोस्य द्विजोत्तम । येषां हतानां मांसानि विक्रीणामीह वै द्विज ४ तेषामपि भवेद्धर्म उपयोगेन भक्षणे । देवतातिथिभृत्यानां पितॄणां चापि पूजनम् ५ ओषध्यो वीरुधश्चैव पशवो मृगपक्षिणः । अन्नाद्यभूता लोकस्य इत्यपि श्रूयते श्रुतिः ६ आत्ममांसप्रसादेन शिबिरौशीनरो नृपः । स्वर्गं सुदुर्गमं प्राप्तः क्षमवान्द्विजसत्तम ७ राज्ञो महानसे पूर्वं रन्तिदेवस्य वै द्विज । द्वे सहस्रे तु वध्येते पशूनामन्वहं तदा ८ अहन्यहनि वध्येते द्वे सहस्रे गवां तथा । समांसं ददतो ह्यन्नं रन्तिदेवस्य

लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील मार्कंडेयसमास्यापर्वांपैकीं ब्राह्मण आणि व्याध ह्यांच्या संवादाविषयीं दोनशें सातवा अध्याय समाप्त झाला ॥ २०७ ॥

मार्कंडेय सांगतात:—हे युधिष्ठिरा, नंतर तो धर्मव्याध त्या विप्राला ह्मणाला "मी जें हें कर्म करीत असतों तें निःसंशय क्रूर आहे १. परंतु, हे विप्रा, प्रारब्ध कांहीं बलवत्तर आहे. माझें पूर्वकर्म दुस्तर आहे आणि पूर्वी आचरिलेल्या पापामुळेंच हा कर्मदोष माझे ठिकाणीं दृष्टोत्पत्तीस येत आहे २. हे विप्रा, हा दोष नाहींसा करण्याकरितां मी यत्न करीत आहें (परंतु, प्रारब्ध बलवत्तर असल्यामुळें माझें कांहीं चालत नाहीं). प्राण्याचा पूर्वी दैवानेंच घात झालेला असतो आणि घातक हा त्याच्या नाशाला निमित्त मात्र होत असतो ३. हे द्विजश्रेष्ठा, ह्या हिंसाकर्माचें निमित्त मात्र आह्मी आहोंत; परंतु, हे द्विजा, ज्या मारलेल्या पशूंचें मांस मी येथें विकीत असतों त्यांनाही यथाविधि भक्षण झाल्यामुळें पुण्य प्राप्त होत असतें. कारण, देवता, अतिथि, भृत्य आणि पितर ह्यांचें पूजन त्यांच्या मांसाच्या योगानें होत असतें ४, ५. ओषधि, लता, पशु आणि मृग व पक्षी हे प्राण्याचे भोग्य व भक्ष्य आहेत, अशीही श्रुति असल्याचें आमच्या ऐकण्यांत आहे ६. हे द्विजश्रेष्ठा, उशीनरपुत्र क्षमाशील शिबिराजाला स्वतःचें मांस अर्पण केल्यानें अत्यंत दुर्लभ असा स्वर्ग प्राप्त झाला ७. हे द्विज, पूर्वी रंतिदेवराजाच्या पाकशालेमध्यें प्रत्यहीं दोन हजार पशूंचा वध होत असे ८. त्याचप्रमाणें नित्य

नित्यशः ९ अतुला कीर्तिरभवन्नृपस्य द्विजसत्तम । चातुर्मास्ये च पशवो वध्यन्त इति नित्यशः १० अग्नयो मांसकामाश्च इत्यपि श्रूयते श्रुतिः । यज्ञेषु पशवो ब्रह्मन्वध्यन्ते सततं द्विजैः ११ संस्कृताः किल मन्त्रैश्च तेपि स्वर्गमवाप्नुवन् । यदि नैवाग्नयो ब्रह्मन्मांसकामाभवन्पुरा १२ भक्ष्यं नैवाभवन्मांसं कस्यचिद्द्विजसत्तम । अत्रापि विधिरुक्तश्च मुनिभिर्मांसभक्षणे १३ देवतानां पितॄणां च भुङ्क्ते दत्त्वापि यः सदा । यथाविधि यथाश्राद्धं न प्रदुष्यति भक्षणात् १४ अमांसाशी भवत्येवमित्यपि श्रूयते श्रुतिः । भार्यां गच्छन्ब्रह्मचारी ऋतौ भवति ब्राह्मणः १५ सत्यानृते विनिश्चित्य अत्रापि विधिरुच्यते १६ सौदासेन तदा राज्ञा मानुषा भक्षिता द्विज । शापाभिभूतेन भृशमत्र किं प्रतिभाति मे १७ स्वधर्म इति कृत्वा तु न त्यजामि द्विजोत्तम । पुराकृतमिति ज्ञात्वा जीवाम्येतेन कर्मणा १८ स्वकर्म त्यजतो ब्रह्मन्नधर्म इह दृश्यते । स्वकर्मनि-

---

मामासहवर्तमान अन्नदान करणाऱ्या त्या रंतिदेवाच्या घरीं दान हजारांपर्यंत गोवध प्रत्यही होत असे ९. हे द्विजश्रेष्ठा, त्या रंतिदेवराजाची अनुपम कीर्ति झालेली आहे आणि चातुर्मास्यामध्यें ह्याप्रमाणें नेहमीं पशूंचा वध होत असतो १०. इतकेंच नव्हे; परंतु, अग्नि मांसाची इच्छा करीत असतात अशी श्रुतिही असल्याचें ऐकण्यांत येतें. हे विप्रा, यज्ञामध्यें द्विज नेहमीं पशूंचा वध करीत असतात ११ आणि मंत्रांनीं संस्कृत झालेले ते पशूही स्वर्गाला गेल्याचें प्रसिद्ध आहे. हे विप्रा, पूर्वीं अग्निच जर मांसाची इच्छा करणारे नव्हते १२ तर, हे द्विजश्रेष्ठा, मांस कोणालाही भक्ष्य झालें नसतें. ह्या मांसभक्षणाविषयींही मुनींनीं विधि सांगितलेला आहे. १३. देवता आणि पितर ह्यांना श्रद्धापूर्वक अर्पण करून जो यथाविधि नेहमीं सुद्धां मांस भक्षण करीत असतो तो त्या भक्षणापासून पातकी होत नाहीं १४. इतकेंच नव्हे; परंतु अशा रीतीनें यथाविधि मांस भक्षण करणारा अमांसभक्षकच समजावा अशीही श्रुति असल्याचें ऐकण्यांत आहे आणि त्याचप्रमाणें ऋतुकालीं भार्येशीं समागम करणारा ब्राह्मणही ब्रह्मचारीच रहात असल्याचें श्रुत आहे १५. असो. परंतु, ह्या यज्ञीय मांसभक्षणाविषयींही सत्यासत्याचा निश्चय करून विशेष विधि सांगितला आहे १६. हे द्विज, सौदास राजानें पूर्वीं शापग्रस्त झाल्यामुळें वारंवार मनुष्येंही भक्षण केलीं आहेत; तेव्हां ह्याबद्दल मला काय बरें वाटावें? १७. हे द्विजश्रेष्ठा, मांसविक्रय करणें हा स्वधर्म आहे असें समजून मी त्या कर्माचा त्याग करीत नाहीं. तर हें माझें संचित आहे असें मानून मी ह्या कर्मावर उपजीविका करीत आहें १८. हे विप्रा, इहलोकीं स्वकर्म

रतो यस्तु धर्मः स इति निश्चयः १९ पूर्वं हि विहितं कर्म देहिनं न विमुञ्चति ।
धात्रा विधिरयं दृष्टो बहुधा कर्मनिर्णये २० द्रष्टव्या तु भवेत्प्रज्ञा क्रूरे कर्मणि
वर्तता । कथं कर्म शुभं कुर्यां कथं मुच्ये पराभवात् ॥ कर्मणस्तस्य घोरस्य
बहुधा निर्णयो भवत् २१ दाने च सत्यवाक्ये च गुरुशुश्रूषणे तथा ।
द्विजातिपूजने चाहं धर्मे च निरतः सदा २२ अभिमानातिवादाभ्यां निवृ-
त्तोस्मि द्विजोत्तम । कृषिं साध्वीति मन्यन्ते तत्र हिंसा परा स्मृता २३
कर्षन्तो लाङ्गलैः पुंसो घ्नन्ति भूमिशयान्बहून् । जीवानन्यांश्च बहुशस्तत्र
किं प्रतिभाति मे २४ धान्यबीजानि यान्याहुर्व्रीह्यादीनि द्विजोत्तम । सर्वा-
ण्येतानि जीवानि तत्र किं प्रतिभाति मे २५ अध्याक्रम्य पशूंश्चापि
घ्नन्ति वै भक्षयन्ति च । वृक्षांस्तथौषधीश्चापि छिन्दन्ति पुरुषा द्विज २६
जीवा हि बहवो ब्रह्मन्वृक्षेषु च फलेषु च । उदके बहवश्चापि तत्र किं प्रति-
भाति मे २७ सर्वं व्याप्तमिदं ब्रह्मन्प्राणिभिः प्राणिजीवनैः । मत्स्यान्ग्र-

---

सोडणाऱ्या पुरुषाला पातक लागत असल्याचें शास्त्रामध्यें दृष्टोत्पत्तीस येतें आणि जो स्वकर्मनिष्ठ असतो तो प्रत्यक्ष धर्मच असा निश्चय आहे १९. पूर्वीचें संचित कर्म प्राण्याला सोडीत नाहीं. कर्माच्या परिमार्जनाविषयीं विधात्यानें अनेक प्रकारांनीं असा उपाय सांगितलेला आहे २०. क्रूर कर्म करणाऱ्याही पुरुषानें "माझ्या हातून शुभ कर्म कसें होईल आणि अशुभ कर्मापासून माझी मुक्तता कशी होईल." असा विचार करावा; म्हणजे त्याच्या क्रूर कर्माचें अनेक प्रकारांनीं परिमार्जन होतें २१. दान, सत्यवचन, गुरुशुश्रूषा, द्विजपूजन व स्वधर्म ह्यांविषयीं मी नेहमीं तत्पर असून २२ अभिमान आणि कलह ह्यांपासून, हे द्विजश्रेष्ठा, मी पराङ्मुख असतो. कृषिकर्म चांगलें असें म्हणत असतात; परंतु, त्या कृषिकर्मामध्यें तर पराकाष्ठेची हिंसा होत असल्याचें दृष्टोत्पत्तीस येतें २३. नांगरांच्या योगानें जमीन नांगरीत असतांना नांगरणारे लोक भूमीमध्यें रहात असलेल्या पुष्कळ प्राण्यांचा आणि इतरही जीवांचा वारंवार वध करीत असतात. तेव्हां त्यासंबधानें मला काय बरें वाटावें ? २४. हे द्विजश्रेष्ठा, ज्या व्रीहिप्रभृतींना धान्यबीजें असें म्हणत असतात ते हे सर्व जीवच आहेत. तेव्हां (स्वधर्म जर निंद्य समजावा तर) ह्याबद्दल मला काय बरें वाटत असलें पाहिजे ? २५. हे द्विज, बलात्कार करून पुरुष पशूंचा वध करून त्यांना भक्षणही करीत असतात. आणि त्याचप्रमाणें वृक्ष व औषधि ह्यांनाही तोडीत असतात २६. सारांश, हे विप्रा, वृक्ष व फलें ह्यांचे ठिकाणीं पुष्कळ जीव असतात आणि उदकामध्येंही पुष्कळच प्राणि असतात. तेव्हां (स्वधर्मासंबंधानें जर मला वाईट वाटावें तर वृक्षच्छेदन, फल-

सन्ते मत्स्याश्च तत्र किं प्रतिभाति मे २८ सत्त्वैः सत्त्वानि जीवन्ति बहुधा द्विजसत्तम। प्राणिनोऽन्योन्यभक्षाश्च तत्र किं प्रतिभाति मे २९ चङ्क्रम्यमाणा जीवांश्च धरणीसंश्रितान्बहून्। पद्भ्यां घ्नन्ति नरा विप्र तत्र किं प्रतिभाति मे ३० उपविष्टाः शयानाश्च घ्नन्ति जीवाननेकशः। ज्ञानविज्ञानवन्तश्च तत्र किं प्रतिभाति मे ३१ जीवैर्ग्रस्तमिदं सर्वमाकाशं पृथिवी तथा। अविज्ञानाच्च हिंसन्ति तत्र किं प्रतिभाति मे। अहिंसेति यदुक्तं हि पुरुषैर्विस्मितैः पुरा ३२ के न हिंसन्ति जीवान्वै लोकेऽस्मिन्द्विजसत्तम। बहु संचिन्त्य इति वै नास्ति कश्चिदहिंसकः ३३ अहिंसायां तु निरता यतयो द्विजसत्तम। कुर्वन्त्येव हि हिंसां ते यत्नादल्पतरा भवेत् ३४ आलक्ष्याश्चैव पुरुषाः कुले जाता महागुणाः। महाघोराणि कर्माणि कृत्वा लज्जन्ति वै न च ३५ सुहृदः सुहृदोऽन्यांश्च दुर्हृदश्चापि दुर्हृदः। सम्य-

---

भक्षण आणि जलपान) ह्याबद्दल मला काय बरें वाटलें पाहिजे ? २७. तात्पर्य, हे विप्र, प्राण्यावर उपजीविका करणाऱ्या प्राण्यानी हें विश्व व्याप्त झालेले आहे आणि मत्स्यच मत्स्याना भक्षण करीत असतात, तेव्हा ह्याबद्दल मला काय बरें वाटत असलें पाहिजे ? २८. हे द्विजश्रेष्ठा, प्रायः प्राण्याच्याच योगानें प्राण्याची उपजीविका होत असते, ह्मणजे प्राणी हे परस्परांना भक्षण करीत असतात. तेव्हां ह्याबद्दल मला काय बरें वाटत असलें पाहिजे ?२९. हे विप्र, चालता चालतां लोक पृथ्वीच्या आश्रयानें राहिलेल्या पुष्कळच जीवांचा पायानी वध करीत असतात. तेव्हां ह्याबद्दल मला काय बरें वाटावें?३०. ज्ञानी व अनुभवी असे लोकही बसले असताना व निजले असताना अनेक जिवाचा वध करीत असतात. तेव्हां ह्याबद्दल मला काय बरे वाटत असलें पाहिजे?३१. आकाश आणि पृथ्वी हें सर्व जीवानी व्याप्त झालेलें आहे आणि सर्वही लोक नसमजून जीवाचा वध करीत आहेत तेव्हा ह्याबद्दल मला काय बरे वाटत असले पाहिजे ? ' अहिंसा, अहिंसा!' ह्मणून विस्मयचकित झालेल्या पुरुषांनीं पूर्वी जें ह्मटलें आहे तें तरी कसें काय जुळते ? ३२. कारण, हे द्विजश्रेष्ठा, ह्या जगतामध्यें कोण बरें जीवांची हिंसा करीत नाही ? तात्पर्य, ह्याप्रमाणें पुष्कळ विचार करून पाहिला ह्मणजे खरा खरा अहिंसक असा कोणीही नाही. ३३. हे द्विजश्रेष्ठा, यति हे अहिंसेविषयी अगदी तत्पर असतात ह्मणून प्रसिद्ध आहे; परंतु, तेही हिंसा करीतच असतात. अंतर इतकाच कीं, यत्न मुळें त्यांच्या हातून हिंसा अगदीं कमी होते ३४. कुलीन आणि मोठे गुण अंगीं असलेलेही पुरुष मोठीं मोठीं क्रूर कर्में करूनही लाजत नाहींत असे दृष्टोत्पत्तीस येतात ३५. मित्र दुसऱ्या मित्राविषयीं, शत्रु शत्रूविषयी आणि

कुप्रवृत्तान्पुरुषान्न सम्यगनुपश्यतः ३६ समृद्धैश्च न नन्दन्ति बान्धवा बान्धवैरपि । गुरूंश्चैव विनिन्दन्ति मूढाः पण्डितमानिनः ३७ बहु लोके विपर्यस्तं दृश्यते द्विजसत्तम । धर्मयुक्तमधर्मं च तत्र किं प्रतिभाति मे ३८ वक्तुं बहुविधं शक्यं धर्माधर्मेषु कर्मसु । स्वकर्मनिरतो यो हि स यशः प्राप्नुयान्महत् ३९ [८३७०] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यामारण्यके पर्वणि मार्कण्डेयसमास्यापर्वणि ब्राह्मणव्याधसंवादेऽष्टाधिकद्विशततमोऽध्यायः ॥ २०८ ॥

मार्कण्डेय उवाच ॥ धर्मव्याधस्तु निपुणं पुनरेव युधिष्ठिर । विप्रर्षभमुवाचेदं सर्वधर्मभृतां वर १ व्याध उवाच ॥ श्रुतिप्रमाणो धर्मोऽयमिति वृद्धानुशासनम् । सूक्ष्मा गतिर्हि धर्मस्य बहुशाखा ह्यनन्तिका २ प्राणान्तिके विवाहे च वक्तव्यमनृतं भवेत् । अनृतेन भवेत्सत्यं सत्येनैवानृतं भवेत् ३ यद्भूतहितमत्यन्तं तत्सत्यमिति धारणा । विपर्ययकृतो धर्मः पश्य धर्मस्य सूक्ष्मताम् ४ यत्करोत्यशुभं कर्म शुभं वा यदि सत्तम ।

सामान्य लोकही सदाचरणसंपन्न पुरुषाविषयी मनामध्यें चांगली बुद्धि धारण करीत नाहींत ३६. संपन्न बांधवांच्या योगानें बांधवांना आनंद होत नाहीं आणि पंडितंमन्य मूढ लोक गुरुजनांचीही निंदा करीत असतात ३७. सारांश, हे द्विजश्रेष्ठ, बाह्यदृष्ट्या धर्मयुक्त परंतु वस्तुतः अधर्म असा पुष्कळच विपरीत प्रकार जगतामध्यें दृष्टोत्पत्तीस येत असतो. तेव्हां ह्याबद्दल मला काय बरें वाटत असलें पाहिजे ? ३८. धर्माधर्मविषयक कर्मासंबंधानें पुष्कळ प्रकार बोलतां येणें शक्य आहे; परंतु, जो स्वकर्मनिष्ठ रहातो तोच मोठें यश संपादन करितो (हेंच सर्व भाषणाचें सार आहे) ३९. ह्याप्रमाणें महामुनिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील मार्कंडेयसमास्यापर्वांपैकीं ब्राह्मण आणि व्याध ह्यांच्या संवादाविषयीं दोनशें आठवा अध्याय समाप्त झाला ॥ २०८ ॥

मार्कंडेय सांगतातः— हे सर्व धर्मनिष्ठांमध्यें श्रेष्ठ युधिष्ठिरा, धर्मव्याधानें पुनरपि त्या विप्रश्रेष्ठाशीं असें उत्कृष्ट भाषण केलें १. व्याध ह्मणालाः— हा धर्म श्रुतिप्रमाण आहे असें वृद्धांचें सांगणें आहे; परंतु, धर्माची गति सूक्ष्म असून तिला पुष्कळच फांटे असल्यामुळें तिचा अंत लागत नाहीं २. प्राणांतप्रसंगीं आणि विवाहप्रसंगीं अनृत भाषण करणेंही योग्य होत असतें आणि अशा वेळीं अनृत भाषणानेंच सत्य होत असून सत्यानेंच अनृत होण्याचा प्रसंग येत असतो ३. कारण, ज्याच्यांत प्राण्यांचें अत्यंत हित आहे तें सत्य हा शास्त्राचा निश्चय होय. सारांश, (सत्यानेंच अनृत व

अवश्यं तत्समाप्नोति पुरुषो नात्र संशयः ५ विषमां च दशां प्राप्तो देवान्गर्हति वै भृशम् । आत्मनः कर्मदोषाणि न विजानात्यपण्डितः ६ मूढो नैकृतिकश्चापि चपलश्च द्विजोत्तम । सुखदुःखविपर्यासान्सदा समुपपद्यते ७ नैनं प्रज्ञा सुनीतं वा त्रायते नैव पौरुषम् ८ यो यमिच्छेद्यथाकामं तं तं कामं स आप्नुयात् । यदि स्यादपराधीनं पौरुषस्य क्रियाफलम् ९ संयताश्चापि दक्षाश्च मतिमन्तश्च मानवाः । दृश्यन्ते निष्फलाः सन्तः प्रहीणाः सर्वकर्मभिः १० भूतानामपरः कश्चिद्धिंसायां सततोत्थितः । वञ्चनायां च लोकस्य स सुखी जीवते सदा ११ अचेष्टमपि चासीनं श्रीः कंचिदुपतिष्ठति । कश्चित्कर्माणि कुर्वन्हि न प्राप्यमधिगच्छति १२ देवानिष्ट्वा तपस्तप्त्वा कृपणैः पुत्रगृद्धिभिः । दशमासधृता गर्भे जायन्ते कुलपांसनाः १३ अपरे धनधान्यैश्च भोगैश्च

अनृतानेच सत्य असा) विपरीत प्रकार धर्मामध्ये आहे. ह्यावरून धर्माची गति किती सूक्ष्म आहे, ह्याचा तूच विचार करून पहा ४. हे सज्जनश्रेष्ठा, पुरुष जें काहीं शुभ अथवा अशुभ कर्म करीत असतो त्याचें फल त्याला अवश्य प्राप्त होत असतें ह्यात संशय नाहीं ५. दुःखद अवस्था प्राप्त झाली असता मूढ पुरुष आपल्या कर्मदोषाचा विचार न करिता वारंवार दैवाचीच निंदा करीत असतो ६. हे द्विजश्रेष्ठा, मूढ, कपटी आणि अविचारी असा जो पुरुष असतो त्याला नेहमीं सुखावह समजली जाणारी गोष्ट दुःखावह होणें अशा विपरीत प्रकाराचा अनुभव येत असतो ७ आणि बुद्धि, गुरुशिक्षा व प्रयत्न ह्यांपैकी एकही त्याला दुःखानुभवापासून तारण्यास समर्थ होत नाहीं ८. प्रयत्नाचें फल जर पराधीन नसतें तर ज्याचा ज्याप्रमाणें मनोरथ असेल त्याचाप्रमाणें तो मनोरथ सिद्धीस जाईल ९; परंतु, जितेंद्रिय, दक्ष व बुद्धिमान् असे पुरुष सर्व प्रयत्न करून थकले असतानाही त्यांना काहीं एक फलप्राप्ति होत नसल्याचें दृष्टोत्पत्तीस येतें १०. प्राण्यांपैकी जो कोणी एखादा हिंसा करण्याविषयीं नेहमीं उद्युक्त असतो तो सर्वदा सुखी रहातो ११. एखादा कोणी एक उद्योग न करिता स्वस्थ बसलेला असतो; परंतु, त्याचीच सेवा लक्ष्मी करूं लागते आणि एखादा काहीं वस्तु प्राप्त करून घेण्याविषयीं नानाप्रकारच्या खटपटी करीत असतानाही आणि ती वस्तु मिळण्यासारखी असूनही त्याला प्राप्त होत नाहीं १२. संतति नसल्यामुळें खेद मानणारे कित्येक लोक पुत्रप्राप्तीकरितां यज्ञयागादि कर्मांनीं देवांना संतुष्ट करून तपश्चर्या करीत असतात आणि अशा रीतीनें वागल्यानंतर त्यांना जे गर्भामध्यें दहा महिने धारण केलेले पुत्र होतात ते कुलाला कलंक लावणारे निपजतात १३ आणि त्याच यज्ञयागादि

मिह्वुमं चितैः । विपुलैरभिजायन्ते लब्धास्तैरेव मङ्गलैः १४ कर्मजा हि
मनुष्याणां रोगा नास्त्यत्र संशयः । व्याधयो विनिवार्यन्ते व्याधैः क्षुद्र-
मृगा इव १५ ते चापि कुशलैर्वैद्यैर्निपुणैः संभृतौषधैः । व्याधयो विनि-
वार्यन्ते मृगा व्याधैरिव द्विज १६ येषामस्ति च भोक्तव्यं ग्रहणीदोषपी-
डिताः । न शक्नुवन्ति ते भोक्तुं पश्य धर्मभृतां वर १७ अपरे बाहुबलिनः
क्लिश्यन्ति बहवो जनाः । दुःखेन चाधिगच्छन्ति भोजनं द्विजसत्तम १८
इति लोकमनाक्रन्दं मोहशोकपरिप्लुतम् । स्रोतसासकृदाक्षिप्तं ह्रियमाणं
बलीयसा १९ न म्रियेयुर्न जीर्येयुः सर्वे स्युः सर्वकामिकाः । नाप्रियं
प्रतिपश्येयुर्वशित्वं यदि वै भवेत् २० उपर्युपरि लोकस्य सर्वो गन्तुं समी-
हते । यतते च यथाशक्ति न च तद्वर्तते तथा २१ बहवः संप्रदृश्यन्ते
तुल्यनक्षत्रमङ्गलाः । महत्तु फलवैषम्यं दृश्यते कर्मसंधिषु २२ न कश्चि-

---

मंगल कर्मांच्या योगानें दुसरे जे पुत्र झालेले असतात ते पूर्वजन्मीं मिळवून ठेवि-
लेल्या अनेक भोग्य वस्तु आणि धनधान्यें यांनीं संपन्न असल्याचें दृष्टोत्पत्तीस यतें १४.
मनुष्यांना कर्मजन्यही व्याधि होत असतात ह्यांत संशय नाहीं. व्याधांच्या योगानें
जसें क्षुद्र मृगांचें निवारण होतें तसें कर्मांच्या योगानें ह्या कर्मजन्य व्याधींचेही निवा-
रण होतें १५ आणि, हे द्विज, मोठमोठ्या मृगाचें निवारण करण्यास ज्याप्रमाणें
व्याधांना जड जातें त्याप्रमाणें औषधसंपन्न, शास्त्रांमध्य निष्णात व चतुर अशा वैद्यां-
नाही त्या व्याधींचें निवारण करणें कठीण जातें १६. हे धर्मनिष्ठामध्यें श्रेष्ठ, पहा !
ज्यांना खाण्याची ददात नसते ते संग्रहणी रोगानें पीडित झाल्यामुळें इच्छेप्रमाणें
खाण्यास समर्थ होत नाहींत १७. हे द्विजश्रेष्ठ, शरीरानें बळकट असे दुसरे पुष्कळ
लोक (दारिद्र्यामुळें) क्लेश भोगीत असतात आणि मोठ्या दुःखानें त्यांना अन्न
मिळत असतें १८. साराश, कोणाचेंही साहाय्य ज्याला नाहीं असें हें जगत् शोक
व मोह ह्यांमध्यें मग्न होऊन गेलेलें आहे आणि प्रचंड असा जो संचितकर्मप्रवाह
त्याच्यापुढें ह्याचें कांहीं एक चालत नसून त्या प्रवाहांत सांपडलेलें हें जगत् वारंवार
इकडे तिकडे हेलकावे व धक्के खात आहे १९. लोक जर स्वतंत्र असते तर सर्वां-
च्याही सर्व कामना परिपूर्ण झाल्या असत्या, कोणी वृद्धही झाले नसते, कोणी
मृत्युही पावले नसते आणि दुःख पाहण्याचीही पाळी कोणावर आली नसती २०.
जो तो दुसऱ्यापेक्षां श्रेष्ठ होण्याची इच्छा करीत असतो व त्याप्रमाणें यथाशक्ति
प्रयत्नही करीत असतो; परंतु, तसें होत मात्र नाहीं २१. एकाच नक्षत्रावर
आणि एकाच शुभ मुहूर्तावर जन्मास आलेले पुष्कळ दृष्टीं पडतात; परंतु

दीश्यते ब्रह्मन्स्वयंग्राह्यस्य सत्तम । कर्मणा प्राकृतानां वै इह सिद्धिः प्रदृश्यते २३ कथा श्रुतिरियं ब्रह्मन्जीवः किल सनातनः । शरीरमध्रुवं लोके सर्वेषां प्राणिनामिह २४ वध्यमाने शरीरे तु देहनाशो भवत्युत । जीवः संक्रमतेन्यत्र कर्मबन्धनिबन्धनः २५ ब्राह्मण उवाच ॥ कथं कर्मविदां श्रेष्ठ जीवो भवति शाश्वतः । एतदिच्छाम्यहं ज्ञातुं तत्त्वेन वदतां वर २६ व्याध उवाच । न जीवनाशोस्ति हि देहभेदे मिथ्यैतदाहुर्म्रियतीति मूढाः ॥ जीवस्तु देहान्तरितः प्रयाति दशार्धतैवास्य शरीरभेदः २७ अन्यो हि नाश्नाति कृतं हि कर्म मनुष्यलोके मनुजस्य कश्चित् । यत्तेन किंचिद्धि कृतं हि कर्म तदश्नुते नास्ति कृतस्य नाशः २८ सुपुण्यशीला हि भवन्ति पुण्या नराधमाः पापकृतो भवन्ति । नरोनुयातस्त्विह कर्मभिः स्वैस्ततः समुत्पद्यति भावितस्तैः २९ ब्राह्मण उवाच ॥ कथं संभवते योनौ कथं वा पुण्यपापयोः । जातीः पुण्याम्त्वपुण्याश्च कथं गच्छति सत्तम ३०

त्याच्या चरित्रामध्यें मोठेंच फलवैषम्य दृष्टी पडतें २२. हे सज्जनश्रेष्ठा विप्रा, हातीं असलेल्या वस्तूवरही ज्यांची मालकी चालत नाही असे काही लोक दृष्टीं पडतात. इहलोकी कर्माच्या योगानें काहीं साधारण मात्र गोष्टी सिद्धीस जात असतात २३ हे विप्रा, जगतांतील सर्व प्राण्यांचें शरीर मात्र नश्वर असून जीव हा खरोखर अक्षय्यच आहे अशा अर्थाची प्रत्यक्ष श्रुतिच आहे २४. शरीराचा मात्र घात कोणी करूं लागला असतां तो होतो आणि कर्मफलरूप बंधनांनीं युक्त असलेला जीव दुसरीकडे चालता होतो २५. ब्राह्मण प्रश्न करतो:—हे कर्मवेत्त्यांमध्यें श्रेष्ठ, हे वक्त्यांमध्यें निपुण, जीव अक्षय्य कसा हें खरें खरें जाणण्याची माझी इच्छा आहे २६. व्याध सांगतो:—देहाचा नाश झाला असता जीवाचा नाश होत नाहीं. देहाचा नाश होऊं लागला असता ज्याचा तो देह असेल तो मरत आहे असें जे मूढ ह्मणत असतात तें मिथ्या आहे. जीव हा दुसऱ्या देहाचें अवलंबन करून चालता होतो. ह्याच्या शरीराचा नाश होणें ह्मणजे तें पंचमहाभूतांमध्यें मिळून जाणेंच होय २७. मनुष्यलोकामध्यें एकानें केलेल्या कर्माचें फळ दुसऱ्याला प्राप्त होत नाहीं; ज्यानें जें कर्म केलें असेल त्यालाच त्याचें फळ भोगावें लागतें. केलेल्या कर्माचा नाश कधीं होत नाहीं २८. अत्यंत पुण्यशील असे जे पुरुष असतात ते चांगले निपजतात आणि पापी असतात ते नराधम निपजतात. पुरुष इहलोकीं आपल्या कर्मासहवर्तमान आलेला असतो आणि नंतरही त्या आपल्या कर्मांनीं बद्ध होऊनच दुसऱ्या जन्माला जात असतो २९. ब्राह्मण प्रश्न करतो:—हे सज्जनश्रेष्ठ, प्राणी जन्माला

व्याध उवाच॥ गर्भाधानसमायुक्तं कर्मेदं संप्रदृश्यते। समासेन तु ते क्षिप्रं प्रवक्ष्यामि द्विजोत्तम ३१ यथासंभृतसंभारः पुनरेव प्रजायते। शुभकृच्छुभयोनीषु पापकृत्पापयोनिषु ३२ शुभैः प्रयोगैर्देवत्वं व्यामिश्रैर्मानुषो भवेत्। मोहनीयैर्वियोनीषु त्वधोगामी च किल्बिषी ३३ जातिमृत्युजरादुःखैः सततं समभिद्रुतः। संसारे पच्यमानश्च दोषैरात्मकृतैर्नरः ३४ तिर्यग्योनिसहस्राणि गत्वा नरकमेव च। जीवाः संपरिवर्तन्ते कर्मबन्धनिबन्धनाः ३५ जन्तुस्तु कर्मभिस्तैस्तैः स्वकृतैः प्रेत्य दुःखितः। तद्दुःखप्रतिघातार्थमपुण्यां योनिमाप्नुते ३६ ततः कर्म समादत्ते पुनरन्यन्नवं बहु। पच्यते तु पुनस्तेन भुक्त्वापथ्यमिवातुरः ३७ अजस्रमेव दुःखार्तोऽदुःखितः सुखसंज्ञकः। ततोऽनिवृत्तबन्धत्वात्कर्मणामुदयादपि ३८ परिक्रामति संसारे चक्रवद्बहुवेदनः। स चेन्निवृत्तबन्धस्तु विशुद्धश्चापि

कर्म येते आणि त्याचप्रमाणें पुण्य व पाप ह्यांच्या अनुसारानें त्याला पवित्र व पातकी जन्म कसे प्राप्त होतात (हें तूं मला कथन कर) ३०. व्याध सांगतोः—पिंडाची उत्पत्ति ज्या ग्रंथांत सांगितली आहे त्या ग्रंथांत हें सर्व काहीं आहे. स्थूल शरीर वगैरे हें जें काहीं दृष्टोत्पत्तीस येतें तें सर्व कर्माचेंच फल आहे. असो. त्या ग्रंथांत जें सांगितलें आहे तेंच, हे द्विजश्रेष्ठा, संक्षेपानें मी तुला थोडक्यांत सांगतों ३१. प्राण्यानें ज्याप्रमाणें (कर्मसंचयरूप) तयारी करून ठेविली असेल त्याप्रमाणें त्याला पुनरपि जन्म प्राप्त होतो. तो जर शुभ कर्में करणारा असला तर शुभ योनीमध्यें त्याला जन्म प्राप्त होतो आणि पापकर्म करणारा असेल तर तो पापयोनीमध्यें जन्मास येतो ३२. शुभ कर्मांच्या योगानें देवयोनि, मिश्रकर्मांच्या योगानें मनुष्ययोनि आणि तामसकर्मांच्या योगानें श्वानसूकरादि योनि पुरुषाला प्राप्त होत असून पाप्याला नरकयोनि प्राप्त होत असते ३३. जन्म, मृत्यु, जरा आणि दुःख हीं नेहमीं पुरुषाच्या मागें लागलेलींच असतात आणि स्वतःच्या दोषामुळें नानाप्रकारच्या योनींमध्यें संचार करितां करितां तो केलेल्या कर्मांचीं फलें भोगीत असतो ३४. कर्मफलानें बद्ध झालेले जीव हजारों पशुपक्ष्यादि योनींमध्यें आणि नरकयोनीमध्यें जाऊन पुनरपि भ्रमण करीत असतात ३५. स्वतः केलेल्या नानाप्रकारच्या कर्मांमुळें दुःखोपभोगास पात्र झालेला प्राणी मरणानंतर त्या दुःखाचा उपभोग घेण्याकरितां अपवित्र योनीमध्यें जन्मास येतो ३६. नंतर नवीन नवीन अनेक कर्में तो करितो आणि रोगग्रस्त पुरुषाला वावडें अन्न भक्षण केल्यावर ज्याप्रमाणें त्याचें फल भोगावें लागतें त्याप्रमाणें त्या कर्मांचेंही फल भोगण्याची पाळी त्याला

कर्मभिः ३९ तपोयोगसमारम्भं कुरुते द्विजसत्तम । कर्मभिर्बहुभिश्चापि लोकानश्नाति मानवः ४० सचेन्निवृत्तबन्धस्तु विशुद्धश्चापि कर्मभिः । प्राप्नोति सुकृताँल्लोकान्यत्र गत्वा न शोचति ४१ पापं कुर्वन्पापवृत्तः पापस्यान्तं न गच्छति । तस्मात्पुण्यं यतेत्कर्तुं वर्जयीत च पापकम् ४२ अनसूयुः कृतज्ञश्च कल्याणानि च सेवते । सुखानि धर्ममर्थं च स्वर्गं च लभते नरः ४३ संस्कृतस्य च दान्तस्य नियतस्य यतात्मनः । प्राज्ञस्यानन्तरा वृत्तिरिह लोके परत्र च ४४ सतां धर्मेण वर्तेत क्रियां शिष्टवदाचरेत् । असंक्लेशेन लोकस्य वृत्तिं लिप्सेत वै द्विज ४५ स्वधर्मेण क्रिया लोके कर्मणः सोऽप्यसंकरः । सन्ति ह्यागमविज्ञानाः शिष्टाः शास्त्रे विचक्षणाः । प्राज्ञो धर्मेण रमते धर्मं चैवोप-

---

येते ३७. प्राणी एकसारखा दुःखाने गांजलेला असतो आणि मध्यंतरी काहीं वेळपर्यंत दुःख नाहींसे झालें असतां सुखी ह्या संज्ञेस तो पात्र होतो; परंतु, कर्मफलरूप बंधन त्याच्यापासून निवृत्त झालें नसल्यामुळे कर्मफलाला आरंभ होण्याचा समय प्राप्त झाला असतां ३८ अनेक दुःखांनी व्याप्त असलेला तो प्राणी चक्राप्रमाणें ह्या संसारामध्यें पुनरपि भ्रमण करूं लागतो. नंतर कर्मांनीं अंतःकरणशुद्धि झाल्यामुळें ऐहिक सुखासंबंधी इच्छा जर त्याची निवृत्त झाली तर ३९, हे द्विजश्रेष्ठ, तो तपश्चर्येला आरंभ करतो आणि अनेक पुण्यकर्मांच्या योगाने त्याला उत्तम लोकांची प्राप्ति होते ४० त्याचप्रमाणें कर्मांच्या योगानें अंतःकरणशुद्ध होऊन पुरुषाचें कर्मफलरूप बंधनच जर निवृत्त झालें तर त्याला पुण्यलोकप्राप्ति होते आणि ती प्राप्ति झाल्यावर त्याला पुनरपि दुःख भोगण्याची पाळी येत नाहीं ४१ पापाचरणी पुरुषानें एकसारखें पातक करणें जरी सुरू ठेविलें तरी त्याचा त्याला कधीं कंटाळा येत नाहीं. तस्मात्, नेहमीं पुण्यकर्म करण्याविषयीं प्रयत्न करावा आणि पापकर्म वर्ज्य करावें ४२ कारण, पुण्यकर्म करणारा पुरुष निर्मत्सर व कृतज्ञ होऊन कल्याण आणि सुख ह्यांचा उपभोग घेतो आणि धर्म, अर्थ व स्वर्ग ही तिन्ही त्याला प्राप्त होतात ४३. संस्कृत, जितेंद्रिय, शौचाचारसंपन्न आणि मनोनिग्रही असा जो विचारी पुरुष असेल त्याचें जीवन इहलोकीं व परलोकींही सुखावह होतें ४४. हे द्विजा, सज्जनांच्या मार्गानें वागावें; शिष्टांप्रमाणें कर्म आचरावें आणि दुसऱ्याला पीडा न देतां आपल्या उपजीविकेची इच्छा धरावी ४५. स्वधर्माला अनुसरून तूं कर्म करीत जा म्हणजे असें केलें असतां जगतामध्यें धर्मांचा संकर होत नाहीं. वेदवेत्ते व धर्मशास्त्राविषयीं निपुण असे जे शिष्ट लोक आहेत तेही असेंच

जीवति ४६ तस्माद्धर्मादवाप्तेन धनेन द्विजसत्तम । तस्यैव सिञ्चते मूलं गुणान्पश्यति यत्र वै ४७ धर्मात्मा भवति ह्येवं चित्तं चास्य प्रसीदति । समित्रजनसंतुष्ट इह प्रेत्य च नन्दति ४८ शब्दं स्पर्शं तथा रूपं गन्धानिष्टांश्च सत्तम । प्रभुत्वं लभते चापि धर्मस्यैतत्फलं विदुः ४९ धर्मस्य च फलं लब्ध्वा न तुष्यति महाद्विज । अतृप्यमाणो निर्वेदमापेदे ज्ञानचक्षुषा ५० प्रज्ञाचक्षुर्नर इह दोषं नैवानुरुध्यते । विरज्यते यथाकामं न च धर्मं विमुञ्चति ५१ सर्वत्यागे च यतते दृष्ट्वा लोकं क्षयात्मकम् । ततो मोक्षे प्रयतते नानुपायादुपायतः ५२ एवं निर्वेदमादत्ते पापं कर्म जहाति च । धार्मिकश्चापि भवति मोक्षं च लभते परम् ५३ तपो निःश्रेयसं जन्तोस्तस्य मूलं शमो दमः । तेन सर्वानवाप्नोति कामान्यान्मनसेच्छति ५४ इन्द्रियाणां निरोधेन सत्येन च दमेन च । ब्रह्मणः पदमा-

---

सांगत असतात. प्राज्ञ पुरुषाचें मन धर्माचे ठिकाणीं रमत असतें आणि धर्माला अनुसरूनच तो उपजीविका करीत असतो ४६. इतकेंच नव्हे; परंतु, हे द्विजश्रेष्ठा, त्या धर्मामुळें प्राप्त झालेलें जें धन त्याच्या योगानें पुनरपि तो त्या धर्मवृक्षाचेंच मूल सिंचन करतो व त्यामुळें त्याला चांगलीं फलेंही प्राप्त होतात ४७ तात्पर्य, धर्मात्मा पुरुष ह्याप्रमाणें वागतो, त्याचें द्रव्यही वृद्धिंगत होतें आणि मित्रजनांसहवर्तमान तो संतुष्ट होऊन इहलोकीं व परलोकीं आनंदानें रहातो ४८. हे सज्जनश्रेष्ठा, शब्द, स्पर्श, रूप व गंध हे सर्व मनाप्रमाणें त्याला प्राप्त होत असून प्रभुत्वही मिळतें हें धर्माचें फल सांगत असतात ४९. हे महाब्राह्मणा, धर्माचें फल जो स्वर्ग तो प्राप्त झाला असतांही चित्तशुद्धि झालेल्या पुरुषाला संतोष होत नाहीं व ह्याप्रमाणें स्वर्गामध्ये त्याचें मन रमेनासें होऊन ज्ञानदृष्टीच्या योगानें त्याला वैराग्य प्राप्त होतें ५०. ज्ञानदृष्टि ज्याला प्राप्त झाली आहे तो पुरुष इहलोकीं रागद्वेषादि दोषाच्या तावडींत न सांपडतां आपोआप विरक्त होऊं लागतो आणि धर्मापासून पराङ्मुख होत नाहीं ५१. जगत् हें नश्वर आहे असें अवलोकन करून तो जगत्संबंधीं सर्व गोष्टींचा त्याग करण्याविषयीं प्रथम यत्न करूं लागतो आणि नंतर दैवावर हवाला देऊन स्वस्थ न बसतां उपायांचें अवलंबन करून मोक्षप्राप्तीविषयीं प्रयत्न करू लागतो ५२. ह्याप्रमाणें पुरुषाला वैराग्य प्राप्त झालें असतां तो पापकर्माचा त्याग करून पुण्यशील होतो आणि उत्कृष्ट मोक्ष प्राप्त करून घेतो ५३ प्राण्याला मुक्ति प्राप्त होण्याचें मुख्य साधन ज्ञान हें असून शम व दम हें त्या ज्ञानाचें मूळ आहे. तें ज्ञान प्राप्त झालें असतां पुरुषाच्या मनामध्यें ज्या कांहीं इच्छा उद्भवलेल्या असतात त्या सर्वही सफल होतात ५४. सारांश, हे

प्रोति यत्परं द्विजसत्तम ५५ ब्राह्मण उवाच ॥ इन्द्रियाणि तु यान्याहुः कानि तानि यतव्रत । निग्रहश्च कथं कार्यो निग्रहस्य च किं फलम् ५६ कथं च फलमाप्नोति तेषां धर्मभृतां वर । एतदिच्छामि तत्त्वेन धर्मं ज्ञातुं निबोध मे ५७ [८४२७] इति श्रीमहाभारते० मारण्यके पर्वणि मार्कण्डेयसमास्यापर्वणि ब्राह्मणव्याधसंवादे नवाधिकद्विशततमोऽध्यायः ॥२०९॥

मार्कण्डेय उवाच ॥ एवमुक्तस्तु विप्रेण धर्मव्याधो युधिष्ठिर । प्रत्युवाच यथा विप्रं तच्छृणुष्व नराधिप १ व्याध उवाच ॥ विज्ञानार्थं मनुष्याणां मनः पूर्वं प्रवर्तते । तत्प्राप्य कामं भजते क्रोधं च द्विजसत्तम २ ततस्तदर्थं यतते कर्म चारभते महत् । इष्टानां रूपगन्धानामभ्यासं च निषेवते ३ ततो रागः प्रभवति द्वेषश्च तदनंतरम् । ततो लोभः प्रभवति मोहश्च तदनंतरम् ४ ततो लोभाभिभूतस्य रागद्वेषहतस्य च । न धर्मे जायते बुद्धिर्व्याजाद्धर्मं करोति च ५ व्याजेन चरते धर्ममर्थं व्याजेन

द्विजश्रेष्ठा, इंद्रियनिग्रह, सत्य व मनःसंयमन ह्यांच्या योगानें ब्रह्माचें जें उत्कृष्ट स्थान तें पुरुषाला प्राप्त होतें ५५ ब्राह्मण प्रश्न करितोः—हे धर्मनिष्ठ, इंद्रियें ज्यांना ह्मणतात तीं कोणतीं? त्यांचा निग्रह कसा करावा ? निग्रह केला असतां काय फल प्राप्त होतें ५६ आणि, हे धर्मनिष्ठांमध्यें श्रेष्ठ, त्यांच्या निग्रहाचें तें फल कसें प्राप्त होतें हें सर्व धर्मप्रकरण खरें खरें जाणण्याची मला इच्छा आहे. ह्यास्तव, तूं तें मला कथन कर ५७. ह्याप्रमाणें महामुनिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील मार्कंडेयसमास्यापर्वापैकीं ब्राह्मण आणि व्याध ह्यांच्या संवादाविषयीं दोनशें नववा अध्याय समाप्त झाला ॥ २०९ ॥

मार्कंडेय ह्मणतातः—हे प्रजाधिपते युधिष्ठिरा, ह्याप्रमाणें त्या विप्रानें धर्मव्याधाला प्रश्न केला असतां त्यानें जें त्या विप्राला सांगितलें तें तूं श्रवण कर १. व्याध सांगतोः—हे द्विजश्रेष्ठ, कोणत्याही पदार्थाचें ज्ञान प्राप्त करून घेण्याकरितां मनुष्याचें मन प्रथम त्या पदार्थाकडे प्रवृत्त होत असतें आणि ह्याप्रमाणें तें प्रवृत्त झालें असतां राग आणि द्वेष ह्यांचें तें अवलंबन करितें २. तदनंतर त्या वस्तूकरितां मनुष्य प्रयत्नपूर्वक मोठी खटपट करूं लागतो आणि वारंवार आपणाला प्रिय असलेल्या रूपांचें व गंधांचें सेवन करूं लागतो ३. ह्याप्रमाणें तो रूप व गंध ह्यांचें सेवन करूं लागला असतां त्याच्या मनामध्यें त्यांविषयीं राग व द्वेष उत्पन्न होऊं लागतात, नंतर लोभ उत्पन्न होऊं लागतो आणि तदनंतर मोहही उत्पन्न होतो ४ व ह्याप्रमाणें तो लोभाच्या तावडींत सांपडून राग आणि द्वेष ह्यांच्या कचाट्यांत सांपडला ह्मणजे त्याच्या

**रोचते । व्याजेन सिध्यमानेषु धनेषु द्विजसत्तम ६ तत्रैव रमते बुद्धि-
स्ततः पापं चिकीर्षति । सुहृद्भिर्वार्यमाणश्च पण्डितैश्च द्विजोत्तम ७
उत्तरं श्रुतिसंबद्धं ब्रवीत्यश्रुतियोजितम् । अधर्मस्त्रिविधस्तस्य वर्तते राग-
दोषजः ८ पापं चिन्तयते चैव ब्रवीति च करोति च । तस्याधर्मप्रवृ-
त्तस्य गुणा नश्यन्ति साधवः ९ एकशीलैश्च मित्रत्वं भजन्ते पापकर्मिणः।
स तेन दुःखमाप्नोति परत्र च विपद्यते १० पापात्मा भवति ह्येवं धर्म-
लाभं तु मे शृणु । यस्त्वेतान्प्रज्ञया दोषान्पूर्वमेवानुपश्यति ११ कुशलः
सुखदुःखेषु साधूंश्चाप्युपसेवते । तस्य साधुसमारम्भाद्बुद्धिर्धर्मेषु राजते १२
ब्राह्मण उवाच॥ ब्रवीषि सूनृतं धर्म्यं यस्य वक्ता न विद्यते । दिव्यप्र-
भावः सुमहानृषिरेव मतोसि मे १३ व्याध उवाच ॥ ब्राह्मणा वै महा-**

धर्माविषयी त्याचे ठिकाणी बुद्धि उत्पन्न न होता तो कपटानें धर्माचरण करूं लागतो ५.
अशा रीतीनें पुरुष कपटानें धर्माचरण करूं लागला असतां द्रव्यार्जनही कपटानेंच
करणें त्याला रुचूं लागतें आणि, हे द्विजश्रेष्ठा, कपटानें द्रव्य संपादन होऊं लागलें
असतां ६ त्याच्या बुद्धीला तेंच बरें वाटूं लागतें व, हे द्विजोत्तमा, सुहृद् आणि
ज्ञानी लोक 'नको नको' म्हणत असतानाही तो पापकर्म करण्याची हाव धरितो ७.
इतकेंच नव्हे; परंतु, (आचरणाविषयीं त्याला कोणी प्रश्न केला
असतां) श्रुतीचा आधार देऊन श्रुतिबाह्य उत्तर देऊं लागतो रागद्वेषादि दोषजन्य
असा ह्या पुरुषाचा अधर्म तीन प्रकारचा होऊं लागतो ८. तो मनामध्यें पापाचें
चिंतन करितो, मुखानें पापाचा उच्चार करितो आणि पापाचें आचरणही प्रत्यक्ष
करूं लागतो. ह्याप्रमाणें तो अधर्माचे ठिकाणीं प्रवृत्त झाला असतां त्याच्या अंगचे
चांगले गुण नाहींसे होतात ९ आणि पापकर्म करीत असल्यामुळें तो शेवटीं स्वतः-
प्रमाणेंच ज्यांचें शील आहे अशा पुरुषांचें मित्रत्व संपादन करितो, परंतु, त्याच्या योगानें
त्याला इहलोकीं दुःख भोगावें लागत असून परलोकींही त्याचा घात होतो १०.
असो. ह्याप्रमाणें पुरुष पापात्मा कसा होतो हें मीं तुला सांगितलें. आतां पुरुषाला
धर्मप्राप्ति कशी होते हें तूं श्रवण कर. सुखदुःख जाणणारा असा जो पुरुष
आपल्या बुद्धीनें हे दोष पूर्वींच अवलोकन करितो आणि साधूंचा समागम करितो
त्याची बुद्धि साधुसमागमामुळें धर्माचे ठिकाणीं रमूं लागते ११, १२. ब्राह्मण
म्हणतोः—जें कोणालाही करितां येणार नाहीं असें प्रिय व धर्माला अनुसरून अस-
लेलें भाषण तूं करीत आहेस. ह्यावरून दिव्य सामर्थ्यानें युक्त असा तूं कोणी मह-
र्षिच आहेस असें मला वाटतें १३. व्याध म्हणतोः—पितरांप्रमाणें नेहमीं प्रथमतःच

भागाः पितरोग्रभुजः सदा । तेषां सर्वात्मना कार्यं प्रियं लोके मनी-
षिणा १४ यत्तेषां च प्रियं तत्ते वक्ष्यामि द्विजसत्तम । नमस्कृत्वा ब्राह्म-
णेभ्यो ब्राह्मीं विद्यां निबोध मे १५ इदं विश्वं जगत्सर्वमजय्यं चापि
सर्वशः । महाभूतात्मकं ब्रह्म नातः परतरं भवेत् १६ महाभूतानि खं
वायुरग्निरापस्तथा च भूः । शब्दः स्पर्शश्च रूपं च रसो गन्धश्च तद्गुणाः १७
तेषामपि गुणाः सर्वे गुणवृत्तिः परस्परम् । पूर्वपूर्वगुणाः सर्वे क्रमशो
गुणिषु त्रिषु १८ षष्ठस्तु चेतना नाम मन इत्यभिधीयते । सप्तमी तु भवे-
द्बुद्धिरहंकारस्ततः परम् १९ इन्द्रियाणि च पञ्चात्मा रजः सत्त्वं तम-
स्तथा । इत्येष सप्तदशको राशिरव्यक्तसंज्ञकः २० सर्वैरिहेन्द्रियार्थैस्तु
व्यक्ताव्यक्तैः सुसंवृतैः । चतुर्विंशक इत्येष व्यक्ताव्यक्तमयो गणः २१
एतत्ते सर्वमाख्यातं किं भूयः श्रोतुमिच्छसि २२ [८४४९] इति श्रीमहा-

---

भोजनास पात्र असलेले ब्राह्मण महाभाग्यवान् आहेत आणि त्याचा मनोरथ परि-
पूर्ण करणें हें ह्या जगतामध्यें विचारी पुरुषाचें कर्तव्य आहे १४. हे द्विजश्रेष्ठ,
त्या ब्राह्मणाना जें प्रिय तें, तुला, त्यांना नमस्कार करून मी कथन करितों. ही ब्राह्म-
णांची विद्या तूं आतां माझ्यापासून श्रवण कर १५. कर्मांच्या योगानें प्रत्यक्ष प्राप्त होण्यास
सर्वस्वीं अशक्य असें जें ब्रह्म तेंच हें पंचमहाभूतात्मक स्थावरजंगमस्वरूप संपूर्ण विश्व होय;
आणि ह्यामुळें ब्रह्माहून श्रेष्ठ अशी कोणतीही वस्तु नाहीं १६. आकाश, वायु, अग्नि, उदक
व भूमि हीं पंचमहाभूतें असून शब्द, स्पर्श, रूप, रस व गंध हे अनुक्रमें त्याचे गुण आहेत १७.
त्या पंचमहाभूतांमध्यें असलेले जे सर्व गुण त्यांची, तीं पंचमहाभूतें पंचीकृत झालीं
असतां ह्मणजे त्यांचें एकमेकांमध्यें समेलन झालें असतां, परस्परमिश्रवृत्ति दृष्टोत्पत्तीस
येते आणि शुद्धावस्थेंतही ह्मणजे अपंचीकृतावस्थेंतही आकाशादि पहिल्या पहिल्या
भूतांचे सर्वही गुण वायुप्रभृति पुढल्या पुढल्या भूतांचे ठिकाणीं क्रमानें असतात आणि
सूक्ष्मत्वामुळें अपंचीकृत आकाशाचा शब्दगुण अपंचीकृत वायूमध्यें जरी इतका व्यक्त
न झाला तरी तेज, उदक व पृथ्वी ह्या तीन महाभूतांमध्यें आकाश व वायु ह्यांचे गुण
चांगल्याप्रकारें व्यक्त असतात १८. (शब्द, स्पर्श, रूप, रस व गंध हे पांच) सहावी
धीवृत्ति ह्मणजे जिला मन असें ह्मणतात ती, सातवी बुद्धि, नंतर अहंकार १९, पांच
ज्ञानेंद्रियें, जीव आणि सत्त्व, रज व तम हे तीन गुण हा मायासंज्ञक सतरा तत्त्वांचा
समुदाय होय २०. मन आणि बुद्धि ह्यांसहवर्तमान पांच ज्ञानेंद्रियें मिळून सात
आणि ह्यांचे बुद्धिरूप गुहेमध्यें लीन असलेले व्यक्त व अव्यक्त असे सात विषय,
आकाशादि पंचमहाभूतें, आत्मा, अहंकार आणि सत्त्व, रज व तम हे तीन गुण हा

भारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यामारण्यके पर्वणि मार्कंडेय-समास्यापर्वणि ब्राह्मणव्याधसंवादे दशाधिकद्विशततमोऽध्यायः ॥ २१० ॥

मार्कण्डेय उवाच ॥ एवमुक्तः स विप्रस्तु धर्मव्याधेन भारत । कथामकथयद्भूयो मनसः प्रीतिवर्धनीम् १ ब्राह्मण उवाच ॥ महाभूतानि यान्याहुः पञ्च धर्मभृतां वर । एकैकस्य गुणान्सम्यक्पञ्चानामपि मे वद २ व्याध उवाच ॥ भूमिरापस्तथा ज्योतिर्वायुराकाशमेव च । गुणोत्तराणि सर्वाणि तेषां वक्ष्यामि ते गुणान् ३ भूमिः पञ्च गुणा ब्रह्मन्नुदकं च चतुर्गुणम् । गुणास्त्रयस्तेजसि च त्रयश्चाकाशवातयोः ४ शब्दः स्पर्शश्च रूपं च रसो गन्धश्च पञ्चमः । एते गुणाः पञ्च भूमेः सर्वेभ्यो गुणवत्तराः ५ शब्दः स्पर्शश्च रूपं च रसश्चापि द्विजोत्तम । अपामेते गुणा ब्रह्मन्कीर्तितास्तव सुव्रत ६ शब्दः स्पर्शश्च रूपं च तेजसोथ गुणास्त्रयः । शब्दः स्पर्शश्च वायौ तु शब्दश्चाकाश एव तु ७ एते पञ्चदश ब्रह्मन्गुणा

व्यक्ताव्यक्तरूप चोवीस तत्त्वांचा समुदाय आहे २१. असो. तूं जें विचारिलेंस तें हें सर्व मीं तुला कथन केलें. आतां आणखी काय श्रवण करण्याची तुझी इच्छा आहे ? २२. ह्याप्रमाणें महामुनिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील मार्कंडेयसमास्यापर्वापैकीं ब्राह्मण व व्याध ह्यांच्या संवादाविषयीं दोनशें दहावा अध्याय समाप्त झाला ॥ २१० ॥

मार्कंडेय ह्मणतातः—हे भरतकुलोत्पन्ना युधिष्ठिरा, ह्याप्रमाणें धर्मव्याधानें त्या ब्राह्मणाला सांगितलें असतां मनाचा उल्हास वृद्धिंगत करणारी अशी कथा त्या ब्राह्मणानें त्या धर्मव्याधाकडून सांगविली १. ब्राह्मण ह्मणतोः— हे धर्मनिष्ठामध्यें श्रेष्ठ, पंचमहाभूतें जीं ह्मणतात त्या पांचांहींपैकीं प्रत्येकाचे वेगळे वेगळे गुण तूं मला उत्तम प्रकारें कथन कर २. व्याध सांगतोः— भूमि, उदक, अग्नि, वायु आणि आकाश या सर्वांतील पुढल्या पुढल्यांचे गुण पहिल्या पहिल्यामध्यें आहेत. परंतु, मी त्यांचे गुण स्पष्टपणें तुला कथन करितों ३. हे विप्र, भूमि पांच गुणांनीं युक्त असून उदक चार गुणांनीं युक्त आहे. तेजामध्यें तीन गुण आहेत व आकाश आणि वायु ह्या दोहोंमध्यें मिळून तीन आहेत (ह्मणजे वायूमध्यें दोन आहेत व आकाशामध्यें एक आहे) ४. शब्द, स्पर्श, रूप, रस आणि पांचवा गंध हे भूमीचे पांच गुण सर्वांपेक्षां श्रेष्ठ आहेत ५. हे सदाचरणसंपन्न द्विजोत्तमा, शब्द, स्पर्श, रूप आणि रस हे उदकाचे गुण मीं तुला कथन केले ६. शब्द, स्पर्श आणि रूप हे तेजाचे तीन गुण होत. शब्द आणि स्पर्श हे दोन गुण वायूमध्यें आहेत आणि शब्द हा एकच गुण आका-

भूतेषु पञ्चसु । वर्तन्ते सर्वभूतेषु येषु लोकाः प्रतिष्ठिताः ८ अन्योन्यं नातिवर्तन्ते सम्यक्क भवति द्विज । यदा तु विषमं भावमाचरन्ति चराचराः ९ तदा देही देहमन्यं व्यतिरोहति कालतः । आनुपूर्व्या विनश्यन्ति जायन्ते चानुपूर्वशः १० तत्र तत्र हि दृश्यन्ते धातवः पाञ्चभौतिकाः । यैरावृतमिदं सर्वं जगत्स्थावरजङ्गमम् ११ इन्द्रियैः सृज्यते यद्यतत्तद्व्यक्तमिति स्मृतम् । तदव्यक्तमिति ज्ञेयं लिङ्गग्राह्यमतीन्द्रियम् १२ यथास्वं ग्राहकान्येषां शब्दादीनामिमानि तु । इन्द्रियाणि यदा देही धारयन्निव तप्यते १३ लोके विततमात्मानं लोकं चात्मनि पश्यति । परापरज्ञः सक्तः सन्स तु भूतानि पश्यति १४ पश्यतः सर्व भूतानि सर्वावस्थासु सर्वदा । ब्रह्मभूतस्य संयोगो नाशुभेनोपपद्यते १५ ज्ञानमूलात्मकं क्लेशमतिवृत्तस्य पौरुषम् । लोकवृत्तिप्रकाशेन ज्ञानमार्गेण गम्यते १६ अना-

---

शामध्यें आहे ७. हे विप्रा, पंचमहाभूतांमध्यें मिळून असलेले हे पधरा गुण सर्व प्रकारच्या प्राण्यांमध्यें आहेत आणि ह्यांच्याच आधारावर त्रैलोक्य राहिलें आहे ८. हे द्विज, जगतामध्यें असणारीं हीं पचमहाभूतें एकमेकाला सोडून न राहतां ऐक्यभावानें रहात असतात. जेव्हां चराचर प्राणी दुसऱ्या देहाचें अवलंबन करितात तेव्हां ते मृत झाले असें लोक ह्मणूं लागतात ९. परंतु, वास्तविक प्राणी मृत्यु पावत नाहींत. कालगतीनें प्राणी त्यावेळीं दुसऱ्या देहाचें अवलंबन मात्र करीत असतो आणि ज्याप्रमाणें प्राण्यांचीं पूर्व कर्मे असतील त्याप्रमाणें ते देहांतर संबंधामुळें अदृश्य व दृश्य होऊं लागतात १०. ज्यांनीं हें सर्व चराचर जगत् व्यापिलें आहे ते शुक्रप्रभृति धातु पांच भौतिक असल्याचें ठिकठिकाणीं दृष्टोत्पत्तीस येतें ११. इंद्रियाशीं जें जें संबद्ध होतें तें तें व्यक्त असें ह्मटलें आहे आणि इंद्रियांचें जेथें कांहीं एक चालत नाहीं व प्रकाशादि चिह्नांच्या योगानेंच ज्याचें अनुमान होतें तें अव्यक्त असें समजावें १२. आपआपल्या शब्दादिविषयांना धरून बसणाऱ्या ह्या श्रवणादि इंद्रियांचें संयमन करून जेव्हां पुरुष आत्मज्ञानाविषयीं प्रयत्न करूं लागतो १३ तेव्हां विश्वामध्यें स्वतः व्याप्त झाल्याचें व स्वतःचे ठिकाणीं विश्व असल्याचें तो अवलोकन करितो. सारांश, ब्रह्मतत्त्व खरें खरें जाणणारा पुरुष आत्मदर्शनाविषयीं आसक्त होऊन राहिला असतां स्वतःचे ठिकाणीं सर्व भूतें तो अवलोकन करूं लागतो १४ आणि ह्याप्रमाणें कोणत्याही अवस्थेमध्यें व कोणत्याही वेळीं सर्व प्राण्यांना आपले ठिकाणीं अवलोकन करूं लागलेला ह्मणजे अर्थात् ब्रह्मस्वरूप बनलेला जो पुरुष तो अशुभकर्मानें लिप्त होत नाहीं १५. अविद्यादिरूप मिथ्या क्लेश ज्याचे ठिकाणीं राहिले नाहींत असा जो योगी त्याला

दिनिधनं जन्तुमात्मयोनिं सदाव्ययम् । अनौपम्यममूर्तं च भगवानाह बुद्धिमान् १७ तपोमूलमिदं सर्वं यन्मां विप्रानुपृच्छसि । इन्द्रियाण्येव संयम्य तपो भवति नान्यथा १८ इन्द्रियाण्येव तत्सर्वं यत्स्वर्गनरकावुभौ । निगृहीतविसृष्टानि स्वर्गाय नरकाय च १९ एष योगविधिः कृत्स्नो यावदिन्द्रियधारणम् । एतन्मूलं हि तपसः कृत्स्नस्य नरकस्य च २० इन्द्रियाणां प्रसङ्गेन दोषमार्च्छन्त्यसंशयम् । संनियम्य तु तान्येव ततः सिद्धिं समाप्नुयात् २१ षण्णामात्मनि नित्यानामैश्वर्यं योधिगच्छति । न स पापैः कुतोनर्थैर्युज्यते विजितेन्द्रियः २२ रथः शरीरं पुरुषस्य दृष्टमात्मा नियन्तेन्द्रियाण्याहुरश्वान् । तैरप्रमत्तः कुशली सदश्वैर्दान्तैः सुखं याति रथीव धीरः २३ षण्णामात्मनि युक्तानामिन्द्रियाणां प्रमाथिनाम् ।

लोकवृत्तिप्रकाशक ज्ञानमार्गाच्या योगानें मुक्ति प्राप्त हाते १६. जीव जन्ममरणरहित आहे, त्याचा कधींही क्षय होत नाहीं, तर्कानें त्याचें स्वरूप समजणें अशक्य आहे आणि परमात्मा हें त्याचें मूळ असून तो अमूर्त आहे असें बुद्धिनियामक भगवानानें ह्मणून ठेविलें आहे १७. हे विप्रा, तूं जें मला विचारीत आहेस तें हें सर्व तपोमूलक आहे, ह्मणजे तपाच्या योगानें समजण्यासारखें आहे; परंतु, इंद्रियांचें संयमन केल्यानेंच तप होत असते नाहीं तर होत नाहीं १८. स्वर्ग आणि नरक ह्मणून जें कांहीं आहे तें सर्व इंद्रियेंच. कारण, इंद्रियांचा निग्रह केला असतां तीं पुरुषाच्या स्वर्गप्राप्तीला कारण होत असून तीं मोकळीं सोडिलीं असतां पुरुषाच्या नरकप्राप्तीला कारण होत असतात १९. इंद्रियांचें पूर्णपणें संयमन करणें ह्यांतच संपूर्ण योगमार्गाचा अंतर्भाव होतो व इंद्रियें हेंच तपाचें मूळ असून सर्व प्रकारच्या नरकाचें ही मूळ हेंच आहे २०. कारण, इंद्रियांचे ठिकाणीं आसक्त झाल्यानें पुरुषांना निःसंशय अनर्थ प्राप्त होतात व त्यांचेंच संयमन केल्यानें सिद्धि प्राप्त होते २१ श्रवणेंद्रिय, त्वगिंद्रिय, चक्षुरिंद्रिय, रसनेंद्रिय, घ्राणेंद्रिय व सहावें मन हीं जीं आत्म्याचे ठिकाणीं कल्पित असल्यामुळें आद्यंतशून्य आहेत त्यांचें आधिपतित्व ह्मणजे नियंतृत्व ज्याला प्राप्त झालें असेल तो जितेंद्रिय पुरुष पापांनीं लिप्त होत नाहीं; मग पापमूलक अनर्थांच्या कचाट्यांत तो कोठून सांपडणार ? २२. शरीर हा पुरुषाचा रथ ह्मणून श्रुतीमध्यें दृष्ट असून बुद्धि हा सारथि व इंद्रियें हे अश्व असें ब्रह्मवेत्त्यांनीं ह्मटलें आहे. ह्यास्तव, ज्याप्रमाणें अश्वसंयमनाविषयीं दक्ष असलेला कुशल सारथी रश्मींनीं आंवरून धरिलेल्या चांगल्या अश्वांच्या योगानें अनायासें मार्गाचें आक्रमण करितो त्याचप्रमाणें निग्रह केलेल्या त्या इंद्रियांच्या योगानें विवेकी पुरुष सुखानें ह्या संसारांतून पार पडून जातो २३.

यो धीरो धारयेद्रश्मीन्स स्यात्परमसारथिः २४ इन्द्रियाणां प्रसृष्टानां हयानामिव वर्त्मसु । धृतिं कुर्वीत सारथ्ये धृत्या तानि जयेद्ध्रुवम् २५ इन्द्रियाणां विचरतां यन्मनोऽनुविधीयते । तदस्य हरते बुद्धिं नावं वायुरिवाम्भसि २६ येषु विप्रतिपद्यन्ते षट्सु मोहात्फलागमम् । तेष्वध्यवसिताध्यायी विन्दते ध्यानजं फलम् २७ [८४७६] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यामारण्यके पर्वणि मार्कण्डेयसमास्यापर्वणि ब्राह्मणव्याधसंवादे एकादशाधिकद्विशततमोऽध्यायः ॥ २११ ॥

मार्कण्डेय उवाच ॥ एवं तु सूक्ष्मे कथिते धर्मव्याधेन भारत । ब्राह्मणः स पुनः सूक्ष्मं पप्रच्छ सुसमाहितः १ ब्राह्मण उवाच ॥ सत्त्वस्य रजसश्चैव तमसश्च यथातथं । गुणांस्तत्त्वेन मे ब्रूहि यथावदिह पृच्छतः २ व्याध उवाच ॥ हन्त ते कथयिष्यामि यन्मां त्वं परिपृच्छसि । एषां

पुरुषाला क्षुब्ध करून टाकणारीं सहा इंद्रियें आल्याचे ठिकाणीं युक्त करून जो विवेकी पुरुष त्यांच्या दोऱ्या आपल्या हातांत ठवितो तो उत्कृष्ट सारथि होय २४. मार्गावर मोकळ्या सुटलेल्या अश्वांप्रमाणें विषयांचे ठिकाणीं मोकळ्या सुटलेल्या इंद्रियांचें संयमन करण्याकरितां पुरुषानें विवेकबुद्धीचें अवलंबन करावें. कारण, विवेकबुद्धीच्या योगानें त्यांचें संयमन निःसंशय करितां येतें २५. इंद्रियें विषयांचें ठिकाणीं संचार करूं लागलीं असतां जें मन त्यांच्या मागोमाग संचार करूं लागतें तें जलमार्गानें जाणाऱ्या नावेला भलतीकडे नेणाऱ्या वायूप्रमाणें ह्या पुरुषाच्या विवेकबुद्धीला भलतीकडे नेतें २६. संकल्प आणि शब्दादि पंचविषय ह्या सहांचें फल ग्राह्य किंवा त्याज्य ह्याबद्दल विरक्त आणि विषयी पुरुष ह्यांमध्यें वाद आहे. तेव्हां त्या विषयांचे ठिकाणीं ज्याची दोषदृष्टि निश्चित झालेली आहे ह्मणजे विषयाविषयीं जो विरक्त झालेला आहे त्याला ध्यानजन्य फल प्राप्त होतें २७. ह्याप्रमाणें महामुनिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील मार्कंडेयसमास्यापर्वांपैकीं ब्राह्मण आणि व्याध ह्यांच्या संवादाविषयीं दोनशें अकरावा अध्याय समाप्त झाला ॥ २११ ॥

मार्कंडेय सांगतात:—हे भरतकुलोत्पन्ना युधिष्ठिरा, ह्याप्रमाणें धर्मव्याधानें सूक्ष्म विषय कथन केला असतां त्याच्या सांगण्याकडे अतिशयच अवधान देऊन राहिलेल्या त्या ब्राह्मणानें पुनरपि त्याला सूक्ष्म विषयासंबंधानेंच प्रश्न केला १. ब्राह्मण ह्मणतो:—सत्त्व, रज आणि तम ह्यांचे गुण जसे असतील तसे मज विचारणाऱ्याला ह्या ठिकाणीं तत्त्वतः कथन कर २. व्याध ह्मणतो:—तूं जें मला विचारीत आहेस तें मी तुला कथन करितों. ह्यांचे वेगळे वेगळे गुण मी सांगत आहें, तूं

गुणान्पृथक्त्वेन निबोध गदतो मम ३ मोहात्मकं तमस्तेषां रज एषां प्रवर्तकम्। प्रकाशबहुलत्वाच्च सत्त्वं ज्याय इहोच्यते ४ अविद्याबहुलो मूढः स्वप्नशीलो विचेतनः। दुर्हृषीकस्तमोध्वस्तः सक्रोधस्तामसोलसः ५ प्रवृत्तवाक्यो मन्त्री च यो नराग्र्योनसूयकः। विधित्समानो विप्रर्षे स्तब्धो मानी स राजसः ६ प्रकाशबहुलो धीरो निर्विधित्सोनसूयकः। अक्रोधनो नरो धीमान्दान्तश्चैव स सात्त्विकः ७ सात्त्विकस्त्वथ संबुद्धो लोकवृत्तेन क्लिश्यते। यदा बुध्यति बोद्धव्यं लोकवृत्तं जुगुप्सते ८ विरागस्य च रूपं तु पूर्वमेव प्रवर्तते। मृदुर्भवत्यहंकारः प्रसीदत्यार्जवं च यत् ९ ततोस्य सर्वद्वन्द्वानि प्रशाम्यन्ति परस्परम्। न चास्य संशयो नाम कचिद्भवति कश्चन १० शूद्रयोनौ हि जातस्य सद्गुणानुप्रतिष्ठतः। वैश्यत्वं लभते ब्रह्मन्क्षत्रियत्वं तथैव च ११ आर्जवे वर्तमानस्य ब्राह्मण्यमभिजायते। गुणास्ते कीर्तिताः सर्वे किं भूयः श्रोतुमिच्छसि १२

श्रवण कर ३. सत्त्व, रज आणि तम ह्यांमध्यें तम हें मोहात्मक आहे, रज ह्यांमध्यें प्रवर्तक आहे आणि ज्ञानाचा पुष्कळ अंश असल्यामुळें सत्त्व ह्यांमध्यें श्रेष्ठ आहे असें ह्मणत असतात ४. अज्ञानमय, मूढ, अविचारी, रागीट, आळशी, निद्रालु, अविवेकी आणि उन्मार्गाला प्रवृत्त झालेल्या इंद्रियांनीं युक्त असा जो पुरुष असेल त्याचे ठिकाणीं तमोगुणाचें प्राधान्य आहे असें समजावें ५. वाचाळ, मसलती, मत्सरी, गर्विष्ट, अभिमानी आणि कोणतीही गोष्ट करण्याविषयीं उत्सुक असा जो पुरुषश्रेष्ठ असेल त्याचे ठिकाणीं, हे विप्रर्षे, रजाचें प्राधान्य आहे असें समजावें ६. विचारी, चांचल्यरहित, निर्मत्सर, क्रोधशून्य, बुद्धिमान्, जितेंद्रिय आणि ज्ञानाचा पुष्कळ अंश ज्याचे ठिकाणीं आहे असा जो पुरुष असेल त्याचे ठिकाणीं सत्त्वगुणाचें प्राधान्य आहे असें समजावें ७. सात्त्विक पुरुषाला ज्ञान प्राप्त झालें असतां लोकांचें वर्तन पाहून त्याला वाईट वाटतें. कारण, ज्ञेय जो आत्मा त्याचें ज्ञान त्याला प्राप्त झालें असतां लोकवृत्त त्याला निंद्य दिसूं लागतें ८. पुरुष विरक्त होऊं लागला असतां त्याचे ठिकाणीं वैराग्याचें लक्षण प्रथमच दृष्टोत्पत्तीस येऊं लागतें. त्याचा अहंकार कमी होतो आणि सरळपणा वृद्धिंगत होऊं लागतो ९. नंतर मान, अपमान इत्यादि सर्व द्वंद्वें आपोआप नाहींशीं होऊं लागतात आणि संशय ह्मणून त्याला कसला तो मुळींच रहात नाहीं १०. हे विप्रा, शूद्रयोनीमध्यें जन्मास येऊन सद्गुणांचें अवलंबन करणाऱ्या पुरुषाला वैश्याचा आणि त्याचप्रमाणें क्षत्रियाचा जन्म प्राप्त होतो ११. त्याचप्रमाणें तो जर एकसारखा निष्कपटपणानें वागत असला तर ब्राह्मणयोनीमध्यें जन्मास येतो.

[८४८८] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यामारण्यके पर्वणि मार्कण्डेयसमास्यापर्वणि ब्राह्मणव्याधसंवादे द्वादशाधिकद्विशततमोऽध्यायः ॥ २१२ ॥

ब्राह्मण उवाच ॥ पार्थिवं धातुमासाद्य शारीरोऽग्निः कथं भवेत् । अवकाशविशेषेण कथं वर्तयतेऽनिलः १ मार्कण्डेय उवाच ॥ प्रश्नमेतं समुद्दिष्टं ब्राह्मणेन युधिष्ठिर । व्याधस्तु कथयामास ब्राह्मणाय महात्मने २ व्याध उवाच ॥ मूर्धानमाश्रितो वह्निः शरीरं परिपालयन् । प्राणो मूर्धनि चाग्नौ च वर्तमानो विचेष्टते ३ भूतं भव्यं भविष्यं च सर्वं प्राणे प्रतिष्ठितम् । श्रेष्ठं तदेव भूतानां ब्रह्मयोनिमुपास्महे ४ स जन्तुः सर्वभूतात्मा पुरुषः स सनातनः । महान्बुद्धिरहंकारो भूतानां विषयश्च सः ५ एवं त्विह स सर्वत्र प्राणेन परिपाल्यते । पृष्ठतस्तु समानेन स्वां स्वां गतिमुपाश्रितः ६ बस्तिमूलं गुदं चैव पावकं समुपाश्रितः । वहन्मूत्रं

असो. सत्त्व, रज व तम ह्यांचे सर्व गुण मीं तुला कथन केले; आतां आणखी काय श्रवण करण्याची तुझी इच्छा आहे ? १२. ह्याप्रमाणें महामुनिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील मार्कंडेयसमास्यापर्वापैकीं ब्राह्मण आणि व्याध ह्यांच्या संवादाविषयीं दोनशें बारावा अध्याय समाप्त झाला ॥ २१२ ॥

ब्राह्मण प्रश्न करितो:—पृथ्वीचा अंश ज्यामध्यें अधिक आहे अशा ह्या शरीराचें अवलंबन करून विज्ञानसंज्ञक शरीराभिमानी अग्नि कसा रहातो ? आणि भिन्नभिन्न नाडीरूप मार्गांचें अवलंबन करून वायु शरीराच ठिकाणीं हालचाल कशी उत्पन्न करितो ? १. मार्कंडेय ह्मणतात:—हे युधिष्ठिरा, ह्याप्रमाणें ब्राह्मणानें प्रश्न विचारिला असतां व्याधानें त्या महात्म्या ब्राह्मणाला त्याचें उत्तर सांगितलें २ शरीराचें रक्षण करणारा अग्नि चिदात्म्याचा आश्रय करून राहिलेला आहे आणि प्राण, मस्तक व अग्नि ह्यांचे ठिकाणीं राहून हालचाल करीत आहे ३. भूत, वर्तमान आणि भविष्य हे सर्व प्राणावरच अवलंबून आहे, भूतांमध्यें जें श्रेष्ठ तें तोच आहे आणि विराटाचेंही कारण तोच असल्यामुळें आह्मी त्याचाच आश्रय करून रहात आहों ४. सर्व भूतांचा आत्मा सनातन पुरुष व जीव तोच असून शब्दादि विषय, भूतांचे ठिकाणीं असलेला अहंकार, बुद्धि व महत्तत्त्व हें सर्वही तोच आहे ५. ह्याप्रमाणें प्राण्याचें रक्षण सर्वप्रकारें प्राणरूपी योगानें होत असतें आणि जीवत्वप्राप्तीनंतर तोच समानाच्या योगानें वेगवेगळ्या वृत्तींचें अवलंबन करीत असतो ६ व तोच मूत्राशय, पुरीषाशय आणि जठराग्नि ह्यांचा आश्रय करून मूत्र व पुरीष त्या त्या ठिकाणीं नेऊं लागला असतां अपान

पुरीषं वाप्यपानः परिवर्तते ७ प्रयत्ने कर्मणि बले स एष त्रिषु वर्तते । उदानमिति तं प्राहुरध्यात्मविदुषो जनाः ८ संधौ संधौ सन्निविष्टः सर्वेष्वपि तथानिलः । शरीरेषु मनुष्याणां व्यान इत्युपदिश्यते ९ धातुष्वग्निस्तु विततः स तु वायुः समीरितः । रसान्धातूंश्च दोषांश्च वर्तयन्परिधावति १० प्राणानां सन्निपातात्तु सन्निपातः प्रजायते । उष्माचाग्निरिति ज्ञेयो योऽन्नं पचति देहिनाम् ११ समानोदानयोर्मध्ये प्राणापानौ समाहितौ । समर्थिनस्त्वधिष्ठानं सम्यक्पचति पावकः १२ अस्यापि पायुपर्यन्तस्तथा स्याद्गुदसंज्ञितः । स्रोतांसि तस्माज्जायन्ते सर्वप्राणेषु देहिनाम् १३ अग्निवेगवहः प्राणो गुदान्ते प्रतिहन्यते । स उर्ध्वमागम्य पुनः समुत्क्षिपति पावकम् १४ पक्वाशयस्त्वधो नाभ्यामूर्ध्वमामाशयः स्थितः । नाभिमध्ये शरीरस्य प्राणाः सर्वे प्रतिष्ठिताः १५ प्रवृत्ता हृद्यात्सर्वे तिर्यगूर्ध्वमधस्तथा । वहन्त्यन्नरसान्नाड्यो दश प्राणप्रचोदिताः १६

बनतो ७. प्रयत्न, कर्म आणि बल ह्या तिहींच ठिकाणीं जेव्हां तो विद्यमान असतो तेव्हां त्याला अध्यात्मवेत्ते लोक उदान असें ह्मणत असतात ८. मनुष्यांच्या सर्व शरीरामध्यें प्रत्येक संधींचे ठिकाणी राहिलेला जो वायु त्याला व्यान असें ह्मणत असतात ९. रसादि धातूंचे ठिकाणी व्याप्त असलेला जो जाठराग्नि तो वायूनें प्रेरित झाला असता अन्नादिकांचा परिपाक करीत असतो आणि रसादिधातु व पित्तादि दोष बनवीत असतो १०. प्राणांच्या सघर्षणामुळें जो उत्पन्न होतो तो प्राण्याचें अन्न पचवितो व तोच उष्मा व जाठराग्नि समजावा ११. साराश, समान आणि उदान ह्यांच्यामध्यें अनुक्रमे प्राण व अपान मिळून जातात आणि ह्यांपासून नाभिस्थानाचे ठिकाणीं उत्पन्न झालेला जो जाठराग्नि तो अन्नाचा परिपाक चांगल्या रीतीनें करीत असतो १२. ह्या जठराग्नीचा संचार पायिंद्रियापर्यंत असतो. ह्या सचारस्थानाला गुद अशी संज्ञा आहे. प्राण्याच्या सर्व प्राणांचे जे संचारमार्ग अर्थात् नाडीमार्ग तेही त्यापासूनच होतात १३. अग्नीच्या वेगामुळें प्राणवायु खालीं गेला असतां गुदप्रदेशाचे ठिकाणीं त्याच्या गतीला एकदम अडथळा होतो ह्यामुळें तो एकदम वर येऊन जठराग्नीलाही वर उडवितो १४. नाभीचे अधोभागीं पक्वाशय असून ऊर्ध्वभागीं आमाशय आहे आणि नाभीचे मध्यभागीं शरीराचे सर्वही प्राण लीन होऊन राहिलेले आहेत १५. दहा प्राण्यांच्या योगानें ह्मणजे प्राण, अपान, व्यान, उदान, समान, (नाग, कूर्म, कृकल, देवदत्त व धनंजय) यांच्या योगानें प्रेरित झालेल्या धमन्या अन्नरस वाहून नेतात व सर्वही रस हृदयाचे ठिकाणीं येऊन तेथून खालीं

योगिनामेष मार्गस्तु येन गच्छन्ति तत्परम् । जितक्लमाः समा धीरा
मूर्धन्यात्मानमादधुः । एवं सर्वेषु विततौ प्राणापानौ हि देहिषु १७
एकादशविकारात्मा कलासंभारसंभृतः । मूर्तिमन्तं हि तं विद्धि नित्यं
योगजितात्मकम् १८ तस्मिन्यः संस्थितो ह्यग्निर्नित्यं स्थाल्यामिवाहितः ।
आत्मानं तं विजानीहि नित्यं योगजितात्मकम् १९ देवो यः संस्थित-
स्तस्मिन्नब्बिन्दुरिव पुष्करे । क्षेत्रज्ञं तं विजानीहि नित्यं योगजितात्म-
कम् २० जीवात्मकानि जानीहि रजः सत्त्वं तमस्तथा । जीवमात्मगुणं
विद्धि तथात्मानं परात्मकम् २१ सचेतनं जीवगुणं वदन्ति स चेष्टते
चेष्टयते च सर्वम् । ततः परं क्षेत्रविदो वदन्ति प्राकल्पयद्यो भुवनानि
सप्त २२ एवं सर्वेषु भूतेषु भूतात्मा संप्रकाशते । दृश्यते त्वग्र्यया बुद्ध्या

वर व बाजूस मिळून सर्व शरीरांत फैलावत असतात १६. हा योग्यांचा मार्ग आहे आणि श्रम जिंकलेले, धैर्यवान् व समचित असे जे पुरुष मस्तकामध्यें असलेल्या सहस्रदल कमलांचे ठिकाणीं सुषुम्ना नाडीच्या योगानें प्राण नेऊन ठेवितात त्यांना या मार्गानें परब्रह्माची प्राप्ति होते. ह्याप्रमाणें सर्व प्राण्यांचे ठिकाणीं प्राण व अपान हे व्याप्त झालेले आहेत १७. लिंगशरीराशीं एकरूप होऊन गेलेला व (प्राण, श्रद्धा आकाश, वायु, अग्नि, जल, पृथ्वी, इंद्रिय, मन, अन्न, वीर्य, तप, मंत्र, कर्म, लोक आणि नाम ह्या सोळा) कलांच्या समुदायानें युक्त असा जो आत्मा तो वस्तुतः अमूर्त असूनही कलारूप उपाधींच्या योगानें मूर्तिमान् झालेला आहे असें तूं समज. हा आत्मा नित्य आहे व त्याच्या स्वरूपाचें ज्ञान चित्तवृत्तींचा निरोध केल्यानें होत असतें १८. स्थालीमध्यें ठेविलेल्या अग्नीप्रमाणें जो सर्वदां त्या कलासमुदायाचे ठिकाणीं राहिलेला आहे तो जीवात्मा आहे असें तूं समज. तो नित्य असून योगामुळें त्याच्या स्वरूपाचें ज्ञान होत असतें १९; कमलपत्राचे ठिकाणीं असलेल्या जलबिंदूप्रमाणें (धर्माधर्मलेपरहित असा) जो देव त्या जीवात्म्यामध्यें राहिलेला आहे तो परमात्मा आहे असें तूं समज. तो नित्य आहे आणि योगामुळें त्याच्या स्वरूपाचें ज्ञान होणें शक्य आहे २०. रज, सत्त्व आणि तम ह्या जीवाच्या उपाधि आहेत आणि (बिंब ज्याप्रमाणें प्रतिबिंबाचें नियामक असतें त्याप्रमाणें) ईश्वर हा जीवाचा नियामक आहे व तो ईश्वर स्वतः निर्गुण आहे, असें तूं समज २१. ज्याच्या हालचालीला चैतन्याची अपेक्षा आहे असें जें जड शरीरादिक हें जीवाचें भोग्य आहे आणि तो जीवात्मा स्वतः हालचाल करीत असून सर्व जडाच्या हालचालीलाही तो कारणीभूत होत आहे. परमात्मा हा त्यापेक्षां श्रेष्ठ आहे आणि त्याच्यापासूनच हे

सूक्ष्मया ज्ञानवेदिभिः २३ चित्तस्य हि प्रसादेन हन्ति कर्म शुभाशुभम् । प्रसन्नात्मात्मनि स्थित्वा सुखमानन्त्यमश्नुते २४ लक्षणं तु प्रसादस्य यथा तृप्तः सुखं स्वपेत् । निवाते वा यथा दीपो दीप्येत्कुशलदीपितः २५ पूर्वरात्रे परे चैव युञ्जानः सततं मनः । लघ्वाहारो विशुद्धात्मा पश्यन्नात्मानमात्मनि २६ प्रदीप्तेनेव दीपेन मनोदीपेन पश्यति । दृष्ट्वात्मानं निरात्मानं स तदा विप्रमुच्यते २७ सर्वोपायैस्तु लोभस्य क्रोधस्य च विनिग्रहः । एतत्पवित्रं लोकानां तपो वै संक्रमो मतः २८ नित्यं क्रोधात्तपो रक्षेद्धर्मं रक्षेच्च मत्सरात् । विद्यां मानापमानाभ्यामात्मानं तु प्रमादतः २९ आनृशंस्यं परो धर्मः क्षमा च परमं बलम् । आत्मज्ञानं परं ज्ञानं सत्यं व्रतपरं व्रतम् ३० सत्यस्य वचनं श्रेयः सत्यं ज्ञानं हितं भवेत् । यद्भूतहितमत्यन्तं तद्वै सत्यं परं मतम् ३१ यस्य सर्वे समारम्भा निराशीर्ब-

---

भूरादि सप्त लोक उत्पन्न झाले आहेत असें आत्मवेत्ते ह्मणतात २२. ह्याप्रमाणें सर्व भूतांचे ठिकाणीं नित्यसिद्ध आत्मा प्रकाशित झालेला आहे; परंतु, त्याचें ज्ञान मात्र सूक्ष्म आणि श्रेष्ठ अशा बुद्धीच्या योगानें ज्ञानीजनालाच होत असतें २३. चित्ताचें शोधन होऊन तें निर्मल झालें असतां पुरुष शुभाशुभ कर्माचा नाश करितो आणि ज्याचें चित्त शुद्ध झालें आहे असा पुरुष आत्म्याचे ठिकाणीं चित्ताचें लय लावून राहिला असतां अनायासें त्याला मुक्ति प्राप्त होते २४. तृप्त झालेला पुरुष जसा गाढ निद्रिस्थ होतो किंवा उत्तम रीतीनें प्रज्वलित केलेला दीप जसा निवात स्थानामध्यें संथ जळूं लागतो तशी चित्तशुद्ध झालेल्या पुरुषाची वृत्ति शांत होत असते, हें चित्तशुद्धीचें लक्षण होय २५. अल्प आहार करून अंतःकरणशुद्धि झालेला जो पुरुष पूर्वरात्रीं आणि पररात्रीं ह्मणजे अर्थात् सर्वदां आत्मज्ञान होण्याकरितां आपल्या मनाचें लय लावून रहात असतो त्याला २६, ज्याप्रमाणें प्रज्वलित दीपाच्या योगानें पुरुषाला दुसऱ्या पदार्थाचें ज्ञान होतें त्याप्रमाणें, मनोदीपाच्या योगानें आत्म्याचें ज्ञान होऊं लागतें आणि निर्गुण आत्म्याचें ज्ञान झाल्यानंतर तो मुक्त होतो २७. लोभ आणि क्रोध ह्यांचा सर्व उपायांनीं निग्रह हीच जगतामध्यें पवित्र वस्तु आहे आणि तप हा संसारसागरातून तारणारा सेतु आहे २८. नित्य क्रोधापासून तपाचें रक्षण करावें मत्सरापासून धर्माचें रक्षण करावें, मान आणि अपमान ह्यांपासून विद्येचें रक्षण करावें आणि प्रमादापासून आत्म्याचें रक्षण करावें २९. दया हा श्रेष्ठ धर्म आहे क्षमा हेंच उत्कृष्ट बल आहे, आत्मज्ञान हेंच उत्तम ज्ञान आहे आणि सत्य हेंच सर्व व्रतांमध्यें श्रेष्ठ व्रत आहे ३०. सत्यभाषण हेंच श्रेयस्कारक असून सत्य

न्धनाः सदा । त्यागे यस्य हुतं सर्वं स त्यागी स च बुद्धिमान् ३२
यतो न गुरुरप्येनां श्रावयेदुपपादयेत् । तं विद्याद्ब्रह्मणो योगं वियोगं
योगसंज्ञितम् ३३ न हिंस्यात्सर्वभूतानि मैत्रायणगतश्चरेत् । नेदं जीवि-
तमासाद्य वैरं कुर्वीत केनचित् ३४ आकिंचन्यं सुसंतोषो निराशित्वम-
चापलम् । एतदेव परं ज्ञानं सदात्मज्ञानमुत्तमम् ३५ परिग्रहं परित्यज्य
भवेद्बुद्ध्या यतव्रतः । अशोकं स्थानमाश्रित्य निश्चलं प्रेत्य चेह च ३६ तपो-
नित्येन दान्तेन मुनिना संयतात्मना । अजितं जेतुकामेन भाव्यं सङ्गेष्वस-
ङ्गिना ३७ गुणागुणमनासङ्गमेककार्यमनन्तरम् । एतद्ब्रह्मणो वृत्तमाहुरे-
कपदं सुखम् ३८ परित्यजति यो दुःखं सुखं चाप्युभयं नरः । ब्रह्म प्राप्नोति
सोऽत्यन्तमसङ्गेन च गच्छति ३९ यथाश्रुतमिदं सर्वं समासेन द्विजोत्तम ।

जाणणें ह्यांतच हित आहे. त्याच्या योगानें प्राण्याचें अत्यंत हित होतें. तें श्रेष्ठ सत्य होय ३१. ज्याचीं सर्व कर्मे फलरूपबंधनरहित असतात आणि ज्याचीं यज्ञदानादि कर्मे फलत्यागांनीं युक्त असतात तोच संन्यासी व ज्ञानी होय ३२. गुरु जरी झाला तरी जो ब्रह्मयोग ह्मणजे ब्रह्मसाक्षात्कार त्याचें वर्णन शिष्याजवळ त्याला हुबेहुब करितां यावयाचें नाहीं. फार तर अमुक अमुक रीतीनें ब्रह्मप्राप्ति होते इतकें त्याला सांगता येईल. चित्तवियोग आणि चित्तवृत्तीचा निरोध ह्यालाच योग असें ह्मणत असतात ३३. कोणालाही पीडा देऊं नये, सर्वांशीं मित्रभावानें असावें आणि जोंपर्यंत जीवित आहे तोंपर्यंत वैर कोणाशीं धरूं नये ३४. कसलाही परिग्रह न करणें, अत्यंत संतुष्ट असणें, कसलीही इच्छा न धरणें, मन शांत ठेवणें हेंच ज्ञानप्राप्तीचें उत्कृष्ट साधन होय; आणि ह्याचेंच सर्वदां अवलंबन केलें असतां उत्तम जें आत्मज्ञान तें प्राप्त होत असतें ३५ मन कोठेंही आसक्त होऊं न देतां ऐहिक व पारलौकिक सुखासंबधीं पूर्ण वैराग्याचें अवलंबन करून जितेंद्रिय असावें ३६. प्राप्त होण्यास कठिण जें ब्रह्म तें प्राप्त करून घेण्याची इच्छा करणाऱ्यानें नेहमीं तपश्चर्येचें अवलंबन करावें, जितेंद्रिय असावें, मनाचा निग्रह करावा आणि भोग्य पदार्थांचे ठिकाणीं कोठेंही आसक्ति ठेऊं नये ३७. जेथें गुणाचा अभाव आहे, जें कोठेंही आसक्त नाहींत एका ज्ञानाच्याच योगानें जें प्राप्त होणारें आहे जें सर्वत्र भरलेलें आहे आणि जें अनादिसिद्ध आहे तेंच ब्रह्माचें सुखरूप उत्कृष्ट स्थान होय, असें ब्रह्मवेत्ते ह्मणतात ३८. सुख व दुःख ह्या दोहोंचा जो त्याग करितो त्यालाच ब्रह्म प्राप्त होतें आणि कसलाही अडथळा न येतां शेवटपर्यंत तोच जातो ३९. हे द्विजश्रेष्ठा, मी ऐकिल्याप्रमाणें तुला हें सर्व संक्षेपतः कथन केलें आहे आतां

एतत्ते सर्वमाख्यातं किं भूयः श्रोतुमिच्छसि ४० [८५२८] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यामारण्यके पर्वणि मार्कण्डेयसमास्यापर्वणि ब्राह्मणव्याधसंवादे त्रयोदशाधिकद्विशततमोऽध्यायः ॥ २१३ ॥

मार्कण्डेय उवाच ॥ एवं संकथिते कृत्स्ने मोक्षधर्मे युधिष्ठिर। दृढप्रीतमना विप्रो धर्मव्याधमुवाच ह १ न्याययुक्तमिदं सर्वं भवता परिकीर्तितम्। न तेऽस्त्यविदितं किंचिद्धर्मेष्विह हि दृश्यते २ व्याध उवाच ॥ प्रत्यक्षं मम यो धर्मस्तं च पश्य द्विजोत्तम। येन सिद्धिरियं प्राप्ता मया ब्राह्मणपुङ्गव ३ उत्तिष्ठ भगवन्क्षिप्रं प्रविश्याभ्यन्तरं गृहम्। द्रष्टुमर्हसि धर्मज्ञ मातरं पितरं च मे ४ मार्कण्डेय उवाच ॥ इत्युक्तः स प्रविश्याथ ददर्श परमार्चितम्। सौधं हृद्यं चतुःशालमतीव च मनोरमम् ५ देवतागृहसंकाशं दैवतैश्च सुपूजितम्। शयनासनसंबाधं गन्धैश्च परमैर्युतम् ६ तत्र शुक्लाम्बरधरौ पितरावस्य पूजितौ। कृताहारौ तु संतुष्टावुपविष्टौ वरासने ७ धर्मव्याधस्तु तौ दृष्ट्वा पादेषु शिरसापतत् ८ वृद्धावूचतुः ॥ उत्ति-

---

आणखी काय श्रवण करण्याची तुझी इच्छा आहे ? ४०. ह्याप्रमाणें महामुनिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील मार्कंडेयसमास्यापर्वापैकीं ब्राह्मण व व्याध यांच्या संवादाविषयीं दोनशें तेरावा अध्याय समाप्त झाला ॥ २१३ ॥

मार्कंडेय ह्मणतातः—हे युधिष्ठिरा, ह्याप्रमाणें संपूर्ण मोक्षधर्म धर्मव्याधानें कथन केल्यावर मनामध्य अत्यंत प्रसन्न झालेला तो विप्र धर्मव्याधाला ह्मणाला, " तूं जें हें कथन केलें आहेस तें सर्व न्याय्य. धर्मासंबंधानें तुला अज्ञात असें कांणतेंही दिसत नाहीं " २ व्याध ह्मणतोः—हे ब्राह्मणश्रेष्ठा, हे द्विजोत्तमा, ज्याच्या योगानें मला ही सिद्धि प्राप्त झाली आहे तो माझा प्रत्यक्ष धर्म तूं पहा ३. हे भगवन्, ऊठ आणि हे धर्मवेत्त्या, सत्वर माझ्या घरामध्यें जाऊन माझे मातापितर अवलोकन कर ४. मार्कंडेय सांगतातः—ह्याप्रमाणें धर्मव्याधानें सांगितलें असतां त्या ब्राह्मणानें आंत जाऊन पराकाष्ठेचे सुशोभित, अत्यंत मनोरम, हृद्य व रंगविलेला असा एक चौक अवलोकन केला ५. तो देवालयाप्रमाणें दिसत होता, देवतांच्या योगानें त्याला उत्तमप्रकारची शोभा आलेली होती शय्या व आसनें ह्यांची त्यांत ठिकठिकाणीं गर्दी उडालेली होती आणि उत्तम उत्तम सुगंधांचीही तेथें समृद्धि होती ६. त्या चौकामध्यें एका उत्कृष्ट आसनावर शुभ्रवस्त्रें धारण केलेले त्याचे मातापितर भोजन करून संतोषानें बसले होते ७. त्यांना अवलोकन करितांक्षणीं धर्मव्याधानें त्यांच्या पायांवर मस्तक ठेविलें ८. तेव्हां ते वृद्ध मातापितर ह्मणाले:—हे धर्म-

ष्ठोत्तिष्ठ धर्मज्ञ धर्मस्त्वामभिरक्षतु । प्रीतौ स्वस्तव शौचेन दिर्घमायुर-
वाप्नुहि ९ गतिमिष्टां तपो ज्ञानं मेधां च परमां गतः । सत्पुत्रेण त्वया
पुत्र नित्यं काले सुपुजितौ १० न तेन्यद्दैवतं किंचिद्दैवतेष्वपि वर्तते ।
प्रयतत्वाद्द्विजातीनां दमेनासि समन्वितः ११ पितुः पितामहा ये च तथैव
प्रपितामहाः । प्रीतास्ते सततं पुत्र दमेनावां च पूजया १२ मनसा कर्मणा
वाचा शुश्रूषा नैव हीयते । न चान्या हि तथा बुद्धिर्दृश्यते सांप्रतं
तव १३ जामदग्न्येन रामेण यथा वृद्धौ सुपूजितौ । तथा त्वया कृतं
सर्वं तद्विशिष्टं च पुत्रक १४ ततस्तं ब्राह्मणं ताभ्यां धर्मव्याधो न्यवेद-
यत् । तौ स्वागतेन तं विप्रमर्चयामासतुस्तदा १५ प्रतिपूज्य च तां पूजां
द्विजः पप्रच्छ तावुभौ । सुपुत्राभ्यां सभृत्याभ्यां कच्चिद्वां कुशलं गृहे ।
अनामयं च वां कच्चित्सदैवेह शरीरयोः १६ वृद्धावूचतुः ॥ कुशलं नौ
गृहे विप्र भृत्यवर्गे च सर्वशः । कच्चित्त्वमप्यविघ्नेन संप्राप्तो भगवन्निति १७

वेत्त्या, ऊठ, ऊठ, धर्म तुझें रक्षण करो; तुझ्या ह्या शुद्ध आचरणानें आह्मी संतुष्ट झालों आहोंत. ह्यास्तव, तूं दीर्घायु हो ९. आणि तप, ज्ञान, उत्कृष्ट बुद्धि व मुक्ति हीही तुला प्राप्त होवोत. हे पुत्रा, तुज सत्पुत्राच्या हातून आमचें योग्यवेळीं नित्य उत्तमरीतीनें पूजन होत असतें १० आणि आमच्या शिवाय तुझें कोणतेंही दुसरें दैवत देवतांमध्येंही नाहीं तूं मनाचा शुद्ध असल्यामुळें द्विजांना योग्य जें इंद्रियदमन त्यानें तूं युक्त आहेस ११. हे पुत्रा, तुझ्या इंद्रियदमनामुळें आणि तुझ्या हातून जो आमचा सत्कार होत आहे त्यामुळें तुझे पणजे आणि निपणजेही तुझ्यावर नेहमीं प्रसन्न आहेत १२. कायावाचा-मनेंकरून तुझ्या हातून आमच्या शुश्रूषेची टंगळमंगळ कधींही होत नाहीं आणि आमच्या शुश्रूषेशिवाय दुसरीकडे तुझें लक्ष्यही चांगलें असल्याचें सांप्रत आमच्या दृष्टोत्पत्तीस येत नाहीं १३. हे पुत्रा, जमदग्निपुत्र परशुरामानें ज्याप्रमाणें आपल्या वृद्ध मातापितरांचा आदरसत्कार केला त्याप्रमाणें तर तूं सर्व कांहीं करीत असून त्यापेक्षां जास्तही करीत आहेस " १४. ह्यानंतर धर्मव्याधानें तो ब्राह्मण तेथें आला असल्याचें आपल्या मातापितरांना कळविलें. तेव्हां त्यांनीं त्या विप्राचा स्वागतपूर्वक आदरसत्कार केला १५. त्यांना मान देऊन तो द्विज त्या उभयतांना ह्मणाला " उत्तम पुत्रानें युक्त असलेल्या आपले पोष्यवर्गासहवर्तमान घरामध्यें कुशल आहे ना ? आणि तुमची शरीरप्रकृति नेहमीं आरोग्ययुक्त आहे ना ? " १६. वृद्ध ह्मणाले " हे विप्रा, आमच्या घरामध्यें आमचें कुशल असुन आमच्या पोष्यवर्गाचेंही सर्वस्वीं कुशल आहे; परंतु, हे भगवन् , आपणही निर्विघ्नपणें येथें आला आहा ना ? " १७. मार्कंडेय

मार्कण्डेय उवाच ॥ बाढमित्येव तौ विप्रः प्रत्युवाच मुदान्वितः । धर्मव्याधो निरीक्ष्याथ ततस्तं वाक्यमब्रवीत् १८ व्याध उवाच ॥ पिता माता च भगवन्नेतौ मद्दैवतं परम् । यद्दैवतेभ्यः कर्त्तव्यं तदेताभ्यां करोम्यहम् १९ त्रयस्त्रिंशद्यथा देवाः सर्वे शक्रपुरोगमाः । संपूज्याः सर्वलोकस्य तथा वृद्धाविमौ मम २० उपाहारानाहरन्तो देवतानां यथा द्विजाः । कुर्वन्ति तद्वदेताभ्यां करोम्यहमतन्द्रितः २१ एतौ मे परमं ब्रह्मन्पिता माता च दैवतम् । एतौ पुष्पैः फलै रत्नैस्तोषयामि सदा द्विज २२ एतावेवाग्नयो मह्यं यान्वदन्ति मनीषिणः । यज्ञा वेदाश्च चत्वारः सर्वमेतौ मम द्विज २३ एतदर्थं मम प्राणा भार्या पुत्रः सुहृज्जनः । सपुत्रदारः शुश्रूषां नित्यमेव करोम्यहम् २४ स्वयं च स्नापयाम्येतौ तथा पादौ प्रधावये । आहारं च प्रयच्छामि स्वयं च द्विजसत्तम २५ अनुकूलं तथा वच्मि विप्रियं परिवर्जये । अधर्मेणापि संयुक्तं प्रियमाभ्यां करोम्यहम् २६ धर्ममेवं गुरुं ज्ञात्वा करोमि द्विजसत्तम । अतन्द्रितां सदा विप्र शुश्रूषां वै करोम्य-

---

सांगतात:—ह्यावर " होय " येवढेंच त्या विप्रानें त्याना आनदानें सांगितलें. नंतर धर्मव्याध त्याच्याकडे पाहून ह्मणाला १८ " हे भगवन्, हे मातापितरच माझें मुख्य दैवत होत. देवतांना उद्देशून जें जें कांहीं करण्यासारिखें आहे तें तें मी सर्व ह्यांना उद्देशूनच करीत असतो १९. सर्व जगताला ज्याप्रमाणें इंद्रप्रभृति सर्व तेहेतीस देव पूज्य आहेत त्याप्रमाणें हे वृद्ध मला पूज्य आहेत २०. पुष्पादि पूजासाहित्य जुळविणारे विप्र ज्याप्रमाणें देवतांचें पूजन करितात त्याप्रमाणें मी दक्ष राहून ह्यांचें पूजन करीत असतो २१. हे ब्रह्मन्, हे मातापितरच माझें परम दैवत होत आणि, हे द्विज, पुष्पें, फळें व उत्कृष्ट वस्तु ह्यांच्या योगानें मी सर्वदां ह्यांनाच संतुष्ट करीत असतो २२. हे द्विज, ज्ञानी लोक ज्यांना अग्नि ह्मणत असतात ते माझे हेच असून यज्ञ व चार वेद सर्वही मला हे माझे मातापितरच आहेत २३. यांच्याच करितां माझे प्राण, भार्या, पुत्र व मित्र आहेत आणि पुत्र व भार्या ह्यांसहवर्तमान मी नित्य यांचीच शुश्रूषा करीत आहे २४. हे द्विजश्रेष्ठ, मी ह्यांना स्वतः स्नान घालीत असतो, त्यांचे पाय स्वतः धूईन असतो आणि ह्यांना भोजन मी स्वतःच घालीत असतो २५. ह्यांना जें अनुकूल असेल तेंच भाषण मी यांच्याशीं करीत असतो, अप्रिय असेल तें वर्ज करीत असतो इतकेंच नव्हे; परंतु, धर्मविरुद्ध अशी जरी एकादी प्रिय गोष्ट यांना असली तरी सुद्धां ती मी यांच्याकरिता करीत असतो २६. हे द्विजश्रेष्ठ ह्याप्रमाणें मी ह्यांनाच गुरु व प्रत्यक्ष धर्ममूर्ति समजून वागत आहें आणि, हे विप्र, सर्वदां दक्ष राहून मी

दृम् २७ पञ्चैव गुरवो ब्रह्मन्पुरुषस्य बुभूषतः । पिता माताग्निरात्मा च गुरुश्च द्विजसत्तम २८ एतेषु यस्तु वर्तेत सम्यगेव द्विजोत्तम । भवेयुर-ग्नयस्तस्य परिचीर्णास्तु नित्यशः २९ गार्हस्थ्ये वर्तमानस्य एष धर्मः सनातनः ३० [८५५८] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यामारण्यके पर्वणि मार्कण्डेयसमास्यापर्वणि द्विजव्याधसंवादे चतुर्दशाधिकद्विशततमोऽध्यायः ॥ २१४ ॥

मार्कण्डेय उवाच ॥ गुरू निवेद्य विप्राय तौ मातापितरावुभौ । पुनरेव स धर्मात्मा व्याधो ब्राह्मणमब्रवीत् १ प्रवृत्तचक्षुर्जातोऽस्मि संपश्य तपसो बलम् । यदर्थमुक्तोऽसि तया गच्छ त्वं मिथिलामिति २ पतिशुश्रूषपरया दान्तया सत्यशीलया । मिथिलायां वसेद्व्याधः स ते धर्मान्प्रवक्ष्यति ३ ब्राह्मण उवाच ॥ प्रतिव्रतायाः सत्यायाः शीलाढ्याया यतव्रत । संस्मृत्य वाक्यं धर्मज्ञ गुणवानसि मे मतः ४ व्याध उवाच ॥ यत्तदा त्वं द्विजश्रेष्ठ तयोक्तो मां प्रति प्रभो । दृष्टमेव तया सम्यगेकपत्न्या न संशयः ५ त्वदनुग्रहबुद्ध्या तु विप्रैतद्दर्शितं मया । वाक्यं च

ह्यांची शुश्रूषा करीत आहे २७. हे ब्रह्मन्, हे द्विजश्रेष्ठ, अभ्युदयेच्छु पुरुषाचे पांचच गुरु आहेत; पिता, माता, अग्नि, आत्मा आणि गुरु २८. हे द्विजश्रेष्ठ, ह्यांच्याशीं जो चांगल्या रीतीनेंच वागतो त्यानें नित्य अग्नींची सेवा सर्वप्रकारें केल्यासारखी होते २९. असो. गृहस्थाश्रमामध्यें राहणाऱ्या पुरुषाचा (ह्या पांचांचें पूजन करणें) हाच सनातन धर्म होय ३०. ह्याप्रमाणें महामुनिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील मार्कंडेयसमास्यापर्वांपैकीं ब्राह्मण आणि व्याध ह्यांच्या संवादाविषयीं दोनशें चवदावा अध्याय समाप्त झाला ॥ २१४ ॥

मार्कंडेय सांगतात:—ते उभयतां मातापितरच आपले गुरु असें त्या ब्राह्मणाला सांगितल्यानंतर पुनरपि तो धर्मात्मा व्याध त्या ब्राह्मणाला ह्मणाला १ " तूं हें तपश्चर्येचें बल अवलोकन कर. मला दिव्य दृष्टि प्राप्त झालेली आहे आणि तूं मिथिलानगरीमध्यें जा, ह्मणजे त्या ठिकाणीं एक व्याध रहात आहे तो तुला धर्म कथन करील असें जें तुला पतिशुश्रूषेविषयीं तत्पर असलेल्या त्या जितेंद्रिय व सत्यनिष्ठ पतिव्रतेनें तुला सांगितलें तें सर्व मी जाणीत आहें " २, ३. ब्राह्मण ह्मणाला " हे जितेंद्रिय, सत्यनिष्ठ आणि सुशील अशा त्या पतिव्रतेनें केलेल्या भाषणाची आठवण होतांक्षणींच तूं गुणवान् आहेस असें मी समजलों ४. " व्याध सांगतो:—हे द्विजश्रेष्ठ, हे प्रभो, त्या पतिव्रतेनें जेव्हां माझ्यासंबंधानें तुला सांगितलें तेव्हां तिनें दिव्य

शृणु मे तात यत्ते वक्ष्ये हितं द्विज ६ त्वया विनिकृता माता पिता च द्विजसत्तम । अनिसृष्टोसि निष्क्रान्तो गृहात्ताभ्यामनिन्दित । वेदोच्चारणकार्यार्थमयुक्तं तत्त्वया कृतम् ७ तव शोकेन वृद्धौ तावन्धीभूतौ तपस्विनौ । तौ प्रसादयितुं गच्छ मा त्वां धर्मोत्यगादयम् ८ तपस्वी त्वं महात्मा च धर्मे च निरतः सदा । सर्वमेतदपार्थं ते क्षिप्रं तौ संप्रसादय ९ श्रद्दधस्व मम ब्रह्मन्नान्यथा कर्तुमर्हसि । गम्यतामद्य विप्रर्षे श्रेयस्ते कथयाम्यहम् १० ब्राह्मण उवाच ॥ यदेतदुक्तं भवता सर्वं सत्यमसंशयम् । प्रीतोस्मि तव भद्रं ते धर्माचारगुणान्वित ११ व्याध उवाच ॥ दैवतप्रतिमो हि त्वं यस्त्वं धर्ममनुव्रतः । पुराणं शाश्वतं दिव्यं दुष्प्राप्यमकृतात्मभिः १२ मातापित्रोः सकाशं हि गत्वा त्वं द्विजसत्तम । अतन्द्रितः कुरु क्षिप्रं मातापित्रोर्हि पूजनम् १३ अतःपरमहं धर्मं नान्यं पश्यामि कंचन १४ ब्राह्मण उवाच ॥ इहाहमागतो दिष्ट्या दिष्ट्या मे संगतं त्वया । ईदृशा दुर्लभा लोके नरा धर्मप्रदर्शकाः १५ एको नरसहस्रेषु

दृष्टीनें सर्व कांहीं अवलोकनच केलें होतें ह्यांत संशय नाहीं ५. हे विप्र, तुझ्यावर अनुग्रह करावा ह्या बुद्धीनें मीं हें आपलें दिव्य ज्ञान तुला दर्शविलें आहें. आतां बा द्विजा, तुला हितावह होणारें जें भाषण मी करणार आहें तें तूं श्रवण कर ६. हे द्विजश्रेष्ठ, तूं मातापितरांचा अपमान केला असून, हे निर्दोष, त्यांच्या अनुज्ञेशिवाय तूं वेदाध्ययनाकरितां घराबाहेर पडला आहेस, हें तूं योग्य केलें नाहींस ७. तुझ्या शोकानें ते बिचारे वृद्ध मातापितर (रडतां रडतां) आंधळेही झाले आहेत. ह्यास्तव, तूं त्यांना प्रसन्न करून घेण्याकरितां जा. हें धर्मातिक्रमण तुझ्या हांतून न होईल तर बरें ८. तूं तपस्वी आहेस, महात्मा आहेस आणि नेहमीं धर्माविषयीं तत्पर आहेस; परंतु, तुझें हें सर्व व्यर्थ आहे. ह्याकरितां तूं सत्वर त्या आपल्या मातापितरांना प्रसन्न करून घे ९. हे ब्रह्मन्, माझ्या सांगण्यावर विश्वास ठेव; माझ्या सांगण्याविरुद्ध वागूं नकोस. हे विप्रर्षे, तूं आतां मातापितरांकडे जा हा मी तुला तुझ्या कल्याणाचा मार्ग सांगत आहें" १०. ब्राह्मण ह्मणतोः—हे धर्मनिष्ठ, हे सदाचारसपन्न, हे गुणसमृद्ध, जें तूं सांगितलेंस तें सर्व सत्य आहे ह्यांत संशय नाहीं. तुझें कल्याण असो. मी तुजवर प्रसन्न झालों आहें ११. व्याध ह्मणतोः—सनातन, शाश्वत, दिव्य आणि ज्यांच्या पदरीं पुण्य नसेल त्यांच्या हातून न होणाऱ्या अशा धर्माला अनुसरून वागणारा तूं देवतुल्य आहेस १२. तथापि, हे द्विजश्रेष्ठा, मातापितरांजवळ जाऊन तूं दक्षतेनें सत्वर पूजन कर १३; ह्यापेक्षां कोणताही धर्म मला श्रेष्ठ दिसत नाहीं १४.

धर्मविद्विद्यते न वा । प्रीतोस्मि तव सत्येन भद्रं ते पुरुषर्षभ १६ पतमा-
नोऽद्य नरके भवतास्मि समुद्धृतः । भवितव्यमथैवं च यद्दृष्टोसि मयान-
घ १७ राजा ययातिर्दौहित्रैः पतितस्तारितो यथा । सद्भिः पुरुषशा-
र्दूल तथाहं भवता द्विजः १८ मातापितृभ्यां शुश्रूषां करिष्ये वचना-
त्तव । नाकृतात्मा वेदयति धर्माधर्मविनिश्चयम् १९ दुर्ज्ञेयः शाश्वतो धर्मः
शूद्रयोनौ हि वर्तते । न त्वां शूद्रमहं मन्ये भवितव्यं हि कारणम् २०
येन कर्मविशेषेण प्राप्तेयं शूद्रता त्वया । एतदिच्छामि विज्ञातुं तत्त्वेन हि
महामते । कामया ब्रूहि मे सर्वं सत्येन प्रयतात्मना २१ व्याध उवाच॥
अनतिक्रमणीया वै ब्राह्मणा मे द्विजोत्तम । शृणु सर्वमिदं वृत्तं पूर्वदेहे
ममानघ २२ अहं हि ब्राह्मणः पूर्वमासं द्विजवरात्मजः । वेदाध्यायी
सुकुशलो वेदाङ्गानां च पारगः २३ आत्मदोषकृतैर्ब्रह्मन्नवस्थामाप्तवानि-

---

ब्राह्मण ह्मणतोः—मी येथें आलों ही एक ईश्वराचीच कृपा असून तुह्मी गांठ पडली हेंही माझें सुदैवच होय. कारण, जगतामध्यें अशा प्रकारचे धर्म दर्शविणारे पुरुष दुर्लभ आहेत १५. हजारों पुरुषांमध्यें एखादा धर्मवेत्ता असेल किंवा नसेल हा संशयच आहे. हे पुरुषश्रेष्ठा, तुझें कल्याण असो; मी तुझ्या सत्यानें संतुष्ट झालों आहें १६. मी आज नरकामध्यें पडत असतांना तू माझा उद्धार केला आहेस. हे निष्पाप, तुझें मला दर्शन झालें हें माझें पूर्व सुकृतच समजलें पाहिजे १७. हे पुरुषश्रेष्ठा, पतित झालेल्या ययातिराजाला ज्याप्रमाणें त्याच्या सज्जन दौहित्रांनीं तारिलें त्याप्रमाणें तू द्विजाला तारिलें आहेस १८. मी तुझ्या सांगण्यावरून मातापितरांची शुश्रूषा करीन. धर्म कोणता आणि अधर्म कोणता ह्याचा निर्णय ह्यांतून चांगलें पुण्य घडलें असल्या-शिवाय कोणालाही करितां येणार नाहीं १९. जाणण्यास कठिण असा जो शाश्वत धर्म तो शूद्रयोनीमध्यें उत्पन्न झालेल्या तुझे ठिकाणीं वास्तव्य करीत आहे. ह्यास्तव, तू मूळचा शूद्र असशील असें मला वाटत नाहीं. शूद्रयोनीमध्यें तुझा जन्म होण्याचें कांहींतरी कारण असलें पाहिजे २०. ज्या विशेष कर्मामुळें तुला ही शूद्रता प्राप्त झाली आहे तें खरें खरें जाणण्याची माझी इच्छा आहे. ह्यास्तव, हे महाविचारी व्याधा, अंतःकरण शुद्ध ठेवून तूं अगदीं मनापासून मला हें सर्व खरें खरें सांग २१. व्याध ह्मणतोः—हे द्विजश्रेष्ठ, ब्राह्मण मला अनुल्लंघनीय आहेत. ह्यास्तव, हे निष्पाप, पूर्वजन्मीं माझ्यासंबंधानें घडलेला हा सर्व वृत्तांत तूं श्रवण कर २२. मी पूर्वजन्मीं एका द्विजश्रेष्ठाचा पुत्र ब्राह्मण होतो. मी वेदाध्ययन करीत असे; धर्मानें वागण्या-विषयीं मी अतिशय दक्ष असे आणि वेदांगांमध्येंही पारंगत असे २३. परंतु, असें

माम् । कश्चिद्राजा मम सखा धनुर्वेदपरायणः २४ संसर्गाद्धनुषि श्रेष्ठ-
स्ततोहमभवं द्विज । एतस्मिन्नेव काले तु मृगयां निर्गतो नृपः २५
सहितो योधमुख्यैश्च मन्त्रिभिश्च सुसंवृतः । ततोऽभ्यहन्मृगांस्तत्र सुबहूना-
श्रमं प्रति २६ अथ क्षिप्तः शरो घोरो मयापि द्विजसत्तम । ताडितश्च
ऋषिस्तेन शरेणानतपर्वणा २७ भूमौ निपातितो ब्रह्मन्नुवाच प्रतिनादयन्।
नापराध्याम्यहं किंचित्केन पापमिदं कृतम् २८ मन्वानस्तं मृगं चाहं
संप्राप्तः सहसा प्रभो । अपश्यं तमृषिं विद्धं शरेणानतपर्वणा २९ अका-
र्यकरणाच्चापि भृशं मे व्यथितं मनः । तमुग्रतपसं विप्रं निष्टनन्तं मही-
तले ३० अजानता कृतमिदं मयेत्यहमथाब्रुवम् । क्षन्तुमर्हसि मे सर्वमिति
चोक्तो मया मुनिः ३१ ततः प्रत्यब्रवीद्वाक्यमृषिर्मां क्रोधमूर्च्छितः ।
व्याधस्त्वं भविता क्रूर शूद्रयोनाविति द्विज ३२ [८५९०] इति श्रीमहाभा-
रते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यामारण्यके पर्वणि मार्कण्डेयस-
मास्यापर्वणि ब्राह्मणव्याधसंवादे पञ्चदशाधिकद्विशततमोऽध्यायः ॥ २१५ ॥

असतांनाही, हे ब्रह्मन्, स्वतःच्या हातून घडलेल्या दोषामुळें ही अवस्था मला प्राप्त झाली. धनुर्विद्येचाच नेहमीं अभ्यास करणारा असा कोणी एक राजा माझा सखा होता २४. त्याच्या संसर्गामुळें, हे द्विज, मीही धनुर्विद्येमध्यें निष्णात झालों. इतक्यामध्यें तो राजा मृगयेकरितां निघून गेला २५ व जातांना तो मंत्र्यांनीं परिवेष्टित होऊन श्रेष्ठ श्रेष्ठ योध्यांना बरोबर घेऊन गेला. नंतर आश्रमाचे संनिध असलेले पुष्कळच मृग त्यानें मारिले २६. तेव्हां, हे द्विजश्रेष्ठ, मीही एक घोर बाण सोडिला. परंतु, त्या अणकुचीदार बाणाचा एका ऋषीला तडाका बसल्यामुळें २७, हे ब्रह्मन्, तो ऋषि भूमीवर पडला आणि गर्जना करीत करीत ह्मणाला " मी कोणाचाही यत्किंचित्सुद्धां अपराध करीत नसतांना मला बाण मारण्याचें हें पातक कोणीं केलें ? " २८. हे प्रभो, तो मृग आहे असें समजून मी एकदम त्याचे संनिध आलों तों अणकुचीदार बाणानें तो ऋषि विद्ध झाल्याचें माझ्या अवलोकनांत आलें २९ आणि जी होऊं नये ती गोष्ट आपल्या हांतून घडली ह्याबद्दल माझ्या मनालाही फारच वाईट वाटलें. तेव्हां भूतलावर तडफडत असलेल्या त्या महातपस्वी ब्राह्मणाला ३० मी ह्मणालों " माझ्या हातून गैरसमजुतीनें ही गोष्ट झाली आहे. " नंतर " आपण माझ्या सर्व अपराधांची क्षमा केली पाहिजे " असेंही मीं त्या मुनींना ह्मटलें ३१. तेव्हां " ते ऋषि क्रुद्ध होऊन मला ह्मणाले " हे क्रूर ब्राह्मणा, तूं शूद्रयोनीमध्यें जन्मास येऊन व्याध होशील " ३२. ह्याप्रमाणें महामुनिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत

व्याध उवाच ॥ एवं शप्तोहमृषिणा तदा द्विजवरोत्तम । अभिप्रसाद-
यमृषिं गिरा त्राहीति मां तदा १ अजानता मया कार्यमिदमद्य कृतं मुने।
क्षन्तुमर्हसि तत्सर्वं प्रसीद भगवन्निति २ ऋषिरुवाच ॥ नान्यथा भविता
शाप एवमेतदसंशयम् । आनृशंस्यात्त्वहं किंचित्कर्तानुग्रहमद्य ते ३ शूद्र-
योन्यां वर्तमानो धर्मज्ञो हि भविष्यसि । मातापित्रोश्च शुश्रूषां करि-
ष्यसि न संशयः ४ तया शुश्रूषया सिद्धिं महत्त्वं समवाप्स्यसि । जाति-
स्मरश्च भविता स्वर्गं चैव गमिष्यसि ५ शापक्षये तु निर्वृत्ते भवितासि
पुनर्द्विजः ६ एवं शप्तः पुरा तेन ऋषिणास्म्युग्रतेजसा । प्रसादश्च कृत-
स्तेन ममैव द्विपदांवर ७ शरं चोद्धृतवानस्मि तस्य वै द्विजसत्तम। आश्रमं
च मया नीतो न च प्राणैर्व्ययुज्यत ८ एतत्ते सर्वमाख्यातं यथा मम पुरा-
भवत् । अभितश्चापि गन्तव्यं मया स्वर्गं द्विजोत्तम ९ ब्राह्मण उवाच ॥
एवमेतानि पुरुषा दुःखानि च सुखानि च । आप्नुवन्ति महाबुद्धे नोत्कण्ठां

वनपर्वांतील मार्कंडेयसमास्यापर्वांपैकीं ब्राह्मण आणि व्याध ह्यांच्या संवादाविषयीं दोनशें पंधरावा अध्याय समाप्त झाला ॥ २१५ ॥

व्याध सांगतोः— हे विप्रश्रेष्ठा, ह्याप्रमाणें ऋषींनीं मला शाप दिल्यावर मीं "मला तारा " ह्मणून त्या ऋषींची प्रार्थना केली आणि ह्मणालों १ "हे भगवन्, हे मुने, मी गैरसमजुतीनें ही आज निंद्य गोष्ट केली आहे. तस्मात्, आपण प्रसन्न व्हा आणि त्या सर्वाची आपण मला क्षमा करा " २. ऋषि ह्मणाले " दिलेला शाप तर अन्यथा होणारच नाहीं. शापाप्रमाणें ही गोष्ट निःसंशय घडून येईलच; परंतु, तुझी दया आल्यामुळें आज मी थोडासा त्यांतल्या त्यांतच तुझ्यावर अनुग्रहही करण्यास उद्युक्त झालों आहें ३. शूद्रयोनीमध्यें असतांनाही तूं धर्मज्ञ होशील आणि मातापितरांची शुश्रूषा करशील ह्याविषयीं संशय नाहीं ४. त्या शुश्रूषेच्या योगानें तुला सिद्धि आणि महत्त्व प्राप्त होऊन पूर्वजन्मींची आठवण राहील व शेवटीं तूं स्वर्गाला जाशील ५. सारांश, शाप भोगून झाला ह्मणजे तूं पुनरपि द्विज होशील " ६. ह्याप्रमाणें त्या महातेजस्वी ऋषींनीं पूर्वीं मला शाप दिला आणि, हे पुरुषश्रेष्ठ, माझ्यावर अनुग्रहही त्यानेंच केला ७. इतकें झाल्यानंतर, हे द्विजश्रेष्ठ, मी शरीरांत घुसलेला बाण काढून त्या ऋषींना आश्रमांत घेऊन गेलों व तेही बाणवेधानें मृत्यु पावले नाहींत ८. पूर्वीं जें माझ्यासंबंधानें घडलें होतें तें हें सर्व मीं तुला कथन केलें आहे. हे द्विजश्रेष्ठ, मला ह्या योनीनंतर ब्राह्मणयोनि प्राप्त होऊन स्वर्गप्राप्ति होणारच आहे ९. ब्राह्मण ह्मणतोः—हे महाविचारी व्याधा, ह्याप्रमाणें हीं सुखदुःखें पुरुषांना प्राप्त होत असतात

कर्तुमर्हसि १० दुष्करं हि कृतं कर्म जानता जातिमात्मनः। लोकवृत्तान्ततत्त्वज्ञ नित्यं धर्मपरायण ११ कर्मदोषश्च वै विद्वन्नात्मजातिकृतेन वै। कंचित्कालमुष्यतां वै ततोसि भविता द्विजः॥ सांप्रतं च मतो मेसि ब्राह्मणो नात्र संशयः १२ ब्राह्मणः पतनीयेषु वर्तमानो विकर्मसु। दाम्भिको दुष्कृतः प्राज्ञः शूद्रेण सदृशो भवेत् १३ यस्तु शूद्रो दमे सत्ये धर्मे च सततोत्थितः। तं ब्राह्मणमहं मन्ये वृत्तेन हि भवेद्द्विजः १४ कर्मदोषेण विषमां गतिमाप्नोति दारुणाम्। क्षीणदोषमहं मन्ये चाभितस्त्वां नरोत्तम १५ कर्तुमर्हसि नोत्कण्ठां त्वद्विधा ह्यविषादिनः। लोकवृत्तानुवृत्तज्ञा नित्यं धर्मपरायणाः १६ व्याध उवाच॥ प्रज्ञया मानसं दुःखं हन्याच्छारीरमौषधैः। एतद्विज्ञानसामर्थ्यं न बालैः समतामियात् १७ अनिष्टसंप्रयोगाच्च विप्रयोगात्प्रियस्य च। मनुष्या मानसैर्दुःखैर्युज्यन्ते चाल्पबुद्धयः १८ गुणैर्भूतानि युज्यन्ते वियुज्यन्ते तथैव च। सर्वाणि नैतदेकस्य शोकस्थानं हि विद्यते १९ अनिष्टं चान्वितं पश्यंस्तथा क्षिप्रं विरज्यते।

तस्मात्, तू ह्याविषयीं मनामध्यें खेद बाळगूं नकोस १०. पूर्वजन्माचें स्मरण असल्यामुळें तू माठें दुर्घट कर्म केलें आहेस. तूं लोकांच्या आचरणाचें तत्त्व जाणणारा असून नेहमीं धर्माविषयीं तत्पर रहाणारा आहेस ११. हे ज्ञानसंपन्न, जन्मामध्यें स्वतःच्या हातून घडलेला हा तुझा कर्मदोष आहे. ह्यास्तव, कांहीं कालपर्यंत ह्या योनीमध्ये राहून नंतर द्विजयोनीमध्ये जन्मास येशील. तू सांप्रतही मला ब्राह्मणच वाटत आहेस ह्यांत संशय नाहीं १२. पातित्यापादक दुष्कर्मे करणारा, दांभिक व दुराचारी असा ब्राह्मण विद्वान् जरी असला तरी शूद्रतुल्य होतो १३. परंतु, इंद्रियदमन, सत्य आणि धर्म ह्याविषयी जो शूद्र नेहमीं तत्पर असतो त्याला मी ब्राह्मण समजत असतो. कारण, द्विज वर्तनानें होत असतो १४. कर्मदोषाच्या योगानें पुरुषाला भयंकर आणि असह्य अशी अवस्था प्राप्त होत असते; परंतु, हे नरोत्तमा, तुझ्या दोषाचा सर्वस्वीं क्षय झाला आहे असें मला वाटतें १५. ह्यास्तव, तू मनामध्यें खेद करूं नकोस. तुझ्यासारिखे लोकवर्तनाचें तत्त्व जाणणारे आणि नेहमीं धर्मपरायण असणारे पुरुष खेद करीत बसत नाहींत १६. व्याध ह्मणतो:—बुद्धीनें मानसिक दुःखाचा आणि औषधांनीं शारीरिक दुःखाचा नाश करावा. बालांशीं पुरुषानें आपलें साम्य करून घेऊं नये हेंच त्याच्या ज्ञानाचें सामर्थ्य होय १७. अप्रिय गोष्ट प्राप्त झाल्यानें आणि प्रिय गोष्टीचा वियोग झाल्यानें अल्पबुद्धि मनुष्यांना मानसिक दुःख होत असतात १८. सुख, दुःख व मोह ह्या गुणकार्यांच्या योगानें पुरुष युक्त होत असून त्यांपासून वियुक्त होत असतात;

ततश्च प्रतिकुर्वन्ति यदि पश्यन्त्युपक्रमान् २० शोचतो न भवेत्किंचित्केवलं परितप्यते । परित्यजन्ति ये दुःखं सुखं वाप्युभयं नराः २१ त एव सुखमेधन्ते ज्ञानतृप्ता मनीषिणः । असंतोषपरा मूढाः संतोषं यान्ति पण्डिताः २२ असंतोषस्य नास्त्यन्तस्तुष्टिस्तु परमं सुखम् । न शोचन्ति गताध्वानः पश्यन्तः परमां गतिम् २३ न विषादे मनः कार्यं विषादो विषमुत्तमम् । मारयत्यकृतप्रज्ञं बालं क्रुद्ध इवोरगः २४ यं विषादोऽभिभवति विक्रमे समुपस्थिते । तेजसा तस्य हीनस्य पुरुषार्थो न विद्यते २५ अवश्यं क्रियमाणस्य कर्मणो दृश्यते फलम् । न हि निर्वेदमागम्य किंचित्प्राप्नोति शोभनम् २६ अथाप्युपायं पश्येत दुःखस्य परिमोक्षणे । अशोचन्नारभेतैवं मुक्तश्चाव्यसनी भवेत् २७ भूतेष्वभावं संचिन्त्य ये तु बुद्धेः परं गताः । न शोचन्ति कृतप्रज्ञाः पश्यन्तः परमां गतिम् २८ न शोचामि च वै विद्वन्का-

---

परंतु, हीं सर्व रजःप्रभृति गुणांची कार्यें आहेत. ह्यापैकीं कोणत्याहीबद्दल वास्तविक शोक करण्याचें कारण नाहीं १९. आपणांला जें अनिष्ट तें प्राप्त होत असल्याचें अवलोकन करून पुरुषांना सत्वर विरक्तता प्राप्त होते. नाहीं तर कांहीं उपाय दिसत असल्यास त्या अनिष्टाचा परिहारही करण्याचा ते यत्न करूं लागतात २०. शोक करीत बसण्यांत कांहीं एक फायदा नाहीं; केवळ संताप मात्र होतो. जे पुरुष सुख व दुःख ह्या उभयतांचाही त्याग करितात २१ त्याच ज्ञानतृप्त विचाऱ्यांना वास्तविक सुख प्राप्त होतें. मूढ लोक नेहमीं असंतुष्ट असून ज्ञानी पुरुष संतोष मानीत असतात २२. कारण, असंतोषाला अंत नाहीं आणि संतोष हेंच उत्कृष्ट सुख होय. ज्ञानमार्गाची ज्यांना प्राप्ति झालेली असते त्यांच्या डोळ्यापुढें उत्तम गति असल्यामुळें ते शोक करीत बसत नाहींत २३. सारांश, मनामध्यें खेद कधींही मानूं नये. कारण, खेद हेंच मोठें जहर विष आहे आणि क्रुद्ध सर्प ज्याप्रमाणें पुरुषाचा घात करितो त्याप्रमाणें ज्ञानहीन आणि ह्मणूनच बाल अशा पुरुषाला तें खेदरूप विष मारून टाकितें २४. पराक्रम दर्शविण्याचा प्रसंग येऊन ठेपला असतां जो मनुष्य खेदाच्या तावडींत सांपडतो त्या तेजोहीन पुरुषाचा कोणताही मनोरथ सिद्धीस जात नाहीं २५. हातून घडणाऱ्या कर्मांचें फल अवश्य दृष्टीं पडत असतें आणि खेदाचें अवलंबन करून बसलें असतां कोणतीही चांगली गोष्ट प्राप्त होत नाहीं २६. आतां दुःखांतून सुटका होण्याचा जर उपाय दृष्टीं पडत असेल तर खेद करीत न बसतां तो योजण्यास लगेंच आरंभ करावा ह्मणजे पुरुष त्या दुःखांतून मुक्त होत असून संकटापासूनही अलग रहातो २७. बुद्धीच्या शेवटाला जाऊन पोंचलेले ह्मणजे ज्ञानसंपन्न झालेले पुरुष पंचमहाभूतात्मक

लाकाङ्क्षी स्थितो ह्यहम् । एतैर्निदर्शनैर्ब्रह्मन्नावसीदामि सत्तम २९ ब्राह्मण उवाच ॥ कृतप्रज्ञोसि मेधावी बुद्धिर्हि विपुला तव । नाहं भवन्तं शोचामि ज्ञानतृप्तोसि धर्मवित् ३० आपृच्छे त्वां स्वस्ति तेस्तु धर्मस्त्वां परिरक्षतु । अप्रमादस्तु कर्तव्यो धर्मे धर्मभृतां वर ३१ मार्कण्डेय उवाच ॥ बाढमित्येव तं व्याधः कृताञ्जलिरुवाच ह । प्रदक्षिणमथो कृत्वा प्रस्थितो द्विजसत्तमः ३२ स तु गत्वा द्विजः सर्वां शुश्रूषां कृतवांस्तदा । मातापितृभ्यां वृद्धाभ्यां यथान्यायं सुसंशितः ३३ एतत्ते सर्वमाख्यातं निखिलेन युधिष्ठिर । पृष्टवानसि यं तात धर्मं धर्मभृतां वर ३४ पतिव्रताया माहात्म्यं ब्राह्मणस्य च सत्तम । मातापित्रोश्च शुश्रूषा धर्मव्याधेन कीर्तिता ३५ युधिष्ठिर उवाच ॥ अत्यद्भुतमिदं ब्रह्मन्धर्माख्यानमनुत्तमम् । सर्वधर्मविदां श्रेष्ठ कथितं मुनिसत्तम ३५ सुखश्राव्यतया विद्वन्मुहूर्त इव मे गतः । न हि तृप्तोस्मि भगवञ्शृण्वानो धर्ममुत्तमम् ३७ [८६२७] इति श्रीमहाभारते

वस्तूंचे ठिकाणीं नश्वरता आहे हें लक्ष्यांत आणून आणि मोक्षाकडे दृष्टि देऊन कधीं शोक करीत बसत नाहींत २८. हे ज्ञानसंपन्न, मी शोक करीत बसलों नाहीं. कालप्रतीक्षा करीत मी बसलों आहें; हे सज्जनश्रेष्ठा, हे दृष्टांत माझ्यापुढें असल्यामुळें माझें धैर्य कधीं खचत नाहीं २९. ब्राह्मण ह्मणतो:—हे धर्मवेत्त्या, तूं ज्ञानसंपन्न आहस; तुझी धारणा चांगली आहे; तुझी बुद्धि विशाल आहे आणि तू ज्ञानतृप्त आहेस. ह्यास्तव, मलाही तुझी हळहळ वाटत नाहीं ३०. तुझें कल्याण असो; धर्म तुझें रक्षण करो आणि हे धर्मनिष्ठामध्यें श्रेष्ठ, धर्माविषयीं तुझी दक्षता राहो. मी आतां तुझा निरोप घेतों ३१ मार्कंडेय सांगतात:— ह्यावर " ठीक आहे " एवढेंच तो व्याध हात जोडून त्या ब्राह्मणाला ह्मणाला आणि तो द्विजश्रेष्ठही त्याला प्रदक्षिणा करून चालता झाला ३२ व घरीं गेल्यानंतर उत्तम प्रकारें जितेंद्रिय राहून तो द्विज वृद्ध मातापितरांची, व्याधानें सांगितल्याप्रमाणें सर्वप्रकारची यथायोग्य रीतीनें शुश्रूषा करू लागला ३३. बा धर्मनिष्ठांमध्यें श्रेष्ठ युधिष्ठिरा, तूं ज्या धर्मासंबंधानें मला प्रश्न केलास तें हें सर्व मीं तुला पूर्णपणें कथन केलें ३४. तात्पर्य, हे सज्जनश्रेष्ठा, पतिव्रतेचें माहात्म्य आणि धर्मव्याधानें ब्राह्मणाला सांगितलेली मातापितरांची शुश्रूषा हें सर्व मीं तुला कथन केलें ३५. युधिष्ठिर ह्मणतो:— हे मुनिश्रेष्ठा, हे सर्वधर्मवेत्त्यांमध्यें श्रेष्ठ, हे ब्रह्मनिष्ठ, आपण हें अतिशय अद्भुत व अत्युत्कृष्ट धर्माख्यान मला कथन केलें आहे ३६. हे भगवन्, हें सुश्राव्य असल्यामुळें तें ऐकण्यांत गेलेला माझा वेळ एका क्षणासारखाच मला वाटत आहे आणि उत्तम धर्म श्रवण करण्याविषयीं

शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यामारण्यकेपर्वणि मार्कण्डेयसमास्या-
पर्वणि ब्राह्मणव्याधसंवादे षोडशाधिकद्विशततमोध्यायः ॥ २१६ ॥

वैशम्पायन उवाच ॥ श्रुत्वेमां धर्मसंयुक्तां धर्मराजः कथां शुभाम् ।
पुन पप्रच्छ तमृषिं मार्कण्डेयमिदं तदा १ युधिष्ठिर उवाच ॥ कथमग्निर्वनं
यातः कथं चाप्यङ्गिराः पुरा । नष्टेऽग्नौ हव्यमवहदग्निर्भूत्वा महाद्युतिः २ अग्नि-
र्यदा त्वेक एव बहुत्वं चास्य कर्मसु । दृश्यते भगवन्सर्वमेतदिच्छामि वेदि-
तुम् ३ कुमारश्च यथोत्पन्नो यथा चाग्नेः सुतोभवत् । यथा रुद्राच्च संभूतो
गङ्गायां कृत्तिकासु च ४ एतदिच्छाम्यहं त्वत्तः श्रोतुं भार्गवसत्तम । कौतू-
हलसमाविष्टो याथातथ्यं महामुने ५ मार्कण्डेय उवाच ॥ अत्राप्युदाहर-
न्तीममितिहासं पुरातनम् । यथा क्रुद्धो हुतवहस्तपस्तप्तुं वनं गतः ६ यथा
च भगवानग्निः स्वयमेवाङ्गिराभवत् । संतापयंश्च प्रभया नाशयंस्तिमिराणि
च ७ पुराङ्गिरा महाबाहो चचार तप उत्तमम् । आश्रमस्थो महाभागो हव्य-
वाहं विशेषयन् ८ तथा स भूत्वा तु तदा जगत्सर्वं व्यकाशयत् ९ तपश्चरंस्तु

माझी अद्यापि तृप्ति झाली नाहीं ३७. ह्याप्रमाणें महामुनिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक-
श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील मार्कंडेयसमास्यापर्वांपैकीं ब्राह्मण आणि व्याध ह्यांच्या
संवादाविषयीं दोनशें सोळावा अध्याय समाप्त झाला ॥ २१६ ॥

वैशंपायन सांगतात:-- (हे जनमेजया,) ही धर्मसंबंधी शुभ कथा श्रवण केल्या-
नंतर धर्मराजानें पुनरपि त्या मार्कंडेय मुनींना असा प्रश्न केला १. युधिष्ठिर प्रश्न
करितो:— पूर्वी अग्नि वनामध्यें कसा निघून गेला आणि अग्नीचा पत्ता नाहींसा
झाला असतां अग्नीचें रूप धारण करून महातेजस्वी अंगिरा मुनींनीं हव्य कसें पोंच-
विलें ? २ आणि त्याचप्रमाणें अग्नि एकच असून कर्मांच ठिकाणीं त्याचें बहुत्व कसें
दृष्टीस पडतें हें सर्व समजण्याची, हे भगवन्, माझी इच्छा आहे ३. कुमार कसा
उत्पन्न झाला ? तो अग्नीचा पुत्र कसा झाला आणि त्याचप्रमाणें तो रुद्रापासून गंगेचे
ठिकाणीं व कृत्तिकांचे ठिकाणीं कसा उत्पन्न झाला ? ४ हें, हे भार्गवश्रेष्ठ महामुने,
उत्सुक झालेल्या मला आपणांपासून इत्थंभूत श्रवण करण्याची इच्छा आहे ५. मार्कंडेय
सांगतात:—ह्याविषयींही एक पुरातन इतिहास इतिहासवेत्ते सांगत असतात. त्या इतिहासा-
मध्यें, अग्नि क्रुद्ध होऊन तपश्चर्या करण्याकरितां वनामध्यें कसा गेला ? ६ भगवान् अंगिरा-
मुनिच स्वतः अग्नि कसे बनले ? आणि आपल्या प्रभेच्या योगानें सर्व प्रदेश प्रकाशित
करून त्यांनीं अंधकाराचा नाश कसा केला, हें सर्व कांहीं कथन केलें आहे ७.
हे महापराक्रमी युधिष्ठिरा, पूर्वी अग्नीच्याही वर ताण करण्याकरितां महाभाग्यवान्

हुतभुक्संतप्तस्तस्य तेजसा । भृशं ग्लानश्च तेजस्वी न च किंचित्प्रजज्ञिवान् १० अथ संचिन्तयामास भगवान्हव्यवाहनः । अन्योऽग्निरिह लोकानां ब्रह्मणा संप्रकल्पितः ११ अग्नित्वं विप्रणष्टं हि तप्यमानस्य मे तपः । कथमग्निः पुनरहं भवेयमिति चिन्त्य सः १२ अपश्यदग्निवल्लोकांस्तापयन्तं महामुनिम् । सोपासर्पच्छनैर्भीतस्तमुवाच तदाङ्गिराः १३ शीघ्रमेव भवस्वाग्निस्त्वं पुनर्लोकभावनः । विज्ञातश्चासि लोकेषु त्रिषु संस्थानचारिषु १४ त्वमग्निः प्रथमं सृष्टो ब्रह्मणा तिमिरापहः । स्वस्थानं प्रतिपद्यस्व शीघ्रमेव तमोनुद १५ अग्निरुवाच ॥ नष्टकीर्तिरहं लोके भवाञ्जातो हुताशनः । भवन्तमेव ज्ञास्यन्ति पावकं न तु मां जनाः १६ निक्षिपाम्यहमग्नित्वं त्वमग्निः प्रथमो भव । भविष्यामि द्वितीयोऽहं प्राजापत्यक एव च १७ अङ्गिरा उवाच ॥ कुरु पुण्यं प्रजास्वर्ग्यं भवाग्निस्तिमिरापहः । मां च देव कुरुष्वाग्ने प्रथमं पुत्रमञ्जसा १८ मार्कण्डेय उवाच ॥ तच्छ्रुत्वा-

---

अंगिरामुनींनीं आश्रमांत राहून उत्कृष्ट तपश्चर्या केली ८ आणि अग्नीप्रमाणें बनून त्यांनीं सर्व जगत् प्रकाशित केलें ९. तेव्हां त्यांच्या तेजानें तो तपश्चर्या करणारा तेजस्वी अग्नि संतप्त झाला; त्याला अतिशय ग्लानि आली व कशालच भान राहीनासें झालें १०. नंतर भगवान् अग्नि मनामध्यें चिंतन करूं लागला " ब्रह्मदेवानें लोकांकरितां येथें दुसरा अग्नि उत्पन्न केला आहे ११ आणि तपश्चर्या करितां करितां माझें अग्नित्व नाहींसें झालें आहे; तेव्हां मी पुनरपि अग्नि कसा होईन? " असा विचार करून १२ अग्नीप्रमाणें लोकांना प्रकाशित करणारे अंगिरामुनि अग्नीनें अवलोकन केले व भयभीत होऊन तो अग्नि त्यांच्यापासून हळूं हळू दूर जाऊं लागला. तेव्हां अंगिरामुनि त्याला ह्मणाले १३ " लोकांना प्रकाशित करणारा असा तूं लवकरच अग्नि हो. स्थावरजंगमात्मक प्राण्यांनीं भरलेल्या त्रैलोक्यामध्यें तूं विख्यात आहेस १४ अंधकाराचा नाशक असा तूंच अग्नि प्रथमतः ब्रह्मदेवामुळें उत्पन्न झाला आहेस. ह्यास्तव, हे अंधकारनाशका, तू सत्वर स्वस्थानीं ये " १५. अग्नि ह्मणतोः— जगतामध्यें माझी कीर्ति नाहींशी झाली आहे आणि आपणच अग्नि झालां आहां. तेव्हां लोक आपणांला अग्नि समजतील; मला समजणार नाहींत १६. मी आपलें अग्नित्व तुमचे ठिकाणीं ठेवितों आणि तुम्ही प्रथम अग्नि व्हा. मी ब्रह्मपुत्रच राहून दुसरा अग्नि होईन १७. अंगिरामुनि ह्मणतातः—लोकांना स्वर्गसुख देणारें असें हव्यवहनरूप पुण्यकर्म तूं कर; अंधकारनाशक असा अग्नि तूंच हो आणि हे, देवा, हे अग्ने, मला तूं एक उत्कृष्ट पुत्र दे १८. मार्कंडेय सांगतातः—अंगिरामुनींचें तें भाषण श्रवण

ङ्गिरसो वाक्यं जातवेदास्तदाकरोत् । राजन्बृहस्पतिर्नाम तस्याप्यङ्गिरसः
सुतः १९ ज्ञात्वा प्रथमजं तं तु वह्नेराङ्गिरसं सुतम् । उपेत्य देवाः पप्रच्छुः
कारणं तत्र भारत २० स तु पृष्टस्तदा देवैस्ततः कारणमब्रवीत् । प्रत्य-
गृह्णंस्तु देवाश्च तद्वचोङ्गिरसस्तदा २१ तत्र नानाविधानग्नीन्प्रवक्ष्यामि
महाप्रभान् । कर्मभिर्बहुभिः ख्यातान्नानार्थान्ब्राह्मणेष्विह २२ [८६४९]
इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यामारण्यके पर्वणि
मार्कण्डेयसमास्यापर्वण्याङ्गिरसे सप्तदशाधिकद्विशततमोऽध्यायः ॥२१७॥

मार्कण्डेय उवाच ॥ ब्रह्मणो यस्तृतीयस्तु पुत्रः कुरुकुलोद्वह । तस्या-
भवत्सुभा भार्या प्रजास्तस्यां च मे शृणु १ बृहत्कीर्तिर्बृहज्ज्योतिर्बृहद्ब्रह्मा
बृहन्मनाः । बृहन्मन्त्रो बृहद्भासस्तथा राजन्बृहस्पतिः २ प्रजासु तासु
सर्वासु रूपेणाप्रतिमाभवत् । देवी भानुमती नाम प्रथमाङ्गिरसः सुता ३
भूतानामेव सर्वेषां यस्यां रागस्तदाभवत् । रागाद्रागेति यामाहुर्द्वितीया-
ङ्गिरसः सुता ४ यां कपर्दिसुतामाहुर्दृश्यादृश्येति देहिनः । तनुत्वात्सा

करून अग्नीनें तसें केलें आणि त्याचप्रमाणें, हे राजा युधिष्ठिरा, बृहस्पति ह्मणून त्या अंगिरामुनींना पुत्र झाला १९. तेव्हां अग्नीपासून अंगिरस्मुनींना तो प्रथमपुत्र झाल्याचें जाणून देव अंगिरस्मुनींपाशीं आले आणि, हे भरतकुलोत्पन्ना युधिष्ठिरा, त्यांना ते पुत्रप्राप्तीचें कारण विचारूं लागले २०. ह्याप्रमाणें देवांनीं प्रश्न केल्यानंतर अंगिरस् मुनींनीं त्यांना कारण कथन केलें असतां देवांनींही त्याचें ह्मणणें मान्य केलें २१. आतां अनेक कर्मांना अनुलक्षून नानाप्रकारचें फल देणारे नानाप्रकारचे महातेजस्वी अग्नि जे कर्मविधायक श्रुतीमध्यें कथन केलेले आहेत ते मी तुला कथन करीन २२. ह्याप्रमाणें महामुनिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक 'श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील मार्कंडेय-समास्यापर्वापैकीं आंगिरसोपाख्यानसंबंधीं दोनशें सतरावा अध्याय समाप्त झाला॥ २१७॥

मार्कंडेय सांगतातः— हे कुरुकुलश्रेष्ठा, ब्रह्मदेवाचा जो तिसरा पुत्र अंगिरा त्याची सुभा ह्मणून भार्या होती. तिचे ठिकाणीं झालेली संतति तू माझ्यापासून श्रवण कर १. हे राजा, बृहत्कीर्ति, बृहज्ज्योति, बृहत्ब्रह्मा, बृहन्मनस्, बृहन्मंत्र, बृहद्भास आणि बृहस्पति ही ती प्रजा होय २. सर्व प्रजेमध्यें अंगिरस् मुनींची जी देवी भानुमती ह्मणून ज्येष्ठ प्रथम कन्या ती रूपानें अप्रतिम होती ३. जिचे ठिकाणीं सर्व प्राण्यांचें प्रेम उत्पन्न झालें व प्राणिमात्रांचें प्रेम उत्पन्न झाल्यामुळें जिला रागा असें ह्मणतात ती अंगिरस्मुनींची दुसरी कन्या होय ४. रूपानें

---

१ अहरभिमानिनी देवता. २ रात्र्यभिमानिनी देवता.

सिनीवाली तृतीयाङ्गिरसः सुता ५ पश्यत्यर्चिष्मती भाभिर्हविर्भिश्च हविष्मती । षष्ठीमङ्गिरसः कन्यां पुण्यामाहुर्महिष्मतीम् ६ महामखेष्वाङ्गिरसी दीप्तिमत्सु महामते । महामतीति विख्याता सप्तमी कथ्यते सुता ७ यां तु दृष्ट्वा भगवतीं जनः कुहुकुहायते । एकानंशेति तामाहुः कुहूमङ्गिरसः सुताम् ८ [८६५७] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यामारण्यके पर्वणि मार्कण्डेयसमास्यापर्वण्याङ्गिरसोपाख्याने-ऽष्टादशाधिकद्विशततमोऽध्यायः ॥ २१८ ॥

मार्कण्डेय उवाच ॥ बृहस्पतेश्चान्द्रमसी भार्याभूद्या यशस्विनी । अग्नीन्साजनयत्पुण्यान्षडेकां चापि पुत्रिकाम् १ आहुतिष्वेव यस्याग्नेर्हविषाज्यं विधीयते । सोऽग्निर्बृहस्पतेः पुत्रः शंयुर्नाम महाव्रतः २ चातुर्मास्येषु यस्येष्ट्यामश्वमेधेऽग्रजः पशुः । दीप्तो ज्वालैरनेकाभैरग्निरेकोऽथ वीर्यवान् ३ शंयो-

---

सूक्ष्म असल्यामुळें जी कधीं दृश्य व कधीं अदृश्य असते आणि जिला लोक रुद्रकन्या असें ह्मणतात ती सिनीवाली अंगिरस्मुनींची तिसरी कन्या होय ५. जिच्या तेजामुळें लोकांना रात्रींही पदार्थ दृग्गोचर होतात अशी जी अर्चिष्मती ती अंगिरस्मुनींची चवथी कन्या होय. जिचें अवलंबन करून लोक हवींच्या योगानें देवतांना उद्देशून याग करितात ती हविष्मती अंगिरस्मुनींची पांचवी कन्या होय. महिष्मती ही आंगिरस्मुनींची सहावी पवित्र कन्या असें ह्मणतात ६. हे महाबुद्धिमान् युधिष्ठिरा, उज्ज्वल अशा महायज्ञामध्यें महामती ह्मणून जी विख्यात आहे ती आंगिरसमुनींची सातवी कन्या असें ह्मणतात ७. ज्या भगवतीला अवलोकन करून लोक विस्मित होतात आणि जिला एका व अमंशा असें ह्मणतात ती अंगिरस्मुनींची कुहू कन्या होय ८ ह्याप्रमाणें महामुनिव्यासप्रणीतलक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील मार्कंडेयसमास्यापर्वांपैकीं आंगिरसोपाख्यानाविषयीं दोनशें अठराचा अध्याय समाप्त झाला ॥ २१८ ॥

मार्कंडेय सांगतात:—बृहस्पतीची जी यशस्विनी चांद्रमसी भार्या होती तिला सहा अग्नि व एक कन्या अशीं अपत्यें झालीं १. दर्शपूर्णमासयागांत प्रधान आहुतींमध्यें ज्याला प्रथम हविर्दान विहित आहे तो शंयुनामक बृहस्पतिपुत्र महातपस्वी अग्नि होय २. चातुर्मास्यांमध्यें वैश्वदेव, वरुणप्रघास, साकमेध आणि शुनासीरीय ह्या चारी पर्वांत ज्याला उद्देशून हविर्दान होतें आणि अश्वमेध यागांतील इष्टीचे वेळीं ज्याला उद्देशून प्रथम पशु असतो

---

१ चतुर्दशीयुक्त अमावास्या. २ पूर्णचंद्रयुक्त शुद्ध पौर्णमासी. ३ प्रतिपदेनें युक्त असलेली पौर्णमासी. हिलाच राका असें ह्मणतात. ४ चतुर्दशीयुक्त पौर्णमासी. हिलाच अनुमती असें ह्मणतात. ५ शुद्ध अमावास्या. ६ प्रतिपदेनें युक्त असलेली अमावास्या.

रप्रतिमा भार्या सत्यासत्याथ धर्मजा । अग्निस्तस्य सुतो दीप्तस्तिस्रः कन्याश्च सुव्रताः ४ प्रथमेनाज्यभागेन पूज्यते योग्निरध्वरे । अग्निस्तस्य भरद्वाजः प्रथमः पुत्र उच्यते ५ पौर्णमासेषु सर्वेषु हविषाज्यं स्रुवोद्यतम् । भरतो नामतः सोग्निर्द्वितीयः शंयुतः सुतः ६ तिस्रः कन्या भवन्त्यन्या यासां स भरतः पतिः । भरतस्तु सुतस्तस्य भरत्येका च पुत्रिका ७ भरतो भरतस्याग्नेः पावकस्तु प्रजापतेः । महानत्यर्थमहितस्तथा भरतसत्तम ८ भरद्वाजस्य भार्या तु वीरा वीरस्य पिण्डदा । प्राहुराज्येन तस्येज्यां सोमस्येव द्विजाः शनैः ९ हविषा यो द्वितियेन सोमेन सह युज्यते । रथप्रभूरयाध्वानकुम्भरेताः स उच्यते १० शरय्वां जनयत्सिद्धिं भानुं भाभिः समावृणोत् । आग्नेयमानयन्नित्यमाह्वाने ह्येष सूयते ११ यस्तु न च्यवते नित्यं यशसा

व अनेक प्रभांनीं युक्त असलेल्या ज्वालांच्या योगानें जो प्रदीप्त झालेला असतो तोही बृहस्पतिपुत्र शंयुनामक वीर्यवान् व अद्वितीय अग्नि होय ३. अत्यंत सुंदर अशी जी सत्यासत्यानामक धर्मकन्या ती शयूची भार्या होय. अग्नि हा त्या शयूला दीप्तिमान् पुत्र झाला आणि तीन पतिव्रता कन्या झाल्या ४. प्रथम आज्यभागानें यज्ञामध्यें ज्या अग्नीचें पूजन होतें तो अग्नि त्या शंयूचा भरद्वाजसंज्ञक प्रथम पुत्र होय ५. पौर्णमासप्रभृति सर्व यागांमध्यें ज्याला उद्देशून प्रथम आघार असतो तो अग्नि शंयूचा भरतनामक दुसरा पुत्र होय ६. शंयूला ज्या दुसऱ्या तीन कन्या झाल्या त्यांपेक्षां भरत हा श्रेष्ठ होय. ह्या भरतालाही भरत ह्मणून पुत्र व भरती ह्मणून एक कन्या अशीं अपत्यें झालीं ७. पोषण करणारा जो प्रजाधिपति भरतसंज्ञक अग्नि त्याचा पावक हा पुत्र होय. ह्याची योग्यता मोठी आहे आणि, हे भरतवंशजश्रेष्ठा, हा महाफल देणारा आहे ८. भरद्वाजनामक शंयुपुत्राची वीरा ह्मणून एक भार्या होती. ती वीरसंज्ञक अग्नीची माता होय. आणि सोमाचें यजन जसें हळूं हळूं मंत्र ह्मणून करीत असतात. तसें त्या वीरसंज्ञक अग्नीचें यजन आज्याच्या योगानें हळूं हळूं मंत्र ह्मणून करावें असें द्विज ह्मणतात ९. द्वितीय हवीच्या योगानें सोमासहवर्तमान ज्याचें यजन होतें तोच वीरसंज्ञक अग्नि होय आणि त्यालाच रथ, प्रभु, रय, अध्वान व कुंभरेता असें ह्मणत असतात १०. त्या वीरनामक भरद्वाजपुत्राला शरयूनामक भार्येचे ठिकाणीं सिद्धि ह्मणून पुत्र झाला व त्यानें आपल्या प्रकाशानें सूर्य आच्छादित करून टाकिला. अग्निदेवत्य याग चालला असतांना अग्नीला आह्वान होतेवेळीं ह्याची स्तुति होत असते ११. यश, तेज आणि श्री हीं ज्याच्यापासून कधींही च्युत होत नाहींत तो निश्च्य-

---

१ बृहस्पतीचा दुसरा पुत्र.

वर्चसा श्रिया । अग्निर्निश्चयवनो नाम पृथिवीं स्तौति केवलम् १२ विपाप्मा कलुषैर्मुक्तो विशुद्धश्चार्चिषा ज्वलन् । विपापोऽग्निः सुतस्तस्य सत्यः समयधर्मकृत् १३ आक्रोशतां हि भूतानां यः करोति हि निष्कृतिम् । अग्निः स निष्कृतिर्नाम शोभयत्यभिसेवितं १४ अनुकूजन्ति येनेह वेदनार्ताः स्वयं जनाः । तस्य पुत्रः स्वनो नाम पावकः स रुजस्करः १५ यस्तु विश्वस्य जगतो बुद्धिमाक्रम्य तिष्ठति । तं प्राहुरध्यात्मविदो विश्वजिन्नाम पावकम् १६ अन्तराग्निः स्मृतो यस्तु भुक्तं पचति देहिनाम् । स यज्ञे विश्वभुङ्नाम सर्वलोकेषु भारत १७ ब्रह्मचारी यतात्मा च सततं विपुलव्रतः । ब्राह्मणाः पूजयन्त्येनं पाकयज्ञेषु पावकम् १८ पवित्रा गोमती नाम नदी यस्याभवत्प्रिया । तस्मिन्कर्माणि सर्वाणि क्रियन्ते धर्मकर्तृभिः १९ वडवाग्निः पिबत्यम्भो योऽसौ परमदारुणः । ऊर्ध्वभागूर्ध्वभाङ्नाम कविः प्राणाश्रितस्तु यः २०

वननामक अग्नि होय आणि तोच वागिंद्रियाभिमानिनी देवता होय १२. त्या निश्चयवनाचा पुत्र सत्य. तो पापरहित, दुराचारांपासून मुक्त, शुद्ध, प्रभेनें उज्ज्वल आणि वाच्य व वाचक ह्यांचा संबध जुळविणारा असा विपापनामक अग्नि होय १३. तोच प्राणी आक्रोश करीत असतांना त्यांना कर्मफलाचा उपभोग घ्यावयास लावितो. त्यालाच निष्कृतिनामक अग्नि असें ह्मणत असतात व उपवनांतून वगैरे तोच शोभा आणीत असतो १४. ज्याच्या योगानें दुःखाकुल झालेले लोक स्वतः रडत असतात तो स्वननामक पीडाकारक अग्नि होय १५. संपूर्ण जगताची बुद्धि व्याप्त करून जो राहिलेला असतो त्याला अध्यात्मवेत्ते पुरुष विश्वजिन्नामक अग्नि ह्मणत असतात १६. हे भरतकुलोत्पन्ना युधिष्ठिरा, ज्याला अंतराग्नि असें ह्मणतात आणि जो प्राण्यांनीं भक्षण केलेलें अन्न पचवितो तो त्रैलोक्यामध्यें होणाऱ्या यज्ञांतील विश्वभुक् अग्नि होय १७. ब्रह्मचारी, जितेंद्रिय, व नित्य दीर्घ तपश्चर्या करणारा असा तो आहे आणि स्मार्तकर्मांमध्यें ब्राह्मण त्याच अग्नीचें पूजन करीत असतात १८. गोमतीनामक पवित्र नदी त्याला प्रिय झालेली असून धर्मनिष्ठ लोक आपलीं सर्व कर्में त्याच्याच आश्रयानें करीत असतात १९. जो हा अतिदारुण वडवाग्नि उदकपान करीत असतो तोच शरीरांतील उदान होय आणि त्यालाच ऊर्ध्वभाक् असें ह्मणत असून प्राणवायूची अभिमानिनी देवताही तोच ज्ञानसंपन्न अग्नि आहे २०. ज्याला उद्देशून कर्मांमध्यें नित्य उत्तरेच्या बाजूला हविर्दान करीत असतात आणि ज्याच्या योगानें आज्यहोम सफल

---

१ बृहस्पतीचा तिसरा पुत्र. २ बृहस्पतीचा चवथा पुत्र. ३ बृहस्पतीचा पांचवा पुत्र. ४ बृहस्पतीचा सहावा पुत्र.

उदङ्द्वारं हविर्यस्य गृहे नित्यं प्रदीयते । ततः स्विष्टं भवेदाज्यं स्विष्टकृत्परमः स्मृतः २१ यः प्रशान्तेषु भूतेषु मन्युर्भवति पावकः । क्रुद्धस्य तु रसो जज्ञे मन्ये तां चाथ पुत्रिकाम् ॥ स्वाहेति दारुणा क्रूरा सर्वभूतेषु तिष्ठति २२ त्रिदिवे यस्य सदृशो नास्ति रूपेण कश्चन । अतुलत्वात्कृतो देवैर्नाम्ना कामस्तु पावकः २३ संहर्षाद्धारयन्क्रोधं धन्वी स्रग्वी रथस्थितः । समरे नाशयेच्छत्रूनमोघो नाम पावकः २४ उक्थो नाम महाभाग त्रिभिरुक्थैरभिष्टुतः । महावाचं त्वजनयत्समाश्वासं हि यं विदुः २५ [८६८२] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यामारण्यके पर्वणि मार्कण्डेयसमास्यापर्वण्याङ्गिरसोपाख्याने एकोनविंशत्यधिकद्विशततमोऽध्यायः ॥ २१९ ॥

मार्कण्डेय उवाच ॥ काश्यपो ह्यथ वासिष्ठः प्राणश्च प्राणपुत्रकः । अग्निराङ्गिरसश्चैव च्यवनस्त्रिषु वर्चकः १ अचरत्स तपस्तीव्रं पुत्रार्थे बहु-

---

होतो त्याला उत्तम यज्ञफल देणारा ह्मणत असतात २१. शांत प्राण्यांचे ठिकाणीं जो पावक क्रोधरूपी असतो आणि तो क्रुद्ध झाला असतां जो त्याच्या शरीरापासून स्वेद उत्पन्न होतो त्या स्वेदापासून उत्पन्न झालेली जी कन्या तीच बृहस्पतीची कन्या ह्मणून मी समजतों. स्वाहा हें त्या कन्येचें नांव आहे आणि ती क्रूर व भयंकर कन्या सर्व भूतांचे ठिकाणीं वास्तव्य करीत आहे २२. स्वर्गामध्यें रूपानें ज्याची बरोबरी करणारा कोणीही नाहीं असा त्या स्वाहेला पुत्र झाला. तो अनुपम असल्यामुळें देवांनीं त्या अग्नीचें नांव काम असें ठेविलें २३. क्रुद्ध, धनुर्धर व पुष्पमाला धारण करणारा असा जो अमोघनामक पावक रथावर आरूढ होऊन समरांगणामध्यें उत्साहानें शत्रूंचा नाश करीत असतो तोही त्या स्वाहेचाच पुत्र होय २४. हे महाभाग्यवान् युधिष्ठिरा, उक्थ हा त्या स्वाहेचा तिसरा पुत्र होय. तो शरीर, प्राण आणि परमात्मा ह्या तीन रूपांनीं स्थित आहे; परावाणीच्या उत्पत्तीला तोच कारण आहे आणि अग्नीची उपासना करणाऱ्यांना मोक्ष देणाराही तोच आहे असें ह्मणत असतात २५. ह्याप्रमाणें महामुनिव्यासप्रणीतलक्षग्रंथात्मकश्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील मार्कंडेयसमास्यापर्वांपैकीं आंगिरसोपाख्यानासंबंधीं दोनशें एकुणिसावा अध्याय समाप्त झाला ॥ २१९ ॥

मार्कंडेय सांगतातः— "कीर्तीनें ब्रह्मदेवाची बरोबरी करणारा धर्मनिष्ठ पुत्र मला प्राप्त व्हावा " अशी इच्छा धरून त्या उक्थानें पुत्रप्राप्तीकरितां अनेक संवत्सरपर्यंत तीव्र तपश्चर्या केली. सारांश, कश्यप, वासिष्ठ, प्राणपुत्र, प्राण, च्यवन व आंगिरस

वार्षिकम् १ पुत्रं लभेयं धर्मिष्ठं यशसा ब्रह्मणा समम् २ महाव्याहृतिभि-र्ध्यातः पञ्चभिस्तैस्तदा त्वथ । जज्ञे तेजो महार्चिष्मान्पञ्चवर्णः प्रभावनः ३ समिद्धाग्निः शिरस्तस्य बाहू सूर्यनिभौ तथा । त्वङ्नेत्रे च सुवर्णाभे कृष्णे जङ्घे च भारत ४ पञ्चवर्णः स तपसा कृतस्तैः पञ्चभिर्जनैः । पाञ्चजन्यः श्रुतो देवः पञ्चवंशकरस्तु सः ५ दश वर्षसहस्राणि तपस्तप्त्वा महातपाः । जनयत्पावकं घोरं पितॄणां स प्रजाः सृजन् ६ बृहद्रथन्तरं मूर्ध्नो वक्त्राद्वा तरसाहरौ । शिवं नाभ्यां बलादिन्द्रं वाय्वग्नी प्राणतोऽसृजत् ७ बाहुभ्या-मनुदात्तौ च विश्वे भूतानि चैव ह । एतान्सृष्ट्वा ततः पञ्च पितॄणामसृज-त्सुतान् ८ बृहद्रथस्य प्रणिधिः काश्यपस्य महत्तरः । भानुराङ्गिरसो धीरः पुत्रो वर्चस्य सौभरः ९ प्राणस्य चानुदात्तस्तु व्याख्याताः पञ्चविंशतिः।

ह्मणून प्रसिद्ध असलेला अग्नि आणि शरीर, प्राण व परमात्मा ह्या तिन्ही रूपांनी स्थित असलेला तो तेजस्वी उक्थ १, २ ह्या पांचांनीं महाव्याहृतीच्या योगानें त्या ब्रह्मदेवाचे ध्यान केलें. तेव्हां महाज्वालांनीं युक्त असलेल्या अग्नीप्रमाणें तो तेजस्वी, जगत्स्रष्टा पचवर्ण होऊन पुत्ररूपानें प्रकट झाला ३. त्याचें मस्तक प्रज्वलित अग्नी-सारिखें होतें; बाहु सूर्यासारिखे होते; त्वचा आणि नेत्र सुवर्णासारिखे होते आणि, हे भरतकुलोत्पन्ना युधिष्ठिरा, त्याच्या पोटऱ्या कृष्णवर्ण होत्या (व ह्याशिवाय राहि-लेल्या इतर अवयवांचा वर्ण निराळा होता) ४. काश्यपप्रभृति पांचांनीं मिळून तो तपोनामक पंचवर्ण पुत्र उत्पन्न केल्यामुळें तो देव पाचजन्य आणि पचवंशकर ह्या दोन नांवानी प्रसिद्ध झाला ५. नतर त्या महातपस्वी जगत्स्रष्ट्यानें दहा हजार वर्षे तपश्चर्या करून पितरांचा घोर अग्नि (ह्मणजे दक्षिणाग्नि) उत्पन्न केला ६. मस्तकापासून बृहत् आणि मुखापासून रथतर ह्या दोन अहोरात्रदेवता वेगानें प्राण्यांचे आयुष्य वगैरे हरण करणाऱ्या त्यानें उत्पन्न केल्या आणि त्याचप्रमाणें नाभीपासून रुद्र, बलापासून इद्र आणि प्राणापासून वायु व अग्नि हे त्यानें उत्पन्न केले ७. नंतर बाहूपासून प्राकृत अनुदात्त व वैकृत अनुदात्त हे स्वर, मनासहवर्तमान इंद्रियें ह्यांच्या देवता आणि पांच भूतें ह्यांना उत्पन्न करून नंतर त्यानें पितरांचे पांच पुत्र उत्पन्न केले ८. बृहद्रथाचा (ह्मणजे वासिष्ठाचा) प्रणिधि, कश्यपाचा महत्तर, आंगिरसाचा ज्ञानवान् भानु, वर्चाचा पुत्र सौभर ९ आणि प्राणाचा अनुदात्त हे पांचांचे पांच पुत्र होत. ह्या सर्वांचें परिगणन केलें असतां हे पंचवीस होतात. नंतर पूर्वीच्या देवाहून भिन्न असे

---

१ दक्षिणाग्नि, बृहत्, रथतर, शिव, इंद्र, वायु, अग्नि, उभयतां अनुदात्त मन आणि पंचज्ञानेंद्रियें ह्या सहांच्या देवता व पंचभूतें हे वीस आणि प्रणिधिप्रभृति पांच मिळून पंचवीस.

देवान्यज्ञमुषश्चान्यान्सृजन्पञ्चदशोत्तरान् १० सुभीममतिभीमं च भीमं भीमबलाबलम् । एतान्यज्ञमुषः पञ्च देवानां ह्यसृजत्तपः ११ सुमित्रं मित्रवन्तं च मित्रज्ञं मित्रवर्धनम् । मित्रधर्माणमित्येतान्देवानभ्यसृजत्तपः १२ सुरप्रवीरं वीरं च सुरेशं च सुवर्चसम् । सुराणामपि हन्तारं पञ्चैतानसृजत्तपः १३ त्रिविधं संस्थिता ह्येते पञ्च पञ्च पृथक्पृथक् । मुष्णन्त्यत्र स्थिता ह्येते स्वर्गतो यज्ञयाजिनः १४ तेषामिष्टं हरन्त्येते निघ्नन्ति च महद्भुवि । स्पर्धया हव्यवाहानां निघ्नन्त्येते हरन्ति च १५ बहिर्वेद्यां तदादानं कुशलैः संप्रवर्तितम् । तदेते नोपसर्पन्ति यत्र चाग्निः स्थितो भवेत् १६ चितामग्निरुद्वहन्नाज्यं पक्षाभ्यां तत्प्रवर्तिते । मन्त्रैः प्रशमिता ह्येते नेष्टं मुष्णन्ति यज्ञियम् १७ बृहदुक्थस्तपस्यैव पुत्रो भूमिमुपाश्रितः । अग्निहोत्रे हूयमाने पृथिव्यां सद्भिरिज्यते १८ रथन्तरश्च तपसः पुत्रोऽग्निः परि-

---

दुसरे पंधरा यज्ञमुष देव (अर्थात् असुर) त्यानें उत्पन्न करण्याचें मनामध्यें आणिलें १०. त्या तपःसंज्ञक पांचजन्यानें प्रथमतः सुभीम, अतिभीम, भीम, भीमबल आणि अबल हे पांच यज्ञमुष (ह्मणजे यज्ञ हरण करणारे) देव उत्पन्न केले ११. नंतर सुमित्र, मित्रवान्, मित्रज्ञ, मित्रवर्धन आणि मित्रधर्म हे देव त्यानें उत्पन्न केले १२ आणि तदनंतर सुरप्रवीर, वीर, सुरेश, सुवर्चस् आणि सुरहंता हे पांच त्यानें उत्पन्न केले १३. हे देव पांच पांच वेगळे वेगळे असे तीन प्रकारांनी राहिलेले आहेत; ह्या ठिकाणीं असलेले हे पंधरा देव स्वर्गास जाण्याची इच्छा धरून यज्ञयाग करणाऱ्यानें जें कांहीं हवन केलें असेल तें हरण करीत असतात आणि त्यानें अर्पण केलेलें जें मोठें हविर्द्रव्य त्याचाही ते नाश करितात. सारांश, हव्य नेऊन पोचविणारे जे अग्नि त्यांच्याशीं स्पर्धा करून हे देव हविर्द्रव्याचा नाश करितात आणि तें हरणही करितात १४, १५. असें जेव्हां होऊं लागलें तेव्हां यज्ञयागांमध्यें निपुण असलेल्या ऋषींनीं यज्ञियवेदीचे बाहेर ह्या देवतांना भाग देण्याचें सुरू केलें व त्यामुळें जेथें अग्नि असतो त्या वेदीमध्यें हे यज्ञघातक येईनासे झाले १६. चयन याग करणाऱ्या यजमानाचें हविर्द्रव्य ठेवण्याचा शकट सिद्ध झाला असतां हे असुर ते हवि स्थलांतीकडे घेऊन जात नाहींत आणि मंत्राच्या योगानें हे शांत झाले असतां अग्नीमध्यें अर्पण केलेलें हविर्द्रव्य हरण करून नेण्यास हे समर्थ होत नाहींत १७. बृहदुक्थ हा तपःसंज्ञक पांचजन्याचाच पुत्र असून तो भूमीच्या आश्रयानें राहिलेला आहे. ह्यामुळें सज्जन पृथ्वीवर अग्निहोत्र होम देऊं लागले असतां त्याचें यजन होतें. (कारण, तो पृथ्वीची अभिमानिनी देवताच आहे) १८. रथंतर जो तपाचा पुत्र त्याला मित्रविंद अग्नि असें

पठ्यते । मित्रविन्दाय वै तस्मै हविरध्वर्यवो विदुः १९ मुमुदे परमप्रीतः
सह पुत्रैर्महायशाः २० [८७०२] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहि-
तायां वैयासिक्यामारण्यके पर्वणि मार्कण्डेयसमास्यापर्वण्याङ्गिरसोपा-
ख्याने विंशत्यधिकद्विशततमोऽध्यायः ॥ २२० ॥

मार्कण्डेय उवाच ॥ गुरुभिर्नियमैर्जातो भरतो नाम पावकः ।
अग्निः पुष्टिमतिर्नाम तुष्टः पुष्टिं प्रयच्छति । भरत्येष प्रजाः सर्वास्ततो
भरत उच्यते १ अग्निर्यश्च शिवो नाम शक्तिपूजापरश्च सः ।
दुःखार्तानां च सर्वेषां शिवकृत्सततं शिवः २ तपसस्तु फलं दृष्ट्वा संप्र-
वृद्धं तपो महत् । उद्धर्तुकामो मतिमान्पुत्रो जज्ञे पुरन्दरः ३ ऊष्मा
चैवोष्मणो जज्ञे सोऽग्निर्भूतस्य लक्ष्यते । अग्निश्चापि मनुर्नाम प्राजापत्य-
मकारयत् ४ शम्भुमग्निमथ प्राहुर्ब्राह्मणा वेदपारगाः । आवसथ्यं द्विजाः
प्राहुर्दीप्तमग्निं महाप्रभम् ५ ऊर्जस्करान्हव्यवाहान्सुवर्णसदृशप्रभान् । तत-

---

म्हणत असतात व ह्या मित्रविंदाला अध्वर्यु हवि अर्पण करीत असतात १९. असो.
त्याप्रमाणें तो महाकीर्तिमान् तपःसंज्ञक पांचजन्य बृहत्, रथंतर वगैरे पुत्र उत्पन्न
केल्यानंतर अत्यंत संतुष्ट झाला आणि पुत्रांसहवर्तमान आनंदानें राहूं लागला २०.
त्याप्रमाणें महामुनिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील मार्कंडे-
यसमास्यापर्वापैकीं आंगिरसोपाख्यानाविषयीं दोनशें विसावा अध्याय समाप्त झाला॥ २२०॥

मार्कंडेय सांगतातः—मोठ्या मोठ्या तपश्चर्यांनीं प्राप्त झालेला जो शयूचा पौत्र भरतना-
मकअग्नि तोच पुष्टिमति म्हणून प्रसिद्ध आहे. कारण, तो संतुष्ट झाला असतां पुष्टि देतो
आणि सर्व प्रजांचें ह्या भरण म्हणजे पोषण करीत असल्यामुळें त्याला भरत असें म्हणत
असतात १. शिव म्हणून प्रसिद्ध असलेला जो तपःसंज्ञक पांचजन्याचा पुत्र अग्नि त्या चिच्छ-
क्तिपूजनाविषयीं (म्हणजे निर्विकल्पसमाधीविषयीं) तत्पर असतो आणि दुःखाकुल
झालेल्या सर्वांचें तो नेहमीं कल्याण करणारा असल्यामुळें त्याला शिव असें म्हणत
असतात २. तपोनामक अग्नीचें ऐश्वर्य वृद्धिंगत झाल्याचें अवलोकन करून तें
प्रचंड ऐश्वर्य प्राप्त करून घेण्याकरितां विचारी पुरंदर त्याचा पुत्र झाला ३.
ऊष्मा हाही तपापासूनच उत्पन्न झाला. हाच ऊष्मा प्राण्यांचे ठिकाणीं
दृष्टोत्पत्तीस येत असतो. मनुनामक अग्नीनेंही स्वतः तपोनामक अग्नीचें पितृत्व स्वीका-
रिलें ४. वेदपारंगत ब्राह्मण तपाच्या चवथ्या पुत्राला शंभु अग्नि म्हणत असतात आणि
महातेजस्वी आवसथ्यनामक जो उज्ज्वल अग्नि तो तपाचा पांचवा पुत्र म्हणून द्विज
म्हणत असतात ५. सुवर्णतुल्य प्रभेनें युक्त आणि सोमरूपी हविर्भागाला पात्र असे

स्तपो ह्यजनयत्तांश्च यज्ञसुतानिह ६ प्रशान्तेऽग्निर्महाभाग परिश्रान्तो गवां
पतिः । असुराञ्जनयन्घोरान्मर्त्यांश्चैव पृथग्विधान् ७ तपसश्च मनुं पुत्रं
भानुं चाप्यङ्गिराः सृजत् । बृहद्भानुं तु तं प्राहुर्ब्राह्मणा वेदपारगाः ८
भानोर्भार्या सुप्रजा तु बृहद्भासा तु सूर्यजा । असृजेतां तु षट्पुत्राञ्शृणु
तासां प्रजाविधिम् ९ दुर्बलानां तु भूतानामसून्यः संप्रयच्छति । तमग्निं
बलदं प्राहुः प्रथमं भानुतः सुतम् १० यः प्रशान्तेषु भूतेषु मन्युर्भवति
दारुणः । अग्निः स मन्युमान्नाम द्वितीयो भानुतः सुतः ११ दर्शे च
पौर्णमासे च यस्येह हविरुच्यते । विष्णुर्नामेह योऽग्निस्तु धृतिमान्नाम सो-
ऽङ्गिराः १२ इन्द्रेण सहितं यस्य हविराग्रयणं स्मृतम् । अग्निराग्रयणो
नाम भानोरेवान्वयस्तु सः १३ चातुर्मास्येषु नित्यानां हविषां योनिरग्रहः ।
चतुर्भिः सहितः पुत्रैर्भानोरेवान्वयः स्तुभः १४ निशा त्वजनयत्कन्याम-
ग्नीषोमावुभौ तथा । मनोरेवाभवद्भार्या सुषुवे पञ्च पावकान् १५ पूज्यते
हविषाऽग्र्येण चातुर्मास्येषु पावकः । पर्जन्यसहितः श्रीमानग्निर्वैश्वानरस्तु

पांच तेजस्कारक अग्निरूप पुत्र तपानें उत्पन्न केले ६. हे महाभाग्यवान् युधिष्ठिरा,
अस्तकालीं श्रांत झालेला जो सूर्य अग्निस्वरूप होऊन घोर व मर्त्य अशा नानाप्रका-
रच्या असुरांना उत्पन्न करूं लागतो त्यालाही तपानेंच उत्पन्न केलेला आहे ७. तपाचा
पुत्र मनु व भानु हे अंगिरामुनींनीं उत्पन्न केले आहेत आणि त्या भानूलाच वेदपारं-
गत ब्राह्मण बृहद्भानु असें ह्मणत असतात. ८ सुप्रजा आणि सूर्यकन्या बृहद्भासा ह्या
दोन भानूच्या भार्या होत. ह्यांना सहा पुत्र झाले. ते कसे झाले हें तू श्रवण कर ९.
दुर्बल प्राण्यांना जो बल देतो त्या भानूच्या प्रथम पुत्राला बलद अग्नि असें ह्मणत
असतात १०. प्राणी शांत झाले असतां जो भयंकर मन्यु प्रबल होत असतो तो
मन्युमान्नामक अग्नि भानूचा दुसरा पुत्र होय ११. दर्श आणि पौर्णमास ह्या दोन्ही
इष्टींमध्यें ज्याच्या उद्देशानें हविर्भाग देत असतात तोच विष्णुनामक अग्नि होय आणि
धृतिमान् अंगिरा असेंही त्यालाच ह्मणत असतात १२. इंद्रासहवर्तमान् ज्याला आग्र-
यण हवि मिळत असतें तो आग्रयणनामक अग्नि भानूनाच पुत्र होय १३. चातुर्मा-
स्ययागामध्यें हवींचें उद्भवस्थान जो विश्वदेवसंज्ञक ग्रहरहित अग्नि चार पुत्रांसहवर्त-
मान असतो तो भानूचाच पुत्र असून स्तुभही भानूचाच पुत्र आहे १४. निशा ह्मणून
मनूची जी तिसरी भार्या तिला रोहिणी कन्या, अग्नि व सोम हे दोन पुत्र आणि इत-
रही पांच अग्नि अशीं आठ अपत्यें झालीं १५. चातुर्मास्ययागामध्यें पर्जन्यासहव-
र्तमान मुख्य हवीच्या योगानें ज्याचें यजन होतें तो वैश्वानरनामक मन्य अग्नि

सः १६ अस्य लोकस्य सर्वस्य यः प्रभुः परिपच्यते । सोऽग्निर्विश्वपति-
र्नाम द्वितीयो वै मनोः सुतः १७ ततः स्विष्टं भवेदाज्यं स्विष्टकृत्परमस्तु
सः । कन्या सा रोहिणी नाम हिरण्यकशिपोः सुता । कर्मणासौ बभौ
भार्या स वह्निः स प्रजापतिः १८ प्राणानाश्रित्य यो देहं प्रवर्तयति देहि-
नाम् । तस्य संनिहितो नाम शब्दरूपस्य साधनः १९ शुक्लकृष्णगति-
र्देवो यो बिभर्ति हुताशनम् । अकल्मषः कल्मषाणां कर्ता क्रोधाश्रितस्तु
यः २० कपिलं परमर्षिं च यं प्राहुर्यतयः सदा । अग्निः स कपिलो नाम
सांख्ययोगप्रवर्तकः २१ अग्रं यच्छन्ति भूतानां येन भूतानि नित्यदा ।
कर्मस्विह विचित्रेषु साग्रणीर्वह्निरुच्यते २२ इमानन्यान्समसृजत्पावका-
न्प्रथितान्भुवि । अग्निहोत्रस्य दुष्टस्य प्रायश्चित्तार्थमुल्बणान् २३ संस्पृ-
शेयुर्यदान्योन्यं कथंचिद्वायुनाग्नयः । इष्टिरष्टाकपालेन कार्या वै शुचये-
ऽग्नये २४ दक्षिणाग्निर्यदा द्वाभ्यां संसृजेत तदा किल । इष्टिरष्टाकपालेन
कार्या वै वीतयेऽग्नये २५ यद्यग्नयो हि स्पृश्येयुर्निवेशस्था दवाग्निना ।

होय १६. ह्या सर्व प्राण्यांचें अन्न ज्याच्या योगानें पचन होतें आणि ह्मणूनच जो सर्व लोकाचा प्रभु आहे, तो विश्वपतिनामक अग्नि मनूचा दुसरा पुत्र होय १७. ज्याच्या योगानें यथाविधि आज्यहोम होतो तो परमस्विष्टकृत ह्मणून मनूचा पुत्रच आहे; परंतु, तीच हिरण्यकशिपूची रोहिणीनामक कन्या होय. ती कांहीं पापकर्मामुळें भार्या झाली; परंतु, वास्तविक तो अग्नि व प्रजाधिपति आहे १८. प्राणांचा आश्रय करून जो प्राण्यांचा देह कायम ठवितो तो त्या मनूचा सन्निहितनामक तृतीय पुत्र होय. ह्या अग्नीच्या योगानें प्राण्यांना शब्दश्रवण होतें १९ ज्याची उपासना केली असतां प्राण्यांना क्रमानें शुक्लकृष्ण गति (ह्मणजे अर्चिरादि मार्ग व धूमादि मार्ग हे) प्राप्त होतात, जो अग्नीला धारण करितो, जो स्वतः शुद्ध आहे, ज्याच्या योगानें काम्य कर्में होतात, क्रोध हा ज्याचा आश्रय आहे २० आणि ज्याला यति नेहमीं कपिल-महर्षि ह्मणतात तो सांख्ययोगप्रवर्तक कपिलनामक अग्नि होय २१. प्राण्यांना उद्देशून ज्याच्या योगाने नानाप्रकारच्या कर्मामध्यें प्राणी अग्रभाग अर्पण करीत असतात त्याला अग्रणी वह्नि असें ह्मणतात २२. अग्निहोत्र दूषित झालें असतां त्याच्या प्राय-श्चित्तार्थ हे व असेच दुसरे प्रचंड व प्रसिद्ध अग्नि मनूंनं उत्पन्न केले आहेत २३. वायूच्या योगानें अग्नि परस्परमिश्र झाले असतां आठकपालांवर संस्कृत केलेल्या पुरो-डाशानें शुचि अग्नीला उद्देशून इष्टि करावी २४. दक्षिणाग्नि जेव्हां इतर दोहोंशीं मिश्र होईल तेव्हां अष्टाकपाल पुरोडाशानें वीतिसंज्ञक अग्नीला उद्देशून इष्टि करावी २५.

इष्टिरष्टाकपालेन कार्या तु शुचयेऽग्नये २६ अग्निं रजस्वला वै स्त्री संस्पृशेदग्निहोत्रिकम् । इष्टिरष्टाकपालेन कार्या वसुमतेऽग्नये २७ मृतः श्रूयते यो जीवः परेयुः पशवो यदा । इष्टिरष्टाकपालेन कार्या सुरभिमतेऽग्नये२८ आर्तो न जहुयादग्निं त्रिरात्रं यस्तु ब्राह्मणः । इष्टिरष्टाकपालेन कार्या स्यादुत्तराग्नये २९ दर्शं च पौर्णमासं च यस्य तिष्ठेत्प्रतिष्ठितम् । इष्टिरष्टाकपालेन कार्या पथिकृतेऽग्नये ३० सूतिकाग्निर्यदा चाग्निं संस्पृशेदग्निहोत्रिकम् । इष्टिरष्टाकपालेन कार्या चाग्निमतेऽग्नये३१[८७३३]इतिश्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यामारण्यकेपर्वणि मार्कण्डेयसमास्यापर्वण्याङ्गिरसोपाख्यान एकविंशत्यधिकद्विशततमोऽध्यायः ॥ २२१ ॥

मार्कण्डेय उवाच ॥ आपस्य मुदिता भार्या सहस्य परमा प्रिया । भूपतिर्भुवभर्ता च जनयत्पावकं परम् १ भूतानां सर्वेषां यं प्राहुः पावकं पतिम् । आत्मा भुवनभर्तेति सान्वयेषु द्विजातिषु २ महतां चैव भूतानां सर्वेषामिह यः पतिः । भगवान्स महातेजा नित्यं चरति

अग्नि स्वस्थानीं असतांना त्यांना जर दावाग्नीचा स्पर्श झाला तर शुचि अग्नीला उद्देशून अष्टाकपाल पुरोडाशानें इष्टि करावी २६. अग्निहोत्रसंबंधीं अग्नीला रजस्वला स्त्रीचा स्पर्श झाला असतां अष्टाकपाल पुरोडाशानें वसुमान अग्नीला उद्देशून इष्टि करावी २७. आपला संबंधी कोणी मनुष्य मेल्याचें कानीं आलें असतां अथवा पशु मृत होऊं लागले असतां सुरभिमान् अग्नीला उद्देशून अष्टाकपाल पुरोडाशानें इष्टि करावी २८. आर्त झाल्यामुळें ज्याच्या हातून त्रिरात्र होम होणार नाहीं त्यानें उत्तराग्नीला उद्देशून अष्टाकपाल पुरोडाशानें इष्टि करावी २९. दर्शेष्टि अथवा पौर्णिमासेष्टि ज्याची अंतरेल त्यानें पथिकृत् अग्नीला उद्देशून अष्टाकपाल पुरोडाशानें इष्टि करावी ३०. सूतिकाग्नीचा स्पर्श अग्निहोत्राच्या अग्नीला झाला असतां अग्निमान् अग्नीला उद्देशून अष्टाकपाल पुरोडाशानें इष्टि करावी ३१. ह्याप्रमाणें महामुनिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील मार्कंडेयसमास्यापर्वांपैकीं आंगिरसोपाख्यानाविषयीं दोनशें एकविसावा अध्याय समाप्त झाला ॥ २१ ॥

मार्कंडेय सांगतात:—उदकामध्यें विदित असलेल्या सहसंज्ञक अग्नीची मुदिता म्हणून एक अत्यंत प्रिय भार्या होती आणि पृथ्वी व अंतरिक्ष ह्यांचा अधिपति जो सह त्यानें अद्भुतसंज्ञक एक दुसरा अग्नि उत्पन्न केला १. त्या सर्वभूताधिपति अग्नीला सर्व भूतांचा आत्मा आणि भुवनाचा अधिपति असें द्विज परंपरेनें म्हणत आले आहेत २. येथील सर्व महाभूतांचाही तो भगवान् महातेजस्वी अग्नि अधिपति आहे

पावकः ३ अग्निर्गृहपतिर्नाम नित्यं यज्ञेषु पूज्यते । हुतं वहति यो हव्य-
मस्य लोकस्य पावकः ४ अपां गर्भो महाभागः सत्यभुग्यो महाद्भुतः ।
भूपतिर्भुवभर्ता च महतः पतिरुच्यते ५ दहन्मृतानि भूतानि तस्याग्निर्भ-
रतोभवत् । अग्निष्टोमे च नियतः क्रतुश्रेष्ठो भरस्य तु ६ स वह्निः
प्रथमो नित्यं देवैरन्विष्यते प्रभुः । आयान्तं नियतं दृष्ट्वा प्रविवेशार्णवं
भयात् ७ देवास्तत्रापि गच्छन्ति मार्गमाणा यथादिशम् । दृष्ट्वा त्वग्नि-
रथर्वाणं ततो वचनमब्रवीत् ८ देवानां वह हव्यं त्वमहं वीर सुदुर्बलः ।
अथ त्वं गच्छ मध्वक्षं प्रियमेतत्कुरुष्व मे ९ प्रेष्य चाग्निरथर्वाणमन्यं
देशं ततोगमत् । मत्स्यास्तस्य समाचख्युः क्रुद्धस्तानग्निरब्रवीत् १० भक्ष्या
वै विविधैर्भावैर्भविष्यथ शरीरिणाम् । अथर्वाणं तथा चापि हव्यवा-
हात्रवीद्वचः ११ अनुनीयमानो हि भृशं देववाक्याद्धि तेन सः । नेच्छ-
द्वोढुं हविः सोढुं शरीरं चापि सोत्यजत् १२ स तच्छरीरं संत्यज्य प्रवि-

---

आणि जगतामध्यें तो नेहमीं संचार करीत आहे ३. यज्ञामध्यें गृहपतिनामक अग्नि जो नित्य पूज्य असतो आणि ह्या लोकामध्यें अर्पण केलेलें हविर्द्रव्य जो त्या त्या देव-तांना नेऊन पोंचवितो तो तोच होय ४. महाभाग्यवान् आणि महाद्भुत जो भूताधि-पति तो आपसंज्ञक सहाचा पुत्र आणि पृथ्वी व अंतरिक्ष ह्यांचा अधिपति जो सह तो महाद्भुताचा पिता ह्मणून ह्मणत असतात ५. मृत भूतांचें दहन करणारा जो अग्नि तो भरत होय व तो अद्भुताचा पुत्र होय. सर्व क्रतूंमध्यें जो श्रेष्ठ व ब्राह्मणांना जो नित्य त्या अग्निष्टोमयागामध्येंही भरताचा पितामह जो सह तोच असतो ६. देव ज्याची नेहमीं इच्छा करीत असतात असा तो सहनामक प्रभु प्रथम वन्हि आपला नियतसंज्ञक पौत्र येतांना अवलोकन करून भीतीनें सागरामध्यें प्रविष्ट झाला ७. नंतर देव अनुक्रमें सर्व दिशा शोधीत शोधीत तिकडेही चालले. तेव्हां अंगिरा मुनींना अवलोकन करून अग्नि ह्मणाला ८ " हे वीरा, तूं देवांचें हव्य पोंचवीत जा. कारण, मी अत्यंत दुर्बल झालों आहें. तस्मात्, तूंच अग्नित्वाचा स्वीकार कर आणि हा माझा मनोरथ परिपूर्ण कर " ९. ह्याप्रमाणें अंगिरस्मुनींना आपलें काम सांगून अग्नि तेथून दुसरीकडे गेला असतां मत्स्यांनीं त्याची बातमी सांगितली. तेव्हां अग्नि क्रुद्ध होऊन त्यांना ह्मणाला १० " नानाप्रकारांनीं तुह्मी प्राण्यांचें भक्ष्य व्हाल. " ह्याप्रमाणें मत्स्यांना शाप दिल्यानंतर अग्नीनें अंगिरस्मुनींशीं पूर्वीप्रमाणेंच भाषण केलें ११. देव वारंवार जरी त्याचें सांत्वन करू लागले तरी अग्नीला हवि पोंचविण्याचें काम कर-ण्याची इच्छा होईना. इतकेंच नव्हे, परंतु, तें शरीर धारण करून रहाणेंही त्याला सहन

वेश धरां तदा । भूमिं स्पृष्ट्वासृजद्धातून्पृथक्पृथगनीव हि १३ पूयात्स गन्धं तेजश्च अस्थिभ्यो देवदारु च । श्लेष्मणः स्फटिकं तस्य पित्तान्मारकतं तथा । यकृत्कृष्णायसं तस्य त्रिभिरेव बभुः प्रजाः १४ नखास्तस्याभ्रपटलं शिराजालानि विद्रुमम् । शरीराद्विविधाश्चान्ये धातवोस्याभवन्नृप १५ एवं त्यक्त्वा शरीरं च परमे तपसि स्थितः । भृग्वङ्गिरादिभिर्भूयस्तपसोत्थापितस्तदा १६ भृशं जज्वाल तेजस्वी तपसाप्यायितः शिखी । दृष्ट्वा ऋषिं भयाच्चापि प्रविवेश महार्णवम् १७ तस्मिन्नष्टे जगद्भीतमथर्वाणमथाश्रितम् । अर्चयामासुरेवैनमथर्वाणं सुरादयः १८ अथर्वा त्वसृजल्लोकानात्मनालोक्य पावकम् । मिषतां सर्वभूतानामुन्ममाथ महार्णवम् १९ एवमग्निर्भगवता नष्टः पूर्वमथर्वणा । आहूतः सर्वभूतानां हव्यं वहति सर्वदा २० एवं त्वजनयद्धिष्ण्यान्वेदोक्तान्विबुधान्बहून् । विचरन्विविधान्देशान्भ्रममाणस्तु तत्र वै २१ सिन्धुं नदं पञ्चनदं देविकाथ सरस्वती ।

होईना. तेव्हां त्यानें त्याचाही त्याग केला १२. त्या स्थूल शरीराचा त्याग केल्यानंतर अग्नि पृथ्वीमध्यें प्रविष्ट झाला आणि भूमीच्या आश्रयानें त्यानें पुष्कळच वेगळे वेगळे धातु उत्पन्न केले १३. पुवापासून त्यानें गंध व तेज निर्माण करून अस्थींपासून देवदारु उत्पन्न केलें; त्याच्या कफापासून स्फटिक रत्न उत्पन्न झालें; पित्तापासून पाच उत्पन्न झाली; लोखंड हें त्याच्या यकृतापासून उत्पन्न झालें आणि ह्याप्रमाणें काष्ठ, पाषाण व धातु अशा तिन्ही प्रकारांनीं त्याच्यापासून वस्तु उत्पन्न झाल्या १४. त्याच्या नखांपासून अभ्रक उत्पन्न झालें; शिराजालांपासून पोंवळें उत्पन्न झालें आणि, हे राजा, ह्याप्रमाणें इतरही नानाप्रकारचे धातु त्याच्या शरीरापासून उत्पन्न झाले १५. असो. वर सांगितल्याप्रमाणें पूर्वीच्या स्थूल शरीराचा त्याग करून तो उत्कृष्ट तपश्चर्या करीत बसला. नंतर भृगु, अंगिरा वगैरे मुनींनीं त्याला तपश्चर्येपासून उठविलें १६. तपाच्या योगानें तेजोवृद्धि पावलेला तो तेजस्वी अग्नि अत्यंत उज्ज्वल दिसूं लागला; तथापि अंगिरामुनींना अवलोकन करून तो पुनरपि भीतीनें महासागरामध्यें प्रविष्ट झाला १७. ह्याप्रमाणें अग्नि नाहीसा झाला असतां भयभीत झालेल्या जगतानें अंगिरामुनींचा आश्रय केला आणि देवादिकही ह्या अंगिरामुनींनाच अग्नि ह्मणून मान देऊं लागले १८. नंतर सर्व प्राण्यांचे समक्ष अंगिरामुनींनीं महासागराचें मथन केलें आणि त्या मंथनानें अग्नीचा शोध लावून त्यांनीं लोक उत्पन्न केले १९. ह्याप्रमाणें पूर्वी नाहींसा झालेला अग्नि अथर्वांगिरसमुनींनीं हाक मारून आणिल्यानंतर तो पूर्वीप्रमाणें नेहमीं सर्व प्राण्यांचें हव्य देवांकडे पोंचवूं लागला २०. असो. (अग्नीपासून

गङ्गा च शतकुम्भा च शरयू गण्डसाह्वया २२ चर्मण्वती मही चैव मेध्या मेधातिथिस्तदा। ताम्रावती वेत्रवती नद्यस्तिस्रोऽथ कौशिकी २३ तमसा नर्मदा चैव नदी गोदावरी तथा। वेणोपवेणा भीमा च वडवा चैव भारत २४ भारती सुप्रयोगा च कावेरी मुर्मुरा तथा। तुङ्गवेणा कृष्णवेणा कपिला शोण एव च २५ एता नद्यस्तु धिष्ण्यानां मातरो याः प्रकीर्तिताः २६ अद्भुतस्य प्रिया भार्या तस्य पुत्रो विभूरसिः। यावन्तः पावकाः प्रोक्ताः सोमास्तावन्त एव तु २७ अत्रेश्चाप्यन्वये जाता ब्रह्मणो मानसाः प्रजाः। अत्रिः पुत्रान्स्रष्टुकामस्तानेवात्मन्यधारयत्। तस्य तद्ब्रह्मणः कायान्निर्हरन्ति हुताशनाः २८ एवमेते महात्मानः कीर्तितास्तेऽग्नयो मया। अप्रमेया यथोत्पन्नाः श्रीमन्तस्तिमिरापहाः २९ अद्भुतस्य तु माहात्म्यं यथा वेदेषु कीर्तितम्। तादृशं विद्धि सर्वेषामेक ह्येष हुताशनः ३० एक एवैष भगवान्विज्ञेयः प्रथमाङ्गिराः। बहुधा निःसृतः कायाज्ज्योतिष्टोमः

अंगिरा, अंगिरापासून बृहस्पति, बृहस्पतीपासून शंयु इत्यादि क्रमानें) पूर्वी सांगितल्याप्रमाणें हव्यदानाकरितां अनेक वेदोक्त देवरूप अधिष्ठानें उत्पन्न केल्यानंतर तो अग्नि नानाप्रकारच्या देशांमध्यें संचार करण्याच्या इच्छेनें हिंडूं लागला २१. सिंधुनद, पंचनद, देविका, सरस्वती, गंगा, शतकुंभा, शरयू, गंडकी २२, चर्मण्वती, मही, मेध्या, मेधातिथि, ताम्रावती, वेत्रवती व कौशिकी ह्या तीन नद्या २३, तमसा, नर्मदानदी गोदावरी, वेणा, उपवेणा, भीमा, हे भरतकुलोत्पन्ना धर्मराजा, वडवा २४, भारती, सुप्रयोगा, कावेरी, मुर्मुरा, तुंगवेणा, कृष्णवेणा, कपिला आणि शोणनद २५ ह्या नद्या धिष्ण्यसंज्ञक अग्नींच्या माता होत २६. अद्भुताची भार्या प्रिया असून विभु हा त्याचा श्रेष्ठ पुत्र होय. (आणि वन्हि, श्वात्र, तुथ वगैरे इतर पुत्र होत). जितक्या प्रकारचे अग्नि सांगितलेले आहेत तितक्या प्रकारचे सोमयागही आहेत २७. ब्रह्मदेवाच्या मानस प्रजा त्या अत्रीच्याही वंशामध्यें उत्पन्न झाल्या. अत्रीला पुत्रोत्पादनाची इच्छा झाली असतां त्यानें वर निर्दिष्ट केलेले अग्निच मनामध्यें आणिले आणि त्यामुळें अग्निच प्रजारूपानें प्रकट झाला. सारांश, त्या अत्रि ब्रह्मर्षींच्या देहापासून प्रजारूपानें वेगळे वेगळे अग्निच बाहेर पडले २८. ह्याप्रमाणें अंधकाराचा नाश करणारे हे श्रीमान् व अचिंत्य महात्मे अग्नि कसे उत्पन्न झाले तें मीं तुला कथन केलें आहे २९. अद्भुतसंज्ञक अग्नीचा महिमा जसा वेदामध्यें कथन केला आहे तसाच सर्वांचा आहे असें तूं समज. ह्या सर्वांमध्यें भगवान् अंगिरा हाच एक श्रेष्ठ अग्नि प्रथम असून त्या प्रजापतिपुत्र अंगिरापासून नानाप्रकारचे अग्नि निघालेले आहेत. सारांश, ज्योतिष्टोम ह्या

क्रतुर्यथा ३१ इत्येष वंशः सुमहानग्नीनां कीर्तितो मया । योऽर्चितो विविधैर्मन्त्रैर्हव्यं वहति देहिनाम् ३२ [८७६५] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यामारण्यके पर्वणि मार्कण्डेयसमास्यापर्वण्याङ्गिरसोपाख्यानेऽग्निसमुद्भवे द्वाविंशत्यधिकद्विशततमोऽध्यायः ॥ २२२ ॥

मार्कण्डेय उवाच ॥ अग्नीनां विविधा वंशाः कीर्तितास्ते मयानघ । शृणु जन्म तु कौरव्य कार्तिकेयस्य धीमतः १ अद्भुतस्याद्भुतं पुत्रं प्रवक्ष्याम्यमितौजसम् । जातं ब्रह्मर्षिभार्याभिर्ब्रह्मण्यं कीर्तिवर्धनम् २ देवासुराः पुरा यत्ता विनिघ्नन्तः परस्परम् । तत्राजयन्सदा देवान्दानवा घोररूपिणः ३ वध्यमानं बलं दृष्ट्वा बहुशस्तैः पुरन्दरः । स सैन्यनायकार्थाय चिन्तामाप भृशं तदा ४ देवसेनां दानवैर्हि भग्नां दृष्ट्वा महाबलः । पालयेद्वीर्यमाश्रित्य स ज्ञेयः पुरुषो मया ५ स शैलं मानसं गत्वा ध्यायन्नर्थमिदं भृशम् । शुश्रावार्तस्वरं घोरमथ मुक्तं स्त्रिया तदा ६ अभिधावतु

एक क्रतु असून त्याच्यापासून जसे वेगळे वेगळे क्रतु झालेले आहेत तसेच अंगिरापासून वेगळे वेगळे अग्नि झालेले आहेत ३०,३१. असो. अग्नींचा हा अति प्रचंड वंश मीं तुला कथन केला आहे. नानाप्रकारच्या मंत्रांनी ह्याचें स्तवन केलें असतां हा लोकांनीं अर्पण केलेलें हव्य देवांकडे नेऊन पोचवीत असतो ३२. ह्याप्रमाणें महर्षिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील मार्कंडेयसमास्यापर्वांपैकी आंगिरसोपाख्यानाविषयीं अग्नींच्या उत्पत्तीसंबंधानें दोनशें बाविसावा अध्याय समाप्त झाला ॥ २२२ ॥

मार्कंडेय सांगतात:—हे निष्पापा धर्मराजा, अग्नींचे नानाप्रकारचे वंश मीं तुला कथन केले. आतां, हे कुरुकुलोत्पन्ना, बुद्धिमान् कार्तिकेयाची उत्पत्ति तू श्रवण कर १. अद्भुतसंज्ञक अग्नीला अपरिमित तेजस्वी असा एक नवीन पुत्र ब्रह्मर्षींच्या भार्यांमुळें उत्पन्न झाला हें मी तुला अगोदरच सांगून ठेवितों. तो पुत्र कीर्तिमान् असून ब्राह्मणांचें हित करणारा होता २. एकमेकांचा घात करण्याच्या इच्छेनें पूर्वी देवदैत्य संग्रामामध्यें सज्ज झाले असतां घोर रूप धारण करणारे दानवच नेहमीं देवांचा पराभव करूं लागले ३. तेव्हां ते दानव अनेक प्रकारांनीं आपल्या सैन्याचा घात करीत आहेत असें अवलोकन करून तो इंद्र सेनाधिपतीविषयीं वारंवार चिंताक्रांत होऊं लागला ४. दानवांनीं देवसेना पराजित केलेली अवलोकन केल्यावर महाबलाढ्य इंद्र "जो वीर्याचें अवलंबन करून देवसेनेचें परिपालन करील असा पुरुष मला पाहिला पाहिजे" ५ असा एकसारखा ध्यास घेऊन मानसपर्वतावर गेला असतां एका स्त्रीनें आर्तस्वरानें ठोकिलेली आरोळी त्यानें ऐकिली ६ "कोणीं तरी पुरुषानें माझ्याकडे

मां कश्चित्पुरुषस्त्रातु चैव ह । पतिं च मे प्रदिशतु स्वयं वा पतिरस्तु
मे ७ पुरन्दरस्तु तामाह माभैर्नास्ति भयं तव । एवमुक्त्वा ततोपश्यत्के-
शिनं स्थितमग्रतः ८ किरीटिनं गदापाणिं धातुमन्तमिवाचलम् । हस्ते
गृहीत्वा कन्यां तामथैनं वासवोब्रवीत् ९ अनार्यकर्मन्कस्मात्त्वमिमां
कन्यां जिहीर्षसि । वज्रिणं मां विजानीहि विरमास्याः प्रबाधनात् १०
केश्युवाच ॥ विसृजस्व त्वमेवैनां शक्रैषा प्रार्थिता मया । क्षमं ते जीवतो
गन्तुं स्वपुरं पाकशासन ११ एवमुक्त्वा गदां केशी चिक्षेपेन्द्रवधाय वै ।
तामापतन्तीं चिच्छेद मध्ये वज्रेण वासवः १२ अथास्य शैलशिखरं केशी
क्रुद्धो व्यवासृजत् । तदापतन्तं संप्रेक्ष्य शैलशृङ्गं शतक्रतुः १३ बिभेद
राजन्वज्रेण भुवि तन्निपपात ह १४ पतता तु तदा केशी तेन शृङ्गेण
ताडितः । हित्वा कन्यां महाभागां प्राद्रवद्भृशपीडितः १५ अपयातेऽ-
सुरे तस्मिंस्तां कन्यां वासवोब्रवीत् । कासि कस्यासि किं चेह कुरुषे त्वं

धांवत येऊन माझें रक्षण करावें आणि मला कोणी पति तरी त्यानें पाहून द्यावा किंवा
स्वतः तरी माझा पति व्हावें " ७ हे शब्द ऐकिल्यावर " भिऊं नको; तुला भय
नाहीं " असें इंद्र तिला ह्मणाला. परंतु, इंद्र असें त्या स्त्रीला ह्मणत आहे तोंच केशि-
संज्ञक दानव हातामध्यें गदा घेऊन व मस्तकीं किरीट घालून धातूंनीं युक्त अस-
लेल्या पर्वताप्रमाणें पुढें उभा राहिलेला त्यानें अवलोकन केला आणि नंतर त्या कन्येचा
हात धरून तो इंद्र त्याला ह्मणाला ८,९ " हे दुराचारी दानवा, तूं ह्या कन्येला
कशाकरितां हरण करीत आहेस ? मी इंद्र आहें असें तूं समज आणि हिला पीडा
करण्याचें सोडून दे " १० केशी ह्मणतो:— हे इंद्रा, माझें मन हिच्यावर गेलें
आहे. तेव्हां तूंच हिला सोड. हे पाकशासना, असें केलेंस तरच तूं जिवंत राहून
आपल्या नगराला परत जाशील ११. असें बोलून केशीनें इंद्राचा वध करण्याकरितां
त्याच्यावर गदा फेंकिली; परंतु, ती गदा येत असतानाच इंद्रानें तिचे वज्राच्या योगानें
मध्येंच तुकडे करून टाकिले १२ तेव्हां केशीनें क्रुद्ध होऊन इंद्रावर पर्वताचें शिखर
फेंकिलें; परंतु, तें पर्वतशिखर आपणाकडे येत आहे असें अवलोकन करितांक्षणीं
इंद्रानें १३, हे राजा, त्याचेही वज्राच्या योगानें तुकडे तुकडे केले आणि ते भूमीवर
पडले १४ इतकेंच नव्हे परंतु, भूमीवर पडता पडतां त्या शिखरानें केशीलाही ताडन
केलें; त्यामुळें अतिशयच चिरडून गेलेला तो केशी ती महाभाग्यवती कन्या
सोडून पळून गेला १५ व तो दैत्य पळून गेल्यानंतर " हे शुभानने, तूं कोण ?
कोणाची आणि येथें काय करीत आहेस " असें इंद्र तिला विचारूं लागला १६.

शुभानने १६[८७८१]इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यामारण्यके पर्वणि मार्कण्डेयसमास्यापर्वण्याङ्गिरसोपाख्याने स्कन्दोत्पत्तौ केशिपराभवे त्रयोविंशत्यधिकद्विशततमोऽध्यायः ॥ २२३ ॥

कन्योवाच ॥ अहं प्रजापतेः कन्या देवसेनेति विश्रुता । भगिनी मे दैत्यसेना सा पूर्वं केशिना हृता १ सदैवावां भगिन्यौ तु सखीभिः सह मानसम् । आगच्छावेह रत्यर्थमनुज्ञाप्य प्रजापतिम् २ नित्यं चावां प्रार्थयते हर्तुं केशी महासुरः । इच्छत्येनं दैत्यसेना न चाहं पाकशासन ३ सा हृतानेन भगवन्मुक्ताहं त्वद्बलेन तु । त्वया देवेन्द्र निर्दिष्टं पतिमिच्छामि दुर्जयम् ४ इन्द्र उवाच ॥ मम मातृष्वसेयी त्वं माता दाक्षायणी मम । आख्यातुं त्वहमिच्छामि स्वयमात्मबलं त्वया ५ कन्योवाच ॥ अबलाहं महाबाहो पतिस्तु बलवान्मम । वरदानात्पितुर्भावी सुरासुरनमस्कृतः ६ इन्द्र उवाच ॥ कीदृशं तु बलं देवि पत्युस्तव भविष्यति । एतदिच्छाम्यहं श्रोतुं तव वाक्यमनिन्दिते ७ कन्योवाच ॥ देवदानवयक्षाणां

ह्याप्रमाणें महामुनिव्यासप्रणीतलक्षग्रंथात्मकश्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील मार्कंडेयसमास्यापर्वांपैकीं स्कंदोत्पत्तिप्रकरणासंबंधीं केशी दानवाच्या पराभवाविषयीं दोनशें तेविसावा अध्याय समाप्त झाला ॥ २२३ ॥

कन्या ह्मणते:—देवसेना ह्मणून प्रख्यात असलेली मी दक्षप्रजापतीची कन्या आहें आणि दैत्यसेना ह्मणून माझी एक बहिण आहे. ती पूर्वी केशी दैत्यानें हरण करून नेली १. आह्मी दोघी बहिणी दक्षप्रजापतीची अनुज्ञा घेऊन नेहमीं सख्यांसहवर्तमान येथें मानसपर्वतावर खेळण्याकरितां येत असतों २ आणि महादैत्य केशी नेहमीं आह्मांला हरण करून नेण्याची इच्छा करीत असतो. हे इंद्रा, माझी भगिनी दैत्यसेना ह्याची इच्छा करीत आहे; परंतु, ह्याला वरण्याची मला इच्छा नाहीं ३. हे भगवन् , ती माझी बहीण ह्यानें हरण करून नेली आहे व तुझ्या सामर्थ्यामुळें ह्याच्या हातून माझी सुटका झाली आहे. तस्मात् , तू सांगशील तो अजिंक्य पति वरण्याची माझी इच्छा आहे ४. इंद्र ह्मणतो:—तूं माझी मावशी आहेस. कारण, माझी माता अदिति दक्षप्रजापतीची कन्या होय. ह्यास्तव, तुझें बल काय आहे तें तुझ्या स्वतःच्याच तोंडून ऐकण्याची माझी इच्छा आहे ५. कन्या ह्मणते:—हे महापराक्रमी इंद्रा, मी अबला आहें; परंतु, मला भर्ता देवदैत्यांना पूज्य व बलाढ्य मिळेल असा माझ्या पित्याचा मला वर आहे ६. इंद्र प्रश्न करितो:— हे निर्दोष देवि, तुझ्या पतीचें बल कसें असावें हें तुझ्या तोंडून श्रवण करण्याची माझी इच्छा

किंनरोरगरक्षसाम् । जेता यो दुष्टदैत्यानां महावीर्यो महाबलः ८ यस्तु सर्वाणि भूतानि त्वया सह विजेष्यति । स हि मे भविता भर्ता ब्रह्मण्यः कीर्तिवर्धनः ९ मार्कण्डेय उवाच ॥ इन्द्रस्तस्या वचः श्रुत्वा दुःखितोऽचिन्तयद्भृशम् । अस्या देव्याः पतिर्नास्ति यादृशं संप्रभाषते १० अथापश्यत्स उदये भास्करं भास्करद्युतिः । सोमं चैव महाभागं विशमानं दिवाकरम् ११ अमावास्यां प्रवृत्तायां मुहूर्ते रौद्र एव तु । देवासुरं च संग्रामं सोऽपश्यदुदये गिरौ १२ लोहितैश्च घनैर्युक्तां पूर्वां संध्यां शतक्रतुः। अपश्यल्लोहितोदं च भगवान्वरुणालयम् १३ भृगुभिश्चाङ्गिरोभिश्च हुतं मन्त्रैः पृथग्विधैः । हव्यं गृहीत्वा वह्निं च प्रविशन्तं दिवाकरम् १४ पर्व चैव चतुर्विंशं तदा सूर्यमुपस्थितम् । तथा धर्मगतं रौद्रं सोमं सूर्यगतं च तम् १५ समालोक्यैकतामेव शशिनो भास्करस्य च । समवायं तु तं रौद्रं दृष्ट्वा शक्रोऽन्वचिन्तयत् १६ सूर्याचन्द्रमसोर्घोरं दृश्यते परिवेषणम् । एतस्मिन्नेव रात्र्यन्ते महायुद्धं तु शंसति १७ सरित्सिन्धुरपीयं तु प्रत्यसृ-

---

आहे ७. कन्या ह्मणतः—देव, दानव, यक्ष, किन्नर, उरग, राक्षस आणि दुष्ट दैत्य ह्यांना जो जिंकील इतकेंच नव्हे, परंतु, तुझ्यासहवर्तमान सर्व भूतांचा जो पराजय करील तो महावीर्यवान्, महाबलाढ्य, ब्राह्मणभक्त व कीर्ति वृद्धिंगत करणारा माझा भर्ता होईल ८, ९. मार्कंडेय सांगतातः—तिचें भाषण श्रवण करून इंद्र दुःखित झाला आणि " जशा प्रकारचा पति ही सांगत आहे तशा प्रकारचा पति नाहीं " ह्मणून अतिशय काळजी करूं लागला १०. इतक्यांत त्या सूर्यसमान तेजस्वी इंद्रानें उदयकालीं सूर्य आणि सूर्यामध्यें प्रविष्ट होणारा महाभाग्यवान् सोम हे अवलोकन केले ११. त्याचप्रमाणें अमावास्या लागल्यावर रौद्रमुहूर्तावरच देवदैत्यांचा संग्राम उदयाचलावर चाललेला त्यानें अवलोकन केला १२. आरक्तवर्ण मेघांनीं पूर्व संध्यायुक्त झाली आहे असें त्यानें पाहिलें आणि सागरही आरक्तवर्ण उदकानें युक्त झाल्याचें त्या भगवान् इंद्रानें अवलोकन केलें १३. त्याचप्रमाणें वेगळ्या वेगळ्या मंत्रांनीं भृगु व अंगिरा ह्यांनीं हवन केलेलें हव्य घेऊन सूर्यामध्यें प्रविष्ट होणारा अग्नि त्यानें अवलोकन केला १४. चोविसाव्या पर्वाला ह्मणजे शेवटल्या अमावास्येला सूर्य असून तो पापस्वरूपानें युक्त आहे आणि चंद्रही क्रूर असून तो सूर्याशीं मिसळून गेलेला आहे असें इंद्रानें अवलोकन केलें १५. ह्याप्रमाणें चंद्रसूर्यांचें ऐक्य अवलोकन करून आणि दुसऱ्या ग्रहांचेंही भयंकर समेलन अवलोकन करून इंद्र आपल्याशीं ह्मणाला १६ " सूर्य व चंद्र ह्यांचे भोंवतीं भयंकर मंडल

ग्वाहिनी मृशम् । शृगालिन्यग्निवक्त्रा च प्रत्यादित्यं विराविणी १८ एष रौद्रश्च संघातो महान्युक्तश्च तेजसा । सोमस्य वह्निसूर्याभ्यामद्भुतोयं समागमः १९ जनयेद्यं सुतं सोमः सोऽस्या देव्याः पतिर्भवेत् । अग्निश्चैतैर्गुणैर्युक्तः सर्वैरग्निश्च देवता २० एष चेज्जनयेद्गर्भं सोऽस्या देव्याः पतिर्भवेत् । एवं संचिंत्य भगवान्ब्रह्मलोकं तदा गतः २१ गृहीत्वा देवसेनां तामवदत्स पितामहम् । उवाच चास्या देव्यास्त्वं साधु शूरं पतिं दिश २२ ब्रह्मोवाच ॥ मयैतच्चिन्तितं कार्यं त्वया दानवसूदन । तथा स भविता गर्भो बलवानुरुविक्रमः २३ स भविष्यति सेनानीस्त्वया सह शतक्रतो । अस्या देव्याः पतिश्चैव स भविष्यति वीर्यवान् २४ एतच्छ्रुत्वा नमस्तस्मै कृत्वासौ सह कन्यया । तत्राभ्यगच्छद्देवेन्द्रो यत्र देवर्षयोऽभवन् २५ वसिष्ठप्रमुखा मुख्या विप्रेन्द्राः सुमहाबलाः । भागार्थं तपसोपात्तं तेषां सोमं तथाध्वरे २६ पिपासवो ययुर्देवाः शतक्रतुपुरोगमाः । इष्टिं कृत्वा यथान्यायं सुसमिद्धे हुताशने २७ जुहुवुस्ते महात्मानो हव्यं सर्वदिवौ-

---

पडलेले दिसत आहे, ह्यावरून उद्यां पहाटेसच देवदैत्यांचें मोठें युद्ध होईल असें दिसतें १७. ह्या वेळीं ही सिंधुनदीही विपरीत झाली असून एकसारिखी रक्तवाह लागली आहे आणि मुखांतून अग्नीच्या ज्वाला निघत असलेली कोल्ही सूर्याकडे तोंड करून ओरडत आहे १८. हें सर्व कांहीं संमेलन मोठें भयंकर झालेलें आहे आणि चंद्राचा सूर्याशीं व अग्नीशीं झालेला हा समागम मोठा तेजस्वी असून अद्भुत आहे १९. सोम जो पुत्र उत्पन्न करील तो ह्या देवीला योग्य पति होईल. अथवा अग्निही ह्या सर्व गुणांनी युक्त आहे. तस्मात् , ही अग्निदेवता जो गर्भ धारण करील तोही ह्या देवीला पति होईल. ह्याप्रमाणें विचार करून भगवान् इंद्र ब्रह्मलोकीं गेला २०, २१ आणि त्या देवसेनेला घेऊन ब्रह्मलोकीं गेल्यानंतर " ह्या देवीला तूं चांगला शूर पति दे " ह्मणून तो इंद्र ब्रह्मदेवांना ह्मणाला २२. ब्रह्मदेव ह्मणाले " हे दैत्यनाशका, मीं ह्या कार्याचा विचार केलेला आहे. तस्मात् , तुझ्या इच्छेप्रमाणें तो गर्भ बलाढ्य व महापराक्रमी होईल २३; तुझ्यासहवर्तमान तो सेनापति होईल आणि ह्या देवीचाही तो वीर्यवान् पति होईल " २४. हें श्रवण करून इंद्रानें त्या कन्येसहवर्तमान त्यांना नमस्कार केला आणि वसिष्ठप्रभृति विप्रश्रेष्ठ व महाबलाढ्य मुख्य देवर्षि जिकडे होते तिकडे यज्ञांतील त्या ऋषींनीं अग्नीमध्यें अर्पण केलेल्या सोमाचें पान करण्याकरितां तो निघून गेला २५, २६. सारांश, इंद्रप्रभृति देव सोमपान करण्याच्या इच्छेनें त्या यज्ञामध्यें गेले. यथाविधि इष्टि करून अग्नि चांगला प्रज्वलित झाल्यावर २७ त्या महात्म्यां

कमाम् । समाहूतो हुतवहः सोऽद्भुतः सूर्यमण्डलात् २८ विनिःसृत्य ययौ वह्निर्वाग्यतो विधिवत्प्रभुः । आगम्याहवनीयं वै तैर्द्विजैर्मन्त्रतो हुतम् २९ स तत्र विविधं हव्यं प्रतिगृह्य हुताशनः । ऋषिभ्यो भरतश्रेष्ठ प्रायच्छत दिवौकसाम् ३० निष्कामंश्चाप्यपश्यत्स पत्नीस्तेषां महात्मनाम् । स्वेष्वासनेषूपविष्टाः स्वपन्तीश्च यथासुखम् ३१ रुक्मवेदिनिभास्तास्तु चन्द्रलेखा इवामलाः । हुताशनार्चिप्रतिमाः सर्वास्तारा इवाद्भुताः ३२ स तत्र तेन मनसा बभूव क्षुभितेन्द्रियः । पत्नीर्दृष्ट्वा द्विजेन्द्राणां वह्निः कामवशं ययौ ३३ भूयः संचिन्तयामास न न्याय्यं क्षुभितो ह्यहम् । साध्व्यः पत्न्यो द्विजेन्द्राणामकामाः कामयाम्यहम् ३४ नैताः शक्या मया द्रष्टुं स्प्रष्टुं वाप्यनिमित्ततः । गार्हपत्यं समाविश्य तस्मात्पश्याम्यभीक्ष्णशः ३५ मार्कण्डेय उवाच ॥ संस्पृशन्निव सर्वास्ताः शिखाभिः काञ्चनप्रभाः । पश्यमानश्च मुमुदे गार्हपत्यं समाश्रितः ३६ निरुष्य तत्र सुचिरमेवं वह्नि-

---

ऋषींनीं सर्व देवांना उद्देशून अग्नीमध्यें हवि अर्पण केलें आणि अग्नीला आह्वान केलें. तेव्हां तो यथाविधि निमंत्रित झालेला प्रभु अद्भुत अग्नि वाक्संयमन करून सूर्यमंडलापासून निघाला आणि तेथें आला. अग्नि आहवनीयामध्यें आल्यानंतर त्या द्विजांनीं समंत्रक अर्पण केलेलें नानाप्रकारचें हव्य त्यानें घेतलें आणि, हे भरतवंशजश्रेष्ठा युधिष्ठिरा, ऋषींना व देवतांना तें त्यानें दिलें २८, २९, ३०. तदनंतर आपआपल्या आसनांवर बसून खुशाल झोंप घेत असलेल्या त्या महात्म्या ऋषींच्या भार्या जात असतांना त्या अग्नीनें पाहिल्या ३१. सुवर्णवेदीप्रमाणें त्यांची प्रभा असून चंद्रकलेप्रमाणें त्या निर्मल होत्या आणि अग्नीच्या ज्वालेप्रमाणें त्या उज्ज्वल असून सर्वही अद्भुत ताऱ्याप्रमाणें चमकत होत्या ३२. ऋषिश्रेष्ठाच्या पत्न्या अवलोकन केल्यावर अग्नीचें मन क्षुब्ध झालें आणि तो अगदीं कामाधीन होऊन गेला ३३. तथापि, पुनरपि तो आपल्या मनाशी ह्मणाला " द्विजश्रेष्ठांच्या पत्न्या पतिव्रता असून मी क्षुब्ध झालों आहे आणि त्या निरिच्छ असूनही मी त्यांची इच्छा करीत आहें हें योग्य नाहीं ३४. कारणाशिवाय ह्या ऋषिपत्न्यांना स्पर्श करणें अथवा ह्यांच्याकडे पाहणेंही मला शक्य नाहीं. तस्मात्, गार्हपत्यामध्यें प्रवेश करून मी ह्यांना एकसारिखा पहात बसतों " ३५. मार्कंडेय सांगतात:—ह्याप्रमाणें गार्हपत्याचें अवलंबन केलेला तो अग्नि त्या सुवर्णासारिख्या उज्ज्वल ऋषिपत्न्यांना पाहूं लागला आणि आपल्या ज्वालांनीं त्या सर्वांना स्पर्श करीत असतांना आनंदित होऊं लागला ३६. ह्याप्रमाणें श्रेष्ठ स्त्रियांची इच्छा करणाऱ्या त्या अग्नीचें मन त्या ऋषि-

र्वशं गतः । मनस्तासु विनिक्षिप्य कामयानो वराङ्गनाः ३७ कामसंतप्त-
हृदयो देहत्यागविनिश्चितः । अलाभे ब्राह्मणस्त्रीणामग्निर्वनमुपागमत् ३८
स्वाहा तं दक्षदुहिता प्रथमं कामयत्तदा । सा तस्य च्छिद्रमन्वैच्छच्चिरात्प्र-
भृति भाविनी ३९ अप्रमत्तस्य देवस्य न च पश्यत्यनिन्दिता । सा तं ज्ञात्वा
यथावत्तु वह्निं वनमुपागतम् ४० तत्त्वतः कामसंतप्तं चिन्तयामास भाविनी।
अहं सप्तर्षिपत्नीनां कृत्वा रूपाणि पावकम् ४१ कामयिष्यामि कामार्तां
तासां रूपेण मोहितम् । एवं कृते प्रीतिरस्य कामावाप्तिश्च मे भवेत् ४२
[८८२३] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यामार-
ण्यके पर्वणि मार्कंडेयसमास्यापर्वण्याङ्गिरसे स्कन्दोत्पत्तौ चतुर्विंशत्यधि-
कद्विशततमोऽध्यायः ॥ २२४ ॥

मार्कण्डेय उवाच ॥ शिवा भार्या त्वङ्गिरसः शीलरूपगुणान्विता ।
तस्याः सा प्रथमं रूपं कृत्वा देवी जनाधिप १ जगाम पावकाभ्याशं तं
चोवाच वराङ्गना । मामग्ने कामसंतप्तां त्वं कामयितुमर्हसि २ करिष्यसि

पत्न्यांवर गेलें असल्यामुळें तो अगदीं कामाधीन होऊन पुष्कळ वेळपर्यंत गार्हपत्या-
मध्यें राहिला ३७ आणि मदनानें त्याचें अंतःकरण अगदीं संतप्त झालें अस-
ल्यामुळें ब्राह्मणस्त्रिया प्राप्त होईनात म्हणून देहत्यागाचा निश्चय करून तो अग्नि वना-
मध्यें निघूनही गेला ३८. दक्षप्रजापतीची कन्या जी स्वाहा तिचें मन प्रथमतः अग्नी-
वर गेलें असल्यामुळें ती सुंदरी पुष्कळ दिवसपर्यंत त्याला भेटण्याची संधी पहात
होती ३९. परंतु, तो देव स्वकार्याविषयीं तत्पर असल्यामुळें त्या निर्दोष दक्षकन्येला
तशी संधी सापडेना. तेव्हां तो अग्नि खरा खरा मदनानें संतप्त झाला असून वना-
मध्यें निघून गेला आहे असें समजून आल्यावर त्या सुंदरीनें मनामध्यें आणिलें कीं
" त्या सप्तर्षिपत्न्यांच्या रूपानें अग्नि मोहित झाला आहे व मलाही कामवासनेमुळें
अगदीं कांहीं सुचेनासें झालें आहे. तस्मात्, मी त्याचीं रूपें धारण करून त्याचा
समागम करीन आणि असें झालें असतां त्यालाही आनंद होऊन माझाही मनोरथ
परिपूर्ण होईल ४०,४१,४२. ह्याप्रमाणें महामुनि व्यासप्रणीतलक्षग्रंथात्मकश्रीमहा-
भारतांतर्गत वनपर्वांतील मार्कंडेयसमास्यापर्वांपैकीं आंगिरसोपाख्यानसंबंधीं स्कंदाच्या
उत्पत्तीविषयीं दोनशेंचोविसावा अध्याय समाप्त झाला ॥ २२४ ॥

मार्कंडेय सांगतातः—अंगिरामुनींची शिवानामक भार्या सुशील, रूपवती व गुण-
संपन्न होती. तिचें रूप प्रथम धारण करून, हे प्रजाधिपते युधिष्ठिरा, ती स्वाहा देवी १
अग्नीसमीप गेली आणि ती सुंदरी त्याला म्हणाली " हे अग्ने, मदनानें संतप्त झालेल्या
माझ्याशीं तूं समागम कर २. ह्याप्रमाणें तूं जर न करशील तर मी मेलें हें पक्कें

न चेदेवं मृतां मामुपधारय । अहमङ्गिरसो भार्या शिवा नाम हुताशन ३ शिष्टाभिः प्रहिता प्राप्ता मन्त्रयित्वा विनिश्चयम् ४ अग्निरुवाच ॥ कथं मां त्वं विजानीषे कामार्तमितराः कथम् । यास्त्वया कीर्तिताः सर्वाः सप्तर्षीणां प्रियाः स्त्रियः ५ शिवोवाच ॥ अस्माकं त्वं प्रियो नित्यं बिभीमस्तु वयं तव । त्वच्चित्तमिङ्गितैर्ज्ञात्वा प्रेषितास्मि तवान्तिकम् ६ मैथुनायेह संप्राप्ता कामं प्राप्तं द्रुतं चर । जामयो मां प्रतीक्षन्ते गमिष्यामि हुताशन ७ मार्कण्डेय उवाच ॥ ततोऽग्निरुपयेमे तां शिवां प्रीतिमुदा युतः । प्रीत्या देवी समायुक्ता शुक्रं जग्राह पाणिना ८ अचिन्तयन्ममेदं ये रूपं द्रक्ष्यन्ति कानने । ते ब्राह्मणीनामनृतं दोषं वक्ष्यन्ति पावके ९ तस्मादेतद्रक्ष्यमाणा गरुडी संभवाम्यहम् । वनान्निर्गमनं चैव सुखं मम भविष्यति १० मार्कण्डेय उवाच ॥ सुपर्णी सा तदा भूत्वा निर्जगाम महावनात् । अपश्यत्पर्वतं श्वेतं शरस्तम्बैः सुसंवृतम् ११ दृष्टीविषैः

समजून ठेव. हे अग्ने, मी अंगिरसमुनींची भार्या शिवा आहे आणि मला इतर ऋषिपत्न्यांनीं निश्चय करून पाठविलें असल्यामुळें मी येथें आलें आहें ३, ४. अग्नि ह्मणतो:—मी मदनानें व्याकुल झालों आहें हें तुला कसें समजलें आणि त्याचप्रमाणें तूं ज्या सप्तर्षींना प्रिय असलेल्या स्त्रिया कथन केल्यास त्या सर्वांना तरी हें कसें कळून आलें ? ५. शिवा ह्मणते:—तूं आह्मांला कित्येक दिवस प्रिय आहेस; परंतु, आह्मी तुला भीत आहोंत. तुझ्या हालचालीवरून तुझा मनोदय काय आहे हें समजल्यानंतर ऋषिपत्न्यांनीं मला तुजकडे पाठविलें आहे ६. हे अग्ने, मी समागमाकरितां येथें प्राप्त झालें आहें. ह्यास्तव, माझे ठिकाणीं उत्पन्न झालेली विषयवासना तूं सत्वर परिपूर्ण कर. कुलस्त्रिया ऋषिपत्न्या माझी वाट पहात आहेत; तेव्हां तिकडे मला लवकरच गेलें पाहिजे ७. मार्कंडेय सांगतात:—तदनंतर प्रेमानें व आनंदानें युक्त झालेल्या अग्नीनें त्या शिवेचा स्वीकार केला आणि ह्याप्रमाणें प्रीतीनें त्याचा समागम झाल्यावर त्या शिवेचें रूप धारण करणाऱ्या स्वाहेनें अग्नीचें वीर्य हातामध्यें घेतलें ८ आणि ती मनामध्यें ह्मणाली " अरण्यामध्यें माझें हें रूप जें अवलोकन करतील ते ब्राह्मणस्त्रिया अग्नीशीं व्यभिचार करीत असतात असा दोष देऊं लागतील ९. तस्मात्, ह्या वीर्याचें रक्षण करण्याकरितां मी गरुडी होतें; ह्मणजे मला ह्या वनांतून सुखानें बाहेर जातां येईल " १०. मार्कंडेय सांगतात:—तदनंतर गरुडपक्षिणीचें रूप धारण केल्यावर ती स्वाहा त्या महावनांतून निघून गेली असतां शरस्तंबांनीं अगदीं आच्छादित झालेला श्वेतपर्वत तिच्या दृष्टीं पडला ११. दृष्टीमध्येंही विष

सप्तशीर्षैर्गुप्तं भोगिभिरद्भुतैः । रक्षोभिश्च पिशाचैश्च रौद्रैर्भूतगणै-
स्तथा १२ राक्षसीभिश्च संपूर्णमनेकैश्च मृगद्विजैः । सा तत्र सहसा
गत्वा शैलपृष्ठं सुदुर्गमम् १३ प्राक्षिपत्काञ्चने कुण्डे शुक्रं सा त्वरिता
शुभा । सप्तानामपि सा देवी सप्तर्षीणां महात्मनाम् १४ पत्नीसरूपतां
कृत्वा कामयामास पावकम् । दिव्यरूपमरुन्धत्या कर्तुं न शकितं तया १५
तस्यास्तपःप्रभावेण भर्तृशुश्रूषणेन च । षट्कृत्वस्तत्तु निक्षिप्तमग्ने रेतः कुरू-
त्तम १६ तस्मिन्कुण्डे प्रतिपदि कामिन्या स्वाहया तदा । तत्स्कन्नं तेजसा तत्र
संवृतं जनयत्सुतम् १७ ऋषिभिः पूजितं स्कन्नमनयत्स्कन्दतां ततः । षट्-
शिरा द्विगुणश्रोत्रो द्वादशाक्षिभुजक्रमः १८ एकग्रीवैकजठरः कुमारः
समपद्यत । द्वितीयायामभिव्यक्तस्तृतीयायां शिशुर्बभौ १९ अङ्गप्रत्यङ्गसं-
भूतश्चतुर्थ्यामभवद्गुहः । लोहिताभ्रेण महता संवृतः सह विद्युता २०
लोहिताभ्रे सुमहति भाति सूर्य इवोदितः । गृहीतं तु धनुस्तेन विपुलं लोम-

---

असलेल्या सात फडच्यांच्या अद्भुत नागांनीं त्याचें रक्षण केलें असून राक्षस, पिशाच,
रुद्रानुचर भूतगण १२, राक्षसी आणि नानाप्रकारचे पशुपक्षी ह्यांनीं तो व्याप्त झालेला
होता. त्या अत्यंत दुर्गम असलेल्या पर्वताच्या पृष्ठभागावर एकाएकीं गेल्यानंतर १३
त्या शुभ स्वाहेनें सत्वर तें वीर्य तेथील एका सुवर्णकुंडामध्यें टाकिलें. महात्म्या
सप्तर्षींच्या सातही १४ पत्न्यांचें रूप धारण करून अग्नीचा समागम करावा अशी
त्या स्वाहेची इच्छा होती; परंतु, अरुंधतीच्या तपःसामर्थ्यामुळें आणि तिच्या हातून
घडत असलेल्या पतिशुश्रूषेमुळें तिचें रूप धारण करण्यास ती समर्थ झाली नाहीं.
तस्मात्, हे कुरुवंशजश्रेष्ठा युधिष्ठिरा, सहा वेळ पतन पावलेलें तें अग्नीचें वीर्य १५, १६
त्या कामुक स्वाहेनें एकदम त्या कुंडामध्यें टाकिलें असतां कुंडांत पडलेल्या आणि
तेजानें युक्त असलेल्या त्या रेतामुळें तेथें एक पुत्र उत्पन्न झाला १७. कुंडामध्यें
गळालेल्या त्या वीर्याला ऋषींनीं बहुमान दिल्यामुळें त्यानें स्वतःला स्कंदत्व प्राप्त
करून घेतलें (ह्मणजे तें वीर्य स्कंदसंज्ञक देवसेनापति बनलें). सारांश, सहा मस्तकें,
बारा कान, बारा नेत्र, बारा हात १८, एक कंठ आणि एक उदर इतक्यांनीं युक्त
असा कुमार त्या वीर्याचा झाला. द्वितीयेचे दिवशीं तो दृश्योत्पत्तीस येऊं लागला;
तृतीयेचे दिवशीं तो शिशु झाला १९ आणि चतुर्थीचे दिवशीं सर्व मुख्य व गौण
अवयवांनीं तो युक्त झाला असतां आरक्तवर्ण प्रचंड अभ्र व विद्युल्लता ह्यांनीं तो
आच्छादून गेला २०. अतिप्रचंड आरक्तवर्ण अभ्रामध्यें असलेला तो कुमार उदय पाव-
लेल्या सूर्याप्रमाणें दिसूं लागला आणि त्रिपुरनाशक शंकरानें ठेविलेलें जें देवशत्रुनाशक

दुर्धर्षणम् २१ न्यस्तं यत्त्रिपुरघ्नेन सुरारिविनिकृन्तनम् । तद्गृहीत्वा धनुःश्रेष्ठं
ननाद बलवांस्तदा २२ संमोहयन्निवेमान्स त्रीँल्लोकान्सचराचरान् । तस्य
तं निनदं श्रुत्वा महामेघौघनिःस्वनम् २३ उत्पेततुर्महानागौ चित्रश्चैरा-
वतश्च ह । तावापतन्तौ संप्रेक्ष्य स बालोर्कसमद्युतिः २४ द्वाभ्यां गृहीत्वा
पाणिभ्यां शक्तिं चान्येन पाणिना । अपरेणाग्निदायादस्ताम्रचूडं भुजेन
सः २५ महाकायमुपश्लिष्टं कुक्कुटं बलिनां वरम् । गृहीत्वा व्यनदद्-
भीमं चिक्रीड च महाभुजः २६ द्वाभ्यां भुजाभ्यां बलवान्गृहीत्वा शङ्खमु-
त्तमं । प्राध्मापयत भूतानां त्रासनं बलिनामपि २७ द्वाभ्यां भुजाभ्यामा-
काशं बहुशो निजघान ह । क्रीडन्भाति महासेनस्त्रीँल्लोकान्वदनैः पिबन् २८
पर्वताग्रेऽप्रमेयात्मा रश्मिमानुदये यथा । स तस्य पर्वतस्याग्रे निषण्णोऽद्भु-
तविक्रमः २९ व्यलोकयदमेयात्मा मुखैर्नानाविधैर्दिशः । स पश्यन्विविधा-
न्भावांश्चकार निनदं पुनः ३० तस्य तं निनदं श्रुत्वा न्यपतन्बहुधा जनाः ।

प्रचंड व अंगावर कांटा आणणारें धनुष्य तेंही त्यानें घेतलें. तें श्रेष्ठ धनुष्य घतल्या-नंतर स्थावरजंगमात्मक प्राण्यांनीं भरलेल्या त्रैलोक्याला मूर्च्छित करीतच कीं काय त्या महाबलाढ्य कुमारानें गर्जनाही केली. तेव्हां प्रचड मेघसमुदायांच्या गर्जनेप्रमाणें त्याची ती गर्जना श्रवण करून २१, २२, २३ चित्र आणि ऐरावत ह्या मोठ्या मोठ्या गजांनी त्याच्यावर उडी घातली; परंतु, त्या सूर्य-तुल्य तेजस्वी बालकानें ते आपल्या अंगावर चालून येत आहेत असें अवलोकन करि-तांक्षणी २४ दोन हातात ते दोघे, एका हातांत शक्ति, एका हातांत मयूर आणि एका हातात बलवानांमध्यें श्रेष्ठ व फारच धिप्पाड असा समीपच असलेला कुक्कुट-पक्षी घेऊन त्या महापराक्रमी अग्निकुमारानें भयकर गर्जना केली आणि क्रीडा कर-ण्यास सुरुवात केली २५, २६. तदनंतर त्या बलाढ्य कुमारानें आपल्या दोन हातां-मध्यें बलाढ्य प्राण्यांनाही भयकर असा एक उत्कृष्ट शंख घेऊन वाजविला २७ आणि दोन हातांनीं तो एकसारिखा आकाशाला ताडण करूं लागला. अतर्क्यरूपानें युक्त असलेल्या उदयकालच्या सूर्याप्रमाणें तो महासेन पर्वताच्या माथ्यावर क्रीडा करीत असतांना भासूं लागला आणि आपल्या मुखांच्या योगानें त्रैलोक्य गिळू-नच टाकीत आहे कीं काय असा दिसू लागला. असो. त्या श्वेतपर्वताच्या शिखरावर बसलेला तो अद्भुतपराक्रमी २८, २९ आणि नानाप्रकारच्या मुखांनीं युक्त अस-ल्यामुळें अचिंत्यस्वरूप षडानन दिशा व नानाप्रकारचे चमत्कार पहातां पहातां पुन-रपि गर्जना करूं लागला ३०. ती गर्जना ऐकतांक्षणीं लोक मनामध्यें उद्विग्न होऊन

भीताश्चोद्विग्नमनसस्तमेव शरणं ययुः ३१ ये तु तं संश्रिता देवं नानाव-
र्णास्तदा जनाः । तानप्याहुः पारिषदान्ब्राह्मणाः सुमहाबलान् ३२ स
तूत्थाय महाबाहुरुपसान्त्व्य च ताञ्जनान् । धनुर्विकृष्य व्यसृजद्बाणाञ्श्वेते
महागिरौ ३३ बिभेद स शरैः शैलं क्रौञ्चं हिमवतः सुतम् । तेन हंसाश्च
गृध्राश्च मेरुं गच्छन्ति पर्वतम् ३४ स विशीर्णोऽपतच्छैलो भृशमार्तस्वरा-
न्रुवन् । तस्मिन्निपतिते त्वन्ये नेदुः शैला भृशं तदा ३५ स तं नादं भृशा-
र्तानां श्रुत्वापि बलिनां वरः । न प्राव्यथदमेयात्मा शक्तिमुद्यम्य चान-
दत् ३६ सा तदा विमला शक्तिः क्षिप्ता तेन महात्मना । बिभेद शिखरं
घोरं श्वेतस्य तरसा गिरेः ३७ स तेनाभिहतो दीर्णो गिरिः श्वेतोऽचलैः
सह । उत्पपात महीं त्यक्त्वा भीतः स सुमहात्मनः ३८ ततः प्रव्यथिता
भूमिर्व्यशीर्यत समन्ततः । आर्ता स्कन्दं समासाद्य पुनर्बलवती बभौ ३९
पर्वताश्च नमस्कृत्य तमेव पृथिवीं गताः । अथैनमभजल्लोकः स्कन्दं

भयभीत झाले; अनेक प्रकारांनीं त्यांचा निःपात होऊं लागला आणि शेवटीं ते त्यालाच शरण जाऊं लागले ३१. ज्यां नानाप्रकारच्या लोकांनीं त्या देवाचा आश्रय केला होता त्यांनाही ब्राह्मणांनीं त्याचे अतिबलाढ्य पार्षद्‌गण असें ह्मटलें ३२. तदनंतर तो महापराक्रमी कुमार आसनावरून उठला आणि आपल्या आश्रयाला आलेल्या लोकांचें सांत्वन केल्यावर धनुष्य आकर्षण करून त्या श्वेतवर्णमहापर्वतावर बाण सोडण्यास त्यानें सुरवात केली ३३. हिमवानाचा पुत्र जो क्रौंच पर्वत तो त्यानें ह्याप्रमाणें बाणांनीं भेदून टाकिला असतां तेथील हंस व गृध्रपक्षी मेरुपर्वतावर निघून गेले ३४. दुःखानें एकसारिखा आक्रोश करीत करीत तो विदीर्ण झालेला पर्वत खालीं पडला व तो पडतांक्षणीं इतरही पर्वत एकसारिखा आक्रोश करूं लागले ३५; परंतु, बलवानांमध्यें श्रेष्ठ आणि अतुलस्वरूपानें युक्त असा तो कुमार अत्यंत दुःखित झालेल्या पर्वतांची ती गर्जना श्रवण करून सुद्धां यत्किंचित्‌ही न डगमगतां शक्ति उगारून गर्जना करूं लागला ३६. तदनंतर त्या महात्म्यानें ती तेजस्वी शक्ति फेंकिली असतां तिनें वेगाच्या योगानें श्वेतपर्वताचें एक भयंकर शिखर विदीर्ण करून टाकिलें ३७. ह्याप्रमाणें त्या कुमाराचे तडाखे बसून तो क्रौंचपर्वत विदीर्ण झाला असतां त्या महात्म्या कुमाराविषयीं तो अतिशय भयभीत झाला आणि पृथ्वी सोडून देऊन इतर पर्वतांसहवर्तमान उडून गेला ३८. तेव्हां पीडित झालेली भूमि दुःखाकुल होऊन सर्व बाजूंनीं फाटून गेली; परंतु, स्कंदाचा आश्रय मिळाल्यामुळें ती पुनरपि प्रबल झाली ३९. तदनंतर त्यालाच नमस्कार करून पुनरपि पर्वतही पृथ्वीवर आले आणि

शुक्लस्य पञ्चमीम् ४० [८८६३] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यामारण्यके पर्वणि मार्कण्डेयसमास्यापर्वण्याङ्गिरसे कुमारोत्पत्तौ पञ्चविंशत्यधिकद्विशततमोऽध्यायः ॥ २२५ ॥

मार्कण्डेय उवाच ॥ तस्मिञ्जाते महासत्त्वे महासेने महाबले। समुत्तस्थुर्महोत्पाता घोररूपाः पृथग्विधाः १ स्त्रीपुंसोर्विपरीतं च तथा द्वन्द्वानि यानि च। ग्रहा दीप्ता दिशः खं च रराम च मही भृशम् २ ऋषयश्च महाघोरान्दृष्ट्वोत्पातान्समन्ततः। अकुर्वञ्शान्तिमुद्विग्ना लोकानां लोकभावनाः ३ निवसन्ति वने ये तु तस्मिंश्चैत्ररथे जनाः। तेऽब्रुवन्नेष नोऽनर्थः पावकेनाहृतो महान् ४ संगम्य षड्भिः पत्नीभिः सप्तर्षीणामिति स्म ह। अपरे गरुडीमाहुस्त्वयानर्थोऽयमाहृतः ५ यैर्दृष्टा सा तदा देवी तस्या रूपेण गच्छती। न तु तत्स्वाहया कर्म कृतं जानाति वै जनः ६ सुपर्णी तु वचः श्रुत्वा ममायं तनयस्त्विति। उपगम्य शनैः स्कन्दमाहाहं जननी तव ७ अथ

तेव्हांपासून शुक्लपक्षांतील पंचमीचे दिवशीं लोक ह्या स्कंदाचें पूजन करूं लागले ४०. ह्याप्रमाणें महर्षिव्यासप्रणीतलक्षग्रंथात्मकश्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील मार्कंडेयसमास्यापर्वापैकीं आंगिरसोपाख्यानसंबंधीं कुमाराच्या उत्पत्तीविषयीं दोनशें पंचविसावा अध्याय समाप्त झाला ॥ २२५

मार्कंडेय सांगतातः—तो महाबलाढ्य व महावीर्यवान् महासेन उत्पन्न झाला असतां नानाप्रकारचे मोठेमोठे भयंकर उत्पात होऊं लागले १; स्त्रीपुरुषांमध्यें कलह होऊं लागले आणि शीतोष्णादि द्वंद्वेंही विपरीत होऊं लागलीं (ह्मणजे शीत वस्तु उष्ण होऊं लागल्या; उष्ण वस्तु शीत भासूं लागल्या; सौम्य वस्तु क्रूर भासूं लागल्या; क्रूर वस्तु शांत भासूं लागल्या वगैरे प्रकारानें सर्वच विपरीत होऊं लागलें). ग्रह, दिशा आणि आकाशही सर्व प्रज्वलित होऊन पृथ्वी अतिशय आक्रोश करूं लागली २; लोकरक्षक ऋषि चोहोंकडे महाभयंकर उत्पात अवलोकन केल्यावर भयभीत होऊन लोकांकरितां शांति करूं लागले ३; त्या चैत्ररथवनामध्यें जे लोक वास्तव्य करीत होते ते " अग्नीनें सप्तर्षींपैकीं सहाजणांच्या स्त्रियांशीं समागम करून आह्मावर हें मोठें संकट आणिलें " असें ह्मणूं लागले आणि ज्यांनीं स्वाहादेवी गरुडपक्षिणीच्या रूपानें जातांना अवलोकन केली होती ते " तूं हें संकट आणिलेंस " असें गरुडपक्षिणीला ह्मणूं लागले; परंतु, स्वाहेनें हें कर्म केलें आहे हें कोणाच्याच समजण्यांत आलें नाहीं ४,५,६. लोकांचें हें भाषण श्रवण केल्यावर " हा पुत्र माझा आहे " असें समजून ती गरुडपक्षीण हळू हळू स्कंदासमीप गेली आणि " मी तुझी माता " ह्मणून त्याला

सप्तर्षयः श्रुत्वा जातं पुत्रं महौजसम् । तत्यजुः षट् तदा पत्नीर्विना देवीमरुन्धतीम् ८ षड्भिरेव तदा जातमाहुस्तद्वनवासिनः । सप्तर्षीनाह च स्वाहा मम पुत्रोऽयमित्युत ९ अहं जाने नैतदेवमिति राजन्पुनः पुनः । विश्वामित्रस्तु कृत्वेष्टिं सप्तर्षीणां महामुनिः १० पावकं कामसंतप्तमदृष्टः पृष्ठतोऽन्वगात् । तत्तेन निखिलं सर्वमवबुद्धं यथातथम् ११ विश्वामित्रस्तु प्रथमं कुमारं शरणं गतः । स्तवं दिव्यं संप्रचक्रे महासेनस्य चापि सः १२ मङ्गलानि च सर्वाणि कौमाराणि त्रयोदश । जातकर्मादिकास्तस्य क्रियाश्चक्रे महामुनिः १३ षड्वक्त्रस्य तु माहात्म्यं कुक्कुटस्य तु साधनम् । शक्त्या देव्याः साधनं च तथा पारिषदामपि १४ विश्वामित्रश्चकारैतत्कर्म लोकहिताय वै । तस्मादृषिः कुमारस्य विश्वामित्रोऽभवत्प्रियः १५ अन्वजानाच्च स्वाहाया रूपान्यत्वं महामुनिः । अब्रवीच्च मुनीन्सर्वान्नापराध्यन्ति वै स्त्रियः १६ श्रुत्वा तु तत्त्वतस्तस्मात्ते पत्नीः सर्वतोऽत्यजन् । मार्कण्डेय उवाच ॥ स्कन्दं श्रुत्वा तदा देवा वासवं सहिता-

---

म्हणाली ७. तदनंतर महाबलाढ्य पुत्र झाल्याचें श्रवण करून सप्तर्षींपैकींही सहाजणांनीं सहा स्त्रियांचा त्याग केला; फक्त वसिष्ठांनीं मात्र अरुंधती देवीचा त्याग केला नाहीं ८. कारण, त्या वनामध्यें वास्तव्य करणारे लोक सहा ऋषिपत्न्यांपासूनच तो पुत्र उत्पन्न झाला असें म्हणत होते. तथापि, " हा पुत्र माझा आहे, तुमच्या म्हणण्याप्रमाणें गोष्ट घडलेली नाहीं हें मला पक्कें माहीत आहे" असें वारंवार, हे धर्मराजा, ती दक्षकन्या सप्तर्षींना सांगू लागली. तदनंतर सप्तर्षींपैकीं विश्वामित्र महामुनींनीं अग्नीला उद्देशून एक इष्टि केली ९,१० आणि कामानें संतप्त झालेल्या त्या अग्नीच्या मागोमाग त्याच्या दृष्टीं न पडतां जाऊन त्यांनीं तो सर्व इत्थंभूत प्रकार पूर्णपणें समजून घेतला ११. नंतर विश्वामित्रमुनि प्रथमः कुमाराला शरण आले आणि त्या महासेनाचें त्यांनीं दिव्य स्तवनही केलें १२. इतकच नव्हे परंतु, त्या कुमाराला मंगलावह होणारीं अशीं सर्व कांहीं कृत्यें करून त्या महामुनींनीं त्याचे जातकर्मादि तेरा संस्कारही केले १३. त्याचप्रमाणें षडाननाची प्रशंसा आणि कुक्कुट, शक्ति देवी व पार्षद्गण ह्यांची त्याला प्राप्ति करून देणें १४ हेंही कृत्य लोकहिताकरितां विश्वामित्र महर्षींनीं केलें आणि म्हणूनच विश्वामित्र ऋषि कुमाराला प्रिय झाले १५. स्वाहेनें रूपांतर केल्याचें महामुनि विश्वामित्रांना समजून आलें व "आपल्या स्त्रियांकडे कांहीं एक दोष नाहीं " असेंही त्यांनीं सर्व मुनींना सांगितलें १६. परंतु, त्या विश्वामित्र मुनींपासून खरी हकीकत समजल्यावरही (लोकापवादाकरितां) त्या

श्रुत्वा १७ अविषह्यबलं स्कन्दं जहि शक्राशु मा चिरम्। यदि वा न निहं-
स्येनं देवेन्द्रायं भविष्यति १८ त्रैलोक्यं संनिगृह्यास्मांस्त्वां च शक्र
महाबल। स तानुवाच व्यथितो बालोयं सुमहाबलः १९
स्रष्टारमपि लोकानां युधि विक्रम्य नाशयेत्। न बालमुत्सहे हन्तुमिति
शक्रः प्रभाषते २० तेब्रुवन्नास्ति ते वीर्यं यत एवं प्रभाषसे। सर्वास्त्वद्या-
भिगच्छन्तु स्कन्दं लोकस्य मातरः २१ कामवीर्या घ्नन्तु चैनं तथेत्युक्त्वा
च ता ययुः। तमप्रतिबलं दृष्ट्वा विषण्णवदनास्तु ताः २२ अशक्योयं
विचिन्त्यैवं तमेव शरणं ययुः। ऊचुश्चैनं त्वमस्माकं पुत्रो भव महा-
बल २३ अभिनन्दस्व नः सर्वाः प्रस्नुताः स्नेहविक्लवाः। तासां तद्वचनं
श्रुत्वा पातुकामः स्तनान्प्रभुः २४ ताः संपूज्य महासेनः कामांश्चासां
प्रदाय सः। अपश्यदग्निमायान्तं पितरं बलिनां बली २५ स तु संपूजित-

---

ऋषींनीं सर्वप्रकारें आपल्या पत्न्यांचा त्याग केला. मार्कंडेय सांगतात:—स्कंद उत्पन्न झाल्याचें श्रवण केल्यावर देव एकत्र जुळून इंद्राला ह्मणाले १७ " हे इंद्रा, ज्याचें सामर्थ्य कोणालाही सहन होणें शक्य नाहीं अशा ह्या स्कंदाचा तूं सत्वर वध कर; उशीर लावूं नकोस. कारण, तूं जर ह्याचा घात न करशील तर त्रैलोक्याचा, आमचा व तुझा पराजय करून, हे महाबलाढ्य इंद्रा, हाच देवराज होईल ". ह्यानंतर तो इंद्र मना-मध्यें दुःखित होऊन त्या देवांना ह्मणाला " हा बालक अतिशय बलाढ्य आहे १८, १९ युद्धामध्यें पराक्रम करून हा लोकांच्या उत्पादकाचाही नाश करील. तस्मात्, बालाचा वध करण्याची माझी इच्छा नाहीं ". ह्याप्रमाणें इंद्र बोलूं लागला असतां २० " ज्याअर्थी तुझे ठिकाणीं सामर्थ्य नाहीं त्याअर्थी तूं असें भाषण करीत आहेस. सांप्रत यथेष्ट सामर्थ्य धारण करणाऱ्या सर्व लोकमातांनीं जाऊन स्कंदाचा वध करावा " असें ते ह्मणाले. तेव्हां " ठीक आहे " असें ह्मणून त्या निघाल्या; परंतु, त्याचें सामर्थ्य अप्रतिहत आहे असें आढळून आल्यामुळें ह्याचा वध होणें अशक्य आहे असें त्या मनामध्यें समजल्या आणि शेंवटीं दीनवदन होऊन त्यालाच शरण गेल्या व ह्मणाल्या " हे महाबलाढ्य, तूं आमचा पुत्र हो २१, २२, २३ आणि प्रेमानें व्याकुल झाल्यामुळें स्तनांतून दुग्धस्राव होत असलेल्या आह्मा सर्वांना तूं आनंद दे ". हें त्यांचें भाषण श्रवण केल्यावर स्तनपान करण्याच्या इच्छेनें बहुमानपूर्वक प्रभु महासेनानें त्यांचे मनोरथ परिपूर्ण केले तों इतक्यांत बलवानांमध्येंही बलाढ्य असलेला आपला पिता अग्नि येत असतांना त्यानें पाहिला २४, २५. अग्नि आल्यानंतर त्या स्कंदानें त्याचा बहुमान केला आणि नंतर मातृगणासहवर्तमान

स्तेन सह मातृगणेन ह । परिवार्य महासेनं रक्षमाणः स्थितः शिवः २६ सर्वासां या तु मातॄणां नारी क्रोधसमुद्भवा । धात्री स्वपुत्रवत्स्कन्दं शूलहस्ताभ्यरक्षत २७ लोहितस्योदधेः कन्या क्रूरा लोहितभोजना । परिष्वज्य महासेनं पुत्रवत्पर्यरक्षत २८ अग्निर्भूत्वा नैगमेयश्छागवक्त्रो बहुप्रजः । रमयामास शैलस्थं बालं क्रीडनकैरिव २९ [८८९२] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यामारण्यके पर्वणि मार्कण्डेयसमास्यापर्वण्याङ्गिरसे स्कन्दोत्पत्तौ षड्विंशाधिकद्विशततमोऽध्यायः ॥ २२६ ॥

मार्कण्डेय उवाच ॥ ग्रहाः सोपग्रहाश्चैव ऋषयो मातरस्तथा । हुताशनमुखाश्चैव दृप्ताः पारिषदां गणाः १ एते चान्ये च बहवो घोरास्त्रिदिववासिनः । परिवार्य महासेनं स्थिता मातृगणैः सह २ संदिग्धं विजयं दृष्ट्वा विजयेप्सुः सुरेश्वरः । आरुह्यैरावतस्कन्धं प्रययौ दैवतैः सह ३ आदाय वज्रं बलवान्सर्वैर्देवगणैर्वृतः । विजिघांसुर्महासेनमिन्द्रस्तूर्णतरं ययौ ४ उग्रं तं च महानादं देवानीकं महाप्रभम् । विचित्रध्वजसन्नाहं

शिवही सभोंवतीं गराडा देऊन त्या महासेनाचें रक्षण करीत उभे राहिले २६. सर्व लोकमातांच्या क्रोधापासून जी स्त्री उत्पन्न झाली ती दायी बनली आणि हातामध्ये शूल घेऊन स्वतःच्या पुत्राप्रमाणें स्कंदाचें रक्षण करूं लागली २७. लोहितसमुद्राची रक्तावर उपजीविका करणारी जी क्रूर कन्या तीही महासेनाला आलिंगन देऊन पुत्राप्रमाणें त्याचें रक्षण करूं लागली २८. बोकडासारिखें मुख आणि विपुल प्रजा ह्यांनीं युक्त असलेला अग्निही लौकिकरूप धारण करून पर्वतावर असलेल्या त्या बालकाला क्रीडनवस्तूंच्या योगानें जसा कांहीं रमवूं लागला २९. ह्याप्रमाणें महर्षिव्यासप्रणीतलक्षग्रंथात्मकश्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील मार्कंडेयसमास्यापर्वापैकीं आंगिरसोपाख्यानसंबंधीं स्कंदाच्या उत्पत्तीविषयीं दोनशें सव्विसावा अध्याय समाप्त झाला ॥ २२६ ॥

मार्कंडेय सांगतातः—उपग्रहांसहवर्तमान ग्रह, ऋषि, देवमाता, स्वसामर्थ्याविषयीं अभिमान होऊन राहिलेले अग्निप्रभृति पार्षद्‌गण १ आणि इतरही स्वर्गनिवासी भयंकर प्राणी मातृगणासहवर्तमान स्कंदाभोंवतीं गराडा देऊन उभे राहिले २. तेव्हां जय येण्याचा संशय आहे असें अवलोकन करून विजयेच्छु देवराज इंद्र ऐरावताच्या स्कंधावर आरूढ होऊन देवतांसहवर्तमान निघाला ३ आणि सर्व देवगणांनीं परिवेष्टित झालेला तो बलाढ्य इंद्र महासेनाचा वध करण्याच्या इच्छेनें हातामध्यें वज्र घेऊन फारच त्वरेनें निघाला असतां ४ तो कुमारही उग्र रूप धारण करणाऱ्या

नानावाहनकार्मुकम् ५ प्रवराम्बरसंवीतं श्रिया जुष्टमलंकृतम् । विजि-
घांसुं तमायान्तं कुमारः शक्रमन्वयात् ६ विनदन्पार्थ देवेशो द्रुतं याति
महाबलः । संहर्षयन्देवसेनां जिघांसुः पावकात्मजम् ७ संपूज्यमानस्त्रि-
दशैस्तथैव परमर्षिभिः । समीपमथ संप्राप्तः कार्तिकेयस्य वासवः ८
सिंहनादं ततश्चक्रे देवेशः सहितैः सुरैः । गुहोपि शब्दं तं श्रुत्वा व्यनद-
त्सागरो यथा ९ तस्य शब्देन महता समुद्भूतोदधिप्रभम् । बभ्राम तत्र
तत्रैव देवसैन्यमचेतनम् १० जिघांसूनुपसंप्राप्तान्देवान्दृष्ट्वा स पावकिः ।
विससर्ज मुखात्क्रुद्धः प्रवृद्धाः पावकार्चिषः ११ अदहद्देवसैन्यानि वेप-
मानानि भूतले । ते प्रदीप्तशिरोदेहाः प्रदीप्तायुधवाहनाः १२ प्रच्युताः
सहसा भान्ति व्यस्तास्तारागणा इव । दह्यमानाः प्रपन्नास्ते शरणं पावका-
त्मजम् १३ देवा वज्रधरं त्यक्त्वा ततः शान्तिमुपागताः । त्यक्तो देवैस्ततः
स्कन्दे वज्रं शक्रोऽभ्यपातयत् १४ तद्विसृष्टं जघानाशु पार्श्वं स्कन्दस्य

इंद्राला अवलोकन करून लगेच समरांगणामध्यें निघाला. तो महातेजस्वी इंद्र मोठी गर्जना करीत असून देवसेना, चित्रविचित्र ध्वज, इतर युद्धसामुग्री आणि नानाप्रकारचीं वाहनें व धनुष्य ह्यांनीं युक्त होता व उत्कृष्ट वस्त्र त्यानें परिधान केलेलीं होतीं; स्वतः कांतीनें संपन्न असून त्यानें अलंकार धारण केलेले होते आणि कुमाराचा वध करण्याच्या इच्छेनें तो त्याच्याकडे येत होता ५,६. हे कुंतीपुत्रा युधिष्ठिरा, अग्निपुत्र स्कंदाच्या वधाची इच्छा करणारा तो महाबलाढ्य देवराज गर्जना करीत करीत आणि ह्मणूनच देवसेनेला आनंदित करीत करीत सत्वर चालला ७ आणि देव व महर्षि प्रशंसा करीत असतांना तो इंद्र कार्तिकेयाच्या सन्निध प्राप्त झाला ८. तदनंतर एकत्र जुळलेल्या देवांसहवर्तमान देवराज इंद्रानें सिंहनाद केला व तो शब्द श्रवण करून कार्तिकेयही सागराप्रमाणें गर्जना करूं लागला ९. तेव्हां त्याच्या त्या प्रचंड शब्दानें देवांचें सैन्य अगदीं गोंधळून गेलें आणि खवळलेल्या समुद्राप्रमाणें इकडे तिकडे भटकूं लागलें १०. देव आपला वध करण्याच्या इच्छेनें प्राप्त झाले आहेत असें अवलोकन करून क्रुद्ध झालेल्या अग्निपुत्र स्कंदानें आपल्या मुखापासून मोठ्या मोठ्या ज्वाला बाहेर सोडिल्या ११ आणि भूतलावर लटलट कांपत असलेल्या देवसेना त्यानें दग्ध करून टाकिल्या. केस, आयुधें व वाहनें प्रज्वलित होऊन एकाएकीं खालीं पडलेले ते देवसैनिक अस्ताव्यस्त होऊन खालीं पडलेल्या तारागणाप्रमाणें दिसूं लागले आणि एकसारिखें दग्ध होऊं लागल्यामुळें ते देव अग्निपुत्र स्कंदाला शरण गेले १२,१३. इंद्राला सोडून देव जेव्हां स्कंदाला शरण गेले तेव्हां त्यांना स्वस्थता प्राप्त झाली;

दक्षिणम् । बिभेद च महाराज पार्श्वं तस्य महात्मनः । वज्रप्रहारात्स्क-
न्दस्य संजातः पुरुषोपरः १५ युवा काञ्चनसन्नाहः शक्तिधृग्दिव्यकु-
ण्डलः । यद्वज्रविशनाज्जातो विशाखस्तेन सोभवत् १६ संजातमपरं दृष्ट्वा
कालानलसमद्युतिम् । भयादिन्द्रस्तु तं स्कन्दं प्राञ्जलिः शरणं गतः १७
तस्याभयं ददौ स्कन्दः सहसैन्यस्य सत्तमः । ततः प्रहृष्टास्त्रिदशा वादि-
त्राण्यभ्यवादयन् १८ [८९१०] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहि-
तायां वैयासिक्यां मारण्यके पर्वणि मार्कण्डेयसमास्यापर्वण्याङ्गिगिरसे
इन्द्रस्कन्दसमागमे सप्तविंशाधिकद्विशततमोऽध्यायः ॥ २२७ ॥

मार्कण्डेय उवाच ॥ स्कन्दपारिषदान्घोराञ्शृणुष्वाद्भुतदर्शनान् । वज्र-
प्रहारात्स्कन्दस्य जज्ञुस्तत्र कुमारकाः १ ये हरन्ति शिशूञ्जातान्गर्भस्थां-
श्चैव दारुणाः । वज्रप्रहारात्कन्याश्च जज्ञिरेस्य महाबलाः २ कुमारास्ते
विशाखं च पितृत्वे समकल्पयन् । स भूत्वा भगवान्संख्ये रक्षंश्छागमु-

---

परंतु, देवांनीं त्याग केला असतां इंद्रानें स्कंदावर वज्राचा प्रहार केला १४. हे महा-राजा युधिष्ठिरा, इंद्रानें सोडिलेल्या त्या वज्राचा प्रहार सत्वर स्कंदाच्या उजव्या बाजूवर झाला आणि त्या वज्रानें त्या महात्म्याची उजवी कूस फोडून टाकिली १५. परंतु, स्कंदाला जेथें वज्रप्रहार झाला होता तेथून त्याच्या शरीरापासून दुसरा एक सुवर्णाचेसमान, शक्ति आणि दिव्य कडलें ह्यांनी युक्त असलेला तरुण पुरुष उत्पन्न झाला आणि वज्रविनाशनापासून (ह्मणजे वज्राच्या खणण्यापासून) तो उत्पन्न झाला असल्यामुळें विशाख ह्या नावानें प्रसिद्ध झाला १६. ह्याप्रमाणें प्रलयकालच्या अग्नीसारिखा दुसरा एक तजस्वी पुरुष स्कंदापासून उत्पन्न झाल्याचें अवलोकन करिताक्षणीं इंद्रही भयामुळें हात जोडून त्या स्कंदाला शरण गेला १७ आणि सैन्यासहवर्तमान त्या इंद्रालाही सज्जनश्रेष्ठ स्कंदानें अभय दिल्यामुळें देवही आनंदित होऊन वाद्यें वाजवू लागले १८. ह्याप्रमाणें महर्षिव्यासप्रणीतलक्षग्रंथात्मकश्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील मार्कंडेयसमास्यापर्वापैकीं आंगिरसोपाख्यानसंबंधीं इंद्र व स्कंद ह्याच्या समागमाविषयीं दोनशें सत्ताविसाव्या अध्याय समाप्त झाला ॥ २२७ ॥

मार्कंडेय सांगतात:—(हे युधिष्ठिरा) आश्चर्यकारक मुद्रेनें युक्त आणि भयंकर असे स्कंदाचे पार्षद्गण तू आता श्रवण कर. स्कंदाला वज्राचा प्रहार जेथें झाला तेथून कुमार उत्पन्न झाले १. ते भयंकर कुमार जन्मास आलेलीं आणि गर्भावस्थेंत असलेलीं मुलें हरण करून नेत असतात. कुमारांप्रमाणें वज्राच्या प्रहारामुळें त्या स्कंदापासून महाबलाढ्य कन्याही उत्पन्न झाल्या २. हे जे कुमार उत्पन्न झाले त्यांनीं

सस्तदा ३ वृतः कन्यागणैः सर्वैरात्मीयैः सह पुत्रकैः । मातॄणां प्रेक्षतीनां च भद्रशाखश्च कौसलः ४ ततः कुमारपितरं स्कन्दमाहुर्जना भुवि । रुद्रमग्निमुखां स्वाहां प्रदेशेषु महाबलम् ५ यजन्ति पुत्रकामाश्च पुत्रिणश्च सदा जनाः । यास्तास्त्वजनयत्कन्यास्तपोनाम हुताशनः ६ किं करोमीति ताः स्कन्दं संप्राप्ताः समभाषत । कुमार्य ऊचुः ॥ भवेम सर्वलोकस्य मातरो वयमुत्तमाः ७ प्रसादात्तव पूज्याश्च प्रियमेतत्कुरुष्व नः। सोऽब्रवीद्बाढमित्येवं भविष्यध्वं पृथग्विधाः ८ शिवाश्चैवाशिवाश्चैव पुनः पुनरुदारधीः । ततः संकल्प्य पुत्रत्वे स्कन्दं मातृगणोऽगमत् ९ काकी च हलिमा चैव मालिनी बृंहिता तथा । आर्या पलाला वैमित्रा सप्तैताः शिशुमातरः १० एतासां वीर्यसंपन्नः शिशुर्नामातिदारुणः । स्कन्दप्रसादजः पुत्रो लोहिताक्षो भयंकरः ११ एष वीराष्टकः प्रोक्तः स्कन्दमातृगणोद्भवः । छागवक्त्रेण सहितो नवकः परिकीर्त्यते १२ षष्ठं छागमयं

विशाख आपला पिता मानिला. नंतर तो भगवान् विशाख एकाएकीं बोकडाचें मुख धारण करून संग्रामामध्यें कन्यागणांनीं आणि आपल्या सर्व पुत्रांनीं परिवेष्टित असतांना स्कंदाचें रक्षण करण्याकरितां गेला आणि तो संग्राम अवलोकन करणाऱ्या मातृगणामध्यें तो भद्रशाख व कोसल ह्मणून प्रसिद्ध झाला ३, ४. तेव्हांपासून भूतलावरील लोक स्कंदाला विशाखप्रभृति कुमारांचा पिता समजूं लागले; रुद्राला स्कंदाचा पिता मानूं लागले आणि त्याचप्रमाणें उमेला त्याची माता समजून महाबलाढ्य अग्नि व स्वाहा ह्यांनाही त्याचे मातापितर समजूं लागले ५. पुत्रेच्छु आणि पुत्रवान् लोक नेहमीं ज्यांना उद्देशून याग करीत असतात त्या कन्या तपोनामक अग्नीपासून झालेल्या आहेत ६. त्या कन्या स्कंदापाशीं आल्या असतां " मी काय करूं? " असें तो त्यांना ह्मणाला. कुमारिका ह्मणतात:—आह्मी तुझ्या प्रसादामुळें सर्व जगताच्या उत्कृष्ट व पूज्य माता व्हावें हा आमचा मनोरथ तूं सिद्धीस ने. ह्यावर तो महाबुद्धिमान् स्कंद ह्मणाला " ठीक आहे; शिवा आणि अशिवा अशा भिन्न भिन्न प्रकारच्या तुह्मी व्हा. " असें स्कंदानें सांगितल्यानंतर स्कंद आपला पुत्र आहे असें समजून मातृगण चालता झाला ७,८,९. काकी, हलिमा, मालिनी, बृंहिता, आर्या, पलाला आणि वैमित्रा ह्या सात कुमारमाता होत १०. स्कंदाच्या कृपेमुळें ह्यांना आरक्तवर्ण नेत्रांनीं युक्त, वीर्यवान्, अतिशय उग्र आणि भयंकर असा एक शिशुनामक पुत्र झाला ११. सात माता आणि आठवा पुत्र मिळून स्कंद व मातृगण ह्यांच्यापासून उत्पन्न झालेले हें वीराष्टक होय. हें वीराष्टक आणि छागवक्त्र ह्यांना वीरनवक असें ह्मणत

षवक्त्रं स्कन्दस्यैवेति विद्धि तत् । षट्शिरोऽभ्यन्तरं राजन्नित्यं मातृगणा-
र्चितम् १३ षण्णां तु प्रवरं तस्य शीर्षाणामिह शब्द्यते । शक्तिं येनासृ-
जद्दिव्यां भद्रशाख इति स्म ह १४ इत्येतद्विविधाकारं वृत्तं शुक्लस्य पञ्च-
मीम् । तत्र युद्धं महाघोरं वृत्तं षष्ठ्यां जनाधिप १५ [८९२५] इति श्रीम-
हाभारते शतसाहस्र्यां संहितायां० मारण्यके पर्वणि मार्कण्डेयसमास्याप-
र्वण्याङ्गिरसे कुमारोत्पत्तावष्टविंशाधिकद्विशततमोऽध्यायः ॥ २२८ ॥

मार्कण्डेय उवाच ॥ उपविष्टं तु तं स्कन्दं हिरण्यकवचस्रजम् । हिरण्य-
चूडमुकुटं हिरण्याक्षं महाप्रभम् १ लोहिताम्बरसंवीतं तीक्ष्णदंष्ट्रं मनो-
रमम् । सर्वलक्षणसंपन्नं त्रैलोक्यस्यापि सुप्रियम् २ ततस्तं वरदं शूरं
युवानं मृष्टकुण्डलम् । अभजत्पद्मरूपा श्रीः स्वयमेव शरीरिणी ३ श्रिया
जुष्टः पृथुयशाः स कुमारवरस्तदा । निषण्णो दृश्यते भूतैः पौर्णमास्यां
यथा शशी ४ अपूजयन्महात्मानो ब्राह्मणास्तं महाबलम् । इदमाहुस्तदा
चैव स्कन्दं तत्र महर्षयः ५ ऋषय ऊचुः ॥ हिरण्यगर्भ भद्रं ते लोकानां

असतात १२. हे राजा, स्कंदाचेंच एक बोकडासारिखें सहावें मुख होतें आणि तें सहाही मुखामध्यें श्रेष्ठ असून मातृगणाला सर्वदा पूज्य होतें असें तूं समज १३. त्या स्कंदाच्या सहाही मुखांमध्यें तें श्रेष्ठ मानिलें जात असून त्यानेंच भद्रशाख ह्मणून प्रसिद्ध असलेली दिव्य शक्ति उत्पन्न केली आहे १४. असो. ह्याप्रमाणें मीं कथन केलेलें नानाप्रकारचें वृत्त शुक्ल पचमीला घडलें आणि, हे प्रजाधिपते युधिष्ठिरा, षष्ठीचे दिवशीं इंद्र आणि कुमार ह्यामध्यें तेथें मोठें युद्ध झालें १५. ह्याप्रमाणें महामुनिव्यास-प्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील मार्कंडेयसमास्यापर्वांपैकीं आंगिरसो-पाख्यानसंबधीं कुमारोत्पत्तीविषयीं दोनशें अठ्ठाविसावा अध्याय समाप्त झाला ॥२२८॥

मार्कंडेय सांगतात:—सुवर्णकवच, सुवर्णमाला, सुवर्णाचा तुरा, सुवर्णमुकुट, सुवर्णासा-रिखे तेजस्वी नेत्र, उज्ज्वल प्रभा आणि तीक्ष्ण दंष्ट्रा ह्यांनीं युक्त, मनोहर, सर्वलक्षणसंपन्न, त्रैलोक्यालाही अत्यंत प्रिय, उज्ज्वल कुंडलें धारण केलेला, तरुण, शूर आणि इष्ट वस्तु देणारा तो स्कंद बसला असतांना कमलासारिख्या आल्हादकारक रूपानें युक्त असलेल्या प्रत्यक्ष मूर्तिमंत लक्ष्मीनेंच त्याचा आश्रय केला १, २, ३ व ह्याप्रमाणें त्या महाकीर्ति-मान् कुमारश्रेष्ठ स्कंदाचा आश्रय श्रीनें केला असतां तो तेथें बसलेला स्कंद लोकांना पौर्णिमेच्या चंद्राप्रमाणें दिसूं लागला ४. महात्म्या ब्राह्मणांनीं त्या महाबलाढ्य स्कंदाचें पूजन केलें आणि महर्षिंही त्या स्कंदाला असें ह्मणाले ५ ऋषि ह्मणतात:— हे हिरण्यगर्भा, तुझें कल्याण असो. तू लोकांचा कल्याणकर्ता हो. तुला अस्मान

शंकरो भव। त्वया षडात्रजातेन सर्वे लोका वशीकृताः ६ अभयं च पुनर्दत्तं त्वयैवैषां सुरोत्तम। तस्मादिन्द्रो भवानस्तु त्रैलोक्यस्याभयंकरः ७ स्कन्द उवाच॥ किमिन्द्रः सर्वलोकानां करोतीह तपोधनाः। कथं देवगणांश्चैव पाति नित्यं सुरेश्वरः ८ ऋषय ऊचुः॥ इन्द्रो दधाति भूतानां बलं तेजः प्रजाः सुखम्। तुष्टः प्रयच्छति तथा सर्वान्कामान्सुरेश्वरः ९ दुर्वृत्तानां संहरति व्रतस्थानां प्रयच्छति। अनुशास्ति च भूतानि कार्येषु बलसूदनः १० असूर्ये च भवेत्सूर्यस्तथाचन्द्रे च चन्द्रमाः। भवत्यग्निश्च वायुश्च पृथिव्यापश्च कारणैः ११ एतदिन्द्रेण कर्तव्यमिन्द्रे हि विपुलं बलम्। त्वं च वीर बली श्रेष्ठस्तस्मादिन्द्रो भवस्व नः १२ शक्र उवाच॥ भवस्वेन्द्रो महाबाहो सर्वेषां नः सुखावहः। अभिषिच्यस्व चैवाद्य प्राप्तरूपोऽसि सत्तम १३ स्कन्द उवाच॥ शाधि त्वमेव त्रैलोक्यमव्यग्रो विजये रतः। अहं ते किंकरः शक्र न ममेन्द्रत्वमीप्सितम् १४ शक्र उवाच॥ बलं तवाद्भुतं वीर त्वं देवानाम-

---

घेऊन सहा दिवस झाले कीं नाहीं तोंच तू सर्व लोक वश केलेस ६ आणि, हे सुरश्रेष्ठा, त्यांना अभयही दिलेंस. तस्मात्, त्रैलोक्याचें भय नाहींसें करणारा इंद्र तूंच हो ७. स्कंद प्रश्न करितो:—हे तपोधनहो, सर्व लोकांकरितां इंद्र काय करीत असतो ? आणि तो देवराज देवगणाचें नहमी रक्षण कसें करीत असतो ? ८. ऋषि सांगतात:— इंद्र प्राण्यांचे ठिकाणीं बल, तेज, प्रजा व सुख हें धारण करीत असून तो देवराज संतुष्ट झाला असतां सर्व मनोरथ परिपूर्ण करितो ९; दुर्जनांचा संहार करितो; धर्मानें वागणाऱ्यांना उत्तम फल देतो आणि कोणत्याही कृत्यासंबंधानें तो प्राण्यांना उपदेश करितो १०. सूर्यरहित प्रदेशामध्यें तो सूर्य होतो; चंद्ररहित प्रदेशामध्यें तो चंद्र होतो आणि त्याचप्रमाणें कारण पडलें असतां तो अग्नि, वायु, पृथ्वी आणि उदक होतो ११. हें इंद्राचें कर्तव्य आहे. कारण, इंद्राचे ठिकाणीं सामर्थ्य विपुल आहे. हे वीरा, तू श्रेष्ठ बली आहेस. तस्मात्, तूं आमचा इंद्र हो १२. इंद्र म्हणतो:—हे महापराक्रमी स्कंदा, आम्हा सर्वांना सुखावह असा इंद्र तूंच हो आणि देवराज्याचा अभिषेक आज तूं आपल्याला करून घे. हे सज्जनश्रेष्ठा, तूं योग्य आहेस १३. स्कंद म्हणतो:—हे इंद्रा, विजयाविषयीं दक्ष व सावध असा तूंच त्रैलोक्याचें राज्य कर; मी तुझा दास आहे. मला इंद्रत्वाची इच्छा नाहीं १४. इंद्र म्हणतो:— हे वीरा, तुझे ठिकाणीं अद्भुत सामर्थ्य आहे. यास्तव, तूंच देवशत्रूंचा वध कर. कारण, तुझ्या वीर्यानें विस्मित झालेले लोक,

रीअहि । अवज्ञास्यन्ति मां लोका वीर्येण तव विस्मिताः १५ इन्द्रत्वे
तु स्थितं वीर बलहीनं पराजितम् । आवयोश्च मिथो भेदे प्रयतिष्यन्त्यत-
न्द्रिताः १६ भेदिते च त्वयि विभो लोको द्वैधमुपेष्यति । द्विधाभूतेषु
लोकेषु निश्चितेष्वावयोस्तथा १७ विग्रहः संप्रवर्तेत भूतभेदान्महाबल ॥
तत्र त्वं मां रणे तात यथाश्रद्धं विजेष्यसि १८ तस्मादिन्द्रो भवानद्य
भविता मा विचारय । स्कन्द उवाच ॥ त्वमेव राजा भद्रं ते त्रैलोक्यस्य
ममैव च १९ करोमि किं च ते शक्र शासनं तद्ब्रवीहि मे । इन्द्र उवाच ॥
अहमिन्द्रो भविष्यामि तव वाक्यान्महाबल २० यदि सत्यमिदं वाक्यं
निश्चयाद्भाषितं त्वया । यदि वा शासनं स्कन्द कर्तुमिच्छसि मे शृणु २१
अभिषिच्यस्व देवानां सैनापत्ये महाबल । स्कन्द उवाच ॥ दानवानां
विनाशाय देवानामर्थसिद्धये २२ गोब्राह्मणहितार्थाय सैनापत्येऽभिषिञ्च
माम् । मार्कण्डेय उवाच ॥ सोऽभिषिक्तो मघवता सर्वैर्देवगणैः सह २३
अतीव शुशुभे तत्र पूज्यमानो महर्षिभिः । तत्र तत्काञ्चनं छत्रं ध्रियमाणं

बलहीन आणि पराभव पावलेला मी इंद्रपदावर राहिलों असतां, माझी अवज्ञा करितील आणि उभयतांमध्यें भेदभाव उत्पन्न करण्याविषयी ते अगदीं दक्ष राहून प्रयत्न करितील १५, १६. हे प्रभो, तू माझ्यापासून भिन्न झालास म्हणजे लोकही द्विधा होतील आणि आपणाविषयीं लोक निश्चयपूर्वक द्विधा झाले म्हणजे १७, हे महाबलाढ्य स्कंदा, लोकांच्या भेदभावामुळें युद्ध सुरू होईल आणि, बा स्कंदा, तू माझा संग्रामामध्यें अगदीं आपल्या इच्छेप्रमाणें पराजय करिशील १८. तस्मात्, तूंच इंद्र हो; आता विचार करूं नको. स्कंद म्हणतो:—तुझें देव बरें करो, तूंच त्रैलोक्याचा व माझा राजा आहेस १९. तस्मात्, हे इंद्रा, तुझी कोणती आज्ञा मी शेवटास न्यावी हें तूं मला सांग. इंद्र म्हणतो:—हे महाबलाढ्य स्कंदा, मी तुझ्या सांगण्यावरून इंद्र होतों २०. हे स्कंदा, तू जर हें निश्चयपूर्वक सत्यभाषण केलें असशील अथवा माझ्या आज्ञेप्रमाणें वागण्याची जर तुला इच्छा असेल तर मी सांगतों तें एक २१ हे महाबलाढ्य स्कंदा, तू देवांचा सेनापति हो. स्कंद म्हणतो:—देवांचा मनोरथ सिद्धीस जाण्याकरितां, दानवांचा नाश होण्याकरितां २२ आणि गोब्राह्मणांचें हित होण्याकरितां तू मला सेनापत्याचा अभिषेक कर. मार्कंडेय सांगतात:—सर्व देवगणांसहवर्तमान इंद्रानें स्कंदाला सेनापत्याचा अभिषेक केला असतां २३ आणि महर्षि त्याचें पूजन करूं लागले असता तो अतिशय शोभूं लागला. चांगल्या रीतीनें प्रज्वलित झालेल्या अग्नीच्या मंडलाप्रमाणें स्कंदाच्या मस्तकावर धरून ठेवलेलें

व्यरोचत २४ यथैव सुसमिद्धस्य पावकस्यात्ममण्डलम् । विश्वकर्मकृता चास्य दिव्या माला हिरण्मयी २५ आबद्धा त्रिपुरघ्नेन स्वयमेव यशस्विना । आगम्य मनुजव्याघ्र सह देव्या परन्तप २६ अर्चयामास सुप्रीतो भगवान्गोवृषध्वजः । रुद्रमग्निं द्विजाः प्राहू रुद्रसूनुस्ततस्तु सः २७ रुद्रेण शुक्रमुत्सृष्टं तच्छ्वेतः पर्वतोभवत् । पावकस्येन्द्रियं श्वेते कृत्तिकाभिः कृतं नगे २८ पूज्यमानं तु रुद्रेण दृष्ट्वा सर्वे दिवौकसः । रुद्रसूनुं ततः प्राहुर्गुहं गुणवतां वरम् २९ अनुप्रविश्य रुद्रेण वह्निं जातो ह्ययं शिशुः । तत्र जातस्ततः स्कन्दो रुद्रसूनुस्ततोभवत् ३० रुद्रस्य वह्नेः स्वाहायाः षण्णां स्त्रीणां च भारत । जातः स्कन्दः सुरश्रेष्ठो रुद्रसूनुस्ततोभवत् ३१ अरजे वाससी रक्ते वसानः पावकात्मजः। भाति दीप्तवपुः श्रीमान्रक्ताभ्राभ्यामिवांशुमान् ३२ कुक्कुटश्चाग्निना दत्तस्तस्य केतुरलंकृतः । रथे समुच्छ्रितो भाति कालाग्निरिव लोहितः ३३ या चेष्टा सर्वभूतानां प्रभा शान्तिर्बलं तथा। अग्रतस्तस्य सा शक्तिर्देवानां जयवर्धिनी ३४ विवेश

तें सुवर्णछत्र झळकूं लागलें. त्याच्याकरितां सुवर्णमय दिव्य माला प्रत्यक्ष विश्वकर्म्यानें तयार केली होती २४,२५ आणि स्वतः यशस्वी शंकरानें ती बांधिली होती. हे शत्रुतापना पुरुषश्रेष्ठा युधिष्ठिरा, देवी पार्वतीसहवर्तमान येऊन २६ भगवान् वृषध्वजानें अत्यंत संतुष्ट होऊन स्कंदाचें पूजन केलें. द्विज अग्नीला रुद्र ह्मणत असतात आणि ह्यामुळें स्कंदालाही रुद्रपुत्र असें ह्मणत असतात २७. रुद्रानें जें वीर्य टाकिलें तें श्वेतपर्वत बनलें. श्वेतपर्वतावर पडलेलें तें अग्नीचें वीर्य कृत्तिकांनीं स्वीकारिलें असतां २८ रुद्र त्याचा आदर करीत आहे असें अवलोकन करून सर्व देव गुणवानांमध्यें श्रेष्ठ असलेल्या त्या कार्तिकेयाला रुद्रपुत्र ह्मणूं लागले २९. अग्नीमध्यें रुद्रानें प्रवेश केल्यामुळें हा पुत्र उत्पन्न झाला आहे ह्यामुळें तो स्कंद रुद्रपुत्र झाला ३०. रुद्र, अग्नि, स्वाहा आणि सहा स्त्रिया ह्याच्यामुळें सुरश्रेष्ठ स्कंद उत्पन्न झाला. ह्यास्तव, तो रुद्रपुत्र ह्मणूनही प्रसिद्ध झाला ३१. निर्मल व आरक्तवर्ण वस्त्रें परिधान केलेला व उज्ज्वल शरीरानें युक्त असलेला तो श्रीमान् अग्निपुत्र स्कंद आरक्तवर्ण अभ्रांच्या योगानें शोभणाऱ्या सूर्याप्रमाणें शोभूं लागला ३२. अग्नीनें दिलेला जो कुक्कुट त्याच्या योगानें त्याचा ध्वज भूषित झालेला होता आणि रथावर उभारिलेला तो ध्वज आरक्तवर्ण असल्यामुळें प्रलयकालच्या अग्नीप्रमाणें भासत होता ३३. सर्व प्राण्यांचे ठिकाणीं असलेलें चलनवलनसामर्थ्य,

१ रुद्रो वा एष यदग्निः । (अग्नि हा रुद्र होय) असें तैत्तिरीयसंहितेंतील पांचव्या कांडाच्या चतुर्थप्रपाठकांतर्गत तिसऱ्या अनुवाकामध्ये आहे

कवचं चास्य शरीरे सहजं तथा । युध्यमानस्य देवस्य प्रादुर्भवति तत्सदा ३५
शक्तिर्धर्मो बलं तेजः कान्तत्वं सत्यमुन्नतिः । ब्रह्मण्यत्वमसंमोहो भक्तानां
परिरक्षणम् ३६ निकृन्तनं च शत्रूणां लोकानां चाभिरक्षणम् । स्कन्देन
सह जातानि सर्वाण्येव जनाधिप ३७ एवं देवगणैः सर्वैः सोऽभिषिक्तः
स्वलंकृतः । बभौ प्रतीतः सुमनाः परिपूर्णेन्दुमण्डलः ३८ इष्टैः स्वाध्या-
यघोषैश्च देवतूर्यवरैरपि । देवगन्धर्वगीतैश्च सर्वैरप्सरसां गणैः ३९ एतै-
श्चान्यैश्च बहुभिस्तुष्टैर्हृष्टैः स्वलंकृतैः । सुसंवृतः पिशाचानां गणैर्देवगणै-
स्तथा ४० क्रीडन्भाति तदा देवैरभिषिक्तश्च पावकिः । अभिषिक्तं महा-
सेनमपश्यन्त दिवौकसः ४१ विनिहत्य तमः सूर्यं यथेहाभ्युदितं तथा ।
अथैनमभ्ययुः सर्वा देवसेनाः सहस्रशः ४२ अस्माकं त्वं पतिरिति
ब्रुवाणाः सर्वतो दिशः । ताः समासाद्य भगवान्सर्वभूतगणैर्वृतः ४३ अर्चि-
तस्तु स्तुतश्चैव सान्त्वयामास ता अपि । शतक्रतुश्चाभिषिच्य स्कन्दं सेना-
पतिं तदा ४४ मस्मार तां देवसेनां या सा तेन विमोक्षिता । अयं तस्याः

तेज, शांति आणि बल ही ह्याची देवांना जय प्राप्त करून देणारी शक्ति बनली ३४. ह्याच्या शरीरामध्यें ह्याच्याबरोबरच कवच उत्पन्न झालेलें होतें व तें कवच तो स्कंद देव युद्ध करूं लागला असतां नेहमीं प्रकट होत असे ३५. शक्ति, धर्म, बल, तेज, सौंदर्य, सत्य, उन्नति, ब्राह्मणप्रियता, मोहराहित्य, भक्तपरिपालन ३६, शत्रुनाशन आणि लोकरक्षण हे सर्वही गुण, हे प्रजाधिपते युधिष्ठिरा, स्कंदाचे ठिकाणीं उपजतच होते ३७. असो. ह्याप्रमाणें सर्व देवगणांनीं सेनापतीचा अभिषेक केला असतां उत्तम प्रकारें भूषित झालेला व मनामध्यें प्रसन्न होऊन आनंदित झालेला तो स्कंद परिपूर्ण चंद्रमंडलाप्रमाणें शोभूं लागला ३८. अनुकूल वेदघोष, श्रेष्ठ देववाद्यें, देव आणि गंधर्व ह्यांचीं गीतें आणि अप्सरांचे सर्व गण ३९ ह्यांनीं व इतरही संतुष्ट, आनंदित व अलंकृत अशा पिशाचगणांनीं व देवगणांनीं अगदीं परिवेष्टिलेला ४० आणि त्यांच्यासह-वर्तमान क्रीडा करीत असलेला तो अग्निपुत्र स्कंद, देवांनीं त्याला सेनापतीचा अभिषेक केला असल्यामुळें, अतिशयच झळकूं लागला. अंधकाराचा नाश करून उदय पावलेल्या सूर्याकडे ज्याप्रमाणें लोक पाहूं लागतात त्याप्रमाणें देव सेनापतीचा अभिषेक झालेल्या महासेनाकडे पाहूं लागले. तदनंतर "तूं आमचा अधिपति आहेस" असें म्हणत म्हणत चोहों-कडून सर्व हजारों देवसेना त्याच्याकडे आल्या आणि त्यांची गांठ पडल्यावर सर्व भूतगणांनीं मानमान्यतापूर्वक व प्रशंसापूर्वक परिवेष्टिलेल्या त्या स्कंदानें त्या सर्व देवसेनांचेंही सांत्वन केलें. स्कंदाला सेनापतीचा अभिषेक केल्यानंतर इंद्राला ४१, ४२, ४३, ४४ पूर्वी मुक्त

पतिर्नूनं विहितो ब्रह्मणा स्वयम् ४५ इति चिन्तयामास देवसेनां त्वलंकृताम् । स्कन्दं प्रोवाच बलभिदियं कन्या सुरोत्तम ४६ अजाते त्वयि निर्दिष्टा तव पत्नी स्वयंभुवा । तस्मात्त्वमस्या विधिवत्पाणिं मन्त्र-पुरस्कृतम् ४७ गृहाण दक्षिणं देव्याः पाणिना पद्मवर्चसा । एवमुक्तः स जग्राह तस्याः पाणिं यथाविधि ४८ बृहस्पतिर्मन्त्रविद्धि जजाप च जुहाव च । एवं स्कन्दस्य महिषीं देवसेनां विदुर्जनाः ४९ षष्ठीं यां ब्राह्मणाः प्राहुर्लक्ष्मीमाशां सुखप्रदाम् । सिनीवालीं कुहूं चैव सद्वृत्तिम-पराजिताम् ५० यदा स्कन्दः पतिर्लब्धः शाश्वतो देवसेनया । तदा तमा-श्रयल्लक्ष्मीः स्वयं देवी शरीरिणी ५१ श्रीजुष्टः पञ्चमीं स्कन्दस्तस्माच्छ्री पञ्चमी स्मृता । षष्ठ्यां कृतार्थोभूद्यस्मात्तस्मात्षष्ठी महातिथिः ५२ [८९७७] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यामार-ण्यके पर्वणि मार्कण्डेयसमास्यापर्वण्याङ्गिरसे स्कन्दोत्पत्तावूनत्रिंशद-धिकद्विशततमोध्यायः ॥ २२९ ॥

मार्कण्डेय उवाच ॥ श्रिया जुष्टं महासेनं देवसेनापतिं कृतम् । सप्त-

---

केलेल्या त्या दक्षकन्या देवसेनेची आठवण झाली; " खरोखर ब्रह्मदेवानें हाच हिचा पति स्वतः ठरवून टाकिला आहे"४५ असा विचार करून अलंकृत झालेल्या देवसेनेला त्यानें आणविलें व तो इंद्र स्कंदाला ह्मणाला " हे सुरश्रेष्ठा, ही कन्या ४६ तूं उत्पन्न होण्याचे पूर्वीच ब्रह्मदेवानें तुझी पत्नी ह्मणून ठरविली आहे. तस्मात् , तूं ह्या देवीचा यथाविधि समंत्रक उजवा हात आपल्या कमलासारिख्या प्रभेनें युक्त असलेल्या हातानें ग्रहण कर. " ह्याप्रमाणें इंद्रानें सांगितलें असतां त्यानें तिचें यथाविधि पाणिग्रहण केलें ४७, ४८; आणि मंत्रवेत्त्या बृहस्पतीनें जपजाप्य व होमहवन केलें. ह्याप्रमाणें देवसेनेला लोक स्कंदाची पत्नी ह्मणूं लागले ४९. ह्याच सुखप्रद व आप्त स्कंदपत्नीला ब्राह्मण लक्ष्मी, सिनीवाली, कुहू, सद्वृत्ति आणि अपराजिता असें ह्मणत असतात ५०. देवसेनेला जेव्हां स्कंद हा शाश्वत पति प्राप्त झाला तेव्हां स्वतः मूर्तिमंत लक्ष्मीनेंही त्याचा आश्रय केला ५१. पंचमीचे दिवशीं स्कंद श्रीनें युक्त झाला ह्मणून पंचमीला श्री असें ह्मणतात आणि षष्ठीचे दिवशीं ज्याअर्थी स्कंद कृतार्थ झाला त्याअर्थी षष्ठी ही महातिथि असें ह्मणतात ५२. ह्याप्रमाणें महर्षिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीम-हाभारतांतर्गत वनपर्वांतील मार्कंडेयसमास्यापर्वापैकीं आंगिरसोपाख्यानसंबंधीं स्कंदो-त्पत्तीविषयीं दोनशें एकोणतिसावा अध्याय समाप्त झाला ॥ २२९ ॥

मार्कंडेय सांगतात:—देवसेनाधिपति केलेल्या महासेनाचा श्रीनें आश्रय केल्यावर

र्षिपत्न्यः षडुद्विग्नास्तत्सकाशमथागमन् १ ऋषिभिः संपरित्यक्ता धर्मयुक्ता महाव्रताः । द्रुतमागम्य चोचुस्ता देवसेनापतिं प्रभुम् २ वयं पुत्र परित्यक्ता भर्तृभिर्देवसंमितैः । अकारणाद्रुषा तैस्तु पुण्यस्थानात्परिच्युताः ३ अस्माभिः किल जातस्त्वमिति केनाप्युदाहृतम् । तत्सत्यमेतत्संश्रुत्य तस्मान्नस्त्रातुमर्हसि ४ अक्षयश्च भवेत्स्वर्गस्त्वत्प्रसादाद्धि नः प्रभो । त्वां पुत्रं चाप्यभीप्सामः कृत्वैतदनृणो भव ५ स्कन्द उवाच ॥ मातरो हि भवन्त्यो मे सुतो वोऽहमनिन्दिताः । यद्वाभीच्छत तत्सर्वं संभविष्यति वस्तथा ६ मार्कण्डेय उवाच ॥ विवक्षन्तं ततः शक्रं किं कार्यमिति सोऽब्रवीत् । उक्तं स्कन्देन ब्रूहीति सोऽब्रवीद्वासवस्ततः ७ अभिजित्स्पर्धमाना तु रोहिण्या कन्यसी स्वसा । इच्छन्ती ज्येष्ठतां देवी तपस्तप्तुं वनं गता ८ तत्र मूढोऽस्मि भद्रं ते नक्षत्रं गगनाच्च्युतम् । कालं त्विमं परं स्कन्द ब्रह्मणा सह चिन्तय ९ धनिष्ठादिस्तदा कालो ब्रह्मणा परि-

---

सप्तर्षींपैकी सहांच्या सहा पत्न्या त्याचे समीप गेल्या १. सारांश, धर्मनिष्ठ आणि महापतिव्रता असूनही ऋषींनी त्याग केलेल्या त्या सहा स्त्रिया प्रभु देवसेनापतीकडे सत्वर गेल्या आणि त्याला ह्मणाल्या २ " हे पुत्रा, त्या देवतुल्य भर्त्यांनीं विनाकारण रागानें आमचा त्याग केला असल्यामुळे आह्मी पुण्यस्थानापासून भ्रष्ट झालों आहोंत ३. तू आमच्यापासून उत्पन्न झालास अशी वार्ता कोणी सांगितली ती खरी समजून पतींनीं आमचा त्याग केला आहे. तस्मात्, तू आमचें रक्षण कर ४. हे प्रभो, तुझ्या प्रसादामुळें आह्मांला अक्षय्य स्वर्गप्राप्ति व्हावी. तुला पुत्र ह्मणून स्वीकार करण्याची आमची इच्छा आहे. तस्मात्, हें आमचें कार्य करून तूं अनृणी हो " ५. स्कंद ह्मणतो:— हे निर्दोष पतिव्रतांनों, तुह्मी माझ्या माता आहांत व मी तुमचा पुत्र आहें. ह्यास्तव, तुमची जी इच्छा आहे ती सर्व परिपूर्ण होईल ६. मार्कंडेय सांगतात:— नंतर कांहीं बोलण्यास उद्युक्त झालेल्या इंद्राला " काय कार्य आहे " असें स्कंदानें विचारिलें आणि " जें असेल तें सांग " असें स्कंदानें पुनरपि ह्मटल्यावर तो इंद्र ह्मणाला ७ " रोहिणीची कनिष्ठ भगिनी अभिजित् तिच्याशीं स्पर्धा करीत असे. असें होतां होतां आपणाला श्रेष्ठत्व मिळावें ह्या इच्छेनें ती देवी (आपला अधिकार सोडून देऊन) तपश्चर्येकरितां वनामध्यें चालती झाली ८. सारांश, तुझें देव बरें करो, आकाशांतून अभिजित् नक्षत्र च्युत झाल्यामुळें मला कांहीं सुचेनासें झालें आहे. तस्मात्, हे स्कंदा, ह्या कालमानाविषयीं ब्रह्मदेवासहवर्तमान तू चांगला विचार कर ९. युगादि नक्षत्र प्रथम रोहिणी होतें व तेव्हां कालमान बरोबर जुळत होतें; परंतु, अभिजित् नक्षत्र

कल्पितः । रोहिणी ह्यभवत्पूर्वमेवं संख्या समाभवत् १० एवमुक्ते तु शक्रेण त्रिदिवं कृत्तिका गताः । नक्षत्रं सप्तशीर्षाभं भाति तद्वह्निदैवतम् ११ विनता चाब्रवीत्स्कन्दं मम त्वं पिण्डदः सुतः । इच्छामि नित्यमेवाहं त्वया पुत्र सहासितुम् १२ स्कन्द उवाच ॥ एवमस्तु नमस्तेऽस्तु पुत्रस्नेहात्प्रशाधि माम् । स्नुषया पूज्यमाना वै देवि वत्स्यसि नित्यदा १३ मार्कण्डेय उवाच ॥ अथ मातृगणः सर्वः स्कन्दं वचनमब्रवीत् १४ वयं सर्वस्य लोकस्य मातरः कविभिः स्तुताः । इच्छामो मातरस्तुभ्यं भवितुं पूजयस्व नः १५ स्कन्द उवाच ॥ मातरो हि भवत्यो मे भवतीनामहं सुतः । उच्यतां यन्मयाकार्यं भवतीनामथेप्सितम् १६ मातर ऊचुः ॥ यास्तु ता मातरः पूर्वं लोकस्यास्य प्रकल्पिताः । अस्माकं तु भवेत्स्थानं तासां चैव न तद्भवेत् १७ भवेम पूज्या लोकस्य न ताः पूज्याः सुरर्षभ । प्रजास्माकं हृतास्ताभिस्त्वत्कृते ताः प्रयच्छ नः १८ स्कन्द उवाच ॥ दत्ताः प्रजा न ताः शक्या भवतीभि-

---

आकाशांतून च्युत झाल्यापासून युगादिकालाला धनिष्ठा नक्षत्रापासून आरंभ व्हावा असें ब्रह्मदेवानें ठरविलें १०. ह्याप्रमाणें इंद्रानें सांगितलें असतां कृत्तिका स्वर्गामध्यें गेल्या आणि तेव्हांपासून सात मस्तकांनीं युक्त असलेलें तें अग्निदैवत नक्षत्र आकाशामध्यें झळकू लागलें ११. तदनंतर (गरुडपक्षिणीचें रूप धारण करून स्वाहादेवी पूर्वी वनांतून निघून गेली असल्यामुळें गरुडमाता) विनता स्कंदाला ह्मणाली " तूं माझा पिंड देणारा पुत्र आहेस. तस्मात्, हे पुत्रा, मी नेहमीं तुझ्यासहवर्तमान वास्तव्य करण्याची इच्छा करीत आहें " १२. स्कंद ह्मणाला " ठीक आहे; तुला नमस्कार असो. पुत्रप्रेमानें तूं मला आज्ञा करीत जा आणि, हे देवि, ही देवसेना स्नुषा तुझी मानमान्यता राखीत असतांना तूं नेहमीं येथें वास्तव्य कर " १३. मार्कंडेय सांगतात:—तदनंतर (विनताप्रभृति) सर्व मातृगण स्कंदाला ह्मणाला १४ " सर्व जगताच्या माता ह्मणून कवींनीं आमची प्रशंसा केली आहे. तस्मात्, तुझ्याही माता होण्याची आमची इच्छा आहे. ह्यास्तव, तूं आह्मांला मान देत जा " १५. स्कंद ह्मणतो:—तुह्मी माझ्या माता व मी तुमचा पुत्र (हें पूर्वीं सांगितलेलेंच आहे). आतां मी आपला कोणता मनोरथ सिद्धीस न्यावा हें आपण मला कथन करा १६. माता ह्मणतात:—ह्या जगताच्या ज्या (ब्राह्मी, माहेश्वरी वगैरे) त्या माता पूर्वीं ठरलेल्या होत्या त्यांचें स्थान आह्मांला प्राप्त व्हावें; तें स्थान इतःपर त्यांना प्राप्त होऊं नये १७. हे सुरश्रेष्ठा, सर्व जगतामध्यें आमचेंच पूजन व्हावें आणि त्यांचें होऊं नये. त्यांनीं

निषेवितुम् । अन्यां वः कां प्रयच्छामि प्रजां यां मनसेच्छथ १९ मातर ऊचुः ॥ इच्छाम तासां मातॄणां प्रजा भोक्तुं प्रयच्छ नः । त्वया सह पृथग्भूता ये च तासामथेश्वराः २० स्कन्द उवाच ॥ प्रजा वो दद्मि कष्टं तु भवतीभिरुदाहृतम् । परिरक्षत भद्रं वः प्रजाः साधु नमस्कृताः २१ मातर ऊचुः ॥ परिरक्षाम भद्रं ते प्रजाः स्कन्द यथेच्छसि । त्वया न रोचते स्कन्द सहवासमश्चिरं प्रभो २२ स्कन्द उवाच ॥ यावत्षोडशवर्षाणि भवन्ति तरुणाः प्रजाः । प्रबाधत मनुष्याणां तावद्रूपैः पृथग्विधैः २३ अहं च वः प्रदास्यामि रौद्रमात्मानमव्ययम् । परमं तेन सहिताः सुखं वत्स्यथ पूजिताः २४ मार्कण्डेय उवाच ॥ ततः शरीरात्स्कन्दस्य पुरुषः पावकप्रभः । भोक्तुं प्रजाः स मर्त्यानां निष्पपात महाप्रभः २५ अपतत्सहसा भूमौ विसंज्ञोथ क्षुधार्दितः । स्कन्देन सोभ्यनुज्ञातो रौद्ररूपोभवद्ग्रहः २६ स्कन्दापस्मारमित्याहुर्ग्रहं तं द्विजसत्तमाः ।

आमच्या प्रजा तुझ्याकरितां हरण केल्या आहेत. तस्मात्, तूं त्या आतां आमच्या परत दे १८. स्कंद ह्मणतोः—ज्या प्रजा त्यांना दिल्या त्या आतां तुह्मांला मिळणें शक्य नाहीं. आतां तुमच्या मनामध्यें दुसरी कोणती प्रजा आहे हें तुह्मी मला कथन करा ह्मणजे मी तुह्मांला देईन १९. माता ह्मणतातः—त्या मातांच्या ज्या प्रजा आहेत त्या व त्यांचे अधिपति तू आह्मांला सेवन करण्याकरितां दे; ह्मणजे तुझ्यासहवर्तमान आह्मी ह्या वेगळ्या माता त्यांचा स्वीकार करूं २०. स्कंद ह्मणतोः—मी तुह्मांला प्रजा देतों; परंतु, तुह्मी हें मोठें पंचाइतीचें मागणें मागितलें आहे. ह्यास्तव, तुमचें कल्याण असो. जे तुमचें चांगलें भजनपूजन करितील त्या प्रजाजनांचें तुह्मीं सर्व प्रकारें रक्षण करीत जा २१. माता ह्मणतातः— तुझें कल्याण असो. हे स्कंदा, आह्मी तुझ्या इच्छेप्रमाणें प्रजाचें रक्षण करूं; परंतु, हे प्रभो, हे स्कंदा, तुझ्यासहवर्तमान आमचें चिरकाल वास्तव्य व्हावें अशी आमची इच्छा आहे २२. स्कंद ह्मणतोः— सोळा वर्षे होईपर्यंत ह्मणजे मनुष्यांच्या प्रजा तरुण होईपर्यंत नानाप्रकारच्या रूपांनीं तुह्मीं त्यांना पीडा करीत जा २३. मी आपला अति भयंकर व अक्षय अंश तुह्मांला देईन, त्याच्यासहवर्तमान तुह्मी मानमान्यतापूर्वक सुखानें वास्तव्य करा २४. मार्कंडेय सांगतातः— तदनंतर स्कंदाच्या शरीरापासून मनुष्यांच्या प्रजा भक्षण करण्याकरितां तो अग्नीसारिखा उज्ज्वल व महातेजस्वी पुरुष बाहेर निघाला २५. निघाल्याबरोबर तो क्षुधेनें व्याकुल झाल्यामुळें एकाएकीं मूर्च्छित होऊन भूमीवर पडला आणि स्कंदाची अनुज्ञा झाल्यामुळें तो पुरुष उग्ररूपी ग्रह बनला २६. त्या ग्रहाला द्विजश्रेष्ठ

विनता तु महारौद्रा कथ्यते शकुनिग्रहः २७ पूतनां राक्षसीं प्राहुस्तं विद्यात्पूतनाग्रहम् । कष्टा दारुणरूपेण घोररूपा निशाचरी २८ पिशाची दारुणाकारा कथ्यते शीतपूतना। गर्भान्सा मानुषीणां तु हरते घोरदर्शना २९ अदितिं रेवतीं प्राहुर्ग्रहस्तस्यास्तु रैवतः । सोपि बालान्महाघोरो बाधते वै महाग्रहः ३० दैत्यानां या दितिर्माता तामाहुर्मुखमण्डिकाम् । अत्यर्थं शिशुमांसेन संप्रहृष्टा दुरासदा ३१ कुमाराश्च कुमार्यश्च ये प्रोक्ताः स्कन्दसंभवाः । तेपि गर्भभुजः सर्वे कौरव्य सुमहाग्रहाः ३२ तासामेव च नारीणां पतयस्ते प्रकीर्तिताः । आजायमानान्गृह्णन्ति बालकान्रौद्रकर्मिणः ३३ गवां माता तु या प्राज्ञैः कथ्यते सुरभिर्नृप । शकुनिस्तामथारुह्य स ह भुङ्क्ते शिशून्भुवि ३४ सरमा नाम या माता शुनां देवी जनाधिप । सापि गर्भान्समादत्ते मानुषीणां सदैव हि ३५ पादपानां च या माता करञ्जनिलया हि सा । वरदा सा हि सौम्या च नित्यं भूतानुकम्पिनी। करञ्जे तां नमस्यन्ति तस्मात्पुत्रार्थिनो नराः ३६ इमे त्वष्टादशान्ये वै ग्रहा मांसमधुप्रियाः। द्विपञ्चरात्रं तिष्ठन्ति

स्कंदापस्मार असें ह्मणत असतात. महाभयकर विनतेला शकुनिग्रह असें ह्मणतात २७. पूतना ह्मणून एक राक्षसी आहे असें ह्मणतात; तोच पूतनाग्रह असें समजावें. दुष्ट, मुद्रेनेंही भयकर व आकृतीनेंही दारुण अशी एक निशाचरी पिशाची आहे; तिला शीतपूतना असें ह्मणतात. ती भयंकर मुद्रेनें युक्त असलेली शीतपूतना मनुष्यस्त्रियांचे गर्भ हरण करून नेते २८, २९. अदितीला रेवती असे ह्मणतात; रैवत हा तिचा ग्रह होय. तो महाग्रहही अतिभयंकर असून बालकाना पीडा देतो ३०. दैत्यांची माता जी दिति तिला मुखमंडिका असें ह्मणतात व जिंकण्यास अशक्य असलेली ती मुखमंडिका लहान मुलांच्या मांसानें अत्यंत आनंदित होत असते ३१. स्कंदापासून उत्पन्न झालेले जे कुमार व ज्या कुमारी ते सर्वही, हे कुरुवंशजश्रेष्ठा युधिष्ठिरा, गर्भ भक्षण करणारे अतिप्रचंड महाग्रह आहेत ३२. त्या स्कंदापासून निघालेल्या स्त्रियांचे जे पति ते क्रूरकर्मी असून जन्मास येणाऱ्या बालकांना हरण करून नेतात ३३. हे राजा, गाईची माता ह्मणून ज्ञानीलोक ज्या सुरभीला ह्मणतात तिच्यावर आरूढ होऊन तो शकुनिग्रह ह्या भूतलावरील लहान मुलें भक्षण करीत असतो ३४. हे प्रजाधिपते युधिष्ठिरा, देवी सरमा ह्मणून जी श्वानांची माता आहे तीही नेहमीं मनुष्यस्त्रियांचे गर्भ हरण करीत असते ३५. वृक्षांची जी माता ती करंजनिलया होय. ती सौम्य, नेहमीं प्राणिमात्रावर दया करणारी आणि त्यांचे मनोरथ परिपूर्ण करणारी आहे. तस्मात्, पुत्रार्थी

सततं सूतिकागृहे ३७ कद्रूः सूक्ष्मवपुर्भूत्वा गर्भिणीं प्रविशत्यथ । भुङ्क्ते सा तत्र तं गर्भं सा तु नागं प्रसूयते ३८ गन्धर्वाणां तु या माता सा गर्भं गृह्य गच्छति । ततो विलीनगर्भा सा मानुषी भुवि दृश्यते ३९ या जनित्री त्वप्सरसां गर्भमास्ते प्रगृह्य सा । उपनष्टं ततो गर्भं कथयन्ति मनीषिणः ४० लोहितस्योदधेः कन्या धात्री स्कन्दस्य सा स्मृता । लोहितायनिरित्येवं कदम्बे सा हि पूज्यते ४१ पुरुषेषु यथा रुद्रस्तथार्या प्रमदास्वपि । आर्या माता कुमारस्य पृथक्कामार्थमिज्यते ४२ एवमेते कुमाराणां मया प्रोक्ता महाग्रहाः । यावत्षोडश वर्षाणि शिशूनां ह्यशिवास्ततः ४३ ये च मातृगणाः प्रोक्ताः पुरुषाश्चैव ये ग्रहाः । सर्वे स्कन्दग्रहा नाम ज्ञेया नित्यं शरीरिभिः ४४ तेषां प्रशमनं कार्यं स्नानं धूपमथाञ्जनम् । बलिकर्मोपहाराश्च स्कन्दस्येज्या विशेषतः ४५ एवमभ्यर्चिताः सर्वे प्रयच्छन्ति शुभं नृणाम् । आयुर्वीर्यं च राजेन्द्र सम्यक्पूजानमस्कृताः ४६ ऊर्ध्वं तु षोडशाद्वर्षाद्ये भवन्ति

पुरुष करजवृक्षावर तिला नमस्कार करीत असतात ३६. हे आणि इतरही अठरा ग्रह मद्यमांस आवडणार असून दहा दिवसपर्यंत एकसारिखे सूतिकागृहामध्यें वास्तव्य करीत असतात ३७. कद्रू सूक्ष्म रूप धारण करून गर्भिणी स्त्रीचे ठिकाणीं प्रवेश करिते; तिच्या उदरामध्ये तो गर्भ भक्षण करिते आणि पुढे तिला सर्प होतो ३८. गंधर्वांची जी माता (रिष्टा) ती गर्भिणी स्त्रीचा गर्भ घेऊन चालती होते आणि त्यामुळें त्या गर्भिणी स्त्रीचा गर्भ जिरून जातो असें भूतलावर दृष्टोत्पत्तीस येतें ३९. अप्सरांची जी माता (मुनि) ती गर्भ घेऊन तेथेच रहाते आणि असें झालें ह्मणजे गर्भ स्तब्ध (अर्थात सल) झाला असें प्राज्ञ जन ह्मणूं लागतात ४०. लोहित समुद्राची कन्या स्कंदाची दायी होय. तिचें कदंबवृक्षाचे ठिकाणीं लोहितायनी ह्मणून पूजन करीत असतात ४१. पुरुषांमध्यें जसा रुद्र तशीच स्त्रियांमध्यें पार्वती आहे आणि ह्मणून कुमारासंबंधानें कांहीं मनोरथ सिद्धीस जाण्याकरितां माता पार्वतीचें वेगळें पूजन करीत असतात ४२. ह्याप्रमाणें मुलांचे महाग्रह मीं कथन केले. हे महाग्रह सोळा वर्षेपर्यंत मुलांना घातक असतात ४३. जे मातृगण व पुरुषग्रह कथन केले ते सर्वही स्कंदग्रह होत असें नेहमीं लोकांनीं समजावें ४४ आणि त्यांचें शमन करावें. स्नान, धूप, अंजन, पूजन व बलिदान ह्याच्या योगानें विशेषतः स्कंदाची पूजा होत असते ४५. ह्याप्रमाणें पूजन केलें असतां सर्वही ग्रह मनुष्यांना शुभ फल देतात. ह्याप्रमाणें, हे राजाधिराज, त्यांचें उत्तम रीतीनें भजनपूजन केलें असतां ते मनुष्यांना

ग्रहा नृणाम् । तानहं संप्रवक्ष्यामि नमस्कृत्य महेश्वरम् ४७ यः पश्यति नरो देवाञ्जाग्रद्वा शयितोपि वा । उन्मादयति स तु क्षिप्रं तं तु देवग्रहं विदुः ४८ आसीनश्च शयानश्च यः पश्यति नरः पितॄन् । उन्मादयति स तु क्षिप्रं स ज्ञेयस्तु पितृग्रहः ४९ अवमन्यति यः सिद्धान्क्रुद्धाश्चापि शपन्ति यम् । उन्मादयति स तु क्षिप्रं ज्ञेयः सिद्धग्रहस्तु सः ५० उपाघ्राति च यो गन्धान्रसांश्चापि पृथग्विधान् । उन्मादयति स तु क्षिप्रं स ज्ञेयो राक्षसो ग्रहः ५१ गन्धर्वाश्चापि यं दिव्याः संविशन्ति नरं भुवि । उन्मादयति स तु क्षिप्रं ग्रहो गान्धर्व एव सः ५२ अधिरोहन्ति यं नित्यं पिशाचाः पुरुषं प्रति । उन्मादयति स तु क्षिप्रं ग्रहः पैशाच एव सः ५३ आविशन्ति च यं यक्षाः पुरुषं कालपर्यये । उन्मादयति स तु क्षिप्रं ज्ञेयो यक्षग्रहस्तु सः ५४ यस्य दोषैः प्रकुपितं चित्तं मुह्यति देहिनः । उन्मादयति स तु क्षिप्रं साधनं तस्य शास्त्रतः ५५ वैक्लव्याच्च भयाच्चैव घोराणां चापि दर्शनात् । उन्मादयति स तु क्षिप्रं सान्त्वं तस्य तु साधनम् ५६ कश्चित्क्रीडितुकामो वै भोक्तुकामस्तथापरः । अभिकामस्तथैवान्य इत्येष

आयुष्य व वीर्य देतात ४६. आतां सोळा वर्षांनंतर जे ग्रह मनुष्यांना ग्रस्त करीत असतात ते मी महेश्वराला नमस्कार करून कथन करितो ४७. जागा अथवा निद्रिस्त असतांना ज्याच्या देव दृष्टीं पडतात तो लागलाच उन्मत्त होतो व त्याला देवग्रह असें ह्मणतात ४८. बसला असतांना आणि निजला असतांना जो मनुष्य पितरांना अवलोकन करितो तो सत्वर उन्मत्त होतो आणि तो पितृग्रह असें समजावें ४९. जो सिद्धांचा अवमान करितो आणि ज्याला ते क्रुद्ध होऊन शाप देतात तो सत्वर उन्मत्त होतो व त्याला सिद्धग्रह असें समजावें ५०. नानाप्रकारचे गंध व रस सेवन केल्याबरोबर उन्माद होणें हें राक्षसग्रहाचें चिन्ह समजावें ५१. दिव्य गंधर्व भूतलावरील पुरुषाला झपाटतात आणि त्यामुळें त्याला सत्वर उन्माद होतो तो गांधर्वग्रहच होय ५२. पिशाच नेहमीं बोकांडीस बसत असल्यामुळें सत्वर उन्माद होणें हें पैशाचग्रहाचें लक्षण होय ५३. नियमित काळ झाला असतां शरीरामध्यें यक्षांचा संचार झाल्यामुळें जो उन्माद होतो तें यक्षग्रहाचें लक्षण होय ५४. वातपित्तादि दोषांचा प्रकोप झाल्यामुळें ज्या पुरुषाला मूर्च्छा येऊन उन्माद होतो त्या रोगाची चिकित्सा वैद्यशास्त्रानें साध्य आहे ५५. गोंधळून गेल्यामुळें, भीति वाटल्यामुळें अथवा कांहीं भयंकर प्रकार दृष्टीं पडल्यामुळें ज्याला उन्माद होतो त्याचें सांत्वन करणें हीच त्याची चिकित्सा होय ५६. कोणी क्रीडा करण्याची इच्छा धरणारा; कोणी उपभोगाची

त्रिविधो ग्रहः ५७ यावत्सप्ततिवर्षाणि भवन्त्येते ग्रहा नृणाम् । अतः परं देहिनां तु ग्रहतुल्यो भवेज्ज्वरः ५८ अप्रकीर्णेन्द्रियं दान्तं शुचिं नित्यमतन्द्रितम् । आस्तिकं श्रद्दधानं च वर्जयन्ति सदा ग्रहाः ५९ इत्येष ते ग्रहोद्देशो मानुषाणां प्रकीर्तितः । न स्पृशन्ति ग्रहा भक्तान्नरान्देवं महेश्वरम् ६० [१०३७] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यामारण्यके पर्वणि मार्कण्डेयसमास्यापर्वण्याङ्गिरसे मनुष्यग्रहकथने त्रिंशदधिकद्विशततमोऽध्यायः ॥ २३० ॥

मार्कण्डेय उवाच ॥ यदा स्कन्देन मातृणामेव मेतत्प्रियं कृतम् । अथैनमब्रवीत्स्वाहा मम पुत्रस्त्वमौरसः १ इच्छाम्यहं त्वया दत्तां प्रीतिं परमदुर्लभाम् । तामब्रवीत्ततः स्कन्दः प्रीतिमिच्छसि कीदृशीम् २ स्वाहोवाच ॥ दक्षस्याहं प्रिया कन्या स्वाहा नाम महाभुज । बाल्यात्प्रभृति नित्यं च जातकामा हुताशने ३ न स मां कामिनीं पुत्र सम्यग्जानाति पावकः । इच्छामि शाश्वतं वासं वस्तुं पुत्र सहाग्निना ४ स्कन्द उवाच ॥ हव्यं कव्यं च यत्किं-

---

इच्छा करणारा आणि कोणी हरण करून नेण्याची इच्छा करणारा असे प्रत्येक ग्रहामध्यें तीन भेद आहेत ५७. सत्तर वर्षेंपर्यंत मनुष्यांना हे ग्रह त्रास देत असतात आणि ह्यानंतर मनुष्याना ज्वरच ग्रहाप्रमाणें पीडा देऊं लागतो ५८. जितेंद्रिय, मनोनिग्रही, शुचि, नेहमीं सावधपणानें वागणारा, आस्तिक आणि श्रद्धालु अशा पुरुषाला ग्रह कधींच पीडा करीत नाहींत ५९. असो. मनुष्यांना त्रास देणाऱ्या ग्रहांचें हें आख्यान मीं तुला कथन केलें. देवाधिदेव महेश्वराचे जे भक्त असतात त्या पुरुषांना ग्रह कधीं स्पर्श करीत नाहींत ६०. ह्याप्रमाणें महर्षिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील मार्कंडेयसमास्यापर्वांपैकीं आंगिरसोपाख्यानसंबंधीं मनुष्यांचे ग्रह कथन करण्याविषयीं दोनशें तिसावा अध्याय समाप्त झाला ॥ २३० ॥

मार्कंडेय सांगतातः—जेव्हां स्कंदानें मातांचा ह्याप्रमाणें मनोरथ परिपूर्ण केला तेव्हां स्वाहा त्याला ह्मणाली "तूं माझा औरस पुत्र आहेस १. ह्यास्तव, अत्यंत दुर्लभ अशी प्रीति तुझ्यामुळें प्राप्त होण्याची माझी इच्छा आहे." ह्यावर "कशा प्रकारची प्रीति तुला हवी आहे ? " असें स्कंदानें विचारिलें असतां स्वाहा ह्मणाली २ " हे महापराक्रमी स्कंदा, मी दक्षप्रजापतीची स्वाहा नामक प्रिय कन्या आहें. मला बालपणापासूनच अग्नीविषयीं नेहमीं विषयवासना उत्पन्न होत असे ३; परंतु, हे पुत्रा, मी त्याची इच्छा करीत आहें हें त्या अग्नीला अद्यापी चांगलेंसें समजत नाहीं. तस्मात्, हे पुत्रा, अग्नीबरोबर अक्षय्य वास्तव्य करण्याची माझी इच्छा आहे " ४. स्कंद ह्मणाला "सदाचरणसंपन्न

चिद्विजा मन्त्रपुरस्कृतम् । होष्यन्त्यग्नौ सदा देवि स्वाहेत्युक्त्वा समुद्धृतम् ५
अद्यप्रभृति दास्यन्ति सुवृत्ताः सत्पथे स्थिताः । एवमग्निस्त्वया सार्धं सदा
वत्स्यति शोभने ६ मार्कण्डेय उवाच ॥ एवमुक्ता ततः स्वाहा तुष्टा
स्कन्देन पूजिता । पावकेन समायुक्ता भर्त्रा स्कन्दमपूजयत् ७ ततो ब्रह्मा
महासेनं प्रजापतिरथाब्रवीत् । अभिगच्छ महादेवं पितरं त्रिपुरार्दनम् ८
रुद्रेणाग्निं समाविश्य स्वाहामाविश्य चोमया । हितार्थं सर्वलोकानां
जातस्त्वमपराजितः ९ उमायोन्यां च रुद्रेण शुक्रं सिक्तं महात्मना ।
अस्मिन्गिरौ निपतितमिञ्जिकामिञ्जिकं यतः १० संभूतं लोहितोदे तु
शुक्रशेषमवापतत् । सूर्यरश्मिषु चाप्यन्यदन्यच्चैवापतद्भुवि । आसक्तमन्य-
द्वृक्षेषु तदेवं पञ्चधापतत् ११ तत्र ते विविधाकारा गणा ज्ञेया मनीषिभिः ।
तव पारिषदा घोरा य एते पिशिताशिनः १२ एवमस्त्विति चाप्युक्त्वा
महासेनो महेश्वरम् । अपूजयदमेयात्मा पितरं पितृवत्सलः १३ मार्क-
ण्डेय उवाच ॥ अर्कपुष्पैस्तु ते पञ्च गणाः पूज्या धनार्थिभिः । व्याधि-

---

व सन्मार्गानें वागणारे द्विज जें कांहीं द्रव्य देवांना अथवा पितरांना उद्देशून अग्नीमध्यें हवन करीत असतात तें हातांत घेतलेलें द्रव्य आजपासून, हे देवि, " स्वाहा " असें ह्मणूनच ते अग्नीमध्यें अर्पण करितील आणि असें झालें असतां, हे कल्याणिं, अग्नि तुझ्याबरोबर नेहमीं वास्तव्य करील " ५,६. मार्कंडेय सांगतातः—ह्याप्रमाणें स्कंदानें प्रार्थनेला मान दिला असतां व ह्याप्रमाणें भाषण केलें असतां स्वाहा संतुष्ट झाली आणि भर्त्या अग्नीशीं तिचा समागम झाल्यावर तिनें स्कंदाचें पूजन केलें ७. तदनंतर प्रजाधिपति ब्रह्मदेव महासेनाला ह्मणाले " त्रिपुरासुरनाशक जो तुझा पिता महादेव त्याच्याकडे तूं सत्वर जा ८. कारण, सर्व लोकांच्या हिताकरितां रुद्रानें अग्नीचे ठिकाणीं आणि उमेनें स्वाहचे ठिकाणीं प्रवेश केल्यामुळें तूं अजिंक्य पुत्र उत्पन्न झाला आहेस ९. महात्म्या रुद्रानें उमेचे ठिकाणीं सिंचन केलेलें वीर्य ह्या पर्वतावर पडलें व त्यामुळें मिंजिकामिंजिकसंज्ञक स्त्रीपुरुष उत्पन्न झाले १०. त्या विपुल वीर्याचा कांहीं अवशिष्ट भाग लोहितसमुद्रामध्यें पडला; सूर्य किरणामध्येंही कांहीं गेला; कांहीं भूमीवर पडला आणि कांहीं वृक्षामध्यें अडकून राहिला. ह्याप्रमाणें तें वीर्य पांच प्रकारांनीं पडलें ११. ज्या ज्या ठिकाणीं तें वीर्य पडलें त्या त्या ठिकाणीं नानाप्रकारचीं रूपें धारण करणारे गण उत्पन्न झाले असें विचारी लोकांनीं समजावें. मांसभक्षक असे जे तुझे घोर पारिषद ते तेच गण होत " १२. ह्यावर " ठीक आहे " असें ह्मणून महात्म्या पितृवत्सल महासेनानें पित्या महेश्वराचें पूजन केलें १३. मार्कंडेय सांगतातः—

प्रशमनार्थं च तेषां पूजां समाचरेत् १४ मिञ्जिकामिञ्जिकं चैव मिथुनं रुद्रसंभवम् । नमस्कार्यं सदैवेह बालानां हितमिच्छता १५ स्त्रियो मानुषमांसादा वृद्धिका नाम नामतः । वृक्षेषु जातास्ता देव्यो नमस्कार्याः प्रजार्थिभिः १६ एवमेते पिशाचानामसंख्येया गणाः स्मृताः । घण्टायाः सपताकायाः शृणु मे संभवं नृप १७ ऐरावतस्य घण्टे द्वे वैजयन्त्याविति श्रुते । गुहस्य ते स्वयं दत्ते शक्रेणानाय्य धीमता १८ एका तत्र विशाखस्य घण्टा स्कन्दस्य चापरा । पताका कार्तिकेयस्य विशाखस्य च लोहिता १९ यानि क्रीडनकान्यस्य देवैर्दत्तानि वै तदा । तैरेव रमते देवो महासेनो महाबलः २० स संवृतः पिशाचानां गणैर्देवगणैस्तथा । शुशुभे काञ्चने शैले दीप्यमानः श्रिया वृतः २१ तेन वीरेण शुशुभे स शैलः शुभकाननः । आदित्येनेवांशुमता मन्दरश्चारुकन्दरः २२ संतानकवनैः फुल्लैः करवीरवनैरपि । पारिजातवनैश्चैव जपाशोकवनैस्तथा २३ कद-

---

धनार्थी लोकांनीं रुईच्या पुष्पांनी त्या पांच गणांचें पूजन करावें आणि रोगशमनार्थही पुरुषानें त्यांची पूजा करावी १४. मिंजिकामिंजिकसंज्ञक जें रुद्रापासून उत्पन्न झालेलें दंपत्य त्याला सर्वदां येथें बालाचे हित इच्छिणाऱ्यानें नमस्कार करावा १५. वृक्षांचे ठिकाणीं जें वीर्य राहिलें त्याच्यापासून नांवानें वृद्धिका ह्मणून प्रसिद्ध अशा मनुष्यमांसभक्षक स्त्रिया वृक्षाचे ठिकाणीं उत्पन्न झाल्या आहेत. त्या देवतानाही संतानेच्छु लोकांनीं वंदन करीत जावें १६. ह्याप्रमाणें पिशाचांचे असंख्य गण उत्पन्न झालेले आहेत. आतां, हे राजा, पताकेसहवर्तमान घंटेचा जन्म कसा झाला हें तूं श्रवण कर १७. वैजयंती ह्मणून ऐरावताच्या दोन घंटा प्रसिद्ध होत्या. त्या विचारी इंद्रानें स्वतः आणवून कार्तिकेयाला दिल्या १८. त्यांपैकीं एक घंटा स्कंदाला दिली आणि एक त्याच्या विशाखसंज्ञक पार्षदाला दिली. स्कंदाला दिलेली वैजयंती घंटा पताका होय आणि विशाखाला दिलेली लोहिता होय १९. जीं जीं कांहीं खेळणीं त्यावेळीं देवांनीं त्याला दिलीं त्यांच्याचबरोबर तो महाबलाढ्य देव महासेन आपलें चित्तरंजन करूं लागला २०. पिशाचगण आणि देवगण ह्यांनीं अच्छादून जाऊन श्रीनें व्याप्त असल्यामुळें देदीप्यमान झालेला तो महासेन त्या सुवर्णपर्वतावर शोभूं लागला २१. आदितिपुत्र सूर्याच्या योगानें ज्याप्रमाणें मनोहर गुहांनीं युक्त असलेला मंदर पर्वत शोभूं लागतो त्याप्रमाणें शुभ वनांनीं युक्त असलेला तो पर्वत त्या वीराच्या योगानें शोभूं लागला. २२. प्रफुल्लित झालेलीं संतानकसंज्ञक देववृक्षांचीं वनें, कण्हेरीचीं वनें, पारिजातांचीं वनें, जास्वंदीचीं अरण्यें, अशोकवृक्षांचीं वनें २३, कदंब वृक्षाचीं वनें आणि

श्वेतरुषण्डैश्च दिव्यैर्मृगगणैरपि । दिव्यैः पक्षिगणैश्चैव शुशुभे श्वेतप-
र्वतः २४ तत्र देवगणाः सर्वे सर्वे देवर्षयस्तथा । मेघतूर्यरवाश्चैव क्षुब्धो-
दधिसमस्वनाः २५ तत्र दिव्याश्च गन्धर्वा नृत्यन्तेऽप्सरसस्तथा । हृष्टानां तत्र
भूतानां श्रूयते निनदो महान् २६ एवं सेन्द्रं जगत्सर्वं श्वेतपर्वतसंस्थितम् ।
प्रहृष्टं प्रेक्षते स्कन्दं न च ग्लायति दर्शनात् २७ मार्कंडेय उवाच ॥ यदाभिषि-
क्तो भगवान्सैनापत्येन पावकिः। तदा संप्रस्थितः श्रीमान्हृष्टो भद्रवटं हरः २८
रथेनादित्यवर्णेन पार्वत्या सहितः प्रभुः । सहस्रं तस्य सिंहानां तस्मिन्युक्तं
रथोत्तमे २९ उत्पपात दिवं शुभ्रं कालेनाभिप्रचोदितम् ३० ते पिबन्त
इवाकाशं त्रासयन्तश्चराचरान् । सिंहा नभस्यगच्छन्त नदन्तश्चारुके-
सराः ३१ तस्मिन्रथे पशुपतिः स्थितो भात्युमया सह । विद्युता सहितः
सूर्यः सेन्द्रचापे घने यथा ३२ अग्रतस्तस्य भगवान्धनेशो गुह्यकैः सह ।
आस्थाय रुचिरं याति पुष्पकं नरवाहनः ३३ ऐरावतं समास्थाय शक्र-
श्चापि सुरैः सह । पृष्ठतोनुययौ यान्तं वरदं वृषभध्वजम् ३४ जृम्भकैर्यक्ष-

---

दिव्य मृगगण व दिव्य पक्षिगण ह्यांच्यायोगानें तो श्वेत पर्वत शोभूं लागला २४. त्या ठिकाणीं सर्व देवगण आणि सर्व देवर्षि मेघांप्रमाणें वाद्याचा घोष करूं लागले असतां क्षुब्ध होऊन गेलेल्या समुद्राप्रमाणें त्यांचा ध्वनि होऊं लागला २५ त्या ठिकाणीं दिव्य गंधर्व आणि अप्सरा नृत्य करूं लागल्या आणि आनंदित झालेल्या इतर प्राण्यां-चीही मोठी गर्जना ऐकूं येऊ लागली २६. ह्याप्रमाणें इंद्रासहवर्तमान आनंदित झालेलें सर्व जगत् श्वेतपर्वतावर येऊन स्कंदाकडे पाहूं लागले व त्याला पाहण्याचा त्यांना कंटाळाही येईनासा झाला २७. मार्कंडेय सांगतातः--जेव्हां अग्निपुत्र भगवान् स्कंदाला सैनापत्याचा अभिषेक केला तेव्हां श्रीमान् प्रभु हर आनंदित होऊन व पार्वतीसहवर्तमान सूर्यवर्ण रथामध्यें आरुढ होऊन भद्रवटाकडे निघाले. त्यावेळीं त्यांच्या त्या श्रेष्ठ रथाला सहस्र सिंह जोडिले असून २८,२९ कालाची प्रेरणा झालेले ते शुभ्रवर्ण सिंह स्वर्गामध्यें उड्या मारीत निघाले ३०. मनोहर केसरांनीं युक्त असलेले आणि जसे कांहीं आकाश गट्ट करूनच टाकीत आहेत कीं काय असें भासत असलेले ते सिंह गर्जना करीत असल्यामुळें चराचर प्राण्यांना त्रस्त करीत करीत आकाशामध्यें चालले ३१. त्या रथावर पार्वतीसहवर्तमान आरूढ झालेले शंकर इंद्रधनुष्यासहवर्त-मान असलेल्या मेघावर विद्युल्लतेसहवर्तमान आरूढ झालेल्या सूर्याप्रमाणें दिसत होते ३२. त्या शंकरांचे अग्रभागीं नरवाहन भगवान् धनाधिपति कुबेर मनोहर पुष्पकविमानामध्यें आरूढ होऊन गुह्यकांसहवर्तमान चालला होता ३३. वृषभध्वज वरप्रद शंकर निघाले

रक्षोभिः स्रग्विभिः समलंकृतः । यात्यमोघो महायक्षो दक्षिणं पक्ष-
मास्थितः ३५ तस्य दक्षिणतो देवा सहवश्चित्रयोधिनः । गच्छन्ति वसुभिः
सार्धं रुद्रैश्च सह संगताः ३६ यमश्च मृत्युना सार्धं सर्वतः परिवारितः ।
घोरैर्व्याधिशतैर्याति घोररूपवपुस्तथा ३७ यमस्य पृष्ठतश्चैव घोरस्त्रिशि-
खरः शितः । विजयो नाम रुद्रस्य याति शूलः स्वलंकृतः ३८ तमुग्रपाशो
वरुणो भगवान्सलिलेश्वरः । परिवार्य शनैर्याति यादोभिर्विविधै-
र्वृतः ३९ पृष्ठतो विजयस्यापि याति रुद्रस्य पट्टिशः । गदामुसलशक्त्या-
द्यैर्वृतः प्रहरणोत्तमैः ४० पट्टिशं त्वन्वगाद्राजंश्छत्रं रौद्रं महाप्रभम् ।
कमण्डलुश्चाप्यनु तं महर्षिगणसेवितः ४१ तस्य दक्षिणतो भाति दण्डो
गच्छञ्छ्रिया वृतः । भृग्वङ्गिरोभिः सहितो दैवतैश्चानुपूजितः ४२ एषां
तु पृष्ठतो रुद्रो विमले स्यन्दने स्थितः । याति संहर्षयन्सर्वांस्तेजसा त्रिदि-
वौकसः ४३ ऋषयश्चापि देवाश्च गन्धर्वा भुजगास्तथा । नद्यो ह्रदाः
समुद्राश्च तथैवाप्सरसां गणाः ४४ नक्षत्राणि ग्रहाश्चैव देवानां शिशु-

---

असतां ऐरावतावर आरूढ होऊन इंद्रही देवांसहवर्तमान त्यांच्या मागोमाग चालला ३४. माला धारण केलेले जृंभक, यक्ष व राक्षस ह्यांसहवर्तमान भूषित झालेला अमोघसंज्ञक महायक्षही उजवी बाजू धरून बरोबर चालला ३५ त्या शंकराबरोबर अद्भुत युद्ध करणारे असंख्य देव अष्ट वसु आणि एकादश रुद्र ह्यांसहवर्तमान त्याच्या उजव्या बाजूनें चालले ३६. शेंकडों घोर व्याधींच्या योगानें सर्व बाजूंनीं परिवेष्टित झालेला यम उग्र मुद्रा व घोर रूप धारण करून मृत्यूसहवर्तमान बरोबर चालला ३७. तीन शिखरांनीं युक्त, उत्तम रीतीनें सजविलेला आणि पाजळून तयार ठेविलेला रुद्राचा विजयनामक भयंकर शूल यमाच्या मागोमाग चालला ३८. नानाप्रकारच्या जलचरांनीं युक्त असलेला व उग्र पाश हातामध्यें धारण केलेला जलाधिपति भगवान् वरुण त्याच्याभोंवतीं गराडा देऊन हळूं हळू चालला ३९. विजयशूलाच्या मागोमाग गदा, मुसल, शक्ति इत्यादि श्रेष्ठ श्रेष्ठ आयुधांनीं परिवेष्टित असलेला रुद्राचा पट्टा चालला होता ४०. हे राजा, अत्यंत तेजस्वी असें रुद्राचें छत्र पट्ट्याच्या मागोमाग चाललें आणि त्याच्या मागोमाग महर्षिगणांनीं स्वीकारिलेला कमंडलु चालला ४१. कांतीनें युक्त असलेला दंड त्या देवाच्या उजव्या बाजूनें जातांना झळकत होता व त्याच्या बरोबर भृगु, अंगिरा वगैरे मुनि असून देव त्याची स्तुतिही करीत होते ४२. ह्या सर्वांच्या मागून निर्मल रथावर आरूढ झालेला रुद्र तेजानें सर्व देवांना हर्ष उत्पन्न करीत करीत चालला होता ४३. ऋषि, देव, गंधर्व, भुजंग, नद्या, तळीं, समुद्र

श्च ये । स्त्रियश्च विविधाकारा यान्ति रुद्रस्य पृष्ठतः ४५ सुजन्त्यः पुष्पवर्षाणि चारुरूपा वराङ्गनाः । पर्जन्यश्चाप्यनुययौ नमस्कृत्य पिनाकिनम् ४६ छत्रं च पाण्डुरं सोमस्तस्य मूर्धन्यधारयत् । चामरं चापि वायुश्च गृहीत्वाग्निश्च धिष्ठितौ ४७ शक्रश्च पृष्ठतस्तस्य याति राजञ्छ्रिया वृतः । सह राजर्षिभिः सर्वैः स्तुवानो वृषकेतनम् ४८ गौरीविद्याथ गान्धारी केशिनी मित्रसाह्वया । सावित्र्या सह सर्वास्ताः पार्वत्या यान्ति पृष्ठतः ४९ तत्र विद्यागणाः सर्वे ये केचित्कविभिः कृताः । तस्य कुर्वन्ति वचनं सेन्द्रा देवाश्चमूमुखे ५० गृहीत्वा तु पताकां वै यात्यग्रे राक्षसो ग्रहः । व्यापृतस्तु श्मशाने यो नित्यं रुद्रस्य वै सखा ५१ पिङ्गलो नाम यक्षेन्द्रो लोकस्यानन्ददायकः । एभिश्च सहितो देवस्तत्र याति यथासुखम् ५२ अग्रतः पृष्ठतश्चैव न हि तस्य गतिर्ध्रुवा । रुद्रं सत्कर्मभिर्मर्त्याः पूजयन्तीह दैवतम् ५३ शिवमित्येव यं प्राहुरीशं रुद्रं पितामहम् । भावैस्तु विविधाकारैः पूजयन्ति महेश्वरम् ५४ देवसेनाप-

---

(ह्यांच्या अधिष्ठात्र्या देवता), अप्सरांचे गण ४४, नक्षत्रें, ग्रह, देवकुमार आणि नानाप्रकारचीं रूपें धारण केलल्या स्त्रिया रुद्राच्या मागोमाग चालल्या ४५ मनोहर रूप धारण केलेल्या श्रेष्ठ स्त्रिया पुष्पवृष्टि करीत करीत रुद्राच्या पाठोपाठ चालल्या व पिनाकपाणी शंकराला नमस्कार करून पर्जन्यही त्याच्या मागोमाग जाऊं लागला ४६ श्वेतवर्ण छत्र चंद्रानें त्याचे मस्तकीं धारण केलेलें होतें. अग्नि व वायु हे उभयतां चवऱ्या घेऊन उभे राहिलेले होते ४७. हे राजा, कांतीनें युक्त असलेला इंद्र वृषभध्वज शंकराची सर्व राजर्षिसहवर्तमान स्तुति करीत करीत त्याच्या मागोमाग चालला ४८. गौरी, विद्या, गांधारी, केशिनी व मित्रसाह्वा ह्या सर्व सावित्रीसहवर्तमान पार्वतीच्या मागोमाग चालल्या ४९. कवींनीं केलेले जे कांहीं विद्यागण तेही पार्वतीच्या मागोमाग चालले व सैन्यामध्ये इंद्रासहवर्तमान सर्वही देव त्या शंकराची आज्ञा मान्य करूं लागले ५०. श्मशानामध्यें जो नेहमीं मढून मेलेला असतो, जो रुद्राचा सखा आहे, पिंगल हें ज्याचें नांव आहे आणि यक्षाधिपति असून जो जगताला आनंद देणारा आहे असा एक राक्षस ग्रह पताका घेऊन पुढें चालला आणि त्याच्याबरोबर देवाधिदेव शंकर स्वर्गामध्यें स्वेच्छेनें निघाले ५१, ५२. असो. शंकराच्या पुढें अथवा मागें गमन होणें (पुण्यसंचयाशिवाय) निश्चित नाहीं. सत्कर्मांच्या योगानें मानव इहलोकीं मुख्य दैवत ह्मणून रुद्राचेंच पूजन करितात ५३. त्याला कोणी शिवच ह्मणतात आणि कोणी ईश, कोणी रुद्र व कोणी पितामह असेंही ह्मणतात. सारांश, नानाप्रकारच्या भावनांनीं लोक

तिस्त्वेवं देवसेनाभिरावृतः । अनुगच्छति देवेशं ब्रह्मण्यः कृत्तिकासुतः ५५
अथाब्रवीन्महासेनं महादेवो बृहद्वचः । सप्तमं मारुतस्कन्धं रक्ष नित्य-
मतन्द्रितः ५६ स्कन्द उवाच ॥ सप्तमं मारुतस्कन्धं पालयिष्याम्यहं
प्रभो । यदन्यदपि मे कार्यं देव तद्वद मा चिरम् ५७ रुद्र उवाच ॥
कार्येष्वहं त्वया पुत्र संद्रष्टव्यः सदैव हि । दर्शनान्मम भक्त्या च श्रेयः
परमवाप्स्यसि ५८ मार्कण्डेय उवाच ॥ इत्युक्त्वा विससर्जैनं परिष्वज्य
महेश्वरः । विसर्जिते ततः स्कन्दे बभूवौत्पातिकं महत् ५९ सहसैव
महाराज देवान्सर्वान्प्रमोहयत् । जज्वाल खं सनक्षत्रं प्रमूढं भुवनं
भृशम् ६० चचाल व्यनदच्चोर्वी तमोभूतं जगद्बभौ । ततस्तद्दारुणं दृष्ट्वा
क्षुभितः शंकरस्तदा । उमा चैव महाभागा देवाश्च समहर्षयः ६१ तत-
स्तेषु प्रमूढेषु पर्वताम्बुदसंनिभम् । नानाप्रहरणं घोरमदृश्यत महद्ब-
लम् ६२ तद्वै घोरमसंख्येयं गर्जच्च विविधा गिरः । अभ्यद्रवद्रणे
देवान्भगवन्तं च शंकरम् ६३ तैर्विसृष्टान्यनीकेषु बाणजालान्यनेकशः ॥

महेश्वराचें पूजन करीत असतात ५४. देवसेनांनीं परिवेष्टित असलेला ब्राह्मणप्रिय कृत्तिकापुत्र देवसेनाधिपतिही ह्याप्रमाणें देवाधिदेव शंकराच्या मागोमाग चालला असतां ५५ " सप्तम वायुस्कंधाचें तूं नेहमीं तत्पर राहून रक्षण करीत जा " असें महत्त्वाचें भाषण महादेवांनीं त्या महासेनाशीं केलें ५६ स्कंद ह्मणाला " हे प्रभो, सातव्या मारुतस्कंधाचें मी परिपालन करीन. हे देवा, आणखीही जें कांहीं माझें कर्तव्य असेल तें आपण मला विलंब न लावितां सत्वर सांगा " ५७. रुद्र ह्मणतातः—हे पुत्रा, कार्य उपस्थित झालें असतां तूं माझें नेहमीं दर्शन घेत जा ह्मणजे माझ्या दर्शनाच्या योगानें व भक्तीच्या योगानें तुझें उत्कृष्ट कल्याण होईल ५८. मार्कंडेय ह्मणतातः— ह्याप्र-माणें सांगितल्यावर स्कंदाला आलिंगन देऊन शंकरांनीं त्याला जाण्यास अनुज्ञा दिली, परंतु, स्कंदाला जाण्याची अनुज्ञा झाल्याबरोबर तेथें मोठमोठे उत्पात होऊं लागले ५९. हे महाराजा, नक्षत्रांसहवर्तमान सर्व आकाशमंडल प्रज्वलित झालें आणि त्याच्या योगानें सर्व देवांना मूर्छा येऊन जगत्ही अत्यंत मूर्छित झालें ६०. पृथ्वी चळूं लागून गर्जना करूं लागली आणि सर्व जगत् अंधकारानें व्याप्त होऊन गेलें. तदनंतर ते भयंकर उत्पात अवलोकन करून शंकर, महाभाग्यवती उमा आणि महर्षींसहवर्तमान देव क्षुब्ध झाले ६१. ह्याप्रमाणें त्या सर्व देवांना अगदीं कांहीं सुचेनासें झालें असतां नाना-प्रकारचीं शस्त्रें हातांत घेतलेलें एक मोठें घोर सैन्य त्यांच्या दृष्टीं पडलें ६२. तें असंख्य घोर सैन्य नानाप्रकारच्या शब्दांनीं गर्जना करीत करीत रणामध्यें देवांवर आणि

पर्वताश्च शतघ्न्यश्च प्रासासिपरिघा गदाः ६४ निपतद्भिश्च तैर्घोरैर्देवानीकं महायुधैः । क्षणेन व्यद्रवत्सर्वं विमुखं चाप्यदृश्यत ६५ निकृत्तयोधनागाश्वं कृत्तायुधमहारथम् । दानवैरर्दितं सैन्यं देवानां विमुखं बभौ ६६ असुरैर्वध्यमानं तत्पावकैरिव काननम् । अपतद्दग्धभूयिष्ठं महाद्रुमवनं यथा ६७ ते विभिन्नशिरोदेहाः प्राद्रवन्तो दिवौकसः । न नाथमधिगच्छन्ति वध्यमाना महारणे ६८ अथ तद्विद्रुतं सैन्यं दृष्ट्वा देवः पुरन्दरः । आश्वासयन्नुवाचेदं बलभिद्दानवार्दितम् ६९ भयं त्यजत भद्रं वः शूराः शस्त्राणि गृह्णत । कुरुध्वं विक्रमे बुद्धिं मा वः काचिद्व्यथा भवेत् ७० जयतनान्सुदुर्वृत्तान्दानवान्घोरदर्शनान् । अभिद्रवत भद्रं वो मया सह महासुरान् ७१ शक्रस्य वचनं श्रुत्वा समाश्वस्ता दिवौकसः । दानवान्प्रत्ययुध्यन्त शक्रं कृत्वा व्यपाश्रयम् ७२ ततस्ते त्रिदशाः सर्वे मरुतश्च महाबलाः । प्रत्युद्ययुर्महाभागाः साध्याश्च वसुभिः सह ७३ तैर्विसृष्टान्यनीकेषु क्रुद्धैः शस्त्राणि संयुगे । शराश्च

भगवान् शंकरावर धावून गेलें ६३. त्यांनीं अनेक वेळां सैन्यावर बाणसमुदाय, पर्वत, शतघ्नी, प्रास, खड्ग, परिघ आणि गदा हीं फेंकिली ६४ आणि तीं प्रचंड घोर आयुधें येऊं लागलीं असतां एका क्षणांत सर्वही देवसैन्य पळून जाऊन पराङ्मुख झालेलें दिसूं लागलें ६५ साराश, योद्धे, गज, अश्व, आयुध आणि महारथि ह्यांचे ज्यांत तुकडे तुकडे उडून गेले आहेत असें तें दानवांनीं पीडिलेलें देवसैन्य पराङ्मुख झालें ६६. मोठ्या मोठ्या वृक्षसमुदायांनीं भरलेले अरण्य अग्नींनी बहुतक दग्ध करून टाकिलें असतां ज्याप्रमाणें खालीं पडतें त्याप्रमाणें असुरांच्या हातून वध पावूं लागलेलें तें देवसैन्य (पटापट) खालीं पडूं लागलें ६७. ज्यांचीं मस्तकें व शरीरें फुटून गेलीं आहेत व ज्यांचा वध होत आहे असे ते देव पळूं लागले असतां त्या महारणामध्यें त्यांना कोणीही रक्षक मिळेना ६८. तेव्हां दानवांनीं त्रस्त केल्यामुळें पळत सुटलेलें तें देवसैन्य अवलोकन केल्यावर धीर देण्याकरितां बलदैत्यनाशक देव इंद्र त्याला ह्मणाला ६९ “ भय सोडा; तुमचें कल्याण असो. शूरहो, शस्त्रें घ्या आणि पराक्रम करण्याचा निश्चय करा; मनामध्यें कांहीं एक शंका बाळगूं नका ७०. ह्या अत्यंत दुराचारी आणि दिसण्यांत भयंकर असलल्या दानवांना जिंका; तुमचें कल्याण असो. माझ्यासहवर्तमान तुह्मी ह्या महादैत्यांवर चाल करा ” ७१. हें इंद्राचें भाषण श्रवण केल्यावर देवांना धीर आला आणि इंद्राचा आश्रय करून ते दैत्यांशीं लढूं लागले ७२. तदनंतर ते सर्वही देव, महाबलाढ्य मरुद्गण आणि

दैत्यकायेषु पिबन्ति रुधिरं बहु ७४ तेषां देहान्विनिर्भिद्य शरास्ते निशि-
तास्तदा। निपतन्तोऽभ्यदृश्यन्त नगेभ्य इव पन्नगाः ७५ तानि दैत्यशरीराणि
निर्भिन्नानि स्म सायकैः। अपतन्भूतले राजंश्छिन्नाभ्राणीव सर्वशः ७६ तत-
स्तद्दानवं सैन्यं सर्वैर्देवगणैर्युधि । त्रासितं विविधैर्बाणैः कृतं चैव
पराङ्मुखम् ७७ अथोत्क्रुष्टं तदा हृष्टैः सर्वैर्देवैरुदायुधैः । संहतानि च
तूर्याणि प्रावाद्यन्त ह्यनेकशः ७८ एवमन्योन्यसंयुक्तं युद्धमासीत्सुदारुणम्।
देवानां दानवानां च मांसशोणितकर्दमम् ७९ अनया देवलोकस्य सह-
सैवाभ्यदृश्यत । तथा हि दानवा घोरा विनिघ्नन्ति दिवौकसः ८० तत-
स्तूर्यप्रणादाश्च भेरीणां च महास्वनाः । बभूवुर्दानवेन्द्राणां सिंहनादाश्च
दारुणाः ८१ अथ दैत्यबलाद्घोरान्निष्पपात महाबलः। दानवो महिषो नाम
प्रगृह्य विपुलं गिरिम् ८२ त तं घनैरिवादित्यं दृष्ट्वा संपरिवारितम् ।
तमुद्यतगिरिं राजन्व्यद्रवन्त दिवौकसः ८३ अथाभिद्रुत्य महिषो देवा-

---

अष्टवसूसहवर्तमान महाभाग्यवान् साध्य युद्धाकरितां सज्ज झाले ७३ आणि संग्रामामध्ये त्या क्रुद्ध देवांनीं दैत्यसेनांवर सोडिलेली शस्त्रें व बाण दैत्यशरीरांचे ठिकाणीं विपुल रक्त प्राशन करूं लागले ७४. देवांचे ते घासलेले बाण दैत्यांचे देह भेदून बाहेर पडत असताना वृक्षांतून बाहेर पडणाऱ्या सर्पांप्रमाणें दिसू लागले ७५ आणि, हे राजा, बाणांनीं विदीर्ण झालेली तीं दैत्यांचीं शरीरें चोहोंकडे वायूनें छिन्नभिन्न होऊन गेलेल्या अभ्रांप्रमाणें दिसू लागलीं व भूतलावर पडलीं ७६. तदनंतर सर्व देवगणांनीं नानाप्रकारच्या बाणांच्या योगानें तें दानवसैन्य युद्धामध्यें त्रस्त करून पराङ्मुख केलें असतां ७७ आनंदित झालेल्या त्या सर्व देवांनीं आयुधें उगारून मोठी गर्जना केली आणि अनेक प्रकारचीं वाद्यें एकदम वाजूं लागलीं ७८. ह्याप्रमाणें देव आणि दानव ह्यांमध्यें एकमेकांची अगदीं भीड होऊन अति भयंकर युद्ध झालें व त्या युद्धामध्यें मांस व रक्त ह्यांचा अगदीं रेंदा होऊन गेला ७९; व (विजयी झालेल्या)देवलोकाचे अन्याय्य वर्तनही एकदम दृष्टोत्पत्तीस येऊं लागलें. असो. त्याचप्रमाणें घोर दानवही देवांचा वध करूं लागले असतां ८० वाद्यांचे ध्वनि व दुंदुभींच्या मोठ्या गर्जना सुरू झाल्या आणि दानवाधिपतींचे भयंकर सिंहनादही होऊं लागले ८१. नंतर त्या घोर दैत्यसेनेंतून एक महाबलाढ्य महिषनामक दानव प्रचंड पर्वत हातांत घेऊन बाहेर पडला ८२. मेघांनीं आच्छादिलेल्या सूर्याप्रमाणें दैत्यांनी परिवेष्टिलेला तो महिषासुर पर्वत उगारून येत आहे असें अवलोकन करितांक्षणीं देव पळत सुटले ८३. तथापि, महिषासुरानेंही

चिक्षेप तं गिरिम् ८४ पतता तेन गिरिणा देवसैन्यस्य पार्थिव । भीमरूपेण निहतमयुतं प्रापतद्भुवि ८५ अथ तैर्दानवैः सार्धं महिषस्त्रासयन्सुरान् । अभ्यद्रवद्रणे तूर्णं सिंहः क्षुद्रमृगानिव ८६ तमापतन्तं महिषं दृष्ट्वा सेन्द्रा दिवौकसः । व्यद्रवन्त रणे भीता विकीर्णायुधकेतनाः ८७ ततः स महिषः क्रुद्धस्तूर्णं रुद्ररथं ययौ । अभिद्रुत्य च जग्राह रुद्रस्य रथकूबरम् ८८ यदा रुद्ररथं क्रुद्धो महिषः सहमागतः । रेसतू रोदसी गाढं मुमुहुश्च महर्षयः ८९ अनदंश्च महाकाया दैत्या जलधरोपमाः । आसीच्च निश्चितं तेषां जितमस्माभिरित्युत ९० तथाभूते तु भगवानहनन्महिषं रणे । सस्मार च तदा स्कन्दं मृत्युं तस्य दुरात्मनः ९१ महिषोपि रथं दृष्ट्वा रौद्रो रुद्रस्य चानदत् । देवान्सन्त्रासयंश्चापि दैत्यांश्चापि प्रहर्षयन् ९२ ततस्तस्मिन्भये घोरे देवानां समुपस्थिते । आजगाम महासेनः क्रोधात्सूर्य इव ज्वलन् ९३ लोहिताम्बरसंवीतो लोहितस्रग्विभूषणः । लोहिताश्वो महाबाहुर्हिरण्यकवचः प्रभुः ९४ रथमादित्यसंकाशमास्थितः

मागोमाग पळत जाऊन देवावर तो पर्वत फाकिला ८४ आणि हे राजा, दिसण्यांतही भयंकर असून अंगावर येत असलेल्या त्या पर्वताच्या योगानें देवाचें दहा हजार सैन्य मरून भूमीवर पडलें ८५. तदनंतर त्या दानवासहवर्तमान तो महिषासुर देवांना त्रास देण्याकरिता रणामध्यें धांवू लागला असतां क्षुद्र मृगांच्या मागें पळत सुटलेला सिंहच की काय असा दिसू लागला ८६ तो महिषासुर धांवत येत आहे असें अवलोकन करून इंद्रासहवर्तमान देव भयभीत झाले आणि आयुधें व ध्वज अस्ताव्यस्त टाकून ते रणामध्यें पळत सुटले ८७. तदनंतर तो क्रुद्ध झालेला महिषासुर सत्वर रुद्ररथावर धावला आणि धांवत जाऊन त्यानें रुद्राच्या रथाची दांडी धरिली ८८ ज्यावेळीं महिषासुर क्रुद्ध होऊन एकाएकीं रुद्ररथावर चालून गेला त्यावेळीं पृथ्वी आणि स्वर्ग ह्या दोहोंनीं फारच मोठी गर्जना केली; महर्षींचेंही भान नाहींसें झालें ८९; मेघासारिखे मोठे मोठे विप्पाड दैत्य गर्जना करू लागले आणि "आमचा जय झाला" असें त्यांना निश्चित वाटूंही लागलें ९०. असा प्रकार झाला असतांही भगवान् शंकरानें संग्रामामध्यें महिषासुराचा वध (करण्याचा विचार) केला आणि त्या दुरात्म्याचा मृत्यु जो स्कंद त्याचें त्या शंकरानें स्मरण केलें ९१ व क्रूर महिषासुरानेंही रुद्राचा रथ अवलोकन करून देवांना त्रस्त व दैत्यांना आनंदित करीत करीत गर्जना केली ९२. ह्याप्रमाणें देवांना तें घोर भय प्राप्त झालें असतां सूर्याप्रमाणें दिशा प्रकाशित करीत करीत तो महासेन क्रोधानें तेथें आला ९३. त्यानें आरक्त वस्त्रें परिधान

कनकप्रभम्। तं दृष्ट्वा दैत्यसेना सा व्यद्रवत्सहसा रणे ९५ स चापि तां प्रज्वलितां महिषस्य विदारिणीम्। मुमोच शक्तिं राजेन्द्र महासेनो महा-बलः ९६ सा मुक्ताभ्यहरत्तस्य महिषस्य शिरो महत्। पपात भिन्ने शिरसि महिषस्त्यक्तजीवितः ९७ पतता शिरसा तेन द्वारं षोडशयोजनम्। पर्वताभेन पिहितं तदागम्यं ततो भवत् ९८ उत्तराः कुरवस्ते न गच्छन्त्यद्य यथा-सुखम्। क्षिप्ता क्षिप्ता तु सा शक्तिर्हत्वा शत्रून्सहस्रशः ९९ स्कन्दहस्तमनु-प्राप्ता दृश्यते देवदानवैः। प्रायः शरैर्विनिहता महासेनेन धीमता १०० शेषा दैत्यगणा घोरा भीतास्त्रस्ता दुरासदैः। स्कन्दपारिषदैर्हत्वा भक्षिताश्च सहस्रशः १ दानवान्भक्षयन्तस्ते प्रपिबन्तश्च शोणितम्। क्षणान्निर्दानवं सर्वमकार्षुर्भृशहर्षिताः २ तमांसीव यथा सूर्यो वृक्षानग्निर्घनान्खगः। तथा स्कन्दोजयच्छत्रून्स्वेन वीर्येण कीर्तिमान् ३ संपूज्यमानस्त्रिदशैर-

---

केलीं होतीं; आरक्तवर्ण पुष्पें व भूषणें धारण केलीं होतीं; आजानुबाहूंनीं युक्त असलेल्या त्या प्रभूनें सुवर्ण कवच धारण केलें होतें; त्याचे अश्व आरक्तवर्ण होते ९४ आणि तो सुवर्णासारिख्या तेजस्वी व सूर्यासारिख्या प्रकाशमान रथावर आरूढ झाला होता. त्याला अवलोकन करितांक्षणीं दैत्यसेना एकदम संग्रामामध्यें पळत सुटली ९५ व, हे राजा-धिराज युधिष्ठिरा, त्या महाबलाढ्य महासेनानेंही महिषासुराला विदीर्ण करून टाकणारी ती प्रज्वलित शक्ति त्यावर सोडिली ९६. त्या सुटलेल्या शक्तीनें त्या महिषासुराचें प्रचंड मस्तक उडविलें आणि मस्तक तुटून जाताक्षणीं तो महिषासुर गतप्राण होऊन भूमीवर पडला ९७; परंतु, त्याच्या त्या पर्वतप्राय मस्तकानें पडतां पडतां कुरुदेशाचा मार्ग चौसष्ट कोसपर्यंत बंद करून टाकिलें व त्यावेळीं तो मार्ग अगम्यच झाला ९८. इतकेंच नव्हे परंतु, जेथें तें मस्तक पडलें त्या कुरुदेशांतील लोकांना अजूनसुद्धां तेथून सहज जातां येत नाहीं. (स्कंदानें फेंकलेल्या त्या शक्तीच्या योगानें महिषासुराचें मस्तक तुटून पडलें इतकेंच नव्हे तर) फिरून फिरून ती शक्ति तो स्कंद फेंकीत आहे आणि वारंवार हजारों शत्रूंचा वध करून ९९ ती पुनः पुनः स्कंदाच्या हातांत येत आहे असें देवदैत्यांच्या दृष्टीस पडलें. बुद्धिमान् महासेनानें प्रायः मोठे मोठे दानव सर्व मारूनच टाकिले होते १००; परंतु, जे कांहीं भयंकर दैत्यगण अवशिष्ट राहिले होते ते अजिंक्य अशा स्कंदपारिषदांना भिऊन त्राऊन गोंधळून गेले आणि त्या स्कंदपारिषदांनीं त्यांचा वध करून हजारोंच्या हजारों एकदम खाऊन टाकिले १. अत्यंत आनंदित झालेल्या त्या स्कंदपारिषदांनीं दानवांना भक्षण करितां करितां आणि त्यांचें रक्त पितां पितां एका क्षणामध्यें सर्व जग दानवशून्य केलें

भिवाद्य महेश्वरम् । शुशुभे कृत्तिकापुत्रः प्रकीर्णांशुरिवांशुमान् ४ नष्टश-
त्रुर्यदा स्कन्दः प्रयातस्तु महेश्वरम् । तदाब्रवीन्महासेनं परिष्वज्य पुरन्दरः ५
ब्रह्मदत्तवरः स्कन्द त्वयायं महिषो हतः । देवास्तृणसमा यस्य बभूवुर्ज-
यतां वर ६ सोयं त्वया महाबाहो शमितो देवकण्टकः । शतं महिषतु-
ल्यानां दानवानां त्वया रणे ७ निहतं देवशत्रूणां यैर्वयं पूर्वतापिताः ।
तावकैर्भक्षिताश्चान्ये दानवाः शतसङ्घशः ८ अजेयस्त्वं रणेरीणामुमाप-
तिरिव प्रभुः । एतत्ते प्रथमं देव ख्यातं कर्म भविष्यति ९ त्रिषु लोकेषु
कीर्तिश्च तवाक्षय्या भविष्यति । वशगाश्च भविष्यन्ति सुरास्तव महा-
भुज ११० महासेनमेवमुक्त्वा निवृत्तः सह दैवतैः । अनुज्ञातो भगवता
त्र्यम्बकेण शचीपतिः ११ गतो भद्रवटं रुद्रो निवृत्ताश्च दिवौकसः ।
उक्ताश्च देवा रुद्रेण स्कन्दं पश्यत मामिव १२ स हत्वा दानवगणान्पूज्य-
मानो महर्षिभिः । एकाह्नैवाजयत्सर्वं त्रैलोक्यं वह्निनन्दनः १३ स्कन्दस्य

टाकिलें २. ज्याप्रमाणे सूर्य अंधकाराचा, अग्नि वृक्षांचा आणि वायु मेघांचा नाश करून टाकितो त्याप्रमाणे कीर्तिमान् स्कंदानें स्वतःच्या पराक्रमाचें अवलंबन करून शत्रूंचा नाश केला ३. तेव्हा देव त्याचें पूजन करू लागले आणि तो कृत्तिकापुत्र स्कंद किरणें पसरलेल्या सूर्याप्रमाणे शंकराला वंदन करून शोभू लागला ४. शत्रूंचा नाश करून ज्यावेळी स्कंद महेश्वराकडे गेला त्यावेळी त्याला आलिंगन देऊन इंद्र ह्मणाला ५ " हे स्कंदा, ब्रह्मदेवानें वर दिलेल्या ह्या महिषासुराचा तूं वध केलास. हे विजयिश्रेष्ठा, त्याला देव ह्मणजे अगदीं कस्पटासारखे होऊन गेले होते ६, तथापि, हे महापराक्रमी स्कंदा, तूं ह्या देवकंटकाची निपोताशांतिच करून टाकिलीस. अरे, इतकेंच नव्हे परंतु ज्यांनीं आह्मांला पूर्वी ताप दिला त्या महिषासुरतुल्य शंभर सुरद्वेष्ट्या दैत्यांचा तूं संग्रामामध्यें वध केलास. शिवाय तुझ्या पार्षद्गणानी इतर दानवांच्या शेंकडो झुंडीच्या झुंडीही भक्षण करून टाकिल्या ७, ८. तूं संग्रामामध्यें प्रभु उमापति शंकराप्रमाणें शत्रूंना अजिंक्य आहेस. (महिषासुरवध) हा तुझा पराक्रम पहिला ह्मणून प्रसिद्ध होईल ९. त्रैलोक्यामध्यें तुझी अक्षय्य कीर्ति होईल आणि हे महापराक्रमी स्कंदा देवही तुझ्या आज्ञेंत राहतील ११०. " ह्याप्रमाणें स्कंदाला सांगून शचीपति इंद्र देवांसहवर्तमान परत फिरला, व भगवान् त्र्यंबकानेंहीं त्याला जाण्याची अनुज्ञा दिली ११. तदनंतर रुद्र भद्रवटाला गेला व जातांना त्यानें " माझ्याप्रमाणें तुह्मी स्कंदाला माना " असें देवाना सांगितल्यावर देवही परत गेले १२ व महर्षि प्रशंसा करीत असतांना दानवगणांचा वध करून एका दिवसांतच त्या

य इदं विप्रः पठेज्जन्म समाहितः । स पुष्टिमिह संप्राप्य स्कन्दसालो-
क्यमाप्नुयात् ११४ [९१५१] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां
वैयासिक्यामारण्यके पर्वणि मार्कण्डेयसमास्यापर्वण्याङ्गिरसे स्कन्दो-
त्पत्तौ महिषासुरवधे एकत्रिंशदधिकद्विशततमोऽध्यायः ॥ २३१ ॥

युधिष्ठिर उवाच ॥ भगवञ्छ्रोतुमिच्छामि नामान्यस्य महात्मनः ।
त्रिषु लोकेषु यान्यस्य विख्यातानि द्विजोत्तम १ वैशम्पायन उवाच ॥
इत्युक्तः पाण्डवेयेन महात्मा ऋषिसन्निधौ । उवाच भगवांस्तत्र मार्क-
ण्डेयो महातपाः २ मार्कण्डेय उवाच ॥ आग्नेयश्चैव स्कन्दश्च दीप्तकी-
र्तिरनामयः । मयूरकेतुर्धर्मात्मा भूतेशो महिषार्दनः ३ कामजित्कामदः
कान्तः सत्यवाग्भुवनेश्वरः । शिशुः शीघ्रः शुचिश्चण्डो दीप्तवर्णः शुभा-
ननः ४ अमोघस्त्वनघो रौद्रः प्रियश्चन्द्राननस्तथा । दीप्तशक्तिः
प्रशान्तात्मा भद्रकृत्कूटमोहनः ५ षष्ठीप्रियश्च धर्मात्मा पवित्रो मातृव-
त्सलः । कन्याभर्ता विभक्तश्च स्वाहेयो रेवतीसुतः ६ प्रभुर्नेता विशा-
खश्च नैगमेयः सुदुश्चरः । सुव्रतो ललितश्चैव बालक्रीडनकप्रियः ७
खचारी ब्रह्मचारी च शूरः शरवणोद्भवः । विश्वामित्रप्रियश्चैव देवसेना-
प्रियस्तथा ८ वासुदेवप्रियश्चैव प्रियः प्रियकृदेव तु ९ नामान्येतानि दिव्यानि

अग्निकुमार स्कंदानें सर्व त्रैलोक्य जिंकिलें ११३. असो. जो ब्राह्मण अंतःकरण स्वस्थ
ठेवून हें स्कंदजन्माख्यान पठण करील त्याला इहलोकीं पुष्टि मिळून स्कंदसालोकता
प्राप्त होईल ११४. याप्रमाणें महर्षिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत
वनपर्वांतील मार्कंडेयसमास्यापर्वांपैकीं आंगिरसोपाख्यानांतर्गत स्कंदजन्माख्यानसंबंधीं
महिषासुरवधाविषयीं दोनशें एकतिसावा अध्याय समाप्त झाला ॥ २३१ ॥

युधिष्ठिर ह्मणतोः—हे द्विजश्रेष्ठ भगवन्, त्रैलोक्यामध्यें ह्या महात्म्या स्कंदाचीं
प्रसिद्ध असलेलीं नामें श्रवण करण्याची माझी इच्छा आहे १. वैशंपायन सांगतात:—
याप्रमाणें पांडुपुत्र युधिष्ठिरानें ऋषींचे संनिध महात्म्या व महातपस्वी भगवान् मार्कंडे-
यमुनींची प्रार्थना केली असतां ते ह्मणाले २ " आग्नेय, स्कंद, दीप्तकीर्ति, अनामय,
मयूरकेतु, धर्मात्मा, भूतेश, महिषार्दन ३, कामजित्, कामद, कांत, सत्यवाक्, भुव-
नेश्वर, शिशु, शीघ्र, शुचि, चंड, दीप्तवर्ण, शुभानन ४, अमोघ, अनघ, रौद्र, प्रिय,
चंद्रानन, दीप्तशक्ति, प्रशांतात्मा, भद्रकृत्, कूटमोहन ५, षष्ठीप्रिय, धर्मात्मा, पवित्र,
मातृवत्सल, कन्याहर्ता, विभक्त, स्वाहेय, रेवतीसुत ६, प्रभु, नेता, विशाख, नैगमेय,
सुदुश्चर, सुव्रत, ललित, बालक्रीडनकप्रिय ७, खचारी, ब्रह्मचारी, शूर, शरवणोद्भव,

कार्तिकेयस्य यः पठेत् । स्वर्गं कीर्तिं धनं चैव स लभेन्नात्र संशयः १०
मार्कण्डेय उवाच ॥ स्तोष्यामि देवैर्ऋषिभिश्च जुष्टं शक्त्या गुहं नाम-
भिरप्रमेयम् । षडाननं शक्तिधरं सुवीरं निबोध चैतानि कुरुप्रवीर ११
ब्रह्मण्यो वै ब्रह्मजो ब्रह्मविच्च ब्रह्मेशयो ब्रह्मवतां वरिष्ठः । ब्रह्मप्रियो ब्राह्मण-
सव्रती त्वं ब्रह्मज्ञो वै ब्राह्मणानां च नेता १२ स्वाहा स्वधा त्वं परमं
पवित्रं मन्त्रस्तुतस्त्वं प्रथितः षडर्चिः । संवत्सरस्त्वमृतवश्च षड्वै मासार्ध-
मासायनं दिशश्च १३ त्वं पुष्कराक्षस्त्वरविन्दवक्त्रः सहस्रवक्त्रोसि
सहस्रबाहुः । त्वं लोकपालः परमं हविश्च त्वं भावनः सर्वसुरासुराणाम् १४
त्वमेव सेनाधिपतिः प्रचण्डः प्रभुर्विभुश्चाप्यथ शत्रुजेता। सहस्रभूस्त्वं धरणी
त्वमेव सहस्रतुष्टिश्च सहस्रभुक् १५ सहस्रशीर्षस्त्वमनन्तरूपः सहस्रपात्त्वं
गुह शक्तिधारी। गङ्गासुतस्त्वं स्वमतेन देव स्वाहामहीकृत्तिकानां तथैव १६
त्वं क्रीडसे षण्मुख कुक्कुटेन यथेष्टनानाविधकामरूपी । दीक्षासि सोमो
मरुतः सदैव धर्मोसि वायुरचलेन्द्र इन्द्रः १७ सनातनानामपि शाश्वतस्त्वं

विश्वामित्रप्रिय, देवसेनाप्रिय,८ वासुदेवप्रिय, प्रिय आणि प्रियकृत् ९ हीं कार्तिकेयाचीं दिव्य नामें जो पठण करितो त्याला स्वर्ग, कीर्ति आणि संपत्ति ह्यांची निःसंशय प्राप्ति होते" १०. पुनरपि मार्कंडेय ह्मणतातः—हे कुरुवंशजश्रेष्ठ युधिष्ठिरा, देव आणि ऋषि ह्यांनीं ज्याचा आश्रय केला आहे त्या महावीर, शक्तिधर, षडानन व अतुल गुहाची मी नामांच्या योगानें स्तुति करितों. ह्यास्तव, हीं नामें तूं श्रवण कर ११. ब्रह्मण्य, ब्रह्मज, ब्रह्मवित्, ब्रह्मेशय, ब्रह्मनिष्ठांमध्यें श्रेष्ठ, ब्रह्मप्रिय, ब्रह्मवेत्त्यांप्रमाणें आचरण करणारा, ब्रह्मज्ञ आणि ब्राह्मणांना ब्रह्मपद देणारा असा तूं आहेस १२. स्वाहा व स्वधा तूंच असून परम पवित्र तूंच आहेस. मंत्रांनीं तुझेंच स्तवन होत असतें. सहा जिह्वांनीं युक्त ह्मणून तूंच प्रसिद्ध आहेस. संवत्सर व ऋतु तूंच असून मास, पक्ष, अयन व दिशा तूंच आहेस १३. पुष्कराक्ष, पुष्करवक्त्र, सहस्रवक्त्र, सहस्रबाहु आणि लोकपाल तूंच असून उत्कृष्ट हवि व सर्व देवदैत्यांचा पालक तूंच आहेस १४. प्रचंड सेनाधिपति, प्रभु, विभु, शत्रुजेता, सहस्रभू, सहस्रतुष्टि, सहस्रभुक् आणि पृथ्वी तूंच असून १५, हे गुहा, सहस्रशीर्ष, अनंतरूप, सहस्रपात्, शक्तिधारी, गंगासुत आणि आपल्या मतानें, हे देवा, स्वाहा, मही व कृत्तिका ह्यांचा पुत्रही तूंच आहेस १६. हे षडानना, तूं मयूरासहवर्तमान क्रीडा करीत असतोस; नानाप्रकारचीं मदनतुल्य रूपें तूं यथेष्ट धारण करीत असतोस आणि दीक्षा, सोम, मरुद्गण, धर्म, वायु, पर्वतराज आणि इंद्र हेही वास्तविक तूंच आहेस १७. सनातनांमध्येंही तूं शाश्वत आहेस; प्रभूंचाही तूं प्रभु

प्रभुः प्रभूणामपि चोग्रधन्वा । सुखस्य कर्ता दितिजान्तकस्त्वं जेता रिपूणां
प्रवरः सुराणाम् १८ सूक्ष्मं तपस्तत्परमं त्वमेव परावरज्ञोसि परावरस्त्वम् ।
धर्मस्य कामस्य परस्य चैव त्वत्तेजसा कृत्स्नमिदं महात्मन् १९ व्याप्तं
जगत्सर्वसुरप्रवीर शक्त्या मया संस्तुत लोकनाथ । नमोस्तु ते द्वादशनेत्र-
बाहो अतःपरं वेद्मि गतिं न तेहम् २० स्कन्दस्य य इदं विप्रः
पठेज्जन्म समाहितः । श्रावयेद्ब्राह्मणेभ्यो यः शृणुयाद्वा द्विजेरितम् २१
धनमायुर्यशोदीप्तं पुत्राञ्शत्रुजयं तथा । स पुष्टितुष्टी संप्राप्य स्कन्दसा-
लोक्यमाप्नुयात् २२ [९१७३] इति श्रीमहाभारते० वैयासिक्यामारण्यके
पर्वणि मार्कण्डेयसमास्यापर्वण्याङ्गिरसे कार्तिकेयस्तवे द्वात्रिंशदधि-
कद्विशततमोध्यायः ॥ २३२ ॥ समाप्तं च मार्कण्डेयसमास्यापर्व ॥

अथ द्रौपदीसत्यभामासंवादपर्व ॥ वैशम्पायन उवाच ॥ उपासीनेषु
विप्रेषु पाण्डवेषु महात्मसु । द्रौपदी सत्यभामा च विविशाते तदा
समम् १ जाहस्यमाने सुप्रीते सुखं तत्र निषीदतुः । चिरस्य दृष्ट्वा
राजेन्द्र तेन्योन्यस्य प्रियंवदे २ कथयामासतुश्चित्राः कथाः कुरुयदु-

---

आहेस; तूं उग्र धनुष्य धारण करणारा आहेस; सुखाचा कर्ता तूं आहेस; दैत्यांचा नाशक तूं आहेस; आणि शत्रूंना जिंकणाराही तूंच असून देवांमध्यें श्रेष्ठही तूंच आहेस १८. सूक्ष्म जें उत्कृष्ट तप तें तूंच असून धर्म, अर्थ व काम ह्यांचें बलाबल जाणणाराही तूंच आहेस आणि ब्रह्मांडांतील श्रेष्ठ व कनिष्ठ वस्तु तूंच असून, हे महात्म्या, हें सर्व ब्रह्मांडही तुझ्याच तेजानें व्याप्त झालें आहे १९. हे माझ्या स्तुतीस पात्र झालेल्या जगदीशा, हे सर्व देवांमध्यें श्रेष्ठ, हें जगत् तुझ्या शक्तीनें व्याप्त झालें आहे. हे द्वादशाक्ष, हे द्वादशभुज, ह्यापेक्षां तुझा थांग मला जास्त लागलेला नाहीं २०. अंतःकरण स्वस्थ ठेवून जो ब्राह्मण हें स्कंदजन्माख्यान पठण करील अथवा ब्राह्मणांना जो कथन करील किंवा ब्राह्मणांच्या मुखांतून जो श्रवण करील २१ त्याला धन, आयुष्य, उज्ज्वल यश, पुत्र, शत्रुजय, पुष्टि आणि तुष्टि प्राप्त होऊन तो स्कंदलोकीं जाईल २२. ह्याप्रमाणें महर्षिव्यासप्रणीतलक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील मार्कंडेयसमास्यापर्वांपैकीं आंगिरसोपाख्यानसंबंधीं कार्तिकेयाच्या स्तुतीविषयीं दोनशें बत्तिसावा अध्याय समाप्त झाला ॥ २३२ ॥ ह्या ठिकाणीं मार्कंडेयसमास्यापर्वही संपूर्ण झालें.

येथून पुढें द्रौपदीसत्यभामासंवादपर्व सुरू झालें. वैशंपायन सांगतात:—महात्मे पांडव आणि विप्र बसले असतांना द्रौपदी व सत्यभामा एकदम तेथें आल्या १. त्या एकमेकींशीं अतिशय हंसत असलेल्या उभयतां प्रियंवदा स्त्रिया, हे राजाधिराज जनमेजया, कुरुकुळ-

श्रिताः । अथाब्रवीत्सत्यभामा कृष्णस्य महिषी प्रिया ३ सात्रा-
जिती याज्ञसेनीं रहसीदं सुमध्यमा । केन द्रौपदि वृत्तेन पाण्डवान-
धितिष्ठसि ४ लोकपालोपमान्वीरान्यूनः परमसंहतान् । कथं च वशगा-
स्तुभ्यं न कुप्यन्ति च ते शुभे ५ तव वश्या हि सततं पाण्डवाः
प्रियदर्शने । मुखप्रेक्षाश्च ते सर्वे तत्त्वमेतद्ब्रवीहि मे ६ व्रतचर्या तपो वापि
स्नानमन्त्रौषधानि वा । विद्यावीर्यं मूलवीर्यं जपहोमागदास्तथा ७
ममाचक्ष्व पाञ्चालि यशस्यं भगदैवतम् । येन कृष्णे भवेन्नित्यं मम कृष्णो
वशानुगः ८ एवमुक्त्वा सत्यभामा विरराम यशस्विनी । पतिव्रता महा-
भागा द्रौपदी प्रत्युवाच ताम् ९ असत्स्त्रीणां समाचारं सत्ये मामनुपृच्छसि ।
असदाचरिते मार्गे कथं स्यादनुकीर्तनम् १० अनुप्रश्नः संशयो वा नैत-
त्त्वय्युपपद्यते । तथा ह्युपेता बुद्ध्या त्वं कृष्णस्य महिषी प्रिया ११ यदैव
भर्ता जानीयान्मन्त्रमूलपरां स्त्रियम् । उद्विजेत तदैवास्याः सर्पाद्वेश्मगता-

---

त्रिवर्गांनी एकमेकांची गांठ पडल्यामुळें अत्यंत आनंदित होऊन सुखानें तेथें बसल्या २
व, कौरव आणि यादव ह्यांच्या संबधानें अद्भुत कथा कथन करूं लागल्या. असें होतां
होतां कृष्णाची प्रिय पट्टराणी सात्राजिती सुंदरी सत्यभामा एकांतामध्यें याज्ञसेनीला
ह्मणाली " हे द्रौपदि, कोणत्या आचरणानें तूं लोकपालतुल्य आणि वीर असूनही
परस्परांवर अत्यंत प्रेम करणाऱ्या पांडवांना आपल्या वचनांत ठेवीत आहेस ? आणि, हे
कल्याणि, तुला ते वश राहून तुझ्यावर क्रुद्ध कसे होत नाहींत ? ३, ४, ५. हे प्रियदर्शने, पांडव
नेहमीं तुझ्या वचनांत असून ते सर्वही तुझ्या मुखाकडे पहात असतात. तस्मात् , ह्याचें
कारण काय हें तूं खरें खरें मला सांग ६. हे कृष्णे, हे पांचालि, कृष्ण ज्याच्या योगानें
नेहमीं माझ्या इच्छेप्रमाणें वागणारा होईल असें कांहीं व्रताचरण, तप, स्नान, समंत्रक
औषध, विद्यावीर्य, मूलवीर्य, जप, होम, औषध, अथवा सौभाग्यवर्धक आणि यशस्कारक
असें एखादें व्रत तूं आज मला कथन कर " ७, ८. असें बोलून यशस्विनी सत्यभामा
स्तब्ध राहिली असतां महाभाग्यवती पतिव्रता द्रौपदी तिला ह्मणाली ९ " हे सत्य-
भामे, दुष्ट स्त्रियांचें आचरण तूं मला विचारीत आहेस; परंतु, ज्या मार्गाचें आचरण
दुर्वृत्त स्त्रियाच करीत असतात त्या मार्गासंबंधानें असलेल्या तुझ्या प्रश्नाला माझ्या-
कडून उत्तर कसें मिळणार ? १०. अशा प्रकारचा प्रश्न असो अथवा संशय असो,
तुला मुळींच योग्य नाहीं. कारण, तूं विचारी असून कृष्णाची प्रिय पट्टराणी आहेस ११.
आपल्याला वश करून घेण्याकरितां आपली स्त्री मंत्रांच्या व मुळ्यांच्या पद्धतीमार्गें
चालली आहे, असें समजून घेतांक्षणीं तिचा पति घरांत शिरलेल्या सर्पाप्रमाणें

वि १२ उद्विग्नस्य कुतः शान्तिरशान्तस्य कुतः सुखम् । न जातु वशगो भर्ता स्त्रियाः स्यान्मन्त्रकर्मणा १३ अमित्रप्रहितांश्चापि गदान्परमदारुणान् मूलप्रचारैर्हि विषं प्रयच्छन्ति जिघांसवः १४ जिह्वया यानि पुरुषस्त्वचा वाप्युपसेवते । तत्र चूर्णानि दत्तानि हन्युः क्षिप्रमसंशयम् १५ जलोदर-समायुक्ताः श्वित्रिणः पलितास्तथा । अपुमांसः कृताः स्त्रीभिर्जडान्धब-धिरास्तथा १६ पापानुगास्तु पापास्ताः पतीनुपसृजन्त्युत । न जातु विप्रियं भर्तुः स्त्रिया कार्यं कथंचन १७ वर्ताम्यहं तु यां वृत्तिं पाण्डवेषु महात्मसु । तां सर्वां शृणु मे सत्यां सत्यभामे यशस्विनि १८ अहंकारं विहायाहं कामक्रोधौ च सर्वदा । सदारान्पाण्डवान्नित्यं प्रयतोपचराम्य-हम् १९ प्रणयं प्रतिसंहृत्य निधायात्मानमात्मनि । शुश्रूषुर्निरभीमाना पतीनां चित्तरक्षिणी २० दुर्व्याहृताच्छङ्कमाना दुःस्थिताद्दुरवेक्षितात् ।

तिच्यापासून उद्विग्न होतो आणि १२ उद्विग्न झाला असतां त्याला शांति कोठून होणार व तो शांतिरहित झाला असतां त्याला सुखप्राप्ति तरी कशी होणार ? सारांश, मांत्रिक उपायानें पति स्त्रीला कधींही वश होणार नाहीं १३. शत्रूनें पाठ-विलेले अत्यंत भयंकर रोगही कदाचित् अशा रीतीनें पतीला प्राप्त होण्याचा संभव असतो. कारण, वधाची इच्छा धरणारे शत्रु औषध ह्मणून (स्त्रीवगैरेंच्या द्वारानें) विष देत असतात १४. जिह्वेनें अथवा त्वगिंद्रियानें जीं द्रव्यें पुरुष नेहमीं सेवन करीत असतो त्यांमध्यें (विषद्रव्यांचीं चूर्णें दिलीं असतां) तीं त्याचा निःसंशय सत्वर वध करितात १५. अशा स्त्रियांनीं कित्येक पुरुष उदररोगी, कुष्ठी, जराग्रस्त, नपुंसक, जड, अंध व बधिर करून टाकिले आहेत १६. कारण, त्या दुष्ट स्त्रिया कोणा दुष्ट लोकांच्या अधीन झालेल्या असतात आणि त्यामुळें आपल्या पतींना (जलोदरादि) दोषांनीं जन्माचेच जायबंदी करून टाकीत असतात. तस्मात्, भर्त्याला (परिणामीं) अहि-तकारक होणारी गोष्ट स्त्रीनें कसाही प्रसंग आला तरी कधींही करूं नये १७. हे यशस्विनी सत्यभामे, महात्म्या पांडवांचे ठिकाणीं मीं जें आचरण ठेविलें आहे तें माझें सर्व आचरण तूं खरें खरें श्रवण कर १८. काम, क्रोध आणि अहंकार ह्यांचा सर्वदां त्याग करून व नेहमीं दक्ष राहून मी दुसऱ्या स्त्रियांसहवर्तमान असलेल्याही पांडवांची नेहमीं सेवा करीत असतें १९. सवतींसंबंधानें मत्सरबुद्धि नाहींशी करून त्यांच्याविषयीं जें काहीं मला वाटतें तें मी आपल्यापाशींच ठेवीत असतें आणि कसल्याही प्रकारचा अभिमान न धरितां पतींचें चित्त स्थिर राहील अशा रीतीनें मी त्यांची शुश्रूषा करीत असतें २०. आपलें बोलणें, उभें रहाणें, पहाणें, बसणें, चालणें, आणि त्याचप्रमाणें

दुरासिताद्दुर्व्रजिताद्दिङ्गिताध्यासिताद्दपि २१ सूर्यवैश्वानरसमान्सोमकल्पा-
न्महारथान् । सेवे चक्षुर्हणः पार्थानुग्रवीर्यप्रतापिनः २२ देवो मनुष्यो
गन्धर्वो युवा चापि स्वलंकृतः । द्रव्यवानभिरूपो वा न मेऽन्यः पुरुषो
मतः २३ नाभुक्तवति नास्नाते नासंविष्टे च भर्तरि । न संविशामि
नाश्नामि सदा कर्मकरेष्वपि २४ क्षेत्राद्वनाद्वा ग्रामाद्वा भर्तारं गृहमाग-
तम् । अभ्युत्थायाभिनन्दामि आसनेनोदकेन च २५ प्रमृष्टभाण्डा मृष्टान्ना
काले भोजनदायिनी । संयता गुप्तधान्या च सुसंमृष्टनिवेशना २६ अति-
रस्कृतसंभाषा दुःस्त्रियो नानुसेवती । अनुकूलवती नित्यं भवाम्यनलसा
सदा २७ अनर्मे चापि हसितं द्वारि स्थानमभीक्ष्णशः । अवस्करे चिरस्थानं
निष्कुटेषु च वर्जये २८ अतिहासातिरोषौ च क्रोधस्थानं च वर्जये ।

कांहीं अभिप्राय मनात धरून नेत्रकटाक्षांनें कोणाकडे पहाणेंही त्याना वाईट लागेल कीं काय ह्याची मला नेहमीं भीति वाटत असतें २१. सारांश, सूर्य, चंद्र व अग्नि ह्यांची बरोबरी करणाऱ्या आणि आपल्या दृष्टीनेंच शत्रूचा घात करणाऱ्या प्रचंड सामर्थ्यवान् व महाप्रतापी महारथी कुंतीपुत्र पांडवांची मी ह्याप्रमाणें सेवा करीत असतें २२. उत्कृष्ट अलंकार धारण केलेला व तरुण असा कोणी देव असो, मनुष्य असो, गंधर्व असो किंवा द्रव्यवान् आणि सुंदर असाही कोणी असो, पांडवांशिवाय अन्य पुरुष माझ्या मनामध्यें कधीं येतच नाहीं २३. भर्त्यांचें भोजन झाल्यावांचून मी कधीं भोजन करीत नाहीं; त्याचें अभ्यंग स्नान न होईल तर मीही कधीं अभ्यंग स्नान करीत नाहीं; भर्त्यानें शयन केल्यावांचून मी कधीं शयन करीत नाहीं आणि त्याचप्रमाणें पांडव कांहीं कार्यामध्यें गढून गेले असतां मीही स्वस्थ बसत नाहीं २४. शेतांतून, वनांतून अथवा परगांवाहून भर्ता गृहीं येतांक्षणीं मी उठून उभी रहातें आणि आसन व उदक देऊन त्याचें अभिनंदन करितें २५. मी घरांतील भांडींकुंडीं घासून वगैरे चांगलीं स्वच्छ ठेवीत असतें; अन्न स्वच्छ तयार करीत असतें; वेळच्यावेळीं पतींना भोजन घालीत असतें; अंतःकरण दुसरीकडे जाऊं लागलें असतां त्याचें नेहमीं संयमन करीत असतें; धान्य वगैरे जपून ठेवीत असतें; घर झाडून वगैरे फारच स्वच्छ राखीत असतें २६; तिरस्कारयुक्त भाषण कधींही करीत नाहीं; दुष्ट स्त्रियांची संगति कधींही धरीत नाहीं; भर्त्याला अनुकूल असेंच आचरण नेहमीं करीत असतें आणि आळस कधींही येऊं देत नाहीं २७. थट्टेच्या प्रसंगाशिवाय हंसण्याचा आणि वारं-वार द्वारामध्यें उभें राहण्याचा मला फारच तिटकारा आहे. त्याचप्रमाणें घरांतीलही बागांतून मी कधीं (पतीशिवाय) फार वेळ बसत नाहीं २८. (थट्टेच्या प्रसंगांतही)

निरताहं सदा सत्ये भर्तॄणामुपसेवने २९ सर्वथा भर्तृरहितं न ममेष्टं कथंचन । यदा प्रवसते भर्ता कुटुम्बार्थेन केनचित् ३० सुमनोवर्णकापेता भवामि व्रतचारिणी । यच्च भर्ता न पिबति यच्च भर्ता न सेवते ३१ यच्च नाश्नाति मे भर्ता सर्वं तद्वर्जयाम्यहम् । यथोपदेशं नियता वर्तमाना वराङ्गने ३२ स्वलंकृता सुप्रयता भर्तुः प्रियहिते रता । ये च धर्माः कुटुम्बेषु श्वश्र्वा मे कथिताः पुरा ३३ भिक्षा बलिः श्राद्धमिति स्थालीपाकाश्च पर्वसु । मान्यानां मानसत्कारा ये चान्ये विदिता मम ३४ तान्सर्वाननुवर्तामि दिवारात्रमतन्द्रिता । विनता नियमांश्चैव सदा सर्वात्मना श्रिता ३५ मृदून्सतः सत्यशीलान्सत्यधर्मानुपालिनः । आशीविषानिव क्रुद्धान्पतीन्परिचराम्यहम् ३६ पत्याश्रयो हि मे धर्मो मतः स्त्रीणां सनातनः । स देवः सा गतिर्नान्या तस्य का विप्रियं चरेत् ३७ अहं पतीन्नातिशये नात्यश्ने नातिभूषये । नापि परिवदे श्वश्रूं सर्वदा परि-

---

अतिहास्य, अतिक्रोध आणि भर्त्यांला क्रोध आणणारी गोष्ट हीं मी वर्ज्य करीत असून, हे सत्यभामे, पतिशुश्रूषेविषयीं मी सदांसर्वकाळ अगदीं तत्पर असतें २९. कांहीं झालें तरी पतिवियोग मला कधींही इष्ट नाहीं. कुटुंबसंबंधीं कांहीं कार्याकरितां जेव्हां भर्त्यांला प्रवासास जाण्याचा प्रसंग येतो ३० तेव्हां मी पुष्पें व अनुलेपनादि शरीरसंस्कार वर्ज्य करून व्रतस्थ रहात असतें. भर्ता जें पीत नाहीं, भर्ता जें सेवन करीत नाहीं ३१ आणि माझा भर्ता जें भक्षण करीत नाहीं तें सर्व मी वर्ज्य करीत असतें. हे श्रेष्ठ स्त्रिये, पतीच्या आज्ञेप्रमाणें मी नेहमीं मनोनिग्रहपूर्वक वागत असतें ३२ आणि भर्त्यांला आवडणारे अलंकार धारण करून व फारच शुद्ध राहून भर्त्यांचें प्रिय व हित करण्याविषयीं सारखी दक्ष असतें. भिक्षा, बलि, श्राद्ध, पार्वणस्थालीपाक, मान्यांचा आदरसत्कार वगैरे जे कुटुंबसंबंधीं धर्म मला पूर्वी सासूनें सांगून ठेविले आहेत आणि आणखीही जे मला विदित आहेत ते सर्व मी रात्रंदिवस तत्पर राहून आचरीत असतें आणि विनयशील राहून सर्वदां अगदीं मनापासून नियमानें वागत असतें ३३,३४,३५. स्वभावानें मृदु, सज्जन, सत्यशील आणि सत्यधर्माचें रक्षण करणारे असे जरी माझे भर्ते आहेत तरी ते क्रुद्ध झालेले सर्प आहेत असें समजून मी त्यांची शुश्रूषा करीत असतें ३६. पतीचा आश्रय हाच स्त्रियांचा सनातन धर्म म्हणून मला अभिमत आहे. पति हेंच स्त्रियांचें दैवत आहे आणि तोच त्यांचा मुख्य आधार आहे; पतीशिवाय स्त्रियांना दुसरा कसलाही आधार नाहीं. तस्मात्, त्याला अप्रिय होणारें वर्तन कोण बरें करील ? ३७. मी पतींच्या बाहेर कधींही वागत नाहीं; त्यांना सोडून कोणताही

यन्त्रिता ३८ अवधानेन सुभगे नित्योत्थिततयैव च । भर्तारो वशगा मह्यं गुरुशुश्रूषयैव च ३९ नित्यमार्यामहं कुन्तीं वीरसूं सत्यवादिनीम् । स्वयं परिचराम्येतां पानाच्छादनभोजनैः ४० नैतामतिशये जातु वस्त्रभूषणभोजनैः । नापि परिवदे चाहं तां पृथां पृथिवीसमाम् ४१ अष्टावग्रे ब्राह्मणानां सहस्राणि स्म नित्यदा । भुञ्जते रुक्मपात्रीषु युधिष्ठिरनिवेशने ४२ अष्टाशीतिसहस्राणि स्नातका गृहमेधिनः । त्रिंशद्दासीक एकैको यान्बिभर्ति युधिष्ठिरः ४३ दशान्यानि सहस्राणि येषामन्नं सुसंस्कृतम् । ह्रियते रुक्मपात्रीभिर्यतीनामूर्ध्वरेतसाम् ४४ तान्सर्वानग्रहारेण ब्राह्मणान्वेदवादिनः । यथार्हं पूजयामि स्म पानाच्छादनभोजनैः ४५ शतं दासीसहस्राणि कौन्तेयस्य महात्मनः । कम्बुकेयूरधारिण्यो निष्ककण्ठ्यः स्वलंकृताः ४६ महार्हमाल्याभरणाः सुवर्णाश्चन्दनोक्षिताः । मणीन्हेम च बिभ्रत्यो नृत्यगीतविशारदाः ४७ तासां नाम च रूपं च

पदार्थ भक्षण करीत नाहीं; त्यांच्यापेक्षां जास्त अलंकार धारण करीत नाहीं व सासूची कधींही निंदा करीत नाहीं; इतकेंच नव्हे परंतु, सर्वदां तिच्या आज्ञेंत जखडून राहिलेली असतें ३८. हे महाभाग्यवती सत्यभामे, अवधान, नित्य तत्परता आणि गुरुजनांची शुश्रूषा ह्यांच्या योगानें भर्ते मला वश आहेत ३९. अन्नपान आणि वस्त्र ह्यांच्या योगानें मी नेहमीं वीरप्रसू व सत्यवादिनी साध्वी कुंतीची स्वतः सेवा करीत असतें ४०. तिच्या आज्ञेशिवाय मी विशिष्ट वस्त्रं, भूषणें व भोजन ह्यांचा कधींही स्वीकार करीत नाहीं आणि त्या पृथ्वीतुल्य कुंतीची मी कधीं निंदाहीं करीत नाहीं ४१. (वनवासांत येण्याचे) पूर्वी युधिष्ठिराच्या गृहामध्यें सुवर्णपात्रांतून आठ हजार ब्राह्मण नित्य भोजन करीत असत ४२. प्रत्येकाला तीस तीस दासी ह्याप्रमाणें ऐशी हजार विद्यापारंगत गृहस्थाश्रम्यांचें पोषण युधिष्ठिर करीत असे ४३ आणि उत्कृष्ट रीतीनें तयार केलेलें अन्न सुवर्णाच्या ताटांतून घालून दहाहजार ऊर्ध्वरेत्या यतींकडे पोंचवावें लागत असे ४४. तथापि, त्या सर्वही वेदवेत्त्या ब्राह्मणांना प्रथम भोजन देऊन योग्यतेप्रमाणें मी नेहमीं पान, आच्छादन व इतरही भोज्य पदार्थ ह्यांच्या योगानें त्यांचें पूजन करीत असे ४५. महात्म्या कुंतीपुत्र युधिष्ठिराच्या सेवेला गोठतोडे व वाकीबाजुबंद हातांत घातलेल्या, पुतळ्यांच्या माळा गळ्यांत घातलेल्या आणि दुसरेही उत्कृष्ट अलंकार धारण केलेल्या एक लक्ष दासी असत ४६. त्या सर्वही मोठ्या मोठ्या मूल्यवान् पुष्पमाला व भूषणें धारण करीत असून चंदनाची उटी लावीत असत आणि सर्वही कांतिमान् असून नृत्यगायना-

भोजनाच्छादनानि च । सर्वासामेव वेदाहं कर्म चैवं कृताकृतम् ४८
शतं दासीसहस्राणि कुन्तीपुत्रस्य धीमतः । पात्रीहस्ता दिवारात्रमति-
थीन्भोजयन्त्युत ४९ शतमश्वसहस्राणि दश नागायुतानि च । युधिष्ठिर-
स्यानुयात्रमिन्द्रप्रस्थनिवासिनः ५० एतदासीत्तदा राज्ञो यन्महीं पर्यपा-
लयत् । येषां संख्याविधिं चैव प्रदिशामि शृणोमि च ५१ अन्तःपुराणां
सर्वेषां भृत्यानां चैव सर्वशः । आगोपालाविपालेभ्यः सर्वं वेद कृताकृ-
तम् ५२ सर्वं राज्ञः समुदयमायं च व्ययमेव च । एकाहं वेद्मि कल्याणि
पाण्डवानां यशस्विनि ५३ मयि सर्वं समासज्य कुटुम्बं भरतर्षभाः ।
उपासनरताः सर्वे घटयन्ति वरानने ५४ तमहं भारमासक्तमनाधृष्यं दुरा-
त्मभिः । सुखं सर्वं परित्यज्य रात्र्यहानि घटामि वै ५५ अधृष्यं वरुण-
स्येव निधिपूर्णमिवोदधिम् । एकाहं वेद्मि कोशं वै पतीनां धर्मचारि-
णाम् ५६ अनिशायां निशायां च सहाया क्षुत्पिपासयोः । आराधयन्त्याः

मध्यें निपुण असत आणि सुवर्णाचे व रत्नांचे अलंकार धारण करीत असत ४७. तात्पर्य, त्या सर्वांचीं नांवें काय काय आहेत, त्यांचें रूप कसें आहे, त्या काय खातात, कसलीं वस्त्रें परिधान करितात आणि त्यांनीं काम केलें कोणतें व न केलें कोणतें ही सर्व चौकशी मी ठेवीत असें ४८. विचारी कुंतीपुत्र युधिष्ठिराच्या घरीं एक लक्ष दासी हातांमध्यें भांडीं घेऊन एकसारिख्या रात्रंदिवस अतिथींना भोजन घालण्याकडे गुंतलेल्या असत ४९. युधिष्ठिर इंद्रप्रस्थामध्यें वास्तव्य करीत असतांना एक लक्ष अश्व आणि एक लक्ष गज नेहमी त्याच्या स्वारीबरोबर असत ५०. सारांश, ज्यांची संख्या मी सांगत आहे आणि ऐकत आहें तो सर्व, युधिष्ठिर राजा पृथ्वीचें परिपालन करीत असतांना, त्याच्या बरोबरचा परिवार होता ५१. सर्व अंतःपुरें आणि सर्व सेवक ह्यांनीं केलें काय आणि न केलें काय हें सर्व अगदीं गुराखी मेंढपाळांपर्यंत मी जाणीत असें ५२. हे कल्याणि, हे यशस्विनि सत्यभामे, पांडवांतील राजाचें एकंदर वैभव किती होतें आणि जमाखर्च काय होता हें मला एकटीला ठाऊक होतें ५३. हे सुंदरि, ते भरतवंशजश्रेष्ठ पांडव सर्वही अस्त्रांच्या अभ्यासाविषयीं तत्पर असल्यामुळें माझ्यावर सर्व कुटुंबाची व्यवस्था सोंपवून अस्त्राभ्यास करीत असत ५४ आणि मीही दुरात्म्यांना असह्य होणारा तो आपल्यावर येऊन पडलेला भार सर्व सुखाचा त्याग करून एकसारिखा रात्रंदिवस सहन करीत असे ५५. वरुणाच्या खजिन्याप्रमाणें कोणालाही हल्ला करून नेतां न येण्यासारिखा आणि समुद्राप्रमाणें रत्नभांडारांनीं परिपूर्ण असा धर्मानें वागणाऱ्या पतींचा कोश मला एकटीला माहीत होता ५६

कौरव्यास्तुल्या रात्रिरहश्च मे ५७ प्रथमं प्रतिबुद्ध्यामि चरमं संविशामि च । नित्यकालमहं सत्ये एतत्संवननं मम ५८ एतज्जानाम्यहं कर्तुं भर्तृसंवननं महत् । असत्स्त्रीणां समाचारं नाहं कुर्यां न कामये ५९ वैशम्पायन उवाच ॥ तच्छ्रुत्वा धर्मसहितं व्याहृतं कृष्णया तदा । उवाच सत्या सत्कृत्य पाञ्चालीं धर्मचारिणीम् ६० अभिपन्नास्मि पाञ्चालि याज्ञसेनि क्षमस्व मे । कामकारः सखीनां हि सोपहासं प्रभाषितम् ६१ [९२३४] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यामारण्यके पर्वणि द्रौपदीसत्यभामासंवादपर्वणि त्रयस्त्रिंशदधिकद्विशततमोऽध्यायः ॥ २३३ ॥

द्रौपद्युवाच ॥ इमं तु ते मार्गमपेतमोहं वक्ष्यामि चित्तग्रहणाय भर्तुः । अस्मिन्यथावत्सखि वर्तमाना भर्तारमाच्छेत्स्यसि कामिनीभ्यः १ नैतादृशं दैवतमस्ति सत्ये सर्वेषु लोकेषु सदेवकेषु । यथा पतिस्तस्य तु सर्वकामा लभ्याः प्रसादात्कुपितश्च हन्यात् २ तस्मादपत्यं विविधाश्च भोगाः

क्षुधा व तृषा लागेल तेव्हां रात्रीं आणि दिवसां मी एकसारिखी कुरुवंशजश्रेष्ठ पांडवांच्या शुश्रूषेमध्यें तत्पर असतें आणि एकसारिखें त्यांचें आराधन करीत असल्यामुळें रात्र आणि दिवस हीं दोन्हीं मला सारखींच असतात ५७. त्याचप्रमाणें मी नित्य सर्वांचे आधीं उठत असतें आणि सर्वांच्या मागून शयन करीत असतें. हे सत्यभामे, हा माझा, पति वश करून घेण्याचा नेहमींचा उपाय होय ५८. अशा रीतीनें पति वश करण्याचा हा मोठा उपाय योजण्याचें मला ठाऊक आहे. दुष्ट स्त्रियांचें आचरण मी करणार नाहीं आणि मला त्याची इच्छाही नाहीं ५९. वैशंपायन म्हणाले:—धर्माला अनुसरून असलेलें तें द्रौपदीचें भाषण श्रवण केल्यावर सत्यभामा सत्कारपूर्वक त्या धर्मचारिणी पांचालीला म्हणाली ६० " हे पांचालि, हे याज्ञसेनि, मी तुला शरण आलें आहें; तूं मला क्षमा कर. मैत्रिणी मैत्रिणी जुळल्या असतां एकीमेकीला थट्टेनें बोलणें त्यांना आवडत असतें (म्हणून माझ्या हातून असा प्रकार झाला) ६१ ह्याप्रमाणें महर्षिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील द्रौपदीसत्यभामासंवादपर्वापैकीं दोनशें तेहेतिसावा अध्याय समाप्त झाला ॥ २३३ ॥

द्रौपदी म्हणते:—हे सखि सत्यभामे, पतीचें अंतःकरण आपल्याकडे ओढून घेण्याचा हा निःशंक मार्ग मी तुला कथन करितें. त्या मार्गानें तूं वागूं लागलीस म्हणजे आपल्या इतर कामुक सवतींपासून तूं स्वतःकडेच आपल्या पतीला ओढून घेशील १. हे सत्यभामे, देवांसहवर्तमान सर्व लोकांमध्यें पतीसारिखें स्त्रीला दुसरें दैवत नाहीं. त्याच्याच प्रसादानें स्त्रीचे मनोरथ परिपूर्ण होत असतात आणि तो क्रुद्ध झाला

शय्यासनान्युत्तमदर्शनानि । वस्त्राणि माल्यानि तथैव गन्धाः स्वर्गश्च लोको विपुला च कीर्तिः ३ सुखं सुखेनेह न जातु लभ्यं दुःखेन साध्वी लभते सुखानि । सा कृष्णमाराधय सौहृदेन प्रेम्णा च नित्यं प्रतिकर्मणा च ४ तथासनैश्चारुभिरग्र्यमाल्यैर्दाक्षिण्ययोगैर्विविधैश्च गन्धैः । अस्याः प्रियोस्मीति यथा विदित्वा त्वामेव संश्लिष्यति तद्विधत्स्व ५ श्रुत्वा स्वरं द्वारगतस्य भर्तुः प्रत्युत्थिता तिष्ठ गृहस्य मध्ये । दृष्ट्वा प्रविष्टं त्वरितासनेन पाद्येन चैनं प्रतिपूजयस्व ६ संप्रेषितायामथ चैव दास्यामुत्थाय सर्वं स्वयमेव कार्यम् । जानातु कृष्णस्तव भावमेतं सर्वात्मना मां भजतीति सत्ये ७ त्वत्संनिधौ यत्कथयेत्पतिस्ते यद्यप्यगुह्यं परिरक्षितव्यम् । काचित्सपत्नी तव वासुदेवं प्रत्यादिशेत्तेन भवेद्विरागः ८ प्रियांश्च रक्तांश्च हितांश्च भर्तुस्तान्भोजयेथा विविधैरुपायैः । द्वेष्यैरुपेक्ष्यैरहितैश्च तस्य भिद्यस्व नित्यं कुहकोद्यतैश्च ९ मदं प्रमादं पुरुषेषु हित्वा संयच्छ भावं

असतां स्त्रीचा घात होतो २. संतान, नानाप्रकारचे भोग, दिसण्यात अतिशय मनोहर असलेल्या शय्या व आसनें, वस्त्रं, पुष्पें, गंध, स्वर्गलोक आणि विपल कीर्ति हीं सर्व भर्त्यापासूनच स्त्रीला प्राप्त व्हावयाचीं असतात ३ सुखानें सुखाची प्राप्ति कधींहि होत नाहीं; दुःख सोसल्यानें साध्वीला सुखप्राप्ति होत असते. तस्मात्, तूं नेहमी मत्सररहित अंतःकरण, प्रेम, शरीरक्लेश, मनोहर आसनें, उत्कृष्ट पुष्पें, सरळ वर्तन आणि नानाप्रकारचे सुगंध ह्यांच्यायोगानें कृष्णाचें आराधन करीत जा; म्हणजे " मी हिला प्रिय आहें " असें समजून तो तुझ्याशीच लगटून राहील. तस्मात्, तूं ह्याप्रमाणें वाग ४,५. दरवाज्यांत आलेल्या पतीचा शब्द कानावर येतांक्षणीं तूं घरामध्यें उठून उभी रहात जा आणि तो दृष्टी पडतांक्षणीं सत्वर आसनानें व पाद्यानें त्याचा सत्कार करीत जा ६. दासी कोठें पाठविली असेल तर तिचें काम सर्व तूं स्वतःच करीत जा; आणि " अगदीं मनापासून ही माझी शुश्रूषा करीत असते " म्हणून ह्या तुझ्या प्रेमाविषयीं, हे सत्यभामे, कृष्णाची खात्री होऊं दे ७. तुझा पति तुझ्यापाशीं जें कांहीं सांगेल तें जरी गुह्य नसलें तरी तूं तें तुझ्याकडून बाहेर न फुटण्याविषयीं फारच जपत जा. कारण, एखादी तुझी सवत वासुदेवाला तुझें कांहीं सांगेल आणि तेवढ्यानें त्याचें तुझ्यावरील प्रेम उडेल ८. तुझ्या भर्त्याला जे कोणी प्रिय असतील, जे त्याच्यावर प्रेम करीत असतील आणि जे त्याचें हित करणारे असतील, त्यांना तूं नानाप्रकारच्या उपायांनीं संतुष्ट राखीत जा आणि त्याला अप्रिय, त्याच्या उपेक्षेस पात्र, त्याचें अहित करणारे व त्याचप्रमाणें त्याच्याशीं कपटानें वागणारे जे असतील त्यांच्या-

प्रतिगृह्य मौनम् । प्रद्युम्नसाम्बावपि ते कुमारौ नोपासितव्यौ रहिते कदाचित् १० महाकुलीनाभिरपापिकाभिः स्त्रीभिः सतीभिस्तव सख्यमस्तु । चण्डाश्च शौण्डाश्च महाशनाश्च चौराश्च दुष्टाश्चपलाश्च वर्ज्याः ११ एतद्यशस्यं भगदैवतं च स्वार्थं तथा शत्रुनिबर्हणं च । महार्हमाल्याभरणाङ्गरागा भर्तारमाराधय पुण्यगन्धा १२ [९२४६] इति श्रीमहाभारतेशतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यामारण्यके पर्वणि द्रौपदीसत्यभामासंवादपर्वणि चतुस्त्रिंशदधिकद्विशततमोऽध्यायः ॥ २३४ ॥

वैशम्पायन उवाच ॥ मार्कण्डेयादिभिर्विप्रैः पाण्डवैश्च महात्मभिः । कथाभिरनुकूलाभिः सह स्थित्वा जनार्दनः १ ततस्तैः संविदं कृत्वा यथावन्मधुसूदनः । आरुरुक्षू रथं सत्यामाह्वयामास केशवः २ सत्यभामा ततस्तत्र स्वजित्वा द्रुपदात्मजाम् । उवाच वचनं हृद्यं यथाभावं समाहितम् ३ कृष्णे मा भूत्तवोत्कण्ठा मा व्यथा मा प्रजागरः । भर्तृभिर्देवसंकाशैर्जितां

पासून तूं नेहमीच अलग रहात जा ९. इतर पुरुषाशीं भाषण्याचा प्रसंग आला असतां मद आणि हलगर्जीपणा अगदीं सोडून देऊन व मौन धारण करून तू मनोनिग्रह करीत जा आणि प्रद्युम्न व सांब हे जे तुझे पुत्र त्याच्याबरोबरसुद्धां तूं कधींही एकांतामध्यें गोष्टी सांगत बसत जाऊं नकोस १०. महाकुलीन, निष्पाप आणि पतिव्रता अशा स्त्रियांशीच तुझें सख्य असू दे आणि क्रूर, उन्मत्त, अधाशी, चोर, दुष्ट आणि चचल स्त्रिया तू वर्ज्य करीत जा ११ हें मीं सांगितलेलें पति वश करण्याचें साधन यशस्कारक, भाग्यकारक, स्वार्थसाधक आणि शत्रुनाशक आहे. ह्यास्तव, ह्याचें अवलंबन करून मोठ्यामोठ्या मूल्यवान् पुष्पमाला, भूषणें, उटया आणि उत्कृष्ट सुगंध ह्यांनीं युक्त असलेली तूं आपल्या भर्त्याचें आराधन करीत जा १२. ह्याप्रमाणें महर्षिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील द्रौपदीसत्यभामासंवादपर्वापैकीं दोनशें चवतिसावा अध्याय समाप्त झाला ॥ २३४ ॥

वैशंपायन सांगतात:— (हे जनमेजय राजा) मार्कंडेयप्रभृति ब्राह्मण आणि महात्मे पांडव ह्यांच्याशीं अनुकूल गोष्टी सांगत बसल्यानंतर १ कृष्णानें रीतीप्रमाणें त्या पांडवांशीं कानगोष्ट केली आणि रथावर आरूढ होण्याचें मनांत आणून त्यानें सत्यभामेला हाक मारिली २. तदनंतर सत्यभामा द्रौपदीला कडकडून भेटली आणि मनोहर, अंतःकरणपूर्वक व प्रेमयुक्त असें भाषण तिच्याशीं करूं लागली ३. (ती म्हणाली) " हे द्रौपदि, तुला कसलीही काळजी नको; तुला दुःख होणार नाहीं आणि ह्यापुढें तुला आतां फार जागरणेंही होणार नाहीत. देवतुल्य भर्त्यांनीं जिंकिलेली

प्राप्स्यसि मेदिनीम् ४ न ह्येवं शीलसंपन्ना नैवं पूजितलक्षणाः। प्राप्नु-वन्ति चिरं क्लेशं यथा त्वमसितेक्षणे ५ अवश्यं च त्वया भूमिरियं निहत-कण्टका। भर्तृभिः सह भोक्तव्या निर्द्वन्द्वेति श्रुतं मया ६ धार्तराष्ट्रवधं कृत्वा वैराणि प्रतियात्य च। युधिष्ठिरस्थां पृथिवीं द्रक्ष्यसे द्रुपदात्मजे ७ यास्ताः प्रव्राजमानां त्वां प्राहसन्दर्पमोहिताः। ताः क्षिप्रं हतसंकल्पा द्रक्ष्यसि त्वं कुरुस्त्रियः ८ तव दुःखोपपन्नाया यैराचरितमप्रियम्। विधि-संप्रस्थितान्सर्वास्तान्कृष्णे यमसादनम् ९ ये च तत्र स्थिता राज्ञि ये तत्पक्षाः क्षितीश्वराः। तेषां कालः क्षितीशानां प्राप्तकालो दुरासदः १० पुत्रस्ते प्रतिविन्ध्यश्च सुतसोमस्तथाविधः। श्रुतकर्मार्जुनिश्चैव शतानी-कश्च नाकुलिः ११ सहदेवाच्च यो जातः श्रुतसेनस्तवात्मजः। सर्वे कुश-लिनो वीराः कृतास्त्राश्च सुतास्तव १२ अभिमन्युरिव प्रीता द्वारवत्यां रता भृशम् १३ त्वमिवैषां सुभद्रा च प्रीत्या सर्वात्मना स्थिता। प्रीयते तव निर्द्वन्द्वा तेभ्यश्च विगतज्वरा १४ दुःखिता तेन दुःखेन सुखेन सुखिता तथा। भज-

---

पृथ्वी तुला (लवकरच) प्राप्त होईल ४. हे कृष्णनयने, तुझ्याप्रमाणें सुशील व सुलक्षणी स्त्रियांना फार दिवस क्लेश सहन करावे लागत नाहींत ५. भर्त्यांसहवर्तमान ह्या निष्कंटक व शत्रुरहित पृथ्वीचा उपभोग तुला अवश्य घडणार आहे हें मी ऐकिलें आहे ६ हे द्रुपदकन्ये धृतराष्ट्रपुत्राचा वध करून सूड उगविल्यानंतर युधिष्ठिराचे ताब्यात असलेली पृथ्वी तू अवलोकन करशील ७. तूं वनामध्ये जात असतांना गर्वानें मोहित झाल्यामुळे ज्या कौरवस्त्रिया तुला हसल्या आहेत त्या लवकरच हताश झाल्याचें तूं अवलोकन करशील ८. तूं दुःखित असतांना ज्यांनीं तुझ्याशीं अप्रिय आचरण केलें आहे ते सर्व, हे कृष्णे, त्यांच्या दैवानें यमसदनास पाठविलेले तू अवलोकन कर-शील ९. हे राजपत्नि, त्या कौरवांकडे जे असतील आणि जे राजे त्यांच्या पक्षाला असतील त्या सर्वही भूपतींचा कधींही न टळणारा असा मृत्युसमय जवळच आला आहे १०. (युधिष्ठिरापासून झालेला) तुझा पुत्र प्रतिविंध्य, (भीमसेनापासून झालेला) तशाच प्रकारचा तुझा पुत्र सुतसोम, अर्जुनापासून झालेला श्रुतकर्मा, नकुलापासून झालेला शतानीक ११ आणि सहदेवापासून झालेला तुझा पुत्र श्रुतसेन हे सर्वही तुझे पुत्र वीर, कृतास्त्र आणि स्वस्तिक्षेम आहेत १२. इतकेंच नव्हे परंतु अभि-मन्यूप्रमाणें ते संतुष्ट असून द्वारवतीनगरीमध्यें वास्तव्य करणें त्यांना अतिशयच आवडलेलें आहे १३. शिवाय, तुझ्याप्रमाणेंच सुभद्रा अगदीं सर्व प्रकारें ह्यांचेठिकाणीं मनापासून प्रेम करीत आहे आणि तुझ्याविषयीं मनामध्यें भेदभाव मुळींच न धरितां

त्सर्वात्मना चैव प्रद्युम्नजननी तथा १५ भानुप्रभृतिभिश्चैनान्विशिनष्टि च
केशवः । भोजनाच्छादने चैषां नित्यं मे श्वशुरः स्थितः १६ रामप्रभृतयः सर्वे
भजन्त्यन्धकवृष्णयः । तुल्यो हि प्रणयस्तेषां प्रद्युम्नस्य च भाविनि १७
एवमादि प्रियं सत्यं हृद्यमुक्त्वा मनोनुगम् । गमनाय मनश्चक्रे वासुदेव-
रथं प्रति १८ तां कृष्णां कृष्णमहिषी चकाराभिप्रदक्षिणम् । आरुरोह
रथं शौरेः सत्यभामाथ भाविनी १९ स्मयित्वा तु यदुश्रेष्ठो द्रौपदीं परि-
सान्त्व्य च । उपावर्त्य ततः शीघ्रैर्हयैः प्रायात्पुरं स्वकम् २० [९२६६]
इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यामारण्यके पर्वणि
द्रौपदीसत्यभामासंवादपर्वणि कृष्णगमने पञ्चत्रिंशदधिकद्विशततमो-
ध्यायः ॥ २३५ ॥ समाप्तमिदं द्रौपदीसत्यभामासंवादपर्व ॥

अथ घोषयात्रापर्व । जनमेजय उवाच ॥ एवं वने वर्तमाना नराग्र्याः
शीतोष्णवातातपकर्शिताङ्गाः । सरस्तदासाद्य वनं च पुण्यं ततः परं

आणि त्यांच्यासंबंधानेंही यत्किंचित्सुद्धां शंका मनांत न आणितां ती त्यांना पाहून आनंदित होत आहे १४. सारांश, त्यांच्या दुःखानें ती दुःखित होत असून त्यांच्या सुखानें तिला सुख होत आहे आणि त्याचप्रमाणें (मी) प्रद्युम्न माताही त्यांच्यावर अगदीं मनापासून प्रेम करीत असून १५ श्रीकृष्णही भानुप्रभृतीपेक्षां त्यांच्याशीं विशेष प्रेमानें वागत आहे. माझे श्वशुर त्यांच्या अन्नवस्त्राची व्यवस्था पाहण्याविषयीं नेहमीं तत्पर असून १६ बलरामप्रभृति सर्वही अंधक व वृष्णि त्यांचें कोड पुरविण्यांत तत्पर आहेत आणि, हे बाई, माझेंही प्रेम त्यांचे ठिकाणीं व प्रद्युम्नाचे ठिकाणीं अगदीं सारखेंच आहे " १७. हें व अशाच प्रकारचें प्रिय, सत्य, मनोहर आणि मनापासून निघालेलें भाषण करून सत्यभामेनें वासुदेवाच्या रथाकडे जाण्याचें मनामध्यें आणिलें १८ आणि नंतर ती कृष्णाची राणी सद्गुणी सत्यभामा त्या द्रौपदीला प्रदक्षिणा करून श्रीकृष्णाच्या रथावर आरूढ झाली १९. असो. इतकें झाल्यानतर यदुकुलश्रेष्ठ श्रीकृष्णानें हास्यपूर्वक द्रौपदीचें सांत्वन केलें आणि पांडवांना निरोप देऊन शीघ्रगामी अश्वाच्या योगानें तो लवकरच आपल्या स्वतःच्या राजधानीला निघून गेला २०. ह्याप्रमाणें महर्षिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील द्रौपदीसत्यभामासंवादपर्वांपैकीं कृष्णगमनाविषयीं दोनशें पस्तिसावा अध्याय समाप्त झाला ॥ २३५ ॥ ह्या ठिकाणीं द्रौपदीसत्यभामासंवादपर्वही समाप्त झालें.

येथून पुढें घोषयात्रापर्व सुरू झालें. जनमेजय प्रश्न करितोः—थंडी, उष्ण, वारा आणि ऊन ह्यांच्यायोगानें ज्यांचीं शरीरें कृश झालीं आहेत असे ते कुंतीपुत्र पुरुषश्रेष्ठ

किमकुर्वन्त पार्थाः १ वैशम्पायन उवाच ॥ सरस्तदासाद्य तु पाण्डुपुत्रा जनं समुत्सृज्य विधाय वेश्म । वनानि रम्याण्यथ पर्वतांश्च नदीप्रदेशांश्च तदा विचेरुः २ तथा वने तान्वसतः प्रवीरान्स्वाध्यायवन्तश्च तपोधनाश्च । अभ्याययुर्वेदविदः पुराणास्तान्पूजयामासुरथो नराग्र्याः ३ ततः कदाचित्कुशलः कथासु विप्रोऽभ्यगच्छद्भुवि कौरवयान् । स तैः समेत्याथ यदृच्छयैव वैचित्रवीर्यं नृपमभ्यगच्छत् ४ अथोपविष्टः प्रतिसत्कृतश्च वृद्धेन राज्ञा कुरुसत्तमेन । प्रचोदितः संकथयाम्बभूव धर्मानिलेन्द्रप्रभवान्यमौ च ५ कृशांश्च वातातपकर्शिताङ्गान्दुःखस्य चोग्रस्य मुखे प्रपन्नान् । तां चाप्यनाथामिव वीरनाथां कृष्णां परिक्लेशगुणेन युक्ताम् ६ ततः कथास्तस्य निशम्य राजा वैचित्रवीर्यः कृपयाभितप्तः । वने तथा पार्थिवपुत्रपौत्राञ्छ्रुत्वा तथा दुःखनदीं प्रपन्नान् ७ प्रोवाच दैन्याभिहतान्तरात्मा निःश्वासवानोपहतस्तदानीम् । वाचं कथंचित्स्थिर-

---

पांडव अरण्यामध्यें रहात असतांना त्या पवित्र द्वैतवनांतील सरोवरापाशीं आल्यावर त्यांनीं काय केलें ? १ वैशंपायन सांगतातः—त्या सरोवरापाशीं आल्यानंतर पांडवानीं बरोबर आलेले लोक सोडून देऊन व ठिकठिकाणीं निवासस्थल तयार करून ते रम्य वनांतून, पर्वतांतून आणि नदीप्रदेशांतून संचार करूं लागले २. ह्याप्रमाणें ते वीर पांडव वनामध्यें वास्तव्य करीत असतांना वेदाध्ययनशील आणि तपोधन असे पुरातन वेदवेत्ते त्यांच्याकडे येऊं लागले व ते पुरुषश्रेष्ठ पांडवही त्यांचा सत्कार करूं लागले ३. तदनंतर वृत्तांत कथन करण्यामध्यें कुशल असलेला एक विप्र पृथ्वीवर हिंडतां हिंडतां कौरवांकडे गेला आणि त्यांची गांठ पडल्यानंतर तो सहज धृतराष्ट्रराजालाही जाऊन भेटला ४. नंतर कुरुवंशजश्रेष्ठ वृद्ध धृतराष्ट्रराजानें सत्कार केल्यावर तो बसला असतां धृतराष्ट्रानें (वनांतील वर्तमान कथन करण्याविषयीं) त्याला विनंति केली. तेव्हां " धर्मराज, भीमसेन, अर्जुन आणि नकुलसहदेव कृश झाले आहेत ; वाऱ्यामुळें व उन्हामुळें त्यांचीं शरीरें जर्जर झालेलीं आहेत ; ते भयंकर दुःखाच्या जबड्यामध्यें सांपडलेले आहेत आणि त्याचप्रमाणें वीर पतींनीं युक्त असलेली ती द्रौपदीही अनाथाप्रमाणें सर्वस्वी क्लेश सोशीत आहे " असें त्यानें सांगितलें ५. ६. ह्याप्रमाणें त्या विप्रानें कथन केलेल्या वनांतील कथा श्रवण केल्यावर विचित्रवीर्यपुत्र धृतराष्ट्रराजा कृपेनें हळहळून गेला. त्याप्रमाणें ते राजपुत्र व राजपौत्र वनामध्यें वास्तव्य करीत असून दुःखनदीमध्यें बुडून गेलेले आहेत असें श्रवण केल्यावर ७ धृतराष्ट्राचें मन अगदीं दैन्यग्रस्त झालें ; तो

तामुपेत्य तत्सर्वमात्मप्रभवं विचिन्त्य ८ कथं नु सत्यः शुचिरार्यवृत्तो
ज्येष्ठः सुतानां मम धर्मराजः । अजातशत्रुः पृथिवीतले स्म शेते पुरा
राङ्कवकूटशायी ९ प्रबोध्यते मागधसूतपूगैर्नित्यं स्तुवद्भिः स्वयमिन्द्र-
कल्पः । पतत्रिसङ्घैः स जघन्यरात्रे प्रबोध्यते नूनमिडातलस्थः १० कथं
नु वातातपकर्शिताङ्गो वृकोदरः कोपपरिप्लुताङ्गः । शेते पृथिव्यामतथो-
चिताङ्गः कृष्णासमक्षं वसुधातलस्थः ११ तथार्जुनः सुकुमारो मनस्वी
वशे स्थितो धर्मसुतस्य राज्ञः । विदूयमानैरिव सर्वगात्रैर्ध्रुवं न शेते वस-
तीरमर्षात् १२ यमौ च कृष्णां च युधिष्ठिरं च भीमं च दृष्ट्वा सुख-
विप्रयुक्तम् । विनिःश्वसन्सर्प इवोग्रतेजा ध्रुवं न शेते वसतीरम-
र्षात् १३ तथा यमौ चाप्यसुखौ सुखार्हौ समृद्धरूपावमरौ दिवीव ।
प्रजागरस्थौ ध्रुवमप्रशान्तौ धर्मेण सत्येन च वार्यमाणौ १४ समीरणेनाथ

अतिशय सुस्कारे टाकू लागला आणि हा सर्व प्रकार आपल्यामुळेंच झाला आहे
असें जेव्हां त्याच्या मनामध्यें आलें तेव्हां कसें तरी मन घट्ट करून तो ह्मणाला ८
" रंकुसंज्ञक मृगलोमाच्या गाद्यांवर जो पूर्वीं शयन करीत असे तो सत्य, शुचि
आणि सद्वर्तनी असा माझा ज्येष्ठ पुत्र अजातशत्रु धर्मराज पृथ्वीवर कसें बरें शयन
करीत आहे ! ९. अरे, मागध आणि सूत ह्यांच्या झुंडींच्या झुंडी स्तवन करूं लागल्या
ह्मणजे जो नेहमीं जागा होत असे तो स्वतः इंद्रतुल्य धर्मराज खरोखर पक्षिसमुदा-
यांच्या योगानेंच सांप्रत पहाटेस जागा होत असतो ना ! १०. क्रोधानें ज्याचें सर्व
शरीर व्यापून गेलेलें आहे ; वारा आणि ऊन ह्यांच्यायोगानें ज्याचें शरीर कृश
झालें आहे आणि पृथ्वीवर शयन करण्याचा ज्याला पूर्वीं कधींही प्रसंग आलेला
नाहीं असा भीमसेन द्रौपदीच्या समक्ष भूतलावर कसें बरें शयन करीत आहे ! ११.
त्याचप्रमाणें सुकुमार, विचारी आणि राजा धर्मपुत्र युधिष्ठिराच्या आज्ञेंत राहणारा
अर्जुन क्रोधानें जशीं कांहीं सर्व गात्रें ठणकत असल्यामुळेंच कीं काय कोणजाणें
निःसंशय अरण्यामध्यें वास्तव्य करीत असतांना कधींही शयन करीत नसेल १२.
नकुलसहदेव, द्रौपदी, युधिष्ठिर आणि भीमसेन हे सुखहीन झाल्याचें
अवलोकन करून सर्पाप्रमाणें सुस्कारे टाकीत असलेला उग्रतेजस्वी अर्जुन
क्रोधामुळें खरोखर मुक्कामांना झोप घेत नसेल १३. त्याचप्रमाणें सुखो-
पभोगालाच योग्य असून दुःखित झालेले आणि सौंदर्यसंपन्न असल्यामुळें स्वर्गातील
देवांप्रमाणें भासत असलेले नकुलसहदेव क्षुब्ध झाले असतील आणि धर्म व सत्य
यांनीं जरी ते बद्ध झाले असले तरी रात्रीं निःसंशय त्यांना झोप येत नसेल १४.

समो बलेन समीरणस्यैव सुतो बलीयान् । स धर्मपाशेन सितोऽग्रजेन
ध्रुवं विनिःश्वस्य सहत्यमर्षम् १५ स चापि भूमौ परिवर्तमानो वधं
सुतानां मम काङ्क्षमाणः । सत्येन धर्मेण च वार्यमाणः कालं प्रतीक्ष-
त्यधिको रणेऽन्यैः १६ अजातशत्रौ तु जिते निकृत्या दुःशासनो यत्प-
रुषाण्यवोचत् । तानि प्रविष्टानि वृकोदराङ्गं दहन्ति कक्षाग्निरिवेन्ध-
नानि १७ न पापकं ध्यास्यति धर्मपुत्रो धनञ्जयश्चाप्यनुवर्त्स्यते तम् ।
अरण्यवासेन विवर्धते तु भीमस्य कोपोऽग्निरिवानिलेन १८ स तेन कोपेन
विदह्यमानः करं करेणाभिनिपीड्य वीरः । विनिःश्वसत्युष्णमतीव
घोरं दहन्निवेमान्मम पुत्रपौत्रान् १९ गाण्डीवधन्वा च वृकोदरश्च संर-
म्भिणावन्तककालकल्पौ । न शेषयेतां युधि शत्रुसेनां शरान्किरन्तावश-
निप्रकाशान् २० दुर्योधनः शकुनिः सूतपुत्रो दुःशासनश्चापि सुमन्दचेताः।
मधु प्रपश्यन्ति न तु प्रपातं यद्द्यूतमालम्ब्य हरन्ति राज्यम् २१ शुभा-

---

बलानें वायूची बरोबरी करणारा असून वायूचाच पुत्र बलाढ्य भीमसेन ज्येष्ठभ्रातृ-रूप धर्मपाशानें बद्ध झाला असल्यामुळें सुस्कारे टाकून टाकूनच खरोखर आपला क्रोध आवरून धरीत असेल १५ भूमीवर लोळत असलेला तो भीमसेन माझ्या पुत्रांच्या वधाची इच्छा करीत असेल; परत, संग्रामामध्यें इतरांना जरी अजिंक्य आहे तरी सत्य आणि धर्म यांनीं त्याला आवरून धरला असल्यामुळें तो कालाची वाट पाहत बसला असेल १६. अजातशत्रु युधिष्ठिराला कपटानें जिंकिल्यावर दुःशासनानें जीं कठोर भाषणें उच्चारिलीं तीं तृणाचे ठिकाणीं प्रज्वलित झालेला वन्हि ज्याप्रमाणें इंधनें जाळून टाकितो त्याप्रमाणें भीमसेनाच्या शरीराला जाळीत असतील १७. धर्मपुत्र युधिष्ठिर मनामध्यें भलतेंसलतें आणणार नाहीं; धनंजयही त्यालाच अनुसरून वागेल; परतु वनवासामुळें भीमसेनाचा कोप मात्र वायूनें वृद्धिंगत होणाऱ्या अग्नीप्रमाणें वृद्धिंगत होत असेल १८. त्या कोपानें जळत असलेला वीर भीमसेन हातावर हात चोळून माझे पुत्रपौत्र दग्ध करीतच कीं काय रागारागानें घोर व उष्ण सुस्कारे टाकीत असेल १९. गांडीवधनुर्धारी अर्जुन आणि वृकोदर भीमसेन हे क्षुब्ध झाल्यामुळें मृत्यु व काल ह्यांप्रमाणें होऊन युद्धामध्यें वज्रतुल्य बाणांचा वर्षाव करूं लागले असतां शत्रूचें सैन्य शिलक ठेवणार नाहींत २०. दुर्योधन, शकुनि, सूतपुत्र कर्ण आणि अत्यंत मंदमति दुःशासन हे ज्याअर्थी द्यूताचें अवलंबन करून राज्य हरण करीत आहेत त्याअर्थी ह्यांना (कड्यावरील वगैरे) मध दिसत असून पतन दिसत नाहीं २१. बरें वाईट कर्म पुरुष करीत असतो व त्या कर्माच्या

शुभं कर्म नरो हि कृत्वा प्रतीक्षते तस्य फलं स्म कर्ता। स तेन युक्त-
स्त्ववशः फलेन मोक्षः कथं स्यात्पुरुषस्य तस्मात् २२ क्षेत्रे सुकृष्टे
ह्युपिते च बीजे देवे च वर्षत्यृतुकालयुक्तम्। न स्यात्फलं तस्य कुतः
प्रसिद्धिरन्यत्र दैवादिति चिन्तयामि २३ कृतं मताक्षेण यथा न साधु
साधुप्रवृत्तेन च पाण्डवेन। मया च दुष्पुत्रवशानुगेन यथा कुरूणामय-
मन्तकालः २४ ध्रुवं प्रवास्यत्यसमीरितोपि ध्रुवं प्रजास्यत्युत गर्भिणी या।
ध्रुवं दिनादौ रजनीप्रणाशस्तथा क्षपादौ च दिनप्रणाशः २५ क्रियेत
कस्मादपरे च कुर्युर्वित्तं न दद्युः पुरुषाः कथंचित्। प्राप्यार्थकालं च
भवेदनर्थः कथं नु तत्स्यादिति तत्कुतः स्यात् २६ कथं नु भिद्येत न

पुरुषालाच त्याच्या फलाची वाट पहावी लागते. कर्म केल्यावर त्याच्या फलांतून सुटणें स्वाधीन न राहतां पुरुष परतंत्र बनत असतो. तस्मात्, त्या फलापासून मूढ पुरुषाची सुटका कशी होणार ? २२. चांगल्या नांगरलेल्या शेतामध्यें बीज पेरिलें असतां आणि पर्जन्यही ऋतुकालाला अनुसरून पडला असतां जर फल-प्राप्ति होणार नाहीं तर दैवावांचून तसें होण्याला दुसरें कांहीं कारण नाहीं असें मला वाटतें २३. द्यूतामध्यें निष्णात असलेल्या शकुनीनें प्रथम चांगलें कर्म केलें नाहीं. तथापि, सद्वर्तनानें वागणाऱ्या पांडुपुत्रानें (त्यांचा त्या वेळेला घात केला नाहीं हें) कृत्य चांगलें केलें; परंतु, दुष्ट पुत्रांच्या ह्मणण्याप्रमाणें वागून मीं पुनरपि वाईट कृत्य केलें आणि त्यामुळें आतां कौरवांचा हा अंतकाल येऊन ठेपला आहे २४. वायूला जरी कोणी प्रेरणा केली नाहीं तरी तो निःसंशय वहाणारच; गर्भिणी स्त्री खचित बाळं-तीण होणारच; दिवस उगवला असतां रात्रीचा नाश ठेवलेलाच आहे आणि रात्र पडली असतां दिवसाचा लय ठरलेलाच आहे. (सारांश, द्यूतानें दुर्योधनप्रभृतींनीं राज्य हरण केलें ह्या पापाचें फल आह्मांला प्राप्त होणारच) २५. (" तर मग पूर्वींच ह्या गोष्टीचा विचार कां केला नाहींस ? " ह्मणून मला कोणी विचारील; परंतु, मनुष्या-मध्यें जर इतका विवेक असता तर अन्यायानें) द्रव्यार्जन करण्यास पुरुषाची प्रवृत्ति कां झाली असती ? बरें (" तूं मूर्ख आहेस ह्मणून तुला तसा विवेक झाला नाहीं " असें कोणी मला ह्मणेल तर) दुसऱ्या पूर्वींच्या राजांनीं तरी द्रव्यसंपादन कां करावें? किंवा द्रव्य संपादन केलें असतां तें संपादन करणाऱ्या चांगल्या लोकांनींही कांहीं तरी योग्य प्रकारानें त्याचा व्यय कां केला नसता? (सारांश, द्रव्यसंपादनाकडे आणि संपा-दिलेल्या द्रव्याचें रक्षण करण्याकडे मनुष्याच्या बुद्धीचा कल स्वाभाविकच होत असतो. आतां " द्रव्यार्जन केलेंच नाहीं तर काय चिंता आहे ? " असें जर कोणी विचारील

च भवेत न च प्रसिच्येदिति रक्षितव्यम् । आरभ्यमाणं शतधा प्रकीर्येद्ध्रुवं न नाशोस्ति कृतस्य लोके २७ गतो ह्यरण्यादपि शक्रलोकं धनञ्जयः पश्यत वीर्यमस्य । अस्त्राणि दिव्यानि चतुर्विधानि ज्ञात्वा पुनर्लोकमिमं प्रपन्नः २८ स्वर्गं हि गत्वा सशरीर एव को मानुषः पुनरागन्तुमिच्छेत् । अन्यत्र कालोपहताननेकान्समीक्षमाणस्तु कुरून्मुमूर्षून् २९ धनुर्ग्राहश्चार्जुनः सव्यसाची धनुश्च तद्गाण्डिवं भीमवेगम् । अस्त्राणि दिव्यानि च तानि तस्य त्रयस्य तेजः प्रसहेत कोत्र ३० निशम्य तद्वचनं पार्थिवस्य दुर्योधनं रहिते सौबलोथ । अबोधयत्कर्णमुपेत्य सर्वं स चाप्रहृष्टो भवदल्पचेताः ३१ [९२९७] इति श्रीमहाभारते

तर) द्रव्यसाध्य दारपरिग्रहादि करण्याचा यौवनप्रभृति काल प्राप्त झाला असतां मन गोंधळून जाणें हा अनर्थ होतच असतो. सारांश, तें द्रव्यसाध्य कृत्य माझ्या हातून कसें होईल आणि तें द्रव्य कोणत्या उपायानें मला प्राप्त होईल असा चिंतारूप अनर्थ होतच असतो २६. संपादन केलेलें द्रव्य ज्या भांड्यांत ठेविलें असेल तें भांडें कांहीं केलें तरी फुटूं नये; त्यांतून द्रव्य थोडें थोडेंही बाहेर जाऊं नये आणि एकवमही द्रव्याचा प्रवाह बाहेर लागूं नये; ह्मणून द्रव्य हें रक्षण करून ठेवणेंच योग्य आहे; कारण, द्रव्याचें रक्षण न केलें तर शेंकडों मार्गांनीं तें उडून जाईल (आणि अर्थनाश होणें हा तर फारच मोठा अनर्थ आहे. आतां " पुत्रादिकांच्या नाशापेक्षां द्रव्यनाश होणें बरें " असें कोणी ह्मणेल तर तें बरोबर नाहीं कारण,) केलेल्या कर्माचें फल जगतामध्यें निःसंशय यावयाचेंच आहे (हें जर ठरलेलें आहे तर द्रव्यनाश करण्यानें समजून उमजून दुःखसंपादन कोण करील) २७. असो. पहा त्या धनंजयाचें सामर्थ्य किती आहे तें ! हा वनांतूनही इंद्रलोकीं गेला आणि तेथें चारी प्रकारचीं दिव्य अस्त्रें संपादन करून पुनरपि ह्या भूलोकीं परत आला २८. कालानें ग्रासलेल्या आणि ह्मणूनच आसन्नमरण झालेल्या अनेक कौरवांच्या नाशाची वाट पहाणाऱ्या अर्जुनाशिवाय शरीरासहवर्तमान स्वर्गाला गेल्यानंतर पुनरपि इहलोकीं परत येण्याची इच्छा करणारा दुसरा कोण बरें मनुष्य आढळणार आहे ? २९. धनुर्धारी सव्यसाची अर्जुन, धनुष्यही तें प्रचंड वेगयुक्त गांडीव आणि त्याचीं तीं दिव्य अस्त्रें ह्या तिघांचें (एकत्र झालेलें) तेज सहन करणारा ह्या पृथ्वीमध्यें कोण आहे ?" ३०. धृतराष्ट्रराजाचें ते भाषण श्रवण करून शकुनीनें एकांतामध्यें कर्णाला व दुर्योधनाला तें सांगितलें आणि तें ऐकून (संपादन केलेलें द्रव्य परत देऊं नये असें धृतराष्ट्रराजाचें मत दिसून आल्यामुळें) मंदमति दुर्योधनही आनंदित झाला ३१. ह्याप्रमाणें

शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यामारण्यके पर्वणि घोषयात्रापर्वणि धृतराष्ट्रखेदवाक्ये षट्त्रिंशदधिकद्विशततमोध्यायः ॥ २३६ ॥

वैशम्पायन उवाच ॥ धृतराष्ट्रस्य तद्वाक्यं निशम्य शकुनिस्तदा । दुर्योधनमिदं काले कर्णेन सहितोब्रवीत् १ प्रव्राज्य पाण्डवान्वीरान्स्वेन वीर्येण भारत । भुङ्क्ष्वेमां पृथिवीमेको दिवि शम्बरहा यथा २ प्राच्याश्च दाक्षिणात्याश्च प्रतीच्योदीच्यवासिनः । कृताः करप्रदाः सर्वे राजानस्ते नराधिप ३ या हि सा दीप्यमानेव पाण्डवानभजत्पुरा । साद्य लक्ष्मीस्त्वया राजन्नवाप्ता भ्रातृभिः सह ४ इन्द्रप्रस्थगते यां तां दीप्यमानां युधिष्ठिरे । अपश्याम श्रियं राजन्दृश्यते सा तवाद्य वै ५ शत्रवस्तव राजेन्द्र नचिरं शोककर्शिताः । सा तु बुद्धिबलेनेयं राज्ञस्तस्माद्युधिष्ठिरात् ६ त्वयाक्षिप्ता महाबाहो दीप्यमानेव दृश्यते । तथैव तव राजेन्द्र राजानः परवीरहन् ७ शासनेधिष्ठिताः सर्वे किं कुर्म इति वादिनः । तवेयं पृथिवी राजन्निखिला सागराम्बरा ८ सपर्वतवना देवी सग्रामनगराकरा । नानावनोद्देशवती पर्वतैरुपशोभिता ९

महर्षिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील घोषयात्रापर्वापैकीं धृतराष्ट्रराजाच्या सखेदभाषणाविषयीं दोनशें छत्तिसावा अध्याय समाप्त झाला॥ २३६॥

वैशंपायन सांगतात:—धृतराष्ट्राचें तें भाषण श्रवण करून शकुनि त्याच वेळीं कर्णा (कडे गेला आणि त्या) ला बरोबर घेऊन दुर्योधनाला ह्मणाला १ " हे भरतवंशजश्रेष्ठा दुर्योधना, स्वतःच्या पराक्रमानें वीर पांडवांना वनांत हाकून लाविल्यामुळें प्राप्त झालेल्या ह्या पृथ्वीचा उपभोग स्वर्गांतील राज्याचा उपभोग घेणाऱ्या इंद्राप्रमाणें तूं एकटा घे २. हे प्रजाधिपते दुर्योधना, पूर्वेकडील, दक्षिणेकडील, पश्चिमेकडील आणि उत्तरेकडील सर्वही राजे तूं कर देणारे करून टाकिलेस ३. हे राजा, जी उज्ज्वल राज्यलक्ष्मी पूर्वी पांडवांचा आश्रय करून राहिली होती ती आज भ्रात्यांसहवर्तमान तुला प्राप्त झाली आहे ४. हे राजा, युधिष्ठिर इंद्रप्रस्थामध्यें असतांना त्याच्या ठिकाणीं जें उज्वल वैभव आह्मीं पाहिलें तें आज तुझे ठिकाणीं दृष्टोत्पत्तीस येत आहे ५. हे राजाधिराज, शोकाकुल झालेले तुझे शत्रु आतां फार दिवस टिकाव धरणार नाहींत. असो. त्या युधिष्ठिर राजापासून बुद्धिसामर्थ्यानें हिसकावून घेतलेली ही राज्यलक्ष्मी, हे महापराक्रमी दुर्योधना, जशी कांहीं देदीप्यमान दिसत आहे. हे शत्रुपक्षीयवीरनाशका राजाधिराज दुर्योधना, युधिष्ठिराप्रमाणें तुझ्याही आज्ञेमध्यें सर्व राजे आहेत आणि " काय आज्ञा आहे " ह्मणून विचारीत आहेत. हे राजा, पर्वत, वनें, ग्राम, नगरें, खाणी आणि नानाप्रकारचे वनप्रदेश ह्यांनीं

वन्द्यमानो द्विजै राजन्पूज्यमानश्च राजभिः । पौरुषाद्दिवि देवेषु भ्राजसे
रश्मिवानिव १० रुद्रैरिव यमो राजा मरुद्भिरिव वासवः । कुरुभिस्त्वं
वृतो राजन्भासि नक्षत्रराडिव ११ यैः स्म ते नाद्रियेताज्ञा न च ये शासने
स्थिताः । पश्यामस्ताञ्श्रिया हीनान्पाण्डवान्वनवासिनः १२ श्रूयते हि
महाराज सरो द्वैतवनं प्रति । वसन्तः पाण्डवाः सार्धं ब्राह्मणैर्वनवा-
सिभिः १३ स प्रयाहि महाराज श्रिया परमया युतः । तापयन्पाण्डुपुत्रांस्त्वं
रश्मिवानिव तेजसा १४ स्थितो राज्ये च्युतान्राज्याच्छ्रिया हीनाञ्छ्रिया वृतः ।
असमृद्धान्समृद्धार्थः पश्य पाण्डुसुतान्नृप १५ महाभिजनसंपन्नं भद्रे महति
संस्थितम् । पाण्डवास्त्वाभिवीक्षन्तु ययातिमिव नाहुषम् १६ यां श्रियं
सुहृदश्चैव दुर्हृदश्च विशांपते । पश्यन्ति पुरुषे दीप्तां सा समर्था भव-
त्युत १७ समस्थो विषमस्थान्हि दुर्हृदो योभिवीक्षते । जगतीस्थानिवा-

---

युक्त, पर्वतांनीं सुशोभित आणि समुद्ररूप वस्त्र परिधान केलेली ही संपूर्ण पृथ्वी तुझी आहे ६,७,८,९. हे राजा, द्विज तुला वंदन करीत आहेत, राजे तुझी प्रशंसा करीत आहेत आणि स्वर्गांत देवांमध्यें झळकणाऱ्या सूर्याप्रमाणें तूं स्वपराक्रमामुळें येथें झळकत आहेस १०. हे राजा, रुद्रगणांनीं परिवेष्टित असलेल्या राजा यमधर्माप्रमाणें अथवा मरुद्गणांनीं परिवेष्टित असलेल्या इंद्राप्रमाणें कौरवांनीं परिवेष्टित असलेला तूं नक्षत्रराज चंद्राप्रमाणें शोभत आहेस ११, आणि जे तुझ्या आज्ञेचा आदर करीत नाहींत व जे तुझ्या अमलाखालीं रहात नाहींत त्या पांडवांना भाग्यहीन वनवासी अवलोकन करण्याचा प्रसंग आतां आपणांला आला आहे १२. हे महाराजा, वनवासी ब्राह्मणांसहवर्तमान पांडव द्वैतवननामक सरोवरासमीप रहात असल्याचें कानावर येत आहे १३. तस्मात्, हे महाराजा, पराकाष्ठेच्या राज्यलक्ष्मीनें संपन्न झालेला तूं तेजाच्या योगानें ताप देणाऱ्या सूर्याप्रमाणें पांडवांना ताप देण्याकरितां तिकडे जा १४. हे राजा, तूं राज्य करीत आहेस आणि ते राज्यापासून च्युत झालेले आहेत, तूं वैभवसंपन्न आहेस आणि ते वैभवहीन झालेले आहेत आणि तुझ्यापाशीं सर्व वस्तूंची समृद्धि असून ते सर्वप्रकारें दरिद्री बनलेले आहेत; तेव्हां अशा वेळीं तूं एकदा पांडुपुत्रांची भेट घेच १५. नहुषपुत्र ययातिराजाप्रमाणें मोठ्या कुलामध्यें येऊन प्रचंड राज्यवैभवानें संपन्न झालेल्या तुला एकदां पांडवांना अवलोकन करूं देच १६. हे प्रजाधिपते, पुरुषाला प्राप्त झालेलें उज्ज्वल वैभव जे मित्र व शत्रु हे उभयतांही पहात असतात तेंच वैभव (मित्रांना हर्ष व शत्रूंना शोक उत्पन्न करण्यास) समर्थ होत असतें १७. पर्वतावर स्थित होऊन पृथ्वीवरील प्राण्यांना अवलोकन करणाऱ्या

द्विस्थः किमतः परमं सुखम् १८ न पुत्रधनलाभेन न राज्येनापि विन्दति । प्रीतिं नृपतिशार्दूल याममित्राघदर्शनात् १९ किं नु तस्य सुखं न स्यादाश्रमे यो धनञ्जयम् । अभिवीक्षेत सिद्धार्थो वल्कलाजिनवाससम् २० सुवाससो हि ते भार्या वल्कलाजिनसंवृताम् । पश्यन्तु दुःखितां कृष्णां सा च निर्विद्यतां पुनः ॥ विनिन्दतां तथात्मानं जीवितं च धनच्युता २१ न तथा हि सभामध्ये तस्या भवितुमर्हति । वैमनस्यं यथा दृष्ट्वा तव भार्याः स्वलंकृताः २२ वैशम्पायन उवाच ॥ एवमुक्त्वा तु राजानं कर्णः शकुनिना सह । तूष्णीं बभूवतुरुभौ वाक्यान्ते जनमेजय २३ [९३२०] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यामारण्यके पर्वणि घोषयात्रापर्वणि कर्णशकुनिवाक्ये सप्तत्रिंशदधिकद्विशततमोऽध्यायः ॥ २३७ ॥

वैशम्पायन उवाच ॥ कर्णस्य वचनं श्रुत्वा राजा दुर्योधनस्ततः ।

पुरुषाप्रमाणें संपत्तीमध्यें असलेल्या पुरुषानें विपन्नावस्थेंत सांपडलेल्या आपल्या शत्रूंना अवलोकन करणें यापेक्षां परम सुख तें काय असणार ? १८. हे नृपश्रेष्ठा, शत्रूचें दुःख अवलोकन करून पुरुषाला जो आनंद होत असतो तो पुत्रलाभानें अथवा धनलाभानें होत नाहीं; इतकेंच नव्हे परंतु, राज्यप्राप्तीनेंही होत नाहीं १९. सर्व गोष्टींची समृद्धि स्वतःपाशीं असून आश्रमांमध्यें वल्कलें व कृष्णाजिनें परिधान केलेल्या (शत्रुभूत) धनंजयाला जो अवलोकन करील त्याला कोणतें बरें सुख होणार नाहीं ? २०. उत्कृष्ट वस्त्रें परिधान केलेल्या तुझ्या भार्यांनीं वल्कलांनीं व कृष्णाजिनांनीं आच्छादिलेल्या दुःखित द्रौपदीला अवलोकन करण्याचा प्रसंग येऊं देच आणि ती द्रौपदीही (त्यांना पाहून) खिन्न होऊं देच. इतकेंच नव्हे परंतु, वैभवापासून भ्रष्ट झालेल्या त्या द्रौपदीला स्वतःचा व जीविताचाही धिक्कार करण्याचा प्रसंग येऊं देच २१. उत्तम उत्तम अलंकार धारण केलेल्या तुझ्या भार्या अवलोकन करून द्रौपदीला जें दुःख होण्याचा संभव आहे तें दुःख तिला सभेमध्यें होण्याचा संभव नव्हता '' २२. वैशंपायन सांगतातः— हे जनमेजया, ह्याप्रमाणें शकुनीसहवर्तमान कर्णानें दुर्योधन राजाला सांगितलें आणि हें सांगणें झाल्यावर ते दोघेही स्वस्थ बसले २३. ह्याप्रमाणें महर्षिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील घोषयात्रापर्वापैकीं कर्ण व शकुनि ह्यांनीं दुर्योधनाशीं केलेल्या भाषणाविषयीं दोनशें सदतिसावा अध्याय समाप्त झाला ॥ २३७ ॥

वैशंपायन सांगतातः— कर्णाचें भाषण श्रवण करून राजा दुर्योधन आनंदित

हृष्टो भूत्वा पुनर्दीन इदं वचनमब्रवीत् १ ब्रवीषि यदिदं कर्ण सर्वं
मनसि मे स्थितम् । न त्वभ्यनुज्ञां लप्स्यामि गमने यत्र पाण्डवाः २
परिदेवति तान्वीरान्धृतराष्ट्रो महीपतिः । मन्यतेभ्यधिकांश्चापि तपोयो-
गेन पाण्डवान् ३ अथवाप्यनुबुध्येत नृपोस्माकं चिकीर्षितम् । एवम-
प्यायतिं रक्षन्नाभ्यनुज्ञातुमर्हति ४ न हि द्वैतवने किंचिद्विद्यतेन्यत्प्रयोज-
नम् । उत्सादनमृते तेषां वनस्थानां महाद्युते ५ जानासि हि यथा क्षत्ता
द्यूतकाल उपस्थिते । अब्रवीद्यच्च मां त्वां च सौबलं वचनं तदा ६ तानि
सर्वाणि वाक्यानि यच्चान्यत्परिदेवितम् । विचिन्त्य नाधिगच्छामि गमना-
येतराय वा ७ ममापि हि महान्हर्षो यदहं भीमफाल्गुनौ । क्लिष्टावरण्ये
पश्येयं कृष्णया सहिताविति ८ न तथा ह्याप्नुयां प्रीतिमवाप्य वसुधामि-
माम् । दृष्ट्वा यथा पाण्डुसुतान्वल्कलाजिनवाससः ९ किं नु स्यादधिकं
तस्माद्यदहं द्रुपदात्मजाम् । द्रौपदीं कर्ण पश्येयं काषायवसनां वने १०
यदि मां धर्मराजश्च भीमसेनश्च पाण्डवः । युक्तं परमया लक्ष्म्या पश्येतां

झाला; परंतु, पुनरपि दीन होऊन त्याला ह्मणाला १ " हे कर्णा, तूं जें सांगत आहेस हें सर्व माझ्या मनामध्यें आहेच. परतु, जिकडे पांडव आहेत तिकडे जाण्याची अनुज्ञा मला मिळणार नाहीं २. कारण, भूपति धृतराष्ट्र त्या वीर पांडवांकरितां शोक करीत आहे आणि तपानें तो त्यांना आमच्यापेक्षां अधिकही समजत आहे ३. तेव्हां आपला बेत जरी राजाला समजला तरी " (झाला तो अनर्थ पुरे झाला) आतां पुढें तरी आपणाला संभाळिलें पाहिजे " असें समजून तो मला तिकडे जाण्याची अनुज्ञा देणार नाहीं ४. कारण, हे महातेजस्वी कर्णा, वनामध्यें असलेल्या त्या पांडवांच्या नाशाशिवाय द्वैतवनामध्यें जाण्याचें आपणाला दुसरें कांहीं प्रयोजन नाहीं ५. शिवाय द्यूतसमय प्राप्त झाला असतां विदुर मला, तुला व शकुनीला काय बोलला हें तुझ्या लक्ष्यांत आहेच ६. त्याचीं तीं सर्व भाषणें आणि त्यानें केलेला तो शोक ह्यांचा विचार मना-मध्यें आला ह्मणजे तेथें जाण्याविषयीं अथवा न जाण्याविषयीं माझा कांहींच निश्चय होत नाहीं ७. द्रौपदीसहवर्तमान भीमार्जुन क्लेश भोगीत असतांना अरण्यामध्यें त्यांना अवलोकन करण्याचा जर प्रसंग येईल तर मलाही खरोखर मोठाच आनंद होईल ८. (फार काय सांगूं) वल्कलें व कृष्णाजिनें परिधान केलेल्या पांडुपुत्रांना अवलोकन करून जसा मला आनंद होईल तसा ही संपूर्ण पृथ्वी प्राप्त झाल्यानेंही होणार नाहीं ९. हे कर्णा, वनामध्यें काषायवस्त्रें नेसून राहिलेली द्रुपदराजकन्या द्रौपदी मीं अवलोकन करावी ह्यापेक्षां (जीविताचें साफल्य) अधिक तें काय होणार आहे ? १०. पराकाष्ठेच्या राज्य-

जीवितं भवेत् ११ उपायं न तु पश्यामि येन गच्छेम तद्वनम् । यथा चाभ्यनुजानीयाद्गच्छन्तं मां महीपतिः १२ स सौबलेन सहितस्तथा दुःशासनेन च । उपायं पश्य निपुणं येन गच्छेम तद्वनम् १३ अहमप्यद्य निश्चित्य गमनायेतराय च । कल्यमेव गमिष्यामि समीपं पार्थिवस्य ह १४ मयि तत्रोपविष्टे तु भीष्मे च कुरुसत्तमे । उपायो यो भवेद्दृष्टस्तं ब्रूयाः सहसौबलः १५ वचो भीष्मस्य राज्ञश्च निशम्य गमनं प्रति । व्यवसायं करिष्येहमनुनीय पितामहम् १६ तथेत्युक्त्वा तु ते सर्वे जग्मुरावसथान्प्रति । व्युषितायां रजन्यां तु कर्णो राजानमभ्ययात् १७ ततो दुर्योधनं कर्णः प्रहसन्निदमब्रवीत् । उपायः परिदृष्टोयं तं निबोध जनेश्वर १८ घोषा द्वैतवने सर्वे त्वत्प्रतीक्षा नराधिप । घोषयात्रापदेशेन गमिष्यामो न संशयः १९ उचितं हि सदा गन्तुं घोषयात्रां विशांपते । एवं च त्वां पिता राजन्समनुज्ञातुमर्हति २० तथा कथयमानौ तु घोषयात्राविनिश्चयम् । गान्धारराजः शकुनिः प्रत्युवाच हसन्निव २१ उपायोयं

लक्ष्मीनें संपन्न झालेल्या मला पांडुपुत्र धर्मराज आणि भीमसेन जर अवलोकन करतील तर माझ्या जीविताचें सार्थक तरी होईल ११. परंतु, (करूं काय !) आपणांला त्या वनांत जातां येईल आणि मी वनांत निघालों असतां भूपति मला अनुज्ञा देईल असा कांहीं उपाय मला सुचत नाहीं १२. ह्यास्तव, शकुनि आणि दुःशासन ह्यांना बरोबर घेऊन तूं आपणांला त्या वनामध्यें जातां येईल असा एकादा पक्का उपाय शोधून काढ १३. मीही जावें कां न जावें ह्याचा आज निश्चय करून पहाटेसच राजाचे समीप जाईन १४. कुरुवंशजश्रेष्ठ भीष्म तेथें असतांना मी तेथें जाऊन बसलों ह्मणजे शकुनीसहवर्तमान जो उपाय तूं योजिला असशील तो तेथें येऊन सांग १५. ह्मणजे भीष्म आणि राजा ह्या उभयतांची जाण्याविषयीं अनुज्ञा ऐकून घेऊन व भीष्माचें मन वळवून मी तिकडे जाण्याचा निश्चय करीन " १६. ह्यावर " ठीक आहे " असें ह्मणून ते सर्वही आपआपल्या घरीं गेले आणि दिवस उजाडल्यावर कर्ण दुर्योधनराजाकडे गेला १७. गेल्यानंतर कर्ण हंसत हंसत दुर्योधनाला ह्मणाला " हे राजा, हा उपाय सुचला आहे तो तूं ऐक १८. हे राजा, द्वैतवनांतील सर्व गोकुलें तुझी वाट पहात आहेत. तस्मात्, घोषयात्रेच्या निमित्तानें आपणांला निःसंशय तेथें जातां येईल १९. शिवाय हे प्रजाधिपते, घोषयात्रेला नेहमीं जाणें योग्यही आहे; आणि ह्मणून, हे राजा, पिता तुला जाण्याची अनुज्ञा देईलच " २०. ह्याप्रमाणें घोषयात्रेचा निश्चय करण्याविषयीं त्यांचें बोलणें चाललें असतां गांधारराज

मया दृष्टो गमनाय निरामयः । अनुज्ञास्यति नो राजा बोधयिष्यति चाप्युत २२ घोषा द्वैतवने सर्वे त्वत्प्रतीक्षा नराधिप । घोषयात्रापदेशेन गमिष्यामो न संशयः २३ ततः प्रहसिताः सर्वे तेऽन्योन्यस्य तलान्ददुः । तदेव च विनिश्चित्य ददृशुः कुरुसत्तमम् २४ [१३४४] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यामारण्यके पर्वणि घोषयात्रापर्वण्यष्टत्रिंशदधिकद्विशततमोऽध्यायः ॥ २३८ ॥

वैशम्पायन उवाच ॥ धृतराष्ट्रं ततः सर्वे ददृशुर्जनमेजय । पृष्ट्वा सुखमथो राज्ञः पृष्टा राज्ञा च भारत १ ततस्तैर्विहितः पूर्वं समङ्गो नाम बल्लवः । समीपस्थास्तदा गावो धृतराष्ट्रे न्यवेदयत् २ अनन्तरं च राधेयः शकुनिश्च विशाम्पते । आहतुः पार्थिवश्रेष्ठं धृतराष्ट्रं जनाधिपम् ३ रमणीयेषु देशेषु घोषाः संप्रति कौरव । स्मारणे समयः प्राप्तो वत्सानामपि चाङ्कनम् ४ मृगया चोचिता राजन्नस्मिन्काले सुतस्य ते । दुर्योधनस्य

शकुनि हसत हसत ह्मणाला २१ " अरे हो ! द्वैतवनांत जाण्याला हा उपाय मला अगदीं बिनतोड दिसत आहे. हा उपाय योजिला असतां राजा आपल्याला जाण्याची अनज्ञा देईल इतकेंच नव्हे; परंतु, जाण्याविषयीं उपदेशही करील २२. हे राजा, द्वैतवनांतील सर्व गोकुलें तुझी वाट पहात आहेत. तस्मात्, घोषयात्रेच्या निमित्तानें आपणाला निःसंशय तथें जातां येईल " २३. इतकें झाल्यानंतर सर्वांनींही उच्च स्वरानें हसून एकमेकांना टाळ्या दिल्या आणि तोच उपाय योजण्याचा निश्चय करून ते कुरुवंशजश्रेष्ठ धृतराष्ट्राच्या भेटीला गेले २४. ह्याप्रमाणें महर्षिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील घोषयात्रापर्वांपैकीं दोनशें अडतिसावा अध्याय समाप्त झाला ॥ २३८ ॥

वैशंपायन सांगतात:—हे भरतकुलोत्पन्ना जनमेजया, तदनंतर ते सर्वही धृतराष्ट्राला जाऊन भेटले आणि " बरें आहेनां ? " असें त्यांनीं धृतराष्ट्राला विचारिल्यानंतर धृराष्ट्रराजानेंही त्यांना तसाच प्रश्न केला १. नंतर त्यांनीं पूर्वीं ठरवून ठेविलेल्या समंगनामक गोपालानें गाई सनिध असल्याचें धृतराष्ट्राला निवेदन केलें २. इतकें झाल्यानंतर, हे प्रजाधिपते जनमेजया, राधेय कर्ण आणि शकुनि हे नृपश्रेष्ठ लोकाधिपति धृतराष्ट्राला ह्मणाले ३ " हे कौरवा, सांप्रत गाठे रम्य प्रदेशामध्यें आहेत आणि स्मारणाचा[1] व वासरांना खुणा करून ठेवण्याचा समय प्राप्त झाला आहे ४. शिवाय,

[1] गाई मोजून त्यांचे वय किती आहे, त्यांचा वर्ण कसला आहे, त्या कोणत्या जातीच्या आहेत आणि त्यांची नांवे काय आहेत हे टिपून ठेवणे ह्याला स्मरण असें ह्मणत असतात.

गमनं समनुज्ञातुमर्हसि ५ धृतराष्ट्र उवाच ॥ मृगया शोभना तात गवां हि समवेक्षणम् । विश्रम्भस्तु न गन्तव्यो बल्लवानामिति स्मरे ६ ते तु तत्र नरव्याघ्राः समीप इति नः श्रुतम् । अतो नाभ्यनुजानामि गमनं तत्र वः स्वयम् ७ छद्मना निर्जितास्ते तु कर्शिताश्च महावने । तपोनित्याश्च राधेय समर्थाश्च महारथाः ८ धर्मराजो न संक्रुध्येद्भीमसेनस्त्वमर्षणः । यज्ञसेनस्य दुहिता तेज एव तु केवलम् ९ यूयं चाप्यपराध्येयुर्दर्पमोहसमन्विताः । ततो विनिर्दहेयुस्ते तपसा हि समन्विताः १० अथवा सायुधा वीरा मन्युनाभिपरिप्लुताः । सहिता बद्धनिस्त्रिंशा दहेयुः शस्त्रतेजसा ११ अथ यूयं बहुत्वात्तानभियात कथंचन । अनार्यं परमं तत्स्यादशक्यं तच्च वै मतम् १२ उषितो हि महाबाहुरिन्द्रलोके धनञ्जयः । दिव्यान्यस्त्राण्यवाप्याथ ततः प्रत्यागतो वनम् १३ अकृतास्त्रेण पृथिवी जिता बीभत्सुना

हे राजा, अशा वेळीं मृगया करणेंही योग्य आहे. तस्मात्, आपल्या दुर्योधन पुत्राला जाण्याची आपण अनुज्ञा द्यावी" ५. धृतराष्ट्र ह्मणतो:—बाबारे, अशा वेळीं मृगया करणें चांगलें आहे आणि गाईंची पहाणी करणेंही योग्य आहे; परंतु, गोपालांवर विश्वास ठेवूं नये, ह्या ह्मणीची मला आठवण होत आहे ६. शिवाय, ते पुरुषश्रेष्ठ पांडव तेथें जवळच आहेत असें आमच्या ऐकण्यांत आलें आहे. ह्यास्तव, तुह्मा स्वतःला तिकडे जाण्याची अनुज्ञा मी देत नाहीं ७. कारण, हे कर्णा, तुह्मी त्यांना कपटानें जिंकिलें असून महावनामध्यें ते अगदीं कृश झालेले आहेत. तथापि, ते नेहमीं तपश्चर्या करणारे असून महारथी व समर्थ आहेत ८. (तुह्मां उभयतांची दृष्टादृष्ट झाली असतां) धर्मराज क्रुद्ध होणार नाहीं; परंतु, भीमसेनाला तें सहन होणें कठीण; आणि यज्ञसेनाची कन्या द्रौपदी तर केवळ आगच आहे ९. शिवाय, गर्व व मोह ह्यांनीं तुह्मी ग्रस्त झालां असल्यामुळें त्यांचा कांहीं तरी अपराध कराल आणि असें झालें असतां तपानें युक्त असलेले ते पांडव तपोबलानेंच तुह्मांला दग्ध करून टाकितील १०. अथवा सशस्त्र असलेले ते वीर क्रोधानें व्याप्त झाले असतां तरवारी लटकावून एकत्र होतील आणि शस्त्रांच्या तेजानेंच तुह्मांला दग्ध करून टाकितील ११. आतां तुह्मी पुष्कळ असल्यामुळें मोठ्या कष्टानें जर त्यांच्यावर चाल करून जाल तर तें पराकाष्ठेचें वाईट होईल आणि त्यांच्या हातून सुटका होणेंही अशक्यच होईल असें मला वाटतें १२. अरे, महापराक्रमी धनंजय इंद्रलोकांमध्यें राहिलेला आहे आणि दिव्य अस्त्रें प्राप्त करून घेतल्यानंतर तेथून पुनरपि वनामध्यें परत आला आहे १३. अरे, अर्जुनापाशीं दिव्य अस्त्रें नसतांनाही त्यानें पूर्वीं पृथ्वी जिंकून टाकिली आहे. तेव्हां सांप्रत दिव्यास्त्रांनीं संपन्न

पुरा । किं पुनः स कृतक्रोधो न हन्याद्वो महारथः १४ अथवा मद्वचः श्रुत्वा तत्र यत्ता भविष्यथ । उद्विग्नवासो विश्रम्भाद्दुःखं तत्र भविष्यति १५ अथवा सैनिकाः केचिदपकुर्युर्युधिष्ठिरम् । तदबुद्धिकृतं कर्म दोषमुत्पादयेच्च वः १६ तस्माद्गच्छन्तु पुरुषाः स्मारणायाप्तकारिणः । न स्वयं तत्र गमनं रोचये तव भारत १७ शकुनिरुवाच ॥ धर्मज्ञः पाण्डवो ज्येष्ठः प्रतिज्ञातं च संसदि । तेन द्वादश वर्षाणि वस्तव्यानीति भारत १८ अनुवृत्ताश्च ते सर्वे पाण्डवा धर्मचारिणः । युधिष्ठिरस्तु कौन्तेयो न नः कोपं करिष्यति १९ मृगयां चैव नो गन्तुमिच्छा संवर्तते भृशम् । स्मारणं तु चिकीर्षामो न तु पाण्डवदर्शनम् २० न चानार्यसमाचारः कश्चित्तत्र भविष्यति । न च तत्र गमिष्यामो यत्र तेषां प्रतिश्रयः २१ वैशम्पायन उवाच ॥ एवमुक्तः शकुनिना धृतराष्ट्रो जनेश्वरः । दुर्योधनं सहामात्यमनुजज्ञे न कामतः २२ अनुज्ञातस्तु गान्धारिः कर्णेन सहितस्तदा ।

झालेला तो महारथी तुमचा वध करण्यास समर्थ होणार नाहीं ही गोष्ट पाहिजे कशाला ? १४. अथवा माझें सांगणें ऐकून घेऊनही जर तुह्मी तिकडे जाण्यास तयार व्हाल तर " वनवासानें उद्विग्न झालेले पांडव आह्मी कांहीं केलें तरी आह्मांला पीडा देणार नाहींत " अशी खात्री धरून जर तुह्मी तेथें वास्तव्य कराल तर तें तुह्मांला दुःखप्रद होईल १५. अथवा सैन्यापैकीं तुमच्या कांहीं लोकांपासून युधिष्ठिराला जर त्रास झाला तर समजून उमजून न केलेल्याही त्या कर्माचा दोष तुमचेकडे येईल १६. तस्मात्, स्मारणाकरितां तुमच्या वतीनें विश्वासु लोकांना जाऊं द्या. हे भरतकुलोत्पन्ना दुर्योधना, स्वतः तूं तेथें जाणें मला रुचत नाहीं १७. शकुनि ह्मणतात:—हे भारता, ज्येष्ठ पांडुपुत्र धर्मवेत्ता आहे आणि " बारा वर्षे वनामध्यें आह्मी वास्तव्य करूं " ह्मणून त्यानें भरसभेंत प्रतिज्ञा केली आहे १८. तेव्हां कुंतिपुत्र युधिष्ठिर आह्मांवर क्रोध करणार नाहीं; आणि ते सर्वही पांडव धर्मनिष्ठ आहेत व त्याला अनुसरून वागणारे आहेत १९. मृगयेला जाण्याची तर आह्मांला अतिशयच इच्छा झालेली आहे; वनामध्यें जाऊन फक्त स्मारण करण्याचा आमचा उद्देश आहे; पांडवांना अवलोकन करण्याचें आमच्या मनांतही नाहीं २०; आमच्या हातून असभ्य आचरण तेथें कांहीं एक होणार नाहीं आणि जेथें पांडवांचें वास्तव्य असेल तेथें आह्मी जाणारही नाहीं २१. वैशंपायन सांगतात:——ह्याप्रमाणें शकुनीनें सांगितलें असतां धृतराष्ट्रराजानें अमात्यांसहवर्तमान दुर्योधनाला जाण्याची अनुज्ञा दिली; परंतु, ती मनापासून दिली नाहीं २२. ह्याप्रमाणें कर्णासहवर्तमान शकुनीला अनुज्ञा

निर्ययौ भरतश्रेष्ठो बलेन महता वृतः २३ दुःशासनेन च तथा सौबलेन च धीमता । संवृतो भ्रातृभिश्चान्यैः स्त्रीभिश्चापि सहस्रशः २४ तं निर्यान्तं महाबाहुं द्रष्टुं द्वैतवनं सरः । पौराश्चानुययुः सर्वे सहदारा वनं च तत् २५ अष्टौ रथसहस्राणि त्रीणि नागायुतानि च । पत्तयो बहुसाहस्रा हयाश्च नवतिः शताः २६ शकटापणवेशाश्च वणिजो बन्दिनस्तथा । नराश्च मृगयाशीलाः शतशोथ सहस्रशः २७ ततः प्रयाणे नृपतेः सुमहानभवस्वनः । प्रावृषीव महावायोरुद्धतस्य विशाम्पते २८ गव्यूतिमात्रे न्यवसद्राजा दुर्योधनस्तदा । प्रयातो वाहनैः सर्वैस्ततो द्वैतवनं सरः २९ [१३७३]
इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यामारण्यके० घोषयात्रापर्वणि दुर्योधनप्रस्थाने ऊनचत्वारिंशदधिकद्विशततमोऽध्यायः ॥२३९॥

वैशम्पायन उवाच ॥ अथ दुर्योधनो राजा तत्र तत्र वने वसन् । जगाम घोषानभितस्तत्र चक्रे निवेशनम् १ रमणीये समाज्ञाते सोदके समहीरुहे । देशे सर्वगुणोपेते चक्रुरावसथान्नराः २ तथैव तत्समीपस्थान्पृथ-

---

झाली असतां भरतवंशजश्रेष्ठ दुर्योधन मोठें सैन्य बरोबर घेऊन निघाला २३. त्याच्याबरोबर दुःशासन, बुद्धिमान् शकुनि, इतरही भ्राते आणि हजारों स्त्रियाही होत्या २४. तो महापराक्रमी दुर्योधन निघाला असता द्वैतवननामक सरावर आणि तें वन अवलोकन करण्याकरितां सर्व नगरवासी जनही स्त्रियांसहवर्तमान त्याच्या मागोमाग गेले २५. त्याच्याबरोबर आठ हजार रथ, तीस हजार हत्ती, अनेक हजार पायदळ आणि नऊ हजार घोडेस्वार होते २६. शिवाय, ओझ्याच्या गाड्या, बाजार, वेश्यासमुदाय, वाणी, स्तुतिपाठक आणि शेंकडों हजारों पारधीही बरोबर हाते २७. तदनंतर हे प्रजाधिपते जनमेजयराजा, पर्जन्यकालामध्यें सुटलेल्या मोठ्या वायूप्रमाणें त्या दुर्योधनराजाच्या प्रयाणसमयीं वाद्यांचा फारच मोठा ध्वनि होऊं लागला २८. प्रस्थानदिवशीं राजा दुर्योधनानें दोन कोसांवरच मुक्काम केला आणि तेथून तो सर्व वाहनांसहवर्तमान द्वैतवननामक सरोवराकडे चालता झाला २९. ह्याप्रमाणें महर्षिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील घोषयात्रापर्वापैकीं दुर्योधनाच्या प्रयाणाविषयीं दोनशें एकुणचाळिसावा अध्याय समाप्त झाला ॥ २३९ ॥

वैशंपायन सांगतातः— तदनंतर दुर्योधनराजा वनामध्यें ठिकठिकाणीं मुक्काम करीत गोकुलासमीप गेला आणि तेथें ठाणें देऊन राहिला १. तेव्हां उदक, वृक्ष आणि इतरही सर्व गुण ह्यांनीं युक्त असा रमणीय प्रदेश आहे असें समजून आल्यावर बरोबरच्या लोकांनींही निवासस्थलें तयार केलीं २ आणि दुर्योधनाच्या समीपच कर्ण,

गावसथान्बहून् । कर्णस्य शकुनेश्चैव भ्रातॄणां चैव सर्वशः ३ ददर्श स तदा गावः शतशोथ सहस्रशः । अङ्कैर्लक्षैश्च ताः सर्वा लक्षयामास पार्थिवः ४ अङ्कयामास वत्सांश्च जज्ञे चोपसृतांस्त्वपि । बालवत्साश्च या गावः कालयामास ता अपि ५ अथ स स्मारणं कृत्वा लक्षयित्वा त्रिहायनान् । वृतो गोपालकैः प्रीतो व्याहरत्कुरुनन्दनः ६ स च पौरजनः सर्वः सैनिकाश्च सहस्रशः । यथोपजोषं चिक्रीडुर्वने तस्मिन्यथामराः ७ ततो गोपाः प्रगातारः कुशला नृत्यवादने । धार्तराष्ट्रमुपातिष्ठन्कन्याश्चैव स्वलंकृताः ८ स स्त्रीगणावृतो राजा प्रहृष्टः प्रददौ वसु । तेभ्यो यथार्हमन्नानि पानानि विविधानि च ९ ततस्ते सहिताः सर्वे तरक्षून्महिषान्मृगान् । गवयर्क्षवराहांश्च समन्तात्पर्यकालयन् १० स तान्छरैर्विनिर्भिद्य गजांश्च सुबहून्वने । रमणीयेषु देशेषु ग्राहयामास वै मृगान् ११ गोरसानुपयुञ्जान उपभोगांश्च भारत । पश्यन्स रमणीयानि

शकुनि व दुर्योधनाचे सर्व भ्राते ह्याच्याकरितां वेगवेगळीं पुष्कळच निवासस्थलें त्यांनीं तयार करून ठेविलीं ३. तेथें जाऊन उतरल्यावर शेंकडों हजारों गाई दुर्योधनाच्या दृष्टी पडल्या व त्या राजानें त्या सर्व खुणा पाहून व मोजून तपासून घेतल्या ४. नंतर नवीन वासरांना त्यानें खुणा केल्या; कामाला लावण्यास योग्य झालेले वत्स किती हेंही त्यानें समजावून घेतलें आणि ज्यांचीं वासरें लहान आहेत अशा गाई किती त्यांचीही त्यानें गणना केली ५. ह्याप्रमाणें स्मारण केल्यानंतर आणि तीन वर्षांचे बैल किती आहेत ते मोजिल्यानंतर गोपालांनीं परिवेष्टित असलेला तो कुरुनंदन दुर्योधन आनंदित होऊन विहार करूं लागला ६. त्याच्या बरोबर गेलेले ते नगरवासी जन आणि हजारों सैनिक आपआपल्या रुचीला अनुसरून त्या वनामध्यें देवांप्रमाणे क्रीडा करूं लागले ७. तदनंतर नाचण्यांत व वाजविण्यांत निपुण असलेले गाणारे गोप आणि उत्कृष्ट अलंकार धारण केलेल्या कन्या धृतराष्ट्रपुत्र दुर्योधनाची सेवा करूं लागल्या असतां ८ स्त्रीसमुदायानें परिवेष्टित झालेल्या त्या दुर्योधन राजानें आनंदित होऊन त्यांना द्रव्य आणि योग्यतेनुरूप नानाप्रकारचे भक्ष्य व पेय पदार्थ अर्पण केले ९. तदनंतर त्या सर्वांनीं एकत्र जुळून तरस, महिष, मृग, गवे, अस्वल आणि डुकरें सर्व बाजूंनीं उठवून दिलीं असतां १० त्या दुर्योधनानें बाणांच्या योगानें त्यांचा वध करून वनामध्यें असंख्यात गजही मारिले आणि रम्य प्रदेशांमध्यें तो मृगांना धरूं लागला ११. हे भरतकुलोत्पन्ना जनमेजया, जातां जातां गोरस आणि इतरही भोग्य वस्तु ह्यांचा तो उपभोग घेऊं लागला आणि

वनान्युपवनानि च १२ मत्तभ्रमरजुष्टानि बर्हिणाभिरुतानि च । अगच्छदानुपूर्व्येण पुण्यं द्वैतवनं सरः १३ मत्तभ्रमरसंजुष्टं नीलकण्ठरवाकुलम् । सप्तच्छदसमाकीर्णं पुन्नागबकुलैर्युतम् १४ ऋद्ध्या परमया युक्तो महेन्द्र इव वज्रभृत् । यदृच्छया च तत्रस्थो धर्मपुत्रो युधिष्ठिरः १५ ईजे राजर्षियज्ञेन साद्यस्केन विशाम्पते । दिव्येन विधिना चैव वन्येन कुरुसत्तम १६ कृत्वा निवेशमभितः सरसस्तस्य कौरव । द्रौपद्या सहितो धीमान्धर्मपत्न्या नराधिपः १७ ततो दुर्योधनः प्रेष्यानादिदेश सहस्रशः । आक्रीडावसथाः क्षिप्रं क्रियन्तामिति भारत १८ ते तथेत्येव कौरव्यमुक्त्वा वचनकारिणः । चिकीर्षन्तस्तदाक्रीडाञ्जग्मुर्द्वैतवनं सरः १९ प्रविशन्तं वनद्वारि गन्धर्वाः समवारयन् । सेनाग्रं धार्तराष्ट्रस्य प्राप्तं द्वैतवनं सरः २० तत्र गन्धर्वराजो वै पूर्वमेव विशाम्पते । कुबेरभवनाद्राजन्नाजगाम गणावृतः २१ गणैरप्सरसां चैव त्रिदशानां

मत्त भ्रमर ज्यांमध्यें आहेत व मयूरपक्ष्यांची गर्जना ज्यात चाललेली आहे अशीं रम्य वनें व उपवनें पहात पहात तो क्रमाक्रमानेंच द्वैतवननामक पुण्य सरोवराकडे गेला १२,१३. त्या सरोवराचा मत्त भ्रमरानीं आश्रय केलेला होता; मयूरपक्ष्यांच्या ध्वनींनीं तें गजबजून गेलेलें होतें; सांतवणाच्या झाडानी तें व्यापलेलें होतें आणि उंडणीच्या झाडानीं व बकुलवृक्षानीही तें युक्त होतें १४. पराकाष्ठेच्या समृद्धीनें युक्त असलेला धर्मपुत्र युधिष्ठिर वज्र धारण करणाऱ्या महेंद्राप्रमाणे तेथें स्वेच्छेनें राहिला होता १५ आणि, हे प्रजाधिपते कुरुवंशजश्रेष्ठा जनमेजया, राजर्षींना करण्यास योग्य असा साद्यस्कसंज्ञक क्रतुही वनाला अनुरूप अशा दिव्य विधीनें त्यानें तेथें आरंभिला होता १६. साराश, हे कुरुकुलोत्पन्ना जनमेजया, त्या सरोवरासंनिध एक निवासस्थल तयार करून बुद्धिमान् प्रजाधिपति धर्मराजा धर्मपत्नी द्रौपदीसहवर्तमान राहिला होता १७. तदनंतर, हे भरतकुलोत्पन्ना जनमेजया, क्रीडेकरितां स्थलें सत्वर तयार करा म्हणून दुर्योधनानें हजारों सेवकांना आज्ञा दिली १८. तेव्हां आज्ञेप्रमाणें वागणारे ते सेवकही " ठीक आहे " असें त्या कुरुवंशजश्रेष्ठ दुर्योधनाला सांगून क्रीडास्थलें तयार करण्याच्या उद्देशानें द्वैतवननामक सरोवराकडे गेले १९; परंतु, धृतराष्ट्रपुत्र दुर्योधनाच्या सेनेचा पुढला भाग द्वैतवननामक सरोवरापाशीं प्राप्त होऊन वनाच्या द्वारामध्यें प्रवेश करूं लागला असतां गंधर्वांनीं त्याला प्रवेश करूं दिला नाहीं २०. कारण, हे प्रजाधिपते जनमेजय राजा, तेथें पूर्वींच गंधर्वगण बरोबर घेऊन गंधर्वराज, कुबेराच्या निवासस्थानापासून, आला होता २१.

तथात्मजैः । विहारशीलः क्रीडार्थं तेन तत्संवृतं सरः २२ तेन तत्संवृतं दृष्ट्वा ते राजपरिचारकाः । प्रतिजग्मुस्ततो राजन्यत्र दुर्योधनो नृपः २३ स तु तेषां वचः श्रुत्वा सैनिकान्युद्धदुर्मदान् । प्रेषयामास कौरव्य उत्सारयत तानिति २४ तस्य तद्वचनं श्रुत्वा राज्ञः सेनाग्रयायिनः । सरो द्वैतवनं गत्वा गन्धर्वानिदमब्रुवन् २५ राजा दुर्योधनो नाम धृतराष्ट्रसुतो बली । विजिहीर्षुरिहायाति तदर्थमुपसर्पत २६ एवमुक्तास्तु गन्धर्वाः प्रहसन्तो विशाम्पते । प्रत्यब्रुवंस्तान्पुरुषानिदं हि परुषं वचः २७ न चेतयति वो राजा मन्दबुद्धिः सुयोधनः । योस्मानाज्ञापयत्येवं वश्यानिव दिवौकसः २८ यूयं मुमूर्षवश्चापि मन्दप्रज्ञा न संशयः । ये तस्य वचनादेवमस्मान्ब्रूत विचेतसः २९ गच्छध्वं त्वरिताः सर्वे यत्र राजा स कौरवः । न चेदद्यैव गच्छध्वं धर्मराजनिवेशनम् ३० एवमुक्तास्तु गन्धर्वै राज्ञः सेनाग्रयायिनः । संप्राद्रवन्यतो राजा धृतराष्ट्रसुतोभवत् ३१ [९४०४] इति श्रीम-

---

सारांश, अप्सरांचे समुदाय, देवगण आणि त्याचप्रमाणें आपले पुत्र बरोबर घेऊन विहार करण्याची संवय असलेला तो गंधर्वराज तेथें आला होता आणि त्याच्या योगानें तें सर्व सरोवर व्याप्त होऊन गेलें होतें २२. हे जनमेजय राजा, तदनंतर त्या गंधर्वराजानें तें सरोवर व्यापून टाकिलें आहे असें अवलोकन करून ते राजसेवक जिकडे दुर्योधनराजा होता तिकडे गेले २३. तेव्हा त्यांचें भाषण श्रवण केल्यावर युद्धामध्यें अतिशयच आवेश चढणार कांहीं सैनिक " त्यांना हाकून द्या " अशी आज्ञा देऊन कुरुवंशज दुर्योधनानें पाठविले २४; व त्या आज्ञेप्रमाणें दुर्योधन राजाच्या सैन्यांतील अग्रणी द्वैतवननामक सरोवरासंनिध जाऊन गंधर्वांना ह्मणाले २५ " धृतराष्ट्रपुत्र दुर्योधननामक बलाढ्य राजा क्रीडा करण्याकरितां इकडे येत आहे. तस्मात्, तुह्मी त्याच्याकडे चला " २६ हे प्रजाधिपते जनमेजया, ह्याप्रमाणें त्या सैन्यांतील अग्रणींनीं गंधर्वांना सांगितलें असतां हंसत हंसत कठोर शब्दांनीं ते गंधर्व त्या राजपुरुषांना ह्मणाले २७ " देव ज्याप्रमाणें सेवकांना आज्ञा करीत असतात त्याप्रमाणें आह्मांला आज्ञा करणाऱ्या तुमच्या मंदबुद्धि सुयोधन राजाला कांहीं समजत नाहीं २८ आणि ज्याअर्थी त्याच्या सांगण्यावरून तुह्मी विवेकशून्य बनून आमच्याशीं ह्याप्रमाणें भाषण करीत आहां त्याअर्थी तुह्मी मंदमति असून तुमचाही मृत्यु जवळ आला आहे ह्यांत संशय नाहीं २९. आतां तुह्मी सर्व जिकडे तो कौरव दुर्योधनराजा असेल तिकडे सत्वर जा; नाहीं तर आजच तुह्मांला राजा यमधर्माचे घरीं जावें लागेल " ३०. ह्याप्रमाणें गंधर्वांनीं दुर्योधनराजाच्या सैन्याग्रणींना सांगितलें असतां ते, जिकडे

हाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यामारण्यके पर्वणि घोषयात्रापर्वणि गन्धर्वदुर्योधनसेनासंवादे चत्वारिंशदधिकद्विशततमोऽध्यायः॥२४०॥

वैशम्पायन उवाच ॥ ततस्ते सहिताः सर्वे दुर्योधनमुपागमन् । अब्रुवंश्च महाराज यदूचुः कौरवं प्रति १ गन्धर्वैर्वारिते सैन्ये धार्तराष्ट्रः प्रतापवान् । अमर्षपूर्णः सैन्यानि प्रत्यभाषत भारत २ शासतैनानधर्मज्ञान्मम विप्रियकारिणः । यदि प्रक्रीडते सर्वैर्देवैः सह शतक्रतुः ३ दुर्योधनवचः श्रुत्वा धार्तराष्ट्रा महाबलाः । सर्व एवाभिसन्नद्धा योधाश्चापि सहस्रशः ४ ततः प्रमथ्य सर्वांस्तांस्तद्वनं विविशुर्बलात् । सिंहनादेन महता पूरयन्तो दिशो दश ५ ततो परैरवार्यन्त गन्धर्वैः कुरुसैनिकाः ६ ते वार्यमाणा गन्धर्वैः साम्नैव वसुधाधिप ।ताननादृत्य गन्धर्वास्तद्वनं विविशुर्महत् ७ यदा वाचा न तिष्ठन्ति धार्तराष्ट्राः सराजकाः । ततस्ते खचराः सर्वे चित्रसेने न्यवेदयन् ८ गन्धर्वराजस्तान्सर्वानब्रवीत्कौरवान्प्रति । अनार्याञ्शा-

---

धृतराष्ट्रपुत्र दुर्योधनराजा होता तिकडे पळत सुटले ३१. ह्याप्रमाणे महर्षिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील घोषयात्रापर्वापैकीं गंधर्व आणि दुर्योधनसेना ह्यांच्या संवादाविषयी दोनशें चाळिसावा अध्याय समाप्त झाला ॥ २४० ॥

वैशंपायन सांगतातः—हे जनमेजय महाराजा, तदनंतर ते सर्वही सैनिक एकत्र जुळून दुर्योधनाकडे गेले आणि कौरव दुर्योधनाला उद्देशून जो निरोप गंधर्वांनीं सांगितला होता तो त्यानीं त्याला कळविला १; परंतु, गंधर्वांनीं सैन्याला अडथळा केला असतां, हे भरतकुलोत्पन्ना जनमेजया, प्रतापी धृतराष्ट्रपुत्र दुर्योधन क्रोधानें परिपूर्ण झाला आणि आपल्या सेनांना ह्मणाला २ " सर्व देवासहवर्तमान इंद्र जरी तेथें क्रीडा करीत असला तरी चिंता नाहीं; माझ्या इच्छेविरुद्ध वागणाऱ्या ह्या अधर्मज्ञ गंधर्वांना तुह्मी शासन करा " ३. हें दुर्योधनाचें भाषण श्रवण करून सर्व महाबलाढ्य धृतराष्ट्रपुत्र आणि दुसरेही हजारों योद्धे संग्रामाकरितां सज्ज झाले ४. तदनंतर वनाच्या द्वारामध्यें असलेल्या त्या सर्वांना जिंकून मोठ्या सिंहनादानें दशदिशा दणाणीत दणाणीत ते बलात्कारानें त्या वनामध्यें प्रविष्ट झाले ५. ह्यानंतर दुसऱ्या गंधर्वांनीं कुरुसैनिकांचें निवारण केलें ६; परंतु, हे पृथ्वीपते जनमेजया, ह्याप्रमाणें सौम्य उपायाच अवलंबन करून गंधर्व त्या कुरुसैनिकांचें निवारण करूं लागले असतां त्या गंधर्वांना न जुमानितां ते त्या महावनामध्यें प्रविष्ट झाले ७. असो. राजासहवर्तमान धृतराष्ट्रपुत्र जेव्हां सांगितलेलें ऐकेनात तेव्हां त्या सर्वही गगनामध्यें संचार करणाऱ्या गंधर्वांनीं चित्रसेनाला तो वृत्तांत निवेदन केला ८. तेव्हां

सतेत्येतांश्चित्रसेनोत्यमर्षणः ९ अनुज्ञाताश्च गन्धर्वाश्चित्रसेनेन भारत । प्रगृहीतायुधाः सर्वे धार्तराष्ट्रानभिद्रवन् १० तान्दृष्ट्वापततः शीघ्रान्गन्धर्वानुद्यतायुधान् । प्राद्रवंस्ते दिशः सर्वे धार्तराष्ट्रस्य पश्यतः ११ तान्दृष्ट्वा द्रवतः सर्वान्धार्तराष्ट्रान्पराङ्मुखान् । राधेयस्तु तदा वीरो नासीत्तत्र पराङ्मुखः १२ आपतन्तीं तु संप्रेक्ष्य गन्धर्वाणां महाचमूम् । महता शरवर्षेण राधेयः प्रत्यवारयत् १३ क्षुरप्रैर्विशिखैर्भल्लैर्वत्सदन्तैस्तथायसैः । गन्धर्वाञ्शतशोभिघ्नँल्लघुत्वात्सूतनन्दनः १४ पातयन्नुत्तमाङ्गानि गन्धर्वाणां महारथः । क्षणेन व्यधमत्सर्वां चित्रसेनस्य वाहिनीम् १५ ते वध्यमाना गन्धर्वाः सूतपुत्रेण धीमता । भूय एवाभ्यवर्तन्त शतशोथ सहस्रशः १६ गन्धर्वभूता पृथिवी क्षणेन समपद्यत । आपतद्भिर्महावेगैश्चित्रसेनस्य सैनिकैः १७ अथ दुर्योधनो राजा शकुनिश्चापि सौबलः । दुःशासनो विकर्णश्च ये चान्ये धृतराष्ट्रजाः १८ न्यहनंस्तत्तदा सैन्यं रथैर्गरुडनिःस्वनैः । भूयश्च योधयामासुः कृत्वा कर्णमथाग्रतः १९ महता रथसङ्घेन

गंधर्वराज चित्रसेन अत्यंत क्रुद्ध झाला आणि "ह्या दुष्टांना शासन करा" असें कौरवांना उद्देशून त्या सर्वांना ह्मणाला ९. हे भरतकुलोत्पन्ना जनमेजया, ह्याप्रमाणें चित्रसेनानें अनुज्ञा दिल्यावर ते सर्व गंधर्व हातांमध्यें आयुधें घेऊन धृतराष्ट्राच्या पुत्रांवर चालून गेले १० व आयुधें उगारून ते शीघ्रगामी गंधर्व चाल करून येत आहेत असें अवलोकन करितांक्षणीं धृतराष्ट्रपुत्र दुर्योधनाचे समक्ष ते सर्वही चोहोंकडे पळूं लागले ११. परंतु, युद्धापासून पराङ्मुख होऊन पळत सुटलेल्या त्या सर्वांना अवलोकन केल्यावरही राधापुत्र वीर कर्ण त्या संग्रामामध्यें पराङ्मुख झाला नाहीं १२. इतकेंच नव्हे परंतु, गंधर्वांची ती मोठी सेना आपल्यावर चाल करून येत आहे असें पाहून मोठ्या बाणवृष्टीनें कर्णानें तिचें निवारणही केलें १३. क्षुरप्र, विशिख, भल्ल आणि वत्सदंत आणि त्याचप्रमाणें लोहमय बाणांनीं तो सूतपुत्र कर्ण शेंकडों गंधर्वांचा वध करूं लागला १४ आणि गंधर्वांचीं मस्तकें खालीं पाडीत पाडीत त्या महारथी कर्णानें एका क्षणांत चित्रसेनाची ती सर्व सेना उडवून दिली १५; परंतु, तो बुद्धिमान् सूतपुत्र कर्ण गंधर्वांचा वध करूं लागला असतांही शेंकडों हजारों गंधर्व आणखी तेथें येऊं लागले १६ आणि ह्याप्रमाणें चित्रसेनाचे महावेगवान् सैनिक येऊं लागले असतां एका क्षणामध्यें ती पृथ्वी गंधर्वमय होऊन गेली १७. तदनंतर दुर्योधन राजा, सुबलपुत्र शकुनि, दुःशासन, विकर्ण आणि इतरही धृतराष्ट्रपुत्र १८ ह्यांनीं गरुडाप्रमाणें गर्जना करणाऱ्या रथांवर आरूढ होऊन गंधर्वसैन्य मारण्यास

रथचारेण चाप्युत । वैकर्तनं परीप्सन्तो गन्धर्वान्समवाकिरन् २० ततः
संन्यमवन्सर्वे गन्धर्वाः कौरवैः सह । तदा सुतुमुलं युद्धमभवल्लोमहर्ष-
णम् २१ ततस्ते मृदवोभूवन्गन्धर्वाः शरपीडिताः । उच्चुक्रुशुश्च
कौरव्या गन्धर्वान्प्रेक्ष्य पीडितान् २२ गन्धर्वांस्त्रासितान्दृष्ट्वा चित्रसेनो
ह्यमर्षणः । उत्पपातासनात्क्रुद्धो वधे तेषां समाहितः २३ ततो मायास्त्र-
मास्थाय युयुधे चित्रमार्गवित् । तयामुह्यन्त कौरव्याश्चित्रसेनस्य मायया २४
एकैकस्य तदा योधा धार्तराष्ट्रस्य भारत । पर्यवर्तन्त गन्धर्वैर्दशभिर्द-
शभिः सह २५ ततः संपीड्यमानास्ते बलेन महता तदा । प्राद्रवन्त रणे
भीता ये च राजञ्जिजीषवः २६ भज्यमानेष्वनीकेषु धार्तराष्ट्रेषु सर्वशः ।
कर्णो वैकर्तनो राजंस्तस्थौ गिरिरिवाचलः २७ दुर्योधनश्च कर्णश्च शकु-
निश्चापि सौबलः । गन्धर्वान्योधयामासुः समरे भृशविक्षताः २८ सर्वे

आरंभ केला आणि कर्णाला पुढें करून ते मोठ्या निकरानें युद्ध करूं लागले १९ व प्रचंड रथसमुदायानें आणि सयुक्तिक रथसंचारानें सूर्यपुत्र कर्णाचें रक्षण करीत करीत त्यांनीं गंधर्वांवर बाणांचा वर्षाव केला २०. तदनंतर सर्व गंधर्व तुटून पडले आणि कौरवांसहवर्तमान त्यांचें अंगावर कांटा आणणार फारच तुमुल युद्ध झालें २१; परंतु, त्या युद्धामध्यें गंधर्व बाणांनीं जर्जर झाल्यामुळें कांहींसे मृदु आले. तेव्हां बाणांनीं जर्जर झालेल्या गंधर्वांना अवलोकन करून कौरवांकडील योद्धे मोठ्या मोठ्यानें गर्जना करूं लागले २२. शेवटीं गंधर्व त्रस्त झालेले अवलोकन करून चित्रसेनाला सहन न झाल्यामुळें कौरवांचा वध करण्याचा उद्देश मनांत धरून तो क्रुद्ध झाला आणि आसनावरून उठला २३. तदनंतर अद्भुत युद्धमार्ग जाणणाऱ्या चित्रसेनानें मायास्त्राचें अवलंबन करून युद्ध करण्याला आरंभ केला असतां त्या चित्रसेनाच्या मायेनें कौरवांकडील योद्धे मोहित झाले २४ आणि, हे भरतकुलोत्पन्ना जनमेजया, दुर्योधनाच्या बाजूला असलेल्या एकेका योद्ध्याशीं दहा दहा गंधर्व युद्ध करूं लागले २५. तदनंतर मोठ्या सैन्यामुळें ते कौरवपक्षीय योद्धे जर्जर होऊं लागले असतां भयभीत झाले आणि, हे राजा, त्यांमध्यें जे जिवाची आशा धरून होते ते रणांत पळत सुटले २६. परंतु, धृतराष्ट्रपुत्र दुर्योधनाच्या सर्व सेनांची जरी ह्याप्रमाणें दाणादाण उडून गेली तरी, हे जनमेजयराजा, सूर्यपुत्र कर्ण पर्वताप्रमाणें रणामध्यें निश्चल उभा राहिला २७ आणि रणामध्यें जरी अतिशय जखमा लागल्या होत्या तरी दुर्योधन, कर्ण व सुबलपुत्र शकुनि ह्यांनींही गंधर्वांशीं युद्ध सुरूं ठेविलेंच होतें २८. असें होतां होतां शेवटीं ते सर्व शेंकडों हजारों गंधर्व वध करण्याच्या उद्देशानें

एव तु गंधर्वाः शतशोथ सहस्रशः । जिघांसमानाः सहिताः कर्णमभ्यद्रवन्रणे २९ असिभिः पट्टिशैः शूलैर्गदाभिश्च महाबलाः । सूतपुत्रं जिघांसन्तः समन्तात्पर्यवाकिरन् ३० अन्येस्य युगमच्छिन्दन्ध्वजमन्ये न्यपातयन् । ईषामन्ये हयानन्ये सूतमन्ये न्यपातयन् ३१ अन्ये छत्रं वरूथं च बन्धुरं च तथापरे । गन्धर्वा बहुसाहस्रास्तिलशो व्यधमन्रथम् ३२ ततो रथादवप्लुत्य सूतपुत्रोसिचर्मभृत् । विकर्णरथमास्थाय मोक्षायाश्वानचोदयत् ३३ [९४३७] इति श्रीमहाभारते० आरण्यके पर्वणि घोषयात्रापर्वणि कर्णपराभव एकचत्वारिंशदधिकद्विशततमोध्यायः ॥ २४१ ॥

वैशम्पायन उवाच ॥ गन्धर्वैस्तु महाराज भग्ने कर्णे महारथे । संप्राद्रवच्चमूः सर्वा धार्तराष्ट्रस्य पश्यतः १ तान्दृष्ट्वा द्रवतः सर्वान्धार्तराष्ट्रान्पराङ्मुखान् । दुर्योधनो महाराजो नासीत्तत्र पराङ्मुखः २ तामापतन्तीं संप्रेक्ष्य गन्धर्वाणां महाचमूम् । महता शरवर्षेण सोभ्यवर्षदरिंदमः ३ अचिन्त्य शरवर्षं तु गन्धर्वास्तस्य तं रथम् । दुर्योधनं जिघांसन्तः समन्ता-

---

एकत्र जुळून रणामध्यें कर्णावर धाऊन गेले २९ आणि सूतपुत्र कर्णाचा वध करण्याकरितां त्या महाबलाढ्य गंधर्वांनीं त्याच्यावर खड्ग, पट्टे, शूल आणि गदा ह्यांची सर्व बाजूंनीं वृष्टि केली ३०. कांहींनीं त्याच्या रथाचें जूं मोडून टाकिलें; कांहींनीं ध्वज पाडिला; कांहींनीं दांडी तोडिली; कांहींनीं अश्वाचा वध केला; कांहींनीं सारथ्याला परलोक दाखविला ३१; कांहींनीं छत्र नाहींसें केलें; कांहींनीं रथाचें कवच फोडून टाकिलें; कांहींनीं रथाचें बंधन तोडिलें आणि इतर अनेक हजार गंधर्वांनीं तिलप्राय तुकडे तुकडे करून तो रथ उडवून दिला ३२. परंतु, असा प्रकार जेव्हां होऊं लागला तेव्हां सूतपुत्र कर्णानें ढाल तरवार घेऊन रथाखालीं उडी घातली आणि गंधर्वांच्या तावडींतून निसटून जाण्याकरितां विकर्णाच्या रथावर बसून त्यानें घोडे पिटले ३३. ह्याप्रमाणे महर्षिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील घोषयात्रापर्वांपैकीं कर्णाच्या पराभवाविषयीं दोनशें एकेचाळिसावा अध्याय समाप्त झाला ॥ २४१ ॥

वैशंपायन सांगतात:—हे जनमेजय महाराजा, गंधर्वांनीं महारथि कर्णाचा पराभव केला असतां धृतराष्ट्रपुत्र दुर्योधनाला न जुमानितां सर्व सेना पळत सुटली १; परंतु, पराङ्मुख होऊन ते सर्व धृतराष्ट्रपुत्र पळत सुटले आहेत असें अवलोकन करूनही दुर्योधनमहाराज त्या रणामध्यें पराङ्मुख झाला नाहीं २. इतकेंच नव्हे परंतु, तें गंधर्वांचें मोठें सैन्य चाल करून येत आहे असें अवलोकन करून त्या शत्रुदमन करणाऱ्या दुर्योधनानें त्या सैन्यावर बाणांचा मोठा वर्षावही केला ३. तथापि त्या